म. ग्रं. सं. ठाणे
विषय ...I.C.L.E.I....
सं. क्र. ३७५६



इन्कीलाब

सुरेन्द्र बारलिंगे

REFBK-0024933

संदर्भ निबंध
३१५६
२३९३३
१८।४।८६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना:—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५[८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

11 MAY 1986
25 MAY 1986
22 JUN 1986
2 MAY 1987
2 SEP 1987

(क्र. मा. पहा)
५०००-३-८४

इन्किलाब

सुरेंद्र बारलिंगे

REFBK-0024933

श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

प्रकाशक :
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

© सुरेन्द्र बारलिंगे

प्रकाशनकाल : प्रथमावृत्ती
२८ डिसेंबर १९८५ (काँग्रेस जन्मशताब्दी)

मुखपृष्ठ : सुभाष अवचट

मूल्य : साठ रुपये

मुद्रक :
सौ. कमल रामचंद्र घळसासी
संजीव मुद्रणालय
४६९ सदाशिव, पुणे ३०

ज्यांच्यावाचून
'इन्किलाब' चालविण्याची कल्पना करणे सुद्धा
अशक्य होते :

भास्कर फडणीस
चिंतामणी चिंचाळकर
मनोहर पाध्ये
सुशीला बारलिंगे
यांस



ओळख

डॉ. सुरेंद्र बारलिंगे हे पुणे विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभागाचे प्रमुख म्हणून सेवा-निवृत्त झाले. तत्पूर्वी महाराष्ट्र, आंध्र, दिल्ली व वेंकटेश्वर विद्यापीठ अशा विविध भागांत प्राध्यापक, प्राचार्य अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी सांभाळल्या. त्यांच्या षष्टयब्द-पूर्तीनिमित्त जो लेखसंग्रह समारंभपूर्वक प्रसिद्ध झाला तो एका बाजूला त्यांच्या विद्व-न्मान्यतेची तर दुसऱ्या बाजूला त्यांच्या लोकप्रियतेची साक्ष देणारा होता. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे ते अध्यक्ष आहेत. त्यांच्या कालखंडात मंडळ जेवढे गाजले तेवढे त्याच्या जन्मापासून ते कधीच गाजले नव्हते! ते कल्पक आहेत. त्यांना वादाची खुमखुमी असते. नवे काही उत्साहाने करताना वादळे उठण्याची तमा ते बाळगत नाहीत. साठी ओलांडल्यावर त्यांची ही प्रतिमा; तो माणूस ऐन तारुण्यात कसा असेल असा विचार कधी कोणाच्या मनात आला असेल की नाही कोणाला ठाऊक, पण 'इन्किलाब' नावाचे एक नियतकालिक त्या काळात ते आणि त्यांचे मित्र चालवत असत. १९४६ ते १९४८ या कालखंडात त्यांनी त्यात जे लिखाण केले त्यावरून त्याची काहीशी कल्पना येईल. त्या दृष्टीने या पुस्तकाचे एक महत्त्व आहे.

१९८५ हे विश्व युवावर्ष– इंटरनॅशनल युथ इयर म्हणून साजरे करावे असे युनोने सर्व सदस्य राष्ट्रांना कळवले आहे. त्याची कमी-जास्त तयारी सर्व देशांत सुरू झाली आहे. अशा कालखंडात हे पुस्तक प्रकाशित होण्यात एक विशेष औचित्य साधले आहे. ज्या काँग्रेसबरोबर ऐन तारुण्यात सुरेंद्र बारलिंगे यांचा घनिष्ठ संबंध होता त्या काँग्रेसची शंभर वर्षे १९८५ मध्येच भरत आहेत, हाही एक योगायोग आहे. त्यांनी आपल्या प्रस्तावनेत असे म्हटले आहे की 'अजूनही या लेखांचे ताजेपण (दुर्दैवाने) कायम राहिले आहे' कारण 'त्या काळातील राजकीय-सामाजिक प्रश्न आजही तसेच आहेत.' या शब्दांत दोन संभाव्यता सूचित होतात : एक म्हणजे लेखक हा फार प्रतिभासंपन्न आणि द्रष्टा

असल्याने कालातीत असे महत्त्वाचे लिखाण त्याने करून ठेवले आणि दुसरे म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळात हा देश अशा निकम्या मंडळींच्या हाती गेला की, तीन तपांपूर्वीचे राजकीय, सामाजिक प्रश्न तसेच कायम राहिले आहेत. डॉ. सुरेंद्र बारलिंगे हे प्रास्तविकात विनयाने 'दुर्दैवाने' असा शब्द कंसात का होईना वापरतात तेव्हा त्यांची वेदना आणि नेतृत्वाबद्दलचा निषेधच ते प्रकट करतात.

यौवनाच्या लक्षणांची चर्चा सध्या जगभर चालली आहे. कारण युवाशक्ती अनावर झाली आहे असा समज वडीलधाऱ्या मंडळींनी करून घेतला आहे आणि त्यामुळे जगाची आजची दुर्दशा उद्भवली आहे असे वडीलधाऱ्यांचे म्हणणे आहे! या वडीलधाऱ्यांच्या छत्राखालीच ही पिढी तयार झाली आहे, ह्या गोष्टीचे ह्या वडीलधाऱ्यांना सोयीस्कर विस्मरण होते! परिहासविजल्पिताला परमार्थाचे वचन समजण्याचा मूढपणा करणे हा तारुण्याचा स्वभावगुणच असतो आणि त्यामुळे वडीलधाऱ्यांची पंचाईत होते. अशी पंचाईत त्या काळी डॉ. सुरेंद्र बारलिंगे किती कणखरपणे करीत होते ते या लेखांतील पानापानांतून दिसून येते. आजही ते अशा वृत्तीचे मनोमन स्वागतच करतील असे मी समजतो. त्याचे चटके वडीलधाऱ्यांना बसतच असतात. ते त्यांनी विनतक्रार आणि सोशिकपणे पत्करले तर युवाशक्तीशी त्यांना संधान बांधता येऊ शकते. डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांच्यात ही क्षमता आहे आणि ती त्यांच्या दार्शनिक वृत्तीतून आली आहे, असे समजायला हरकत नाही.

डॉ. सुरेंद्र बारलिंगे तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्याच्या निमित्ताने अंमळनेरच्या तत्त्वज्ञान मंदिरात काही काळ होते. त्या काळात साने गुरुजी अनेकविध कामे तेथे करत होते आणि त्याचेही काही संस्कार कळत न कळत त्यांच्यावर झाले आहेत. 'धडपड' या एका शब्दाने साने गुरुजींनी मराठी भाषेला संपन्नता आणली आणि तशा धडपड्या मंडळींत सुरेंद्र बारलिंगे यांचा समावेश आहे. ही धडपड ज्यांना गैरसोयीची असते, त्यांना ते बारलिंगे यांचे उपद्व्याप वाटतात आणि मग त्यांच्या कार्याला आजारपण तर आले नाही ना, अशी जाहीर शंका माणसे व्यक्त करतात, पण कालांतराने आपण ज्याला आजारपण समजलो त्या नवनिर्माणाच्या कळा होत्या हे ध्यानी येते आणि मग आपल्या चुकीची कबुली देण्याचीही पाळी येते.

१९४० ते १९५० हे भारताच्या इतिहासातले आणि बहुधा जगाच्या इतिहासातील एक खळबळजनक दशक होते. अशा काळात जिवंत असणे हे देखील भाग्याचे, पण त्यातही उसळत्या रक्ताचे तरुण असणे हे परम भाग्याचे वाटले, तर आश्चर्य नाही. किती घडामोडी जगभर होत होत्या. दुसरे महायुद्ध आले आणि गेले, पण जगाला नव्या उंबरठ्यावर उभे करून गेले. म. गांधी 'चले जाव' चळवळीच्या वेळी म्हणाले होते की, भारताचे स्वातंत्र्य ही जगातील सर्व गुलाम राष्ट्रांच्या स्वातंत्र्याची गुरुकिल्ली

आहे आणि त्याचे प्रत्यंतर येऊ लागले होते. तारुण्याचा एक कैफ असतो आणि त्या कैफात आपल्याला विश्वरहस्य उमगले असे माणसाला वाटते. डॉ. बारलिंगे यांच्या प्रायः सर्व लेखांत हा सूर आहे. त्या लेखांची नुसती शीर्षके वाचली तरी ही गोष्ट ध्यानी येते. प्रायः सर्व शीर्षके आदेशवजा आहेत. 'अधिकार निर्माण करा', 'काँग्रेसचे जनसंघ स्थापन करा', 'परिस्थितीस साजेसे क्रांतितंत्र निर्माण करा', 'जनतारूप व्हा', 'या पाकिस्तान आणि व्हा मोकळे', 'आता चला समाजक्रांतीच्या वाटेने', 'जुनागड खालसा करा' हे आदेश खरोखर कोणासाठी होते, ते अमलात आणणारी काही यंत्रणा होती काय, या गोष्टी आज सुचतात. तारुण्याच्या कैफात त्या सुचण्याची शक्यता नसते. लोकमान्य टिळकांच्या संदर्भातला एक प्रसंग येथे आठवतो. लोकमान्य टिळकांचे दरवाजे तरुणांसाठी नेहमीच सताड उघडे असत. एकदा काही भारावलेले तरुण टिळकांकडे गेले. टिळकांनी त्यांचे स्वागत केले. ते तरुण 'असे केले पाहिजे, तसे केले पाहिजे' असे ठासून सांगू लागले. टिळकांनी बराच वेळ शांतपणे त्यांचे ऐकून घेतले आणि मग म्हणाले, 'हे सारे कोण करणार?' ते तरुण मग एकमेकांच्या तोंडाकडे पाहू लागले. तेव्हा लोकमान्य म्हणाले, "गांजाच्या चिलमीचे दोन झुरके घेतले की कल्पनांचे असे भुईनळे उडू लागतात. कल्पनांची आपल्याकडे मुळीच वाण नाही, पण त्या कल्पना प्रत्यक्षात आणणारे बळ आपल्याजवळ नाही. खरा प्रश्न उदात्त, भव्य कल्पना सगुण— साकार करणारी शक्ती कोणती हा आहे." डॉ. बारलिंगे यांची ही आदेशवजा शीर्षके वाचली की लोकमान्यांच्या जीवनातील ह्या प्रसंगाची आठवण होते. कल्पनांच्या आत्म्याला भूमीशी बद्ध करून ठेवील असे शरीर लाभते तेव्हा नवनिर्माणाचे कार्य होते. डॉ. बारलिंगे यांच्यासारख्या आमच्या पिढीची ही शोकांतिका आहे की आमच्या कल्पना अचूक होत्या, परंतु त्या आत्म्याला शरीराची, संघटनेची जोड आम्हाला देता आली नाही. त्यामुळे आज हे लेख एखाद्या करुण विलापिकेसारखे वाटतात. 'चले जाव' चळवळीचे नेतृत्व करण्याचा कैफ असणाऱ्या सर्वांच्याच जीवनाची ही एक प्रकारची शोकांतिका आहे, पण आजही ती मंडळी अपराजित हृदयाने धडपड करीत आहेत. पडतानाही ती धडपणे पडत आहेत हेही कमी नाही. कारण त्यांच्या यशापयशाच्या व्याख्याच वेगळ्या आहेत.

जयप्रकाशांवर सत्ताधाऱ्यांनी अशा आरोपाची झडी लावली तेव्हा जयप्रकाश म्हणाले, "साफल्य आणि वैफल्य यांची माझी व्याख्याच वेगळी आहे. जग ज्याला वैफल्यच समजते तो अधिक उच्च उड्डाण घेण्याचा एक टप्पा माझ्या दृष्टीने असतो. आणि असे अनेक टप्पे मला ओलांडायचे आहेत. माझे मुक्कामाचे ठिकाण फार दूर आहे. मार्गात कितीही अडथळे आले तरी मी थांबू शकत नाही. माझी अपेक्षा एवढीच आहे की, युवकांच्या मार्गातील काटे तेवढे दूर व्हावे." अशा माणसाचे अपयश हे इतरांच्या

लौकिक यशापेक्षा अधिक ऊर्जस्वल असते. एखादा किलोमीटर जाणारा 'यशस्वी' होतो, 'गौरीशंकर' गाठण्यासाठी निघालेला मनुष्य 'अपेशी' होतो, पण गौरीशंकर चढण्याची उमेद धरून प्रस्थान करणाराचे अपयश हे एक किलोमीटर चालून जाणाराच्या यशापेक्षा मोठे असते. कारण एक किलोमीटरवाला तिथेच बसकण मारून हाशहुश करू लागतो. गौरीशंकरवाला अथक चालत राहतो व इतरांना त्याची ओढ लावतो. डॉ. बारलिंगे ज्या समाजवादी गोटाबरोबर त्या काळात होते त्याची स्थिती काहीशी अशीच आहे. अपयशाने नामोहरम न होता, अपराजित हृदयाने त्यांची धडपड अद्याप चालूच आहे. उलट डॉ. बारलिंगे यांच्यासारख्यांना क्षणकाल सत्ताधाऱ्यांच्या निकट जाता आले तरी नोकरशाहीच्या अजगरविळख्यात त्यांचे प्राण गुदमरत असतात.

डॉ. बारलिंगे यांच्या ह्या लेखांना ठोस अशी एक मूल्यांची बैठक आहे. त्या निकषावर ते घटनांची तपासणी करण्याची धडपड करतात. राष्ट्रीयता, लोकशाही, समाजवाद, असांप्रदायिक नागरिकत्व आणि विज्ञानाभिमुखता ही ती मूल्ये होत. त्या कसाला एखादी घटना उतरत नाही असे दिसते तेव्हा ते स्वजनांवरही निकराने तुटून पडतात. अस्पृश्यतानिवारणासंबंधीचे विधेयक मंत्री म्हणून त्यांच्या बंधूंनीच त्या काळच्या मध्यप्रदेश विधानसभेत आणले. पुरोगामी तोंडावळ्याच्या त्या विधेयकात मंदिरप्रवेशाचा अंतर्भाव नव्हता आणि त्याबाबत अशी मखलाशी करण्यात आली होती की, अद्याप लोकमानस त्या गोष्टीला तयार नाही! डॉ. सुरेंद्र बारलिंगे या उणिवेवर निकराने तुटून पडतात. केवळ लोकमतासाठी मूल्यांबाबत हयगय करणे त्यांना मान्य नाही. अविकसित देशांत लोकानुनयाची भूमिका घेतली तर परंपरागत अन्यायांचे निवारण कधीच होऊ शकणार नाही, हे उघड आहे. सतीसारखी प्रथा लोकमताचा अनुनय करण्याने सुटली नसती, त्याबाबतीत कणखरपणाची गरज असते. मूल्यनिष्ठेतून लोकशाहीत हा कणखरपणा निर्माण होत असतो. आणि तो राज्यकर्ते पुरेशा प्रमाणात दाखवत नाहीत, हा तक्रारीचा सूर बहुतेक लेखांत आहे. स्वातंत्र्याच्या उषःकाली अपेक्षांचा प्रचंड स्फोट व्हावा हे स्वाभाविक आहे, पण नेते सत्तास्थानी गेल्यावर प्रत्येक गोष्टीतच सबुरीचा सल्ला देत राहिले. ही सबुरी आणि समजूतदारपणा आता लोकांच्या इतका अंगवळणी पडला आहे की तोच एक राष्ट्रीय चिंतेचा विषय व्हावा.

आपण काहीही केले तरी समंजसपणे लोक सारे सहन करतात, हे खरोखर नेतृत्वाचे यश समजायचे की असे शेणामेणाचे गोळे बरोबर घेऊन नवराष्ट्र निर्मिती करता येणार नाही याची चिंता करायची? लाचलुचपत, भ्रष्टाचार, दमन, अन्याय लोक मुर्दाडपणे, मुकाट्याने सहन करतात व त्यामुळे आपल्या हातची सत्ता सुरक्षित राहते म्हणून जे राज्यकर्ते आनंदात असतात त्यांना निर्भयपणे ही चिंता करण्याची बाब आहे असे सांगणाऱ्यांची नेहमीच गरज असते. आचार्य जावडेकरांनी अशा निर्भय, निर्वैर आणि

निष्पक्ष यतिशक्तीची आवश्यकता प्रतिपादन केली होती. सत्ताधाऱ्यांना व सत्ताकांक्षींना अंकुश लावू शकणारी अशी शक्ती उभी राहिली नाही तर समाजात जडता निर्माण होते. विनोबांनी ह्या यतिशक्तीला आचार्यशक्ती संबोधले होते. पत्रकार अशी शक्ती बनू शकतात आणि 'इन्किलाब'मधील सुरेंद्र बारलिंगे यांचे हे लेख याची ग्वाही देतील.

हे लेख ज्या काळात, ज्या वयात आणि ज्या मूल्यप्रेरणेने डॉ. बारलिंगे यांनी लिहिले त्याच अवस्थेत मीही असल्याने ह्या लेखात माझ्याच जाणिवा प्रतिबिंबित झाल्यासारखे मला वाटले. हे प्रास्ताविक म्हणजे पुस्तकाचे मूल्यमापन नसून त्या अवस्थेची ओळख करून देण्याचा एक अल्पसा प्रयत्न आहे. त्याची संधी लेखक-प्रकाशकांनी दिली याबद्दल त्यांचा मी आभारी आहे.

यदुनाथ थत्ते



जडणघडण—माझी आणि इन्किलाबची

माझ्या आयुष्यातील सार्वजनिक जीवनाची सुरुवात १९२८ सालापासून झाली असे म्हणावे लागेल. याची कारणे दोन– एक तर, नागपूर शहरापासून दूर राहात असल्यामुळे मी घरातून कोठे बाहेर गेलोच नव्हतो. शाळेतील शिक्षणाशीही माझा संपर्क आला नव्हता. त्यामुळे मी आणि माझे घर याशिवाय मला दुसरे काहीही माहिती नव्हते. पण २७–२८ साल हे आणखी एका दृष्टीने महत्त्वाचे होते. सायमन कमिशन हिंदुस्थानात आल्यावर ठिकठिकाणी प्रचंड आंदोलने झाली, परदेशी मालाच्या विशेषत: टोप्यांच्या होळ्या त्या दिवसांत झाल्या आणि त्यामुळे जी जागृती झाली तिला कशाचीही तोड नव्हती. नागपुरात ठिकठिकाणी परदेशी कापडांच्या होळ्या होताहेत हे ऐकताच मी घरातून कसा सटकलो हे मला माहीत नाही. पण माझ्या डोक्यावरची जरीची टोपी जेव्हा एका धगधगत्या होळीत टाकली, त्या वेळी आयुष्यात कृतकृत्य झाल्याचा भास मला पहिल्या प्रथम झाला. याच सुमारास भय्याजी कायंदे यांच्या शाळेत जाण्याचाही प्रसंग आला आणि त्यातून गुरुवर्य कै. भय्याजी कायंदे, गुरुवर्य पां. कृ. सावळापूरकर, कै. बाळाजी हुद्दार यांचे तर आयुष्यात नाते जडलेच पण कै. राजा बढे आणि त्यांचे बंधू व माझे वर्गबंधू कै. बकुल बढे आणि कै. दक्षिणामूर्ती ऊर्फ बाळशास्त्री हरदास यांचीही अतूट मैत्री झाली.

ते दिवस अत्यंत गतिमान होते. पायाखालचा काळ हा सपाटून सरकत होता. नवीन नवीन संस्कार घडत होते आणि मतांची जडणघडण होत होती. माझ्या एका लेखात (माझे गुरू भय्याजी कायंदे) त्या काळचे मी थोडेसे वर्णन केले आहे. पण मी त्या काळातच राहिलो असतो तर संघाचा स्वयंसेवक झालो असतो, कदाचित कार्यकर्तापण झालो असतो. परंतु कै. डॉ. मुंजे यांच्या सान्निध्यात मी चाललो आहे अशी शंका येताच माझ्या वडिलांनी माझी श्री. कायंदे यांच्या शाळेतून उचलबांगडी केली आणि तेथून

माझ्या आयुष्यातील एका नवीन पर्वाला सुरुवात झाली. १९३० सालची महात्मा गांधींची सविनय कायदेभंगाची आणि मिठाच्या सत्याग्रहाची चळवळ सुरू झाली तेव्हा मी जेमतेम ११ वर्षांचा असेन. धवसे यांच्या शाळेत माझे नाव टाकले गेले होते. पण त्या वेळचे आमचे विद्यार्थी पुढारी मारवाडी प्रेसचे एक मालक श्री. नारायणदास यांच्याबरोबर शाळेत हरताळ पाळणे आणि प्रभातफेऱ्या व मिरवणुकी काढणे हाच आमचा उद्योग झाला होता. आमच्या शाळेजवळच खादीभांडार होते. तेथील व्यवस्थापक श्री. नूरमहंमद यांचीही माझी त्या काळात मैत्री झाली आणि त्यातून खादी वापरण्यास मी सुरुवात केली. याच दिवसांत प्रभातफेऱ्या काढल्यामुळे अनेक छड्या खाण्याचा प्रसंग आला आणि त्यातून माझी हीही शाळा सुटली. एक नवे पर्व पुन्हा आयुष्यात सुरू व्हायचे होते. कै. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनी चालविलेला नवा काळ हे त्या काळातील अत्यंत स्फूर्तिदायक पत्र होते. त्यातील चळवळीच्या बातम्या ऐकून मन हेलावून जात असे. १९३२ च्या चळवळीत काँग्रेस बुलेटिन वाटणे ही गोष्ट माझ्या नित्य सरावाची झाली होती आणि त्यातून एकदा रिझर्व्हड् घोडेस्वार पोलिसाने मला सीताबर्डीवरील बलीभाई बिल्डिंगमधील पोस्ट ऑफिसपासून सीताबर्डी पोलिस स्टेशनपर्यंत फरफटतही नेले होते आणि तेथे रात्री बारा वाजेपर्यंत डांबूनही ठेवले. या काळात आमचे घर हे जणू काँग्रेस कार्यकर्त्यांचे शिबिरच झाले होते. बंधू तुरुंगात होते आणि त्यांचा दंड न भरल्यामुळे घरावर दररोज जप्त्यापण येत होत्या. अशा त्या चैतन्याने झपाटलेल्या दिवसांत माझ्या आयुष्यातील एक पर्व सुरू झाले. याच पर्वाचा आणखी एक भाग म्हणजे ३४-३५ चा काळ. नागपुरात सर्वश्री ल. के. देशपांडे, गो. बा. वैद्य, दीनदयाळ गुप्ता, दाणी, वझलवार, भावे (हे पु. भा. भावे यांच्यापेक्षा वेगळे आणि पुढे आयुष्यात राजकीय जीवनात न चमकलेले असे गृहस्थ होते) इत्यादिकांनी विद्यार्थी चळवळीचे एक केंद्र नागपूरला सुरू केले होते. त्यांनी एक अभ्यासमंडळही काढले होते. या अभ्यासमंडळाच्या एका सभेला माझ्या बंधूंच्या बरोबर मीपण गेलो होतो. हिंदुमुसलमानांचा प्रश्न यावर तात्त्विक आणि समाजाला आवश्यक अशी सर्व चर्चा करण्याचे या अभ्यासमंडळात ठरल्याचे मला आठवते. त्या काळात या अभ्यासमंडळाकरिता मी हिंदुमुसलमानांचे दंगे यावर एक मोठा निबंधही लिहिला होता. काँग्रेसच्या सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने या विद्यार्थी चळवळीने पुढे एक नवीन वळण घेतले आणि त्यातून काँग्रेसचा एक नवीन नेतृवर्गही नागपुरात निर्माण झाला. याच दिवसांत आणखी दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. एक म्हणजे गांधींच्या आश्रमातील वल्लभभाई नावाचे एक कार्यकर्ते आमच्याकडे नेहमी यावयाचे. त्यांच्याकडून कापसातून सरकी काढणे, पेळू करणे, टकळीवर आणि चरख्यावर सूत काढणे इत्यादी अनेक गोष्टी मी शिकलो. आमचे दादा म्हणजे वामन शिवदास बारलिंगे आणि त्यांचा मित्रपरिवार म्हणजे आचार्य दादा

धर्माधिकारी, कै. वीर बाबुराव हरकरे, कै. मा. ज. कानिटकर आणि कै. हरिभाऊ मोहनी यांच्याही अफलातून चर्चा ऐकण्यात मला त्या वेळी मजा वाटे आणि त्यातून सामाजिक शिक्षणाचेही मला धडे मिळाले यात शंकाच नाही. अशा चर्चांबरोबरच कधीकधी श्री. श्रीमन्नारायण, श्री. किशोरीलाल मश्रूवाला, श्री. गोपाळराव काळे, श्री. काका थत्ते, श्री. वाळुंजकर, श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धे, श्री. रा. कृ. पाटील यांच्याबरोबर चालणाऱ्या आमच्या घरातील गंभीर चर्चांनाही मी साथीदार होतो. कै. डॉ. खरे, कै. पूनमचंद रांका यांच्याबरोबरही या काळात माझा संबंध आला आणि त्यातून न कळत माझी एक राजकीय-सामाजिक जडणघडण होत गेली. या जडणघडणीत पुढील काळात श्री. मेहर-अली आणि कै. स. का. पाटील यांचाही थोडाफार हातभार निश्चितच लागला आहे.

१९३५ मध्ये मी मॅट्रिक पास झालो आणि मॉरिस कॉलेजात म्हणजे आजच्या नागपूर महाविद्यालयात गेलो. येथून माझ्या आयुष्याला आणखीच वेगळी कलाटणी मिळाली. नवीन मित्र जोडले गेले, नवीन विचारांच्या मंडळींच्या ओळखीही होऊ लागल्या. यांपैकी पहिली महत्त्वाची ओळख म्हणजे कॉमरेड भूपेन्द्रनाथ मुखर्जी यांची. कॉ. मुखर्जी आणि श्री. मगनलाल बागडी यांच्यावर नागपूर कटाचा खटला चालला होता आणि माझे वडीलच 'भूना' यांचा खटला चालवीत होते. त्यामुळे भूपेन्द्रनाथ मुखर्जी आणि मगनलाल बागडी (त्यांना पुढे आम्ही भय्या म्हणायला लागलो) यांच्याबद्दल माझ्या मनात आदर रुजत चालला होता. श्री. मुखर्जी हे तुरुंगातून सुटल्यानंतर सिटी कॉलेजमध्ये शिकायला गेले आणि माझ्यापेक्षा सातआठ वर्षांनी मोठे असले तरी ते आणि मी निराळ्या कॉलेजात पण एकाच वर्गात होतो. या सुमारास घडलेली दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे श्री. विनायकराव दांडेकर यांचे नागपुरास पुनरागमन. १९२० मध्ये हे माझ्या बंधूंच्या बरोबर होते. पण त्यांना चळवळीमुळे शाळेला रामराम ठोकावा लागला आणि तेथून ते जे गायब झाले ते अलाहाबादला गेले. पं. जवाहरलाल नेहरूंचे ते काही दिवस सेक्रेटरी पण झाले असे म्हणतात. अनेकदा त्यांनी तुरुंगवास सहन केला होता आणि ते फार जहाल वृत्तीचे होते असे आम्हा तरुणांचे त्यांच्याबद्दलचे मत झाले होते. आमच्या दादांचे एक मित्र श्री. पु. य. देशपांडे यांचीही या सुमारास ओळख झाली आणि त्यातून कम्युनिस्ट नेते सर्वश्री पी. डी. मराठे, मोटे आणि कुलकर्णी (म्हणजे आज सी. पी. एम. चे कार्यवाह असलेले श्री. कोल्हटकर), श्री. चोथमल इत्यादींचा पण स्नेह झाला. फॉरवर्ड ब्लॉकचे श्री. रामभाऊ रुईकर, श्री. बळनाईक, श्री. महेन्द्रे, माजी नामदार भगवंतराव गायकवाड यांचीही मैत्री याच काळातली. पण नागपूरच्या बाहेरीलही शिवाजीराव ऊर्फ दाजीसाहेब पटवर्धन, श्रीमती कै. पार्वतीबाई पटवर्धन, श्री. हरिहरराव देशपाण्डे, माझे गुरू आणि मित्र श्री. उद्धवराव शास्त्री आणि माझे पुतणे कै. राजाभाऊ बारलिंगे आणि राजाभाऊ तारे यांचाही स्नेह या काळात

माझ्या आयुष्यातील एका नवीन पर्वाला सुरुवात झाली. १९३० सालची महात्मा गांधींची सविनय कायदेभंगाची आणि मिठाच्या सत्याग्रहाची चळवळ सुरू झाली तेव्हा मी जेमतेम ११ वर्षांचा असेन. धवसे यांच्या शाळेत माझे नाव टाकले गेले होते. पण त्या वेळचे आमचे विद्यार्थी पुढारी मारवाडी प्रेसचे एक मालक श्री. नारायणदास यांच्या-बरोबर शाळेत हरताळ पाळणे आणि प्रभातफेऱ्या व मिरवणुकी काढणे हाच आमचा उद्योग झाला होता. आमच्या शाळेजवळच खादीभांडार होते. तेथील व्यवस्थापक श्री. नूरमहंमद यांचीही माझी त्या काळात मैत्री झाली आणि त्यातून खादी वापरण्यास मी सुरुवात केली. याच दिवसांत प्रभातफेऱ्या काढल्यामुळे अनेक छड्या खाण्याचा प्रसंग आला आणि त्यातून माझी हीही शाळा सुटली. एक नवे पर्व पुन्हा आयुष्यात सुरू व्हायचे होते. कै. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनी चालविलेला नवा काळ हे त्या काळातील अत्यंत स्फूर्तिदायक पत्र होते. त्यातील चळवळीच्या बातम्या ऐकून मन हेलावून जात असे. १९३२ च्या चळवळीत काँग्रेस बुलेटिन वाटणे ही गोष्ट माझ्या नित्य सरावाची झाली होती आणि त्यातून एकदा रिझर्व्हड् घोडेस्वार पोलिसाने मला सीताबर्डीवरील वलीभाई बिल्डिंगमधील पोस्ट ऑफिसपासून सीताबर्डी पोलिस स्टेशनपर्यंत फरफटतही नेले होते आणि तेथे रात्री बारा वाजेपर्यंत डांबूनही ठेवले. या काळात आमचे घर हे जणू काँग्रेस कार्यकर्त्यांचे शिबिरच झाले होते. बंधू तुरुंगात होते आणि त्यांचा दंड न भरल्या-मुळे घरावर दररोज जप्त्यापण येत होत्या. अशा त्या चैतन्याने झपाटलेल्या दिवसांत माझ्या आयुष्यातील एक पर्व सुरू झाले. याच पर्वाचा आणखी एक भाग म्हणजे ३४-३५ चा काळ. नागपुरात सर्वश्री ल. के. देशपांडे, गो. बा. वैद्य, दीनदयाळ गुप्ता, दाणी, वझलवार, भावे (हे पु. भा. भावे यांच्यापेक्षा वेगळे आणि पुढे आयुष्यात राजकीय जीवनात न चमकलेले असे गृहस्थ होते) इत्यादिकांनी विद्यार्थी चळवळीचे एक केंद्र नागपूरला सुरू केले होते. त्यांनी एक अभ्यासमंडळही काढले होते. या अभ्यासमंडळाच्या एका सभेला माझ्या बंधूंच्या बरोबर मीपण गेलो होतो. हिंदुमुसल-मानांचा प्रश्न यावर तात्त्विक आणि समाजाला आवश्यक अशी सर्व चर्चा करण्याचे या अभ्यासमंडळात ठरल्याचे मला आठवते. त्या काळात या अभ्यासमंडळाकरिता मी हिंदुमुसलमानांचे दंगे यावर एक मोठा निबंधही लिहिला होता. काँग्रेसच्या सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने या विद्यार्थी चळवळीने पुढे एक नवीन वळण घेतले आणि त्यातून काँग्रेसचा एक नवीन नेतृवर्गही नागपुरात निर्माण झाला. याच दिवसांत आणखी दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. एक म्हणजे गांधींच्या आश्रमातील वल्लभभाई नावाचे एक कार्यकर्ते आमच्याकडे नेहमी यावयाचे. त्यांच्याकडून कापसातून सरकी काढणे, पेळू करणे, टकळीवर आणि चरख्यावर सूत काढणे इत्यादी अनेक गोष्टी मी शिकलो. आमचे दादा म्हणजे वामन शिवदास बारलिंगे आणि त्यांचा मित्रपरिवार म्हणजे आचार्य दादा

धर्माधिकारी, कै. वीर बाबुराव हरकरे, कै. मा. ज. कानिटकर आणि कै. हरिभाऊ मोहनी यांच्याही अफलातून चर्चा ऐकण्यात मला त्या वेळी मजा वाटे आणि त्यातून सामाजिक शिक्षणाचेही मला धडे मिळाले यात शंकाच नाही. अशा चर्चांबरोबरच कधीकधी श्री. श्रीमन्नारायण, श्री. किशोरीलाल मश्रूवाला, श्री. गोपाळराव काळे, श्री. काका थत्ते, श्री. वाळुंजकर, श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धे, श्री. रा. कृ. पाटील यांच्याबरोबर चालणाऱ्या आमच्या घरातील गंभीर चर्चांनाही मी साथीदार होतो. कै. डॉ. खरे, कै. पूनमचंद रांका यांच्याबरोबरही या काळात माझा संबंध आला आणि त्यातून न कळत माझी एक राजकीय-सामाजिक जडणघडण होत गेली. या जडणघडणीत पुढील काळात श्री. मेहर-अली आणि कै. स. का. पाटील यांचाही थोडाफार हातभार निश्चितच लागला आहे.

१९३५ मध्ये मी मॅट्रिक पास झालो आणि मॉरिस कॉलेजात म्हणजे आजच्या नागपूर महाविद्यालयात गेलो. येथून माझ्या आयुष्याला आणखीच वेगळी कलाटणी मिळाली. नवीन मित्र जोडले गेले, नवीन विचारांच्या मंडळींच्या ओळखीही होऊ लागल्या. यांपैकी पहिली महत्त्वाची ओळख म्हणजे कॉमरेड भूपेन्द्रनाथ मुखर्जी यांची. कॉ. मुखर्जी आणि श्री. मगनलाल बागडी यांच्यावर नागपूर कटाचा खटला चालला होता आणि माझे वडीलच 'भूना' यांचा खटला चालवीत होते. त्यामुळे भूपेन्द्रनाथ मुखर्जी आणि मगनलाल बागडी (त्यांना पुढे आम्ही भय्या म्हणायला लागलो) यांच्याबद्दल माझ्या मनात आदर रुजत चालला होता. श्री. मुखर्जी हे तुरुंगातून सुटल्यानंतर सिटी कॉलेजमध्ये शिकायला गेले आणि माझ्यापेक्षा सातआठ वर्षांनी मोठे असले तरी ते आणि मी निराळ्या कॉलेजात पण एकाच वर्गात होतो. या सुमारास घडलेली दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे श्री. विनायकराव दांडेकर यांचे नागपुरास पुनरागमन. १९२० मध्ये हे माझ्या बंधूंच्या बरोबर होते. पण त्यांना चळवळीमुळे शाळेला रामराम ठोकावा लागला आणि तेथून ते जे गायब झाले ते अलाहाबादला गेले. पं. जवाहरलाल नेहरूंचे ते काही दिवस सेक्रेटरी पण झाले असे म्हणतात. अनेकदा त्यांनी तुरुंगवास सहन केला होता आणि ते फार जहाल वृत्तीचे होते असे आम्हा तरुणांचे त्यांच्याबद्दलचे मत झाले होते. आमच्या दादांचे एक मित्र श्री. पु. य. देशपांडे यांचीही या सुमारास ओळख झाली आणि त्यातून कम्युनिस्ट नेते सर्वश्री पी. डी. मराठे, मोटे आणि कुलकर्णी (म्हणजे आज सी. पी. एम. चे कार्यवाह असलेले श्री. कोल्हटकर), श्री. चोथमल इत्यादींचा पण स्नेह झाला. फॉरवर्ड ब्लॉकचे श्री. रामभाऊ रुईकर, श्री. बळनाईक, श्री. महेन्द्रे, माजी नामदार भगवंतराव गायकवाड यांचीही मैत्री याच काळातली. पण नागपूरच्या बाहेरीलही शिवाजीराव ऊर्फ दाजीसाहेब पटवर्धन, श्रीमती कै. पार्वतीबाई पटवर्धन, श्री. हरिहरराव देशपाण्डे, माझे गुरू आणि मित्र श्री. उद्धवराव शास्त्री आणि माझे पुतणे कै. राजाभाऊ बारलिंगे आणि राजाभाऊ तारे यांचाही स्नेह या काळात

उत्पन्न झाला. श्री. मुकुंदलाल सरकार, श्री. याजी, श्री. मेहेरअली, श्री. लोहिया, श्री. मानवेन्द्रनाथ रॉय, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी या सर्वांच्या विचारानीही माझ्या विचारांत उलथापालथ झाली. आणखी दोन नावांचा येथे उल्लेख करणे आवश्यक आहे. त्यांपैकी एक म्हणजे श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धे आणि दुसऱ्या म्हणजे श्रीमती कमलाबाई होस्पेट. अण्णासाहेबांच्या बरोबर मी काही दिवस राहून आलो होतो आणि कमलाबाई तर जवळजवळ आमच्या घरच्याच होत्या. अच्युतराव पटवर्धन, अरुणा असफअली, श्री. एस्. एम्. जोशी, श्री. नानासाहेब गोरे, आचार्य नरेन्द्र देव, साने गुरुजी आणि सेनापती बापट यांची मात्र या वेळेपर्यंत भेट झाली नव्हती, ती पुढे १९४२ मध्ये झाली.

आणि १९३९ साल उगवले. दुसरे महायुद्ध सुरू झाले. त्याच वर्षी मी बी. ए. पास झालो. आतापर्यंत न झालेल्या अनेक लोकांच्या ओळखीपाळखी झाल्या. त्यांच्याशी स्नेह जमला. अँटीइंपीरियालिस्ट कॉन्फरन्सच्या निमित्ताने सुभाषबाबूंचीही ओळख झाली. या सुमारास माझ्या वडीलबंधूंचे मित्र श्री. रामगोपालजी माहेश्वरी यांनी त्या काळातील विदर्भातील काँग्रेसचे पुढारी श्री. ब्रिजलाल बियाणी यांच्या प्रेरणेने व साहाय्याने नागपुरात नवभारत या नावाचे एक हिंदी दैनिक सुरू केले होते आणि देशबंधू नावाचे एक मराठी दैनिक सुरू करण्याचे त्यांच्या मनात होते. त्या काळात मी विद्यार्थी चळवळीत काम करीत होतो. या दैनिकाचे संपादन करण्यास श्री. रामगोपालजी यांनी मला पाचारण केले. आमच्या दादांचाही संबंध श्री. भिकुलालजी चांडक आणि श्री. रामगोपालजी यांच्याशी होता. रामगोपालजींनी मला आणि कै. माणिक चांदोरकर यांना दैनिक देशबंधू चालविण्यास बोलविले आणि संपादनाची जबाबदारी आमच्यावर टाकली. ही पण माझ्या दृष्टीने एक पर्वणीच होती. आमच्या दैनिक देशबंधूचा पहिला अंक १९४० च्या एप्रिल मध्ये अक्षयतृतीयेला निघाला. त्या काळात कोणत्याही विद्यापीठात वृत्तपत्र विभाग नसत. प्रत्येकाला स्वतःच शिक्षण घ्यावे लागे आणि १९४० मध्ये दैनिक देशबंधूच्या निमित्ताने जे शिक्षण मला मिळाले ते खरोखरच फार महत्त्वाचे होते. त्या वेळी अभ्यास करून मी अनेक अग्रलेख लिहिण्याचा प्रयत्न केला. आमचे दैनिक हे काँग्रेसचे होते. त्यामुळे कोणी काँग्रेसवर टीका केली तरी आम्हाला त्याला उत्तर द्यावे लागे. कै. भाऊसाहेब माडखोलकरांसारख्या ज्येष्ठ वृत्तपत्रकारावरही एक लेख त्या वेळी लिहिल्याचे मला आठवते. तसेच 'आंधळी दळते व कुत्रे पीठ खाते' या शीर्षकाखाली लिहिलेला अग्रलेखही लोकांना फार आवडला होता. दैनिक देशबंधूच्या पहिल्या अग्रलेखात आम्ही लिहिले होते, "संपूर्ण स्वातंत्र्याचा सदैव पुरस्कार करणाऱ्या काँग्रेसमध्येही आज सव्यगामी (Rightist) व वामगामी (Leftist) अशी दुफळी निर्माण झाली आहे. कोणाच्याही हेतूबद्दल आम्हाला शंका घ्यावयाचे कारण नाही. आपापल्या परीने देशसेवा करण्याचीच सर्वांची इच्छा आहे. परन्तु ज्या वेळी सर्वांनी एकजुटीने व शिस्तीने वागावयास पाहिजे,

त्याच वेळी काँग्रेसची आज्ञा अमान्य करून पुरोगामी (Forward Block) गटाने दुसराच सूर काढावा व मुरारेस्तृतीयः पंथाः या न्यायाने कॉ. राय व त्यांच्या पक्षाने काँग्रेसमधून काढून टाकीपर्यंत बेशिस्त व बेजबाबदार वर्तन करावे व काँग्रेसमधून काढून टाकल्यानंतर दुसरा पक्ष स्थापण्याचा खटाटोप करावा, या व अशा सर्व प्रकारांमुळे देशाची शक्ती क्षीण झाल्याशिवाय राहील काय ? लोक कितीही वायफळ बडबड करोत, संपूर्ण स्वातंत्र्याची ज्योत तेवत ठेवून ब्रिटिश साम्राज्यशाहीशी आपल्या हक्कांसाठी झुंज घेणारी काँग्रेसशिवाय दुसरी संस्था आज आपल्या देशात नाही; आणि आज अशा संस्थेचा ब्रिटिश साम्राज्यशाहीशी लढा चालू असताना, तिच्यावर, तिच्या नेत्यांवर, आणि नेत्यांनी चालविलेल्या लढ्याच्या तंत्रावर निर्बुद्ध व विपर्यस्त शाब्दिक टीका करणे म्हणजे काँग्रेसचेच पाय मागे ओढण्यासारखे नाही काय ? अशा वेळी वास्तविक सर्वांनी काँग्रेसच्या झेंड्याखाली एकत्र जमून काँग्रेसलाच उत्तरोत्तर बलवान करण्याचा प्रयत्न करावयास पाहिजे.

" काँग्रेसचे सध्याचे धोरण चूक आहे असे जरी घटकाभर धरून चालले, तरी आमचे धोरण काँग्रेसपासून भिन्न आहे असा आव आणून त्याप्रमाणे वागणे म्हणजे आम्हाला स्वातंत्र्य नको असे म्हणण्यासारखेच आहे, आणि म्हणूनच काँग्रेसचा पुरस्कार करण्याचे आमचे धोरण राहील. काँग्रेसचा आदेश, काँग्रेसची आज्ञा सामान्य लोकांपर्यंत पोचवायची, स्वातंत्र्याचे लोण खेड्यापाड्यापर्यंत पोचवून काँग्रेसच्या कार्याला हातभार लावावयाचा हा आम्ही आमचा धर्म समजतो. याचा अर्थ असा नव्हे की, दुसऱ्या पक्षोपपक्षांना आमचे धोरण अन्यायाचे राहील. कोणावरही वैयक्तिक व अप्रस्तुत टीका न करता इतर पक्षांच्या मतांचे समालोचन करण्याचेच आमचे धोरण राहील.

" आजचा सुमुहूर्त अक्षय तृतीयेचा आहे. आजच्या प्रसंगी आमचा पहिला अंक आपल्या हाती देताना आम्हास विशेष आनंद होत आहे. आजच्या दिवसाला काही विशेष इतिहास आहे. आमच्या पितरांच्या संतर्पणाचा आजचा दिवस आहे. आमच्या राष्ट्रवीरांच्या स्मृतीला तिलांजली वाहण्याचा आजचा योग आहे. अशा या प्रसंगी आमच्या राष्ट्रवीरांच्या स्मृतीला साक्षी ठेवून देशसेवेचे जे काही व्रतपालन आमच्याकडून होईल ते करण्याचा आमचा मनोदय आहे.

" दुर्दैवाने काँग्रेसच्या मताचे एकही मराठी दैनिक आज मराठी मध्यप्रांत, वऱ्हाड व खानदेश यामध्ये अस्तित्वात नाही. आम्ही ही तूट अंशतः जरी भरून काढू शकलो तरी आमचे कार्य फलदायी झाल्यासारखे होईल. "

आम्ही मताने बरेचसे डावे होतो. पण १९४१ साली नाझी जर्मनीने रशियावर जेव्हा चढाई केली आणि कम्युनिस्टांनी जेव्हा हे लोकयुद्ध आहे अशी घोषणा केली त्या वेळी संपादकीय लिखाणातून मी त्यांच्यावर तुटून पडलो होतो आणि हे युद्ध रशिया-

करिता लोकयुद्ध असू शकते पण आमच्याकरिता नाही असे पण प्रतिपादन केले होते. त्या काळात वृत्तपत्रानुभव मला मिळवून देण्यात श्री. शैलेन्द्र आणि श्री. शर्मा या नवभारतमधील संपादकांचा फार मोठा हात होता हे पण कबूल केले पाहिजे. दैनिक देशबंधूवर माझे नाव जरी तीनचार वर्षे होते तरी माझा या दैनिकाशी खराखुरा संबंध वर्ष-दीड वर्षाच्या आतच संपला. कारण मी पुढे एम. ए.च्या अभ्यासाला लागलो.

१९४२ ची चळवळ सुरू होण्याच्या सुमाराला तरुणांचा आणखी एक गट जोरात पुढे येत होता. सर्वश्री नरेन्द्र तिडके, आनंदराव कळमकर, शंकरराव गेडाम, विठ्ठलराव इंगोले, बापू अंजनकर, एन. एल. राव इ. लोक त्यात होते आणि पुढे मी आणि माझे मित्र गोविंदराव देशपांडेही त्यात गेलो. स्वतः समाजवादी मताचा असल्यामुळे व्यक्तिशः माझा बागडी-दांडेकर या गटाशी आणि त्यांच्या हिंदुस्थानी लालसेनेशीही संबंध आला. दांडेकरांच्या वक्तृत्वामुळे आणि त्यांच्या एकंदर बुद्धिमत्तेमुळे तर आम्ही अनेक तरुण त्या काळात भारावूनच गेलो होतो. १९४२-४३ या सालात मी अक्षरशः दांडेकरांच्या सावलीसारखा वागलो, हे नागपुरातील आणि नागपुराबाहेरील अनेकांना माहिती आहे. भूमिगत अवस्थेत असताना मी दांडेकरांच्याबरोबर सारखा फिरत होतो. अशाच स्थितीत १ ऑक्टोबर १९४३ ला दांडेकर व मी एका ठिकाणी जात असता पोलिसांनी आम्हास घेरले. श्री. दांडेकरांवर पोलिसांचा रोख असल्यामुळे मी पोलिसांच्या विळख्यातून फरार होऊ शकलो व त्यातूनच माझी श्री. मनोहर पाध्ये यांची अधिक जवळीक होऊ शकली. श्री. पाध्ये यांच्या घरी मला आश्रय मिळाला नसता तर मलाही तुरुंगात जावे लागले असते. दुसरे दिवशीच्या वृत्तपत्रांत पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पळालेला इसम कोण याबद्दल चर्चा पण झाली. पण तो इसम मी होतो हे काही ठरावीक लोकांशिवाय इतरांना माहीत असेल असे वाटत नाही. ना. नरेन्द्र तिडके यांना मात्र ही गोष्ट माहीत असावी. कारण त्याच दिवशी दुपारी त्यांची व दांडेकरांची मी भेट करवून दिली होती. खरे म्हणजे त्या काळात माझा खरा सहकारी होता माझा धाकटा चुलतभाऊ नाना बारलिंगे. दोन-तीन वर्षे सतत काम केल्यामुळे हा पुढे आजारी पडला. तो आजार विषमज्वर ठरला आणि शेवटी नानाचा त्याने बळी घेतला. आम्ही इन्किलाब जेव्हा सुरू केले तेव्हा ज्या अनेकांना आम्ही भावांजली वाहिली आहे त्यात नाना बारलिंगेही एक होता.

१९४६ ते १९४८ ही वर्षे भारताच्या इतिहासात फार महत्त्वाची आहेत. या काळात इंग्रजांची राजवट नाहीशी झाली आणि स्वराज्याच्या जडणघडणीस सुरुवात झाली. १९४२ च्या छोडो भारत चळवळीचा संदेश घेऊन जी तरुण मुले राजकारण व समाज-कारणाच्या आखाड्यात उतरली होती त्यांमध्ये आमचेही एक मित्रमंडळ होते.

४२ ची चळवळ, त्यानंतर झालेली आझाद हिंद सेनेची चढाई, नाविकांचे आणि हवाई दलातील लोकांचे बंड आणि पोस्टाचा संप यामुळे आम्हा मित्रमंडळींच्या भावना

उफाळून वर आल्या होत्या. आमच्या गटाचे स्वतंत्र अस्तित्व ठेवून त्यातून सामाजिक राजकीय चळवळ उभारण्याचा आम्हा मित्रमंडळींचा विचार होता. आम्ही समाजवादी होतो पण समाजवादी पक्षातही जुनेनवे असा मतभेद, नाही म्हटले तरी उत्पन्न होत होता. जुन्यातसुद्धा बागडी–दांडेकर हे एका बाजूला होते असे म्हणणे चूक ठरले असते. १९४२ च्या चळवळीमध्ये जे तरुण समाजकारणाच्या आखाड्यात उतरले त्यांचे त्याच विचाराच्या जुन्या मंडळींशी मात्र फार जमले नाही. अशा ९ ऑगस्टर्सचा नागपुरातही एक गट होता, आणि तो प्रामुख्याने आम्हा मित्रमंडळींचा होता. या गटाचे आणि जुन्या समाजवादी गटाचे विशेष जमले नाही. या जुन्या गटातील अनेक लोक आमचा पुष्कळदा हे अच्युत पटवर्धनांचे, हे साने गुरुजींचे म्हणूनही निर्देश करीत असत आणि ते थोडेफार खरेच होते. थोडेफार म्हणायचे कारण असे की त्या काळात आम्ही लोकांनी कै. बाबूराव घटवाई आणि कै. बाबा राघवदास यांच्या बरोबर पण थोडेसे काम केले होते. या साऱ्या परिस्थितीत आम्ही मित्रमंडळी राजकीय जीवनात जिवंत राहण्याची धडपड करीत होतो. त्यातूनच आम्ही प्रथम साने गुरुजी यांच्या आशीर्वादाने नॅशनल बुक सर्व्हिस नावाचे पुस्तकाचे दुकान काढले आणि पुढे इन्किलाब नावाचे मराठी साप्ताहिक सुरू केले.

इन्किलाब सुरू करताना आम्हाला दोन फार मोठ्या अडचणी आल्या. पहिली अडचण होती ती इन्किलाबचे रजिस्ट्रेशन मिळविण्याची. भारत सरकारकडून मी परवानगी मिळवायची असे ठरले. कै. श्री. हरी विष्णु कामत यांच्या मदतीने ती मिळाली. कै. डॉ. केसकरही मला त्या वेळी पं. नेहरूंकडे घेऊन गेले होते. त्या वेळी श्री. राजाजी हे सिव्हिल सप्लाय खात्याचे मंत्री होते. मी त्यांना जाऊन भेटलो आणि त्यांनी कागदाचा कोटा देण्याचे कबूल केले. पण केवळ कागदाची परवानगी मिळाल्याने अंक निघू शकत नव्हता. एक अंक काढायचा म्हणजे त्या काळात एक हजार रुपये लागत होते. तेही आम्हांला अचानक मिळाले. झारियाच्या कोणत्यातरी व्यापाऱ्याला आझाद हिंद सेनेवरील पुस्तक हवे होते आणि ते त्याला आमच्याच दुकानात मिळाले. त्यामुळे खूष होऊन त्याने आम्हा मित्रमंडळींची चौकशी केली. तो म्हणाला, "तुम्ही वर्तमानपत्र का काढीत नाही?" आम्ही आमची अडचण त्याला सांगितली. मला अमूक ठिकाणी येऊन भेटा म्हणून त्याने सांगितले. मी तेथे त्याला भेटायला गेलो. पण तो पूर्वीच निघून गेला होता. एक पाकीट मात्र त्याने माझ्यासाठी ठेवले होते. त्यात शंभराच्या दहा नोटा होत्या. त्या गृहस्थाची त्यानंतर पुन्हा कधीही माझी भेट झाली नाही. पण त्याने दिलेल्या पैशातून इन्किलाबचा जन्म झाला. मग आम्ही आणखी काही पैसे जमविले. नवयुग समिती नावाची एक संस्था स्थापन केली. तिच्यामार्फत थोडेफार पैसे पण मिळविले. एजंटांच्या डिपॉझिटमधूनही काही पैसे गोळा झाले. इन्किलाबचा जन्म हा

असा झाला.

१९४६ साली ४७ मध्ये स्वातंत्र्य मिळणार असे वाटले नव्हते. क्रिप्स मिशन हात हलवीत परत गेले होते. पण हिंदुस्थान आणि इतर वसाहती ब्रिटिशांच्या हातून लवकरच जातील अशी चिन्हे दिसू लागली होती. ब्रिटिशांनी जून १९४८ मध्ये स्वराज्य देण्याची जाहिरात पण केली होती. अद्‌भुत घटनांनी भरलेल्या अशा या काळात इन्किलाबचा जन्म झाला. १५ ऑगस्ट १९४७ ला स्वराज्य मिळाले. १९४८ सालात हैदराबादेत पोलिस ॲक्शन झाली. घटना समितीची स्थापना झाली आणि आपल्या पुढील धोरणाची दिशा पण ठरत गेली. भारत १९५० मध्ये प्रजासत्ताक झाले पण त्याच्या जडणघडणीची बीजे, उद्योगीकरणाची बीजे, १९४७-४८ मध्येच पेरली गेली. नवनव्या योजनांची सुरुवात पण याच काळातली. देशाची फाळणी पण याच काळात झाली.

स्वराज्य मिळण्याचा आणि राष्ट्रविकासाच्या विधायक योजनांची आखणी होण्याचा एक परिणाम आम्हा तरुणांवर झाला तो असा की, आता आमचे चळवळीचे काम संपले, आपण आपापल्या क्षेत्रात परत जावे आणि ज्या जागी जे काम करायला मिळेल ते इमानदारीने करावे. त्यामुळेच आमच्या गटातील अनेकजण शिक्षणक्षेत्रात गेले. आमच्यापैकी बरेचसे लोक या क्षेत्रात नावारूपासही आले. पण यामागील गोष्टीचे मी आता जेव्हा सिंहावलोकन करतो तेव्हा मला असे दिसते की, असे करण्यात आमची फार मोठी चूक झाली. आम्ही राजकीय- सामाजिक क्षेत्रात तग धरून राहायला पाहिजे होते. एक तर विधायक वृत्तीने काम करीत राहण्याचा आमच्या देशातील राष्ट्रीय सभेचा पिंडच नव्हता. त्यामुळे असंतोषाची चळवळ करीत राहणे एवढेच आम्ही शिकलो होतो आणि राष्ट्रसभेच्या लोकांनी कायदेमंडळ वगैरेत जाण्याचे ठरविले तेव्हा एकतर यांपैकी बहुतेक लोक सत्तेने हुरळून गेले होते आणि जे या सत्तेबाहेर होते त्यांची असंतोषाची चळवळ तशीच कायम राहिली होती. त्यामुळे देशाच्या प्रगतीला जे स्वरूप यायला पाहिजे होते ते कधी आलेच नाही. तज्ज्ञ म्हणून समजला जाणारा आमच्यातील विद्वज्जनांचा आणि अधिकारी लोकांचा वर्ग होता. पण हा होता पाश्चात्यविद्याविभूषित. यांचे अर्थशास्त्र, यांचे समाजशास्त्र, यांचे तत्त्वज्ञान, यांचा देशाच्या प्रगतीला आणि जडणघडणीला बहुतेक उपयोग झालाच नाही. त्यांची वृत्ती दिसायला लोकशाहीची पण वस्तुतः साम्राज्यशाहीची आणि पादशाहीचीच होती. त्यातही समाजवादी गट काँग्रेसमधून बाहेर पडल्यामुळे देशाच्या जडणघडणीत विचाराची जी एक आवश्यकता असते त्यात पोकळी निर्माण झाली. त्या काळात 'समाजवाद्यांनो परत काँग्रेसमध्ये या' असा मी एक लेख लिहिला. पण समाजवादी काँग्रेसमध्ये आलेच नाहीत. जयप्रकाश, अच्युत पटवर्धन, लोहिया यांच्यातही मतभेद झाले. त्यातून अच्युतराव पटवर्धन राजकारणातून गेले, जयप्रकाशांनी

काही दिवस भूदानाची कास धरली, अरुणा असफअलींनी निराळाच पंथ स्वीकारला. लोहियांचाही प्रभाव जितका पडायला हवा होता तितका पडला नाही आणि समाजवादी चळवळ विरत गेली. काँग्रेसमध्ये जे राहिले त्यांतील जवळजवळ सर्वचजण सत्तावादी होते. काहींनी त्याचा चांगला उपयोग करून आर्थिक क्षेत्रातही सहकाराच्या नावाने काही महत्त्वाच्या गोष्टी केल्या. पण स्वराज्य हे रामराज्य झाले पाहिजे म्हणजे लोकांचे राज्य झाले पाहिजे याची जाणीव फारच थोड्यांना आली. 'बुभुक्षितः किं न करोति पापम्' ही जी संस्कृत म्हण, ती सत्तेसाठी आणि संपत्तीसाठी हपापलेल्या लोकांनी खरी करून दाखविली. सर्व समाजवाद्यांना एकत्र ठेवू शकणारे मेहरअली, आचार्य नरेन्द्र देव यांच्यासारखे लोकनेतेही या जगातून निघून गेले आणि त्यातून मी एके मी, मी दुणे मी असे मीचे वातावरण सर्वत्र भरून गेले. १९४६-४८ या काळात ज्या गोष्टी करायला पाहिजे होत्या असे मी म्हटले ते म्हणणे त्यामुळे आजही टिकून आहे. ध्येय-निष्ठेचा अभाव, दृष्टीची दिशाहीनता आणि दुसऱ्यांच्या ओंजळीने पाणी पिण्याचा सराव, लोकशाही आणि समाजवादाच्या खोट्या कल्पना, जातीयवादाचा पगडा या सर्व गोष्टी आजही तशाच कायम आहेत. आम्ही काही प्रगती केली नाही असा मात्र याचा अर्थ नाही. अणुक्षेत्रापासून प्लॅस्टिक आणि इलेक्ट्रॉनिक्सच्या क्षेत्रापर्यंत आम्ही प्रगती केली. औद्योगिक क्षेत्रातही आम्ही प्रगती केली. शिक्षणाच्या आणि शेतीच्याही क्षेत्रात आम्ही मोठी बाजी मारली पण या सर्वांच्या मागे आवश्यक असणारी 'मज्जातंतूंची चौकट' मात्र आम्ही निर्माण करू शकलो नाही किंवा कायम राखू शकलो नाही. याचे खरे कारण आमच्या देशात एक प्रकारचा संवाद (म्हणजे Communication) उत्पन्न झाला नाही. निनाद (resonance) आणि प्रतिध्वनी (reverberation) यांच्या भरंवशावरच आम्ही नारे देत राहिलो आणि त्यात आम्हांला थोडेफार यश पण आले. पण तरीही मूळ प्रश्न कायमच राहिला. मूळ प्रश्न का कायम राहिला याबद्दल मी आणि माझे मित्र, ज्यांना या लेखसंग्रहाची प्रस्तावना लिहायला विनंती केली ते, श्री. यदुनाथ थत्ते यांच्या विश्लेषणात फरक असू शकेल. पण हा फरक खोलात जाऊन विचार केला तर खरोखर फरक नाही असेच मला वाटते. कारण त्या वेळचे आणि आजचे राजकीय-सामाजिक प्रश्न अद्याप जसेच्या तसेच आहेत. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी हे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला असे मला वाटते. यदुनाथ थत्ते यांना अर्थातच तसे वाटत नाही. सामान्य माणसाच्या स्वराज्याचे प्रश्न अद्याप सुटलेच नाहीत हे मात्र खरे. त्यामुळेच १९४६-४८ या काळात मी इन्किलाबमध्ये लिहिलेल्या अग्रलेखांचे ताजेपण (दुर्दैवाने) कायम राहिले. म्हणूनच त्यांचे संकलन करून त्या मंतरलेल्या दिवसांतील इतिहासाच्या नोंदींना पुनश्च एकदा उजाळा देण्यासाठी त्या लेखांच्या पुनःप्रसिद्धीचा हा खटाटोप. पण हे सर्व खटाटोप करीत असताना माझ्या दोन मित्रांचे ऋण मान्य केले

पाहिजे. 'हे अस्पृश्यतेचे पाप तावडतोब धुऊन काढा.' या लेखातील काही भाग हा श्री. चिंतामणी चिंचाळकर यांच्या लेखणीतून, तसेच इन्किलाबच्या एका अग्रलेखातील काही भाग हा श्री. भाऊसाहेब नेवाळकर यांच्या लेखणीतून उतरला आहे. पण हे परिच्छेद वेगळे करता येणे शक्य नाही; इतके त्यांचे मूळ लेखाशी 'सिंबोयोसिस' झाले आहे.

अर्थात, हे लांबलेले चम्हाट आटोपण्याच्या अगोदर आणखी एक गोष्ट सांगावीशी वाटते. आज राजकीय साम्राज्यवाद आणि आर्थिक साम्राज्यवाद यांच्यावरोबर एक वृत्तपत्रीय साम्राज्यवादपण आलेला आहे. धनवान मालकांची चाकरी करीत बसत असताना वैचारिक स्वातंत्र्याचे मानभावी स्तोम हल्ली फार जोरात माजविले जात आहे. सत्यान्वेषण आणि स्वातंत्र्य आवश्यक आहेत. पण नैतिक मूल्यांच्या प्रामाणिक अधिष्ठानावाचून केलेला सत्यान्वेषणाचा आणि स्वातंत्र्याचा देखावा मात्र हास्यास्पद ठरेल, हे पण आपणांस पुष्कळदा कळेनासे होते हे म्हणणे भाग आहे. शिवाय पोकळ अभिनिवेश आणि आवेश यांच्या डरकाळ्यांनी गोबेल्सतंत्र पण अमलात आणण्याचे काही पत्रकारांचे तत्त्वज्ञान आहे. आपल्याला फायदेशीर असतील ती मूल्ये, बाकीच्या वेळी ती पायदळी तुडविण्यास हरकत नाही अशी एकूण 'चवथ्या इस्टेटीची' कल्पना दिसते. या 'चौथ्या संपत्ती'चा वारसा हक्क हिरीरीने आपल्याकडे घेऊन स्वातंत्र्याची मक्तेदारी निर्माण करू पाहणाऱ्या 'साम्राज्यशहां'च्या निष्ठाही देशातच आहेत की देशाबाहेर हा प्रश्नही आपले विदारक स्वरूप व्यक्त करू लागला आहे. या सर्व परिस्थितीवर आपण मात करू शकणार आहोत की नाही हा खरा प्रश्न आहे. जगातील दोन मोठ्या शक्ती आपणास आपापल्या बाजूस ओढण्याचा प्रयत्न करीत आहेत. दिसायला आशा फार कमी आहे. पण आपल्या आशावादाने आपल्याला नेहमीच साथ दिली आहे. अशी साथ आजही मिळेल आणि आपला देश प्रगतीचे एकेक पाऊल टाकीत साम्राज्यवादी दृष्टी न ठेवताही जगातील एक अग्रगण्य देश होईल आणि जगाला साम्राज्यविरोधी असा नैतिक मार्ग दाखवील अशी आशा धरू या.

या इन्किलाबच्या काळात श्री. चिंतामणी चिंचाळकर, श्री. भास्कर फडणीस व श्री. मनोहर पाध्ये यांनी तर कशाची पर्वा न करताना इन्किलाबमध्ये आपल्याला झोकून दिलेच पण याशिवायही माझे असंख्य मित्र श्री. शंकरराव वेलंकीवार, श्री. छोटू पारनंदीवार, श्री. एस्. ए. देशपांडे, श्री. शरद शेवडे, श्री. खांडेकर, श्री. दि. यं. देशपांडे, श्री. सतीश कालेलकर, श्री. पां. ब. गाडगीळ, श्री. भाऊसाहेब नेवाळकर, श्री. वा. वि. भट इत्यादी अनेकांनी इन्किलाबची सांस्कृतिक पातळी राखण्यात फार मोठा हातभार लावला. एका अडचणीच्या वेळी श्री. श्रीमन्नारायण (अग्रवाल) यांनीही संपादक मंडळावर राहण्याचे कबूल करून आम्हा तरुणांना खूपच प्रोत्साहित केले. कै. नारायण

पुराणिक, श्री. नेरूरकर हे पण कधीकधी लेख पाठवीत असत. तसेच श्री. यशवंत शास्त्री, श्री. डी. टी. देशपांडे व श्री. केशव पुरोहित इत्यादिकांचेही लेखनसाहाय्य इन्किलाबला वेळोवेळी झाले. श्री. मगनलाल बागडी आणि लालसेनेचा गट यांनीही दिलेल्या उत्तेजनाचा आमच्या कार्यात फार मोठा वाटा होता. विद्यार्थी काँग्रेसचे टिकटिकाणी पसरलेले कार्यकर्ते यांनीही आम्हाला शक्य ती सर्व मदत केली. इन्किलाब नियमितपणे काढण्यात कामगारवर्गाचे विशेषतः श्री. प्रभाकर वाकेकर, श्री. प्रभाकर देशमुख इत्यादिकांचे फार मोठे साहाय्य झाले. या सर्वांचे ऋण कधीही न फिटणारे.

शेवटी या लेखसंग्रहास प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल श्री. यदुनाथ थत्ते, लेखांचे पुनर्लेखन करून दिल्याबद्दल माझ्या विद्यार्थिनी श्रीमती कुंजबाला शहा व लेखांचे संकलन-संपादन करण्याबद्दल डॉ. सुभाष भेलके या सर्वांचा मी कृतज्ञ आहे. अशी कृतज्ञता व्यक्त करणे औपचारिक दिसले तरी ते औपचारिक नसून आवश्यक आहे.

अक्षयतृतीया
२३-४-८५
यशोधन मुंबई २०

सुरेन्द्र बारलिंगे

अनुक्रमणिका

१ आम्ही / १
२ अधिकार (सँक्शन्स) निर्माण करा / ६
३ १९४२ ची तालीम आणि पुढील नाटक / ९
४ काँग्रेसचे जनसंघ (Unions) स्थापन करा ! / १३
५ शिक्षकांना न्याय द्या ! / १९
६ परिस्थितीस साजेसे क्रांतितंत्र निर्माण करा ! / २२
७ काँग्रेस समाजवादी पक्षाचे अवतारकार्य / २७
८ जनतारूप व्हा ! / ३०
१० गुलामगिरीची ही प्रतीके दृष्टीसमोरून नाहीशी करा ! / ३५
११ काँग्रेसचे अवतारकार्य अद्याप पुरे व्हावयाचे आहे / ३८
१२ आम्हासही भटाभिक्षुकांचे राज्य नको ! / ४२
१३ क्षुल्लक कार्य साधण्यासाठी महत्कार्याचा बळी देऊ नका ! / ४६
१४ हे अस्पृश्यतेचे पाप ताबडतोब धुऊन काढा– / ५०
१५ हे लोकशाहीच्या मार्गाने जाणे नव्हे ! / ५३
१६ जालियनवाला बाग / ५६
१७ सरदारांचे समाजवादी तरुणांना आव्हान / ५९
१८ द्या पाकिस्तान आणि व्हा मोकळे / ६३
१९ फाळणी आणि समाजवाद / ६७
२० सरकारी शाळांचा उपयोग बहुजन समाजाला होऊ द्या ! / ७१
२१ पंचवार्षिक योजना समित्या निर्माण करा ! / ७३
२२ युद्धोत्तरकालीन रेल्वे-सुधारणा / ७६
२३ जून १९४७ ते जून १९४८ / ८०
२४ स्वातंत्र्याच्या मार्गातील निझामाचा काटा दूर करा ! / ८४
२५ निझामापासून वऱ्हाडचे रक्षण करा ! / ८८
२६ हैद्राबादची जनता आपणास बोलावीत आहे / ९१
२७ आमचे वऱ्हाड आम्ही निझामला देणार नाही / ९३
२८ आता तरी नवी दृष्टी येऊ द्या–लेखांक १ ला / ९६
२९ आता तरी नवी दृष्टी येऊ द्या–लेखांक २ रा / ९८
३० आता तरी नवी दृष्टी येऊ द्या–लेखांक ३ रा / १०१

३१ स्वतंत्र भारता, तुझा जयजयकार असो ! / १०४
३२ आता चला समाजक्रांतीच्या वाटेने / १०८
३३ आमच्या सहनशीलतेची मर्यादा कधी संपणार ? / १११
३४ ग्रामोद्धार आणि परिश्रम सहकाराची कल्पना ! / ११४
३५ ही सामंतशाहीची सडकी प्रेते कुटपर्यंत टिकवणार ? / ११८
३६ आंतरराष्ट्रीय सहकार्याची आवश्यकता / १२२
३७ 'नाहीतर युद्ध पुकारावे लागेल !' / १२५
३८ मंत्रिमंडळ विरोधकांचा पोकळवासा / १२९
३९ जुनागड खालसा करा ! / १३३
४० नेहरू सरकार बलशाली करा ! समाजवादी पक्षाचे मार्गदर्शन ! / १३६
४१ काश्मिर आणि पाकिस्तान / १३९
४२ धर्मनिरपेक्ष शासनसंस्था निर्माण करावयाची असेल तर... / १४१

खंड दुसरा

१ इन्किलाबचे एक वर्ष / १४४
२ सामन्तशाहीच्या विसर्जनाची नांदी / १४९
३ महात्माजींच्या उपवासाचे मर्म / १५२
४ श्रद्धांजली / १५६
५ याचा शेवट कशात होणार ? / १५९
६ ब्राह्मण्यवादाचे भूत गाडून टाका- ब्राह्मणेतरवादाचेही भूत गाडून टाका. / १६३
७ समाजवादी पक्षाचे अभिनंदन / १६९
८ आजच्या सुमुहूर्तावर / १७१
९ बलशाली भारताची निर्मिती / १७४
१० ऑलिंपिकची दीपशिखा / १७७
११ युक्तप्रांतातील निवडणुकी / १७९
१२ माणुसकी नांदविण्याकरिता / १८२
१३ हैदराबाद प्रकरणाचे समालोचन / १८४
१४ ९ ऑगस्ट / १९०
१५ 'WE MARCH' / १९३
१६ गांधीजींच्या प्राणांचे मोल / १९५
१७ समाजवाद्यांनो ! परत काँग्रेसमध्ये या / १९९



१

आम्ही

१-१२-४६

संकल्प केल्याप्रमाणे आमच्या वाचकांना 'इन्किलाब' सादर करण्याचा सुयोग आज येत आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सुद्धा, एक विशिष्ट ध्येय डोळ्यांसमोर ठेवून 'इन्किलाब' सुरू करण्याचे धाडस आम्ही करीत आहोत. आमच्यापाशी वृत्तपत्रव्यवसायाचा म्हणण्यासारखा अनुभव नाही, पैशाचे पाठबळ नाही आणि कोणासही युक्तीच्या चार गोष्टी सांगण्यास लागणारी वयाची गुरुताही पण नाही. आणि तरीही परिस्थितीने 'इन्किलाब" सुरू करण्यास आम्हास प्रवृत्त केले आहे. 'इन्किलाब'मधून जो संदेश जनतेला पोचविण्याचा आमचा विचार आहे तो आमचा संदेश नाही. तो कालाचा संदेश आहे, क्रांतियुगाचा संदेश आहे, जागतिक परिस्थितीचा संदेश आहे. आमचा त्यात हिस्सा असलाच तर तो दूताचा आहे. आम्ही केवळ निमित्तमात्र आहोत. क्रांतितत्त्वाचे पाठबळ हेच आमचे भांडवल आणि वाचकांची सहृदयता हीच आमची शिदोरी. दुर्दम्य आशावाद, उत्साह आणि आत्मविश्वास यांच्या भरवशावरच आम्ही या नवीन क्षेत्रात पदार्पण करीत आहोत.

आम्ही काँग्रेसचे एकनिष्ठ सेवक आहोत. ब्रिटिश साम्राज्यशाहीशी सामना करण्याकरिता काँग्रेसइतके प्रभावशाली साधन दुसरे नाही असेच आम्हाला वाटते आणि म्हणूनच काँग्रेसच्या शिस्तीचे बंधन आम्ही आमच्यावर लादून घेत आहोत. पण याचा असा मात्र अर्थ नव्हे की, आमच्या पुढाऱ्यांना नवीन पिढीच्या वतीने विधायक सूचना करण्याचा आम्हाला हक्क नाही. इतकेच नव्हे तर असा हक्क आम्हाला आहे आणि

काँग्रेसला अधिक बलशाली करण्याकरिता हा हक्क आम्ही बजावावयास पाहिजे, असे आमचे मत असल्यामुळेच आम्ही 'इन्किलाब' चा उपक्रम करीत आहोत.

आज आपण क्रांतीच्या मार्गावरील एक एक टप्पा गाठीत आहोत. १९४२ च्या ऑगस्ट क्रांतीत सरकारी अत्याचाराचा जनतेने केलेला तेजस्वी आणि सक्रिय प्रतिकार, आणि त्यानंतर ठिकठिकाणी प्रस्थापित झालेली प्रतिसरकारे, नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली हिंदुस्थानच्याच नव्हे, तर जगाच्या इतिहासात अलौकिक असा आझाद हिंद सेनेने केलेला प्रचंड आणि दारुण संग्राम, जनतेची प्रतिकारशक्ती नष्ट झाली आहे असे समजून, आझाद हिंद फौजेच्या अधिकाऱ्यांवर खटले भरून त्यांना शिक्षा ठोठावताच १९४२ च्या तोडीची जनतेने केलेली उठावणी, त्यानंतर झालेले नाविकांचे आणि वैमानिकांचे बंड, पोस्ट आणि रेल्वे कामगारांनी केलेला संप, आणि शेवटी प्रांतांत आणि केंद्रात स्थापन झालेले आमचे लोकनियुक्त किंवा हंगामी सरकार अशी एकंदरीत लढ्याची पूर्वपीठिका आहे.

स्वातंत्र्याचा, समतेचा, लोकशाहीचा आजचा काळ आहे. स्वातंत्र्य, समता आणि लोकशाही यासारख्या पुरोगामी शक्तींचाच विजय होणार हे काळाने अनेकवार सिद्ध केले आहे. दुर्दैवाने आपले हे अंतिम उद्दिष्ट आपणास अद्याप गाठावयाचे आहे. स्वातंत्र्याचा क्षण जवळ आला आहे असे म्हणणाऱ्यांचा आशावाद हळूहळू वितळू लागला असून इंग्रजांच्या कुटिल नीतीचे सम्यग्दर्शन निराळ्या स्वरूपात आपणांस पुनश्च व्हावयास लागले आहे. "हंगामी सरकारचे राष्ट्रीय स्वरूप आता नष्ट झाले असून आमच्या पुढाऱ्यांना हंगामी सरकारातून केव्हा बाहेर पडावे लागेल याचा नेम नाही. लोकहो, पुढील लढ्याकरिता तयार राहा" असा खडखडीत इशारा राष्ट्रसभेच्या मीरत अधिवेशनास निवताना श्रीमती कमलादेवी यांनी दिला तो या दृष्टीने फारच सूचक आहे.

"प्रसादचिन्हानि पुरःफलानि" ही कविकुलगुरू कालिदासांची उक्ती राजांच्या कृपाप्रसादाइतकीच राजनीतीलाही लागू आहे; आणि ब्रिटिशनीतीला तर लागू आहेच. त्यामुळे त्यांच्या कारस्थानाचा शेवटचा अंक समाप्त होईपर्यंत त्यांच्या कारस्थानाची आपणाला कल्पनाही येत नाही आणि शेवटी भोळेपणाने त्यांच्या चांगुलपणाची प्रतीती पाहण्याकरिता त्यांना प्रत्येक वेळी "एक शेवटची संधी" देऊन आपणास स्वस्थ बसावे लागते. या कालहरणामुळे आमची शक्ती वाया जाते किंवा अस्थानी लागते, आम्ही क्रियाशून्य बनतो आणि आमच्यात कलह उत्पन्न होतात. ऑगस्ट आंदोलनात ज्यांनी आपल्या सर्वस्वाचा होम केला, आझाद हिंद सेनेत सामील होऊन राष्ट्राच्या स्वातंत्र्याकरिता ज्यांनी आपले प्राण पणास लावले, त्यांना आणि सर्वसामान्य जनतेला आपल्या राजकारणात पुनः "देवाणघेवाण" सुरू होईल असे खचित वाटले नव्हते. इतकेच नव्हे तर आम्ही क्रियाशून्य होऊन आपसांत कलह करीत बसलो नसतो तर निरनिराळ्या

संपांच्या रूपाने आपल्याच विरुद्ध उपयोगात येऊन नष्ट होणाऱ्या जनतेच्या शक्तीला आम्ही अधिक योग्य वळण देऊ शकलो असतो. नगरच्या किल्ल्यातून वर्किंग कमिटी सुटल्यानंतर आमच्या लढ्याला अधिक जोमाने सुरुवात होईल, १९४२ च्या लढ्यात आमचे नाव राखले म्हणून ज्यांचे अभिनंदन केले जाते त्या उत्साही आणि क्रियाशील तरुणांचे पुढील लढ्याच्या दृष्टीने संघटन करण्यात येईल, आणि कार्यप्रवृत्त आणि प्रामाणिक लोकच काँग्रेसमध्ये राहिल्यामुळे काँग्रेसला शुद्ध करण्याच्या घोषणा राष्ट्राध्यक्ष आचार्य कृपलानी यांना कराव्या लागणार नाहीत अशीच आमची कल्पना होती. आणि असे झालेही असते, पण...पण ब्रिटिश नीती आडवी आली. ज्या वेळी आमचे संघटन मजबूत करण्याची वेळ होती त्याच वेळी प्रांतीय आणि केंद्रीय निवडणुकीची घोषणा करण्यात आली. सरकारच्या या आव्हानाचा स्वीकार करणे अवश्य होतेच. पण या आव्हानाचा स्वीकार करताच आमच्यातील वैमनस्य पृष्ठभागावर आले. आमचा आपसातील लढा सुरू झाला आणि ब्रिटिश राजनीतीचा विजय झाला. निवडणुकीचा पवित्रा जर आमच्या सरकारने त्या वेळी टाकला नसता तर आपल्या देशात अंतःस्थ यादवीचे आज जे पेव फुटले आहे ते फुटले असते की नाही याची शंकाच आहे.

आपली निष्क्रियता आणि प्रतिगामिता झाकून टाकण्यासाठी जहाल भाषा वापरण्याइतके बहुमोल दुसरे साधन नाही. या साधनाच्या भरवंशावर आमच्या मजूरपक्षीय राज्यकर्त्यांनी आम्हाला केवळ शब्दांवर झुलवत ठेवले आहे. अशा वेळी त्यांच्या मधुर शब्दांच्या मागे कोणते रहस्य दडले आहे याची जाणीव आपणाला न होणे म्हणजे आपला कार्यनाश करून घेण्यासारखे आहे. "तुम्ही आपसांत समझोता करून या म्हणजे स्वराज्य तुमचेच आहे" असे सांगून इकडे वटना समितीची बैठक पुढे ढकलण्याची विनन्ती करणे, काँग्रेसच्या स्वाधीन केंद्रीय सूत्रे दिली असतानासुद्धा मुस्लिम लीगशी स्वतंत्रपणे वाटाघाटी करणे, नेहरू सरकारला बंगालमधील परिस्थिती स्वतंत्रपणे काबूत आणण्यास मनाई करणे, बजिरीस्थानच्या प्रश्नावर स्वतःच काहीतरी आश्वासने देणे, म्हणजे आम्हा हिंदुमुसलमानांत उत्पन्न झालेल्या दुहीच्या रोपास खतपाणी करण्यासारखेच आहे. अशा या पार्श्वभूमीवरून बंगालमध्ये चाललेल्या जातीय दंग्याकडे, नौखाली वगैरेसारख्या ठिकाणी झालेल्या अमानुष अत्याचारांकडे, आणि या अत्याचारांचा सूड घेण्याकरिता म्हणून बिहारमध्ये चाललेल्या दंग्यांच्या परतफेडीकडे पाहिले म्हणजे, "फोडा आणि झोडा" चे जुने ब्रिटिश राज्यतंत्र अजून बदलले नसून ते तसेच कायम आहे असे मोठ्या खेदाने म्हणावे लागते.

जागतिक परिस्थितीच्या कक्षेतसुद्धा हिन्दी राजकारणाचे असेच धिंडवडे उडणार की काय अशी शंका येणे अपरिहार्य आहे. संयुक्त राष्ट्रात हिंदुस्थानला जागा नाकारण्याच्या मागे हेच साम्राज्यशाही धोरण कारणीभूत आहे हे सांगावयास पाहिजे असे नाही.

पण प्रत्येक वेळी ब्रिटिश राजनीतीला नावे ठेवून चालावयाचे नाही. आम्हाला आमच्या तेजस्वितेची चुणूक जगाला दाखवून द्यावयाची असेल तर निर्बल राहून भागणार नाही. आम्ही आणि आमचे शत्रू यांच्यामध्ये केवळ शक्तीचाच झगडा आहे. आज आमच्या शत्रूंची ताकद अधिक आहे म्हणून त्यांचे आमच्यावर अधिराज्य आहे. उद्या आमची ताकद अधिक झाली तर त्यांना येथून गाशा गुंडाळावा लागणार! म्हणून आमच्या समोरचा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आमची ताकद वाढविण्याचा आहे. जोपर्यंत आमची ताकद वाढत नाही तोपर्यंत केवळ मोठमोठ्या घोषणांना अर्थ नाही. आमच्या प्रत्येक घोषणेच्या मागे काहीतरी अधिकार (Sanctions) असावयास पाहिजे. याकरिता एका बलशाली संघटनेची– जनसंघटनेची, शेतकरी-कामकऱ्यांच्या संघटनेची भक्कम उभारणी करणे अवश्य आहे. शेतकरी कामकऱ्यांच्या संघटनेतूनच महात्माजी-प्रणित खऱ्या किसान-मजदूर प्रजाराज्याची उभारणी होऊ शकते. आमची अशी विचार-सरणी असल्यामुळे ध्येयवादी तरुणांची संघटना करण्याचा आम्ही आपल्या परीने प्रयत्न करू.

आम्ही समाजवादी आहोत. जगातील सर्व लोकांनी स्वातंत्र्य उपभोगावे, जगातील विषमता नष्ट होऊन सर्वत्र समता आणि बंधुभाव यांचे अधिराज्य व्हावे असे ज्याला वाटेल तो समाजवादीच होईल अशी आमची धारणा आहे. प्रत्येक समाजवाद्याला आजची भांडवलशाही समाजरचना नष्ट होऊन तिच्या जागी समाजवादी समाजरचना किंवा शेतकरी-कामकऱ्यांचे राज्य स्थापन व्हावे असे वाटते. शेतकरी-कामकऱ्यांचे राज्य स्थापन होणे म्हणजे आजच्याप्रमाणे काही ठराबीक भांडवलशहांच्या किंवा जमीनदारांच्याच हातात उत्पादनाची साधने न राहता, सरसकट सामान्य किसान-कामगारांच्या हातात ती साधने अवश्य येणे होय. याकरिता किसान-कामगारांची संघटना करून जरूर पडल्यास जमीनदार-भांडवलादारांविरुद्ध आम्हाला लढा उभारावा लागेल. किसान-कामगार-क्रान्तीकरिता वर्गसंघटनांची आणि वर्गयुद्धाची जरूर आहे असे आमचे प्रामाणिक मत आहे.

अर्थात वर्गसंघटन आणि वर्गयुद्ध याला जरी आमचा विरोध नसला तरी जातीय संघटना आणि जातीय कलहाला (Caste Struggle) आमचा तीव्र विरोध आहे. दुर्दैवाने अशा तऱ्हेच्या जातीय संघटना आज राष्ट्रक्षितिजावर दिसू लागल्या आहेत. पण प्रत्येक राष्ट्रवाद्याने आणि समाजवाद्याने अशा संघटनांपासून अलिप्त असावयास पाहिजे. नाहीतर जातीय संघटनांच्या चितेत त्याचा सारा समाजवाद आणि राष्ट्रवाद तेव्हाच खाक होऊन जाईल. अर्थात येथे एक गोष्ट सांगणे अवश्य आहे. ती ही की, जातीय संघटनांच्या जोपासनेला आमच्या समाजाची, समाजातील काही घटकाकडे अत्यंत तिरस्काराने पाहण्याची, त्यांना अस्पृश्य लेखण्याची आणि त्यांच्यावर शतकानुशतके जुल्म

करण्याची वृत्तीच कारणीभूत आहे. जोपर्यंत आमची ही वृत्ती कायम आहे तोपर्यंत जातीय चळवळीच्या वाढीची, राष्ट्रीय संघटनेच्या हानीची आणि परकीय शत्रूंचे पाय आमच्या देशात मजबूत करण्याची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष जबाबदारी आमच्यावरच येऊन पडणार. आमच्यावर आणि आमच्या समाजावर असलेला हा कलंक आम्ही जितक्या लवकर धुऊन काढू, तितक्या लवकर आमच्यातली असंस्कृतता आम्ही नाहीशी केली असे होईल. आमच्या 'इन्किलाब'मधून अशा तऱ्हेचा प्रयत्न आम्ही करू अशी आम्ही आमच्या वाचकांना ग्वाही देतो.

आमच्या समाजात आणि देशात क्रांती झाली पाहिजे असे आमचे मत आहे. पण आम्ही जेव्हा क्रांती किंवा इन्किलाब हा शब्द उच्चारतो तेव्हा आम्हाला रक्तरंजित घटना अभिप्रेत नसतात. इन्किलाब म्हणजे आमूलाग्र आणि सर्वांगीण बदल. इन्किलाब म्हणजे मूल्यपरिवर्तन (Transvaluation of Values). जेव्हा समाजातील सर्वच मूल्ये जीर्ण होऊन जातात आणि तरीही जीर्ण मूल्यांचे पंडे ही निर्माल्य मूल्ये टिकविण्याचा प्रयत्न करितात तेव्हा प्रयत्नपूर्वक सर्वांगीण बदल घडवून आणून जुन्या निर्माल्य मूल्यांच्या ऐवजी नवीन उपयुक्त समाजमूल्यांची प्रतिष्ठापना करावी लागते. अशा मूल्यांच्या प्रतिष्ठापनेलाच क्रांती किंवा 'इन्किलाब' असे म्हणतात. आज आपल्या देशात अशी परिस्थिती उत्पन्न झाली आहे असे आम्ही समजतो आणि म्हणून साऱ्या हिंदी जनतेला 'इन्किलाब' सुरू करण्यास तयार व्हा असा गंभीर इषारा आम्ही देतो. जयहिंद.

२

अधिकार (सँक्शन्स) निर्माण करा

१६-१२-४६

सर्वसामान्य माणसाच्या दृष्टीने हिंदी राजकारणात सध्या तरी आशा-निराशांचा खेळ चालू आहे. स्वराज्य अगदी जवळ आले आहे, हातातोंडाशी आले आहे, स्वराज्यामध्ये आणि आपणामध्ये केवळ एक झिरझिरीत पडदाच काय तो शिल्लक आहे, वगैरे वगैरे आमचे वयोवृद्ध, तपोवृद्ध आणि अनुभववृद्ध पुढारी सांगतात. आम्ही त्यांच्यावर विसंबून पुढील लढ्याच्या तयारीचा प्रयत्न न करता स्वस्थ बसतो, आणि आमच्या पुढाऱ्यांनी आपल्या हातांनी स्वराज्याला धरण्याचा प्रयत्न केला तर ते त्यांच्या हातातून दूरदूर पळत जाते. स्वराज्य दूर पळाले अशी खात्री झाली म्हणजे आमच्या पुढाऱ्यांना इंग्रजांच्या सद्हेतूबद्दल शंका यावयास लागते. वाटाघाटीचे राजकारण काही काळ तरी थंड पडते. लढ्याशिवाय दुसरा मार्ग शिल्लक राहात नाही आणि लढा पुकारला जातो. अपुऱ्या तयारीनिशी किंवा मुळीच तयारी न करताना लढा चालविला तरीसुद्धा आमच्या पुढाऱ्यांचा उदोउदो करणारे स्तुतिपाठक सर्वत्र असतातच. प्रत्यक्ष लढ्याला मजबूत करण्याचा प्रयत्न न करता लढ्याचे मूल्यमापन करून तो लढा स्वयंस्फूर्त होता की अस्वयंस्फूर्त होता याचा शाब्दिक काथ्याकूट करण्यातच त्यांची शक्ती क्षीण होते.

सामान्य जनता ही भक्तिवादी आहे. पुढाऱ्यांवर जनतेची भक्ती असते. समाजातील स्तुतिपाठकांनी पुढाऱ्यांची अवास्तव स्तुती करण्याचाच परिपाठ ठेवला तर जनता आणि पुढारी हे दोघेही स्वप्नाळू झाल्याशिवाय राहणार नाहीत. जनतेचे योग्य मार्गदर्शन करून त्यांना क्रांतिप्रवण करावयाचे असेल तर आपले राजकारण, समाजकारण किंवा अर्थकारण

हे स्वप्नाळू राहणार नाही ही काळजी आपण घ्यावयास पाहिजे. स्वप्नाळू किंवा अवास्तव राजकारणाकरिता जर आमच्या पुढाऱ्यांचा उदोउदो व्हावयास लागला तर पुढाऱ्यांतही ते कितीही कर्तृत्ववान असले तरी, एक खोटा अहंगंड उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाही. मीरत काँग्रेसच्या वेळी, आणि नंतर नागपुरास श्री. वल्लभभाई पटेल यांनी तरुण नेत्यांना कुऱ्यांच्या पंक्तीला बसवून स्वतःकडे जो 'बैल होण्याचा' मान घेतला तो आमच्या तरी मते स्वप्नाळू भक्तिवादी राजकारणातून उत्पन्न झालेल्या अहंगंडाचाच मासला होय. आमच्या काही वडील भावंडांना वाटते त्याप्रमाणे जुन्यांचे पुढारीपण फेकून देण्याचा चंग बांधल्यामुळे किंवा नवीन पुढारीपण निर्माण करण्याचे कंत्राट घेतल्यामुळे आम्ही अशा तऱ्हेची भाषा वापरतो असे कोणीही समजू नये. कोणत्याही तऱ्हेच्या सत्ताराजकारणात (पॉवर पॉलिटिक्स) शिरण्याचा आमचा विचार नाही, आणि आमचे तरुण पुढारी जी भाषा वापरतात त्याच्यामागेसुद्धा सत्तालोलुपत्व आहे अशी आमची खात्री झाली तर त्यांचे सत्तालोलुपत्व चव्हाट्यावर आणण्याची जबाबदारीही आम्ही हिरीरीने पत्करू असे आम्ही सर्व जनतेस आश्वासन देतो. वास्तविक आम्हाला 'जुने पुढारीपण' आणि 'नवीन पुढारीपण' अशा तऱ्हेची भाषा वापरावयाचीच नाही. आमचे अनुभवी पुढारी ज्या धोरणाने राजकारणाचा गाडा हाकलीत आहेत ते धोरण म्हणजे देशद्रोही किंवा स्वार्थसाधू धोरण आहे अशी शंका-ही आमच्या मनात उत्पन्न होणे शक्य नाही. त्यांचे धोरण अपुरे आहे एवढेच आमचे म्हणणे.

मागील लेखात विवेचन केल्याप्रमाणे आम्ही व आमचे शत्रू यांच्यात शक्तीचा झगडा आहे. ज्या दिवशी आमची ताकद आमच्या शत्रूपेक्षा अधिक होईल त्या दिवशी आमचे कार्य पुरे होणार आहे. त्यामुळे आमच्या शत्रूला चीत करण्याकरिता आम्ही जो पवित्रा टाकतो तो भुसभुशीत वाळूवर आम्ही टाकत नाही याची काळजी घ्यावयास पाहिजे. एखादा पवित्रा टाकताच आपल्या पायाखालची जमीन सरकावयास लागली तर शत्रू चीत होण्याऐवजी आपलेच दुर्दैव ओढावयाचे. याकरिताच आपल्या प्रत्येक क्रियेच्या मागे अधिकार (Sanctions) असावयास पाहिजे. अधिकाराशिवाय केलेल्या रणगर्जना ह्या पोकळ गर्जना ठरतील. आमच्या पुढाऱ्यांच्या गर्जना पोकळ ठरू नयेत एवढीच आमची इच्छा आहे.

आपण घटना समितीचेच उदाहरण घेऊ. आमच्या पुढाऱ्यांनी कसे वागावयास पाहिजे होते, घटना समितीला सार्वभौम अधिकार आहे की नाही, 'सोळा मे'च्या कागद-पत्रांचा खरा अर्थ काय? इत्यादी गोष्टींचा आता विचार करून काही फलनिष्पत्ती होईल असे आम्हास वाटत नाही. घटना समितीला सार्वभौम अधिकार असेल तर ठीकच झाले. नाहीतर वाटेल ते करून, जरूर पडल्यास लढून सुद्धा, घटना समितीस

सार्वभौम अधिकार आपण मिळवून दिला पाहिजे, असे सामान्य माणसाप्रमाणे आम्हास-ही वाटते. सध्या चालू असलेल्या घटना परिपदेतून स्वतंत्र हिंदुस्थानची जी घटना तयार होईल ती केवळ कागदपत्रावर न राहता ताबडतोब अंमलात आली पाहिजे. याकरिता जरूर असलेली सर्व खटपट आतापासूनच आपण करावयास नको का? उद्या स्वतंत्र हिंदुस्थानची घटना तयार झाली आणि साम्राज्यवाद्यांनी ती आमच्या देशास लागू करण्यास अडथळे उत्पन्न केले तर वेळेवर आम्ही काय करणार? पुढे ज्या गोष्टींची शक्यता आहे त्याची तयारी आतापासूनच करून न ठेवली तर तहान लागली म्हणजे विहीर खोदण्यासारखे होणार नाही काय?

आमच्या अनुभवी नेत्यांना इंग्रज 'आपला शब्द' वाया जाऊ देणार नाही असा विश्वास वाटतो. कदाचित त्यांचे अनुभवाचे बोल खरेही असतील. पण आमचे धोरण चुकणे शक्यच नाही असा स्वतःबद्दल फाजील विश्वास बाळगणे सुद्धा गैर नाही काय? इंग्रजांनी आपल्यास कमीदा का फसविले आहे? लबाड माणसाचा विश्वास कसा धरावा? आम्हा तरुणांची अशी विचारसरणी आहे. आमच्या जुन्या पुढाऱ्यांना पदच्युत करण्याचा भाव त्यात नाही. स्वतःची सत्ता उत्पन्न करण्याची राक्षसी महत्त्वाकांक्षा त्यात नाही. वेशिस्त वर्तन करण्याचा अविवेकही त्यात नाही.

स्वतंत्र हिंदुस्थानची घटना तयार होताच प्रजासत्ताक राज्याची आम्हांस घोषणा करिता आली पाहिजे. ही घोषणा आम्हास करावयाची असेल तर या घोषणेच्या पूर्तीला लागणारे बलही आम्ही आजपासूनच संपादन करावयास पाहिजे. आम्हा तरुणांचा इंग्रजांवर विश्वास नाही. चूक असो वा बरोबर असो, पुनः एकदा इंग्रजांशी दोन हात करावे लागतील अशी आमची धारणा आहे. घटनात्मक राजकारण आम्हाला करावयाचे नाही. आमच्या अनुभवी पुढाऱ्यांनी ते जरूर करावे. आमची फक्त एकच इच्छा आहे, आमच्या पुढाऱ्यांना आमची एकच विनंती आहे, यदाकदाचित तुमचे पार्लमेंटरी राजकारण अयशस्वी ठरले तर देशाच्या स्वातंत्र्याकरिता आमचे बलिदान करा, आणि त्या क्षणाला आम्ही बलिदानाला तयार व्हावे याची आजपासूनच काळजी घ्या.

३

१९४२ ची तालीम आणि पुढील नाटक

२३-१२-४६

आमच्या मागील अग्रलेखात आमच्या पुढाऱ्यांच्या प्रत्येक शब्दामागे अधिकार (सँक्शन्स) असावयास पाहिजे असे आम्ही म्हटले आहे. जर आमच्या पुढाऱ्यांना आपल्या शब्दामागे अधिकार (सँक्शन्स) निर्माण करता आले नाहीत, किंवा त्यांनी निर्माण केलेले अधिकार (सँक्शन्स) अपुरे पडले अथवा आमच्या शत्रूंनी अगतिक होऊन दिलेले अधिकार किंवा सँक्शन्स अनुकूल संधी येताच त्यांना परत घेता आले तर आमच्या पुढाऱ्यांचा शब्द हा वायशब्द ठरेल. लंडन वाटाघाटीची जी फलश्रुती झाली आणि पंडित जवाहरलालजींना जे हात हालवीत परत यावे लागले याचे कारण तरी हेच आहे की, आम्ही स्वतःची पुरेशी शक्तिसाधने निर्माण करू शकलो नाही. आमच्या घटना समितीच्या मागील अधिकार हे परनिर्मित आहेत. त्या परनिर्मित शक्तीच्या ऐवजी ज्या दिवशी आम्ही स्वतःची अधिकारशक्ती निर्माण करू ज्या दिवशी आमच्या अधिकारांचा (सँक्शन्सचा) शक्तिबिंदू लंडनला न राहता आमच्याच जवळ राहील, त्याच दिवशी आमचे अधिकार हे खरे सार्वभौम अधिकार (सॉव्हरिन सँक्शन्स) ठरतील आणि आम्ही आमच्या मानेवरील गुलामगिरीचे जोखड दूर झुगारून देऊ शकू.

आजपर्यंत सार्वभौम अधिकार (सँक्शन्स) निर्माण करावयाचा आपण प्रयत्न केला नाही असे मुळीच नाही. आमच्या प्रत्येक जनआंदोलनातून काही मौलिक अधिकारमूल्ये खात्रीनेच निर्माण झाली आहेत. १९४२ मधील ऑगस्ट आंदोलनामुळे एका गोष्टीचा तर आम्हास निश्चितपणे प्रत्यय मिळाला. जनतासामर्थ्याचे, जन-आंदोलनाचे विश्वरूपदर्शन

त्याच वेळी आम्हाला प्रथम घडले. आम्ही जनतासंघटन करू शकतो आणि त्या संघटनाच्या जोरावर आमच्या देशाच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत आमूलाग्र बदल घडवून आणून आमच्या राज्यकर्त्यांना आम्ही आपला गाशा गुंडाळावयास लावू शकतो हा आत्मविश्वास ऑगस्टमधील जनतेच्या उठावणीने आम्हाला दिला. ज्या दिवशी हा आत्मविश्वास, हा आत्मप्रत्यय आम्हाला आला, त्या दिवशी आमची ताकद निश्चितपणे वाढली. त्या दिवशी आम्ही नवीन मौलिक अधिकार निश्चितपणे निर्माण केले. त्या दिवशी आमच्या स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ आम्ही निश्चितपणे रोवली.

१९४२ च्या चळवळीतून एक नवे अधिकारमूल्य प्रतिसरकारच्या रूपानेही आम्हास मिळाले. ब्रिटिशांची सत्ता झुगारून देणे हे विशेष कठीण काम नाही; आणि ९ ऑगस्ट नंतरच्या पहिल्याच आठवड्यात जनशक्ती ही सुसंघटित नसतानासुद्धा चिमूर, आष्टी, रामटेक, बलिया, मिदनापूर आदी ठिकाणी जनतेने पहिल्या धडकेसरशीच ब्रिटिश सत्ता नेस्तनाबूद करून टाकली. परंतु नेस्तनाबूद झालेल्या ब्रिटिश सत्तेऐवजी खरी जनसत्ता निर्माण होण्याला सुद्धा एका निराळ्याच अधिकारमूल्याची जरुरी होती. ते अधिकारमूल्य प्रतिसरकार किंवा ग्रामराज्याच्या रूपाने साताऱ्यास लाभले; आणि म्हणून साताऱ्याचे स्वराज्य कित्येक दिवसपर्यंत इंग्रजांशी झुंज देऊ शकले, आणि इतर ठिकाणची जनसत्ता एक आठवड्याच्या आतच संपुष्टात आली.

पण ऑगस्ट आंदोलनात आम्हाला अनेक अधिकारमूल्यांचे केवळ निमित्तमात्र दर्शन झाले. एक तर १९४२ च्या आंदोलनातून प्राप्त झालेल्या मूल्यांचा राष्ट्रीय आणि जागतिक परिस्थितीच्या फेऱ्यात सापडल्यामुळे आम्हाला हवा तसा उपयोग करून घेता आला नाही; आणि दुसरे म्हणजे त्या वेळी निर्माण झालेली अधिकारमूल्ये आमच्या कार्याच्या व्याप्तीच्या मानाने एकंदरीत अपुरीच पडली. म्हणूनच आमच्या प्रान्ताचे अनुभवी आणि वास्तववादी नेते आणि आजचे पंतप्रधान* पं. रविशंकर शुक्ल यांनी अधिकारग्रहण करण्यापूर्वी काही दिवस "१९४२ ची चळवळ ही केवळ पुढील नाटकाची तालीम (रिहर्सल) होती, नाटक अद्याप पुढेच आहे" असे जे उद्गार काढले ते यथार्थ नाहीत असे कोण म्हणेल?

तालीम आणि नाटक यात फार थोडे अंतर आहे. नाटक हे तालमीचे अधिक परिणत स्वरूप असते. तालमीत अधिक सूत्रबद्धता आणि सुसंगती आली म्हणजे नाटक प्रयोगाकरिता तयार झाले असे समजले जाते. १९४२ च्या आंदोलनात जी सूत्रबद्धता आणि सुसंगती नव्हती ती सूत्रबद्धता आणि सुसंगती आपण जर निर्माण करू शकलो तर आपल्या नाटकाचा प्रयोग फारच बहारीचा वठेल यात शंका नाही.

---

* प्रांताच्या मुख्यमंत्र्यांना त्या वेळी पंतप्रधान म्हणत असत.

ही सूत्रबद्धता आम्ही कशी आणावयाची ? किंवा निराळ्या शब्दांत आम्हाला हवी असलेली सार्वभौम अधिकारमूल्ये आम्ही कशी निर्माण करायची ?

लीगच्या धोरणामुळे एका रीतीने आजची परिस्थिती १९४२ किंवा तत्पूर्व परिस्थिती-पेक्षा अधिक गुंतागुंतीची झाली असली तरी काही दृष्टीने आजची परिस्थिती आम्हास अधिक अनुकूलही आहे. हिंदुस्थानातील बहुतांश प्रांतात आणि थोडयाफार प्रमाणात केंद्रातसुद्धा आज आमचे सरकार अस्तित्वात आहे. आजपर्यंत आम्ही जेव्हा जेव्हा सार्वभौम अधिकारासाठी झगडलो तेव्हा राजसत्तेचे लगाम आमच्या हाती नव्हते. त्यामुळे आमचा लढा नेहमीच एकांगी राहिला. आमची जास्तीत जास्त मजल प्रतिसरकारापर्यंतच (पॅरलल गव्हर्नमेंट) गेली. सरकारी राज्ययंत्रातूनच वाहात असलेल्या असंतोषात्मक शक्तीचा फायदा घेऊन ते राज्ययंत्रच जसेच्या तसे आपल्या ताब्यात येण्याची कला आम्हास साधली नाही. राज्ययंत्रातील मर्मस्थानी आमची माणसे नेमून राज्ययंत्राचा फायदा आम्हासच मिळावा, आमच्या शत्रूंना तो मिळू नये, अशी व्यवस्था आम्हांस करता आली नाही, किंवा राज्ययंत्र आमच्या ताब्यातून गेले तरीसुद्धा ज्या सुधारणांचा जरूर पडल्यास आम्ही स्थापन केलेल्या प्रतिकारास निश्चितपणे उपयोग होईल अशा सुधारणाही आम्हांस घडवून आणता आल्या नाहीत.

हा लढ्याचा काळ नाही एवढी गोष्ट आम्हाला कबूल आहे. पण हा लढ्याच्या तयारीचा काळ खचित आहे. सामोपचाराने आमचा प्रश्न न सोडविला तर आम्ही लढण्यासाठीही तयार आहोत हे जर आमच्या राज्यकर्त्यांना कळले तर कदाचित लढ्याशिवाय सुद्धा आमचा प्रश्न सुटेल. पण आमची लढ्याची तयारी नाही असे क्षणभर जरी आमच्या राज्यकर्त्यांना दिसून आले तर आपल्या तालावर ते आम्हाला केवळ नाचावयास लावतील.

आज आमच्यासमोर स्वराज्याचा प्रश्न नाही, केवळ सुराज्याचा प्रश्न आहे असे फार जबाबदार पुढाऱ्यांकडूनसुद्धा बोलले जाते, पण सुराज्याचा प्रश्न केव्हा उद्भवेल ? आम्हास स्वराज्य मिळाले असेल तर. स्वराज्याची तहान सुराज्याने भागत नाही हे विसरून कसे चालेल ? गुलामीतील सुराज्यात रामेश्वरापासून काशीपर्यंत काठीला सोने लावून फिरण्यात धन्यता मानण्यापेक्षा स्वराज्याचा प्रश्न हा अधिक महत्त्वाचा आहे असे आमचे प्रामाणिक मत आहे. ज्या सुराज्यात स्वातंत्र्याचे मूल्य अंतर्भूत नाही ते खरोखरच सुराज्य तरी होऊ शकेल काय ?

आमच्या सुदैवाने आज आमचे मंत्रिमंडळ अस्तित्वात आहे. त्यांना राज्याचा शकट हाकावयाचा आहे हे आम्ही विसरलो नाही. त्यांच्या हातून राज्यशकट योग्य रीतीने हाकला जावा अशीच आमची इच्छा राहील. सुव्यवस्था राखण्याकरिता १४४ कलमाची जरी त्यांना अंमलबजावणी करावी लागली तरी त्याला आमची हरकत नाही. पण केवळ सुव्यवस्था राखण्याकरिता नव्हे, तर ना. पंडित रविशंकर शुक्ल यांनी म्हटल्याप्रमाणे पुढील

नाटकाची तयारी करण्याकरिता आमचे मंत्री मंत्रिमंडळात गेले आहेत हे सत्य त्यांनाही दृष्टिआड करून चालणार नाही. हे सत्य जर ज्यांनी दृष्टिआड केले नाही आणि पुढील लढ्याला जरूर असलेल्या विधायक कार्यक्रमांची आजपासूनच आखणी आणि अंमलबजावणी केली तर आवश्यक असलेली सार्वभौम अधिकारमूल्ये आम्हाला निश्चितपणे निर्माण करता येतील. १९४२ च्या तालमीत जे साधले नाही ते साधेल. जनसंघटनेला राज्ययंत्राचे पाठबळ मिळेल. सार्वभौम अधिकाराकरिता ॲटली-चर्चिलच्या तोंडाकडे आम्हांस पाहावे लागणार नाही, आपोआप सत्तांतर होईल आणि मग आमचे नाटक यशस्वी झालेले आम्हाला दिसेल.

४

काँग्रेसचे जनसंघ (Unions) स्थापन करा !

६-१-४७

लोकशाही आणि भाषणस्वातंत्र्य

आमच्या गेल्या अंकात, कम्युनिस्टांना आमच्या सरकारने केवळ स्थानबद्ध करून न ठेवता त्यांच्या अपराधाबद्दल एकतर त्यांच्यावर खटले तरी भरावे किंवा त्यांना सोडून तरी द्यावे असे आम्ही म्हटले आहे. पण याचा असा मात्र मुळीच अर्थ नाही की, कम्युनिस्टांचे धोरण बरोबर आहे असे आमचे मत आहे. उलट लोकशाही आणि भाषणस्वातंत्र्य या दोन मौलिक गोष्टींचा आपल्या पक्षाकरिता जास्तीत जास्त उपयोग करून घेऊन दुसऱ्यांच्या कार्यात आणि मार्गात अडथळे उत्पन्न करण्याचाच त्यांचा हा एक डाव आहे असेच सामान्य काँग्रेसवाल्यांप्रमाणेच आम्हासही वाटते.

धरले तर चावते, आणि सोडले तर पळते

परंतु कोणताही डाव वा पवित्रा टाकण्यात कम्युनिस्ट इतके कुशल आणि धूर्त असतात की त्यांचा डाव समजण्यात थोडीशी जरी कसर काँग्रेस कार्यकर्त्यांत राहिली तरी त्यांनी काँग्रेसवाल्यांवर डाव उलटविलाच म्हणून समजावे. विधायक दृष्ट्या समाजाची पुनर्रचना करणे हे अवघडच काम आहे. उलट कोणाच्याही कार्याची नासाडी किंवा विघटना करावयाची असल्यास थोडेसे विध्वंसतोषी लोक पुरेसे होतात. कम्युनिस्टांचा आज असा विध्वंसतोषीपणाचा डाव असल्यामुळेच ' धरले तर चावते आणि सोडले तर

पळते ' अशी हिंदी राजकारणात कम्युनिस्टांची भूमिका झाली आहे.

कम्युनिस्ट पक्षाकरिता चळवळ

आज कम्युनिस्ट कसे वागतात ? आणि तसे वागण्यात त्यांचा खरा हेतू कोणता ? जागतिक महायुद्धामुळे उत्पन्न झालेल्या महागाईचा आणि आर्थिक दुरवस्थेचा फायदा घेऊन, कम्युनिस्ट, कामगारांची एक चळवळ आज उभारू इच्छितात. किसान-कामगारांची चळवळ उत्पन्न करणे प्रतिगामी आहे काय ? याचे उत्तर ' नाही ' असेच द्यावे लागेल. पण कम्युनिस्टांचा अशी चळवळ उभारण्यामागे कोणता हेतू आहे ? किसान-कामगारांचा प्रश्न सोडविणे याला कम्युनिस्टांच्या दृष्टीने केवळ साधन म्हणून महत्त्व आहे. किसान-कामगारांकरिता चळवळ करणे निराळे आणि किसान कामगारांच्या दुःस्थितीचा फायदा घेऊन स्वपक्षाची चळवळ करणे निराळे. यातही आणखी एक फरक आहे. किसान-कामगारांच्या चळवळीचा राष्ट्रहिताच्या दृष्टीने उपयोग करून घेणे निराळे आणि किसान-कामगार चळवळींच्या आणि राष्ट्रहिताच्या घोषणा करून स्वपक्षाचे बल वाढविणे निराळे. कम्युनिस्टांनी किसान-मजूर हिताच्या आणि राष्ट्रीय चळवळीच्या कितीही घोषणा केल्या तरी ' त्यांचा बोलविता धनी ' निराळाच आहे हे सुज्ञांना सांगण्याची आवश्यकता राहिली नाही. पण राजकीय दृष्टी नसलेल्या कामगारांचे काय ? राजकारणाशी किंवा स्वराज्यविषयक अथवा समाजविषयक प्रश्नांशी त्यांचा साक्षात संबंध तो कितीसा येणार ? त्यांच्या दैनंदिन प्रश्नांविषयी जो सहानुभूती बाळगेल, मिशनरी लोकांप्रमाणे त्यांच्या जीवनाशी समरस होऊन त्यांच्या अडीअडचणी सोडविण्याचा जो प्रयत्न करेल त्यांच्याचकडे सामान्य कामगारवर्गाची विनी झुकणार, त्यांच्याच मागे सामान्य कामगारवर्ग जाणार ! " आमच्या पुढाऱ्यांनी अमुक एक धोरण का आखले, त्यामागे काही राजकारण आहे काय ? " याचा तो कशाला विचार करील ? आज जर कोणाला दहा रुपये मिळत असतील आणि उद्या कोणी वीस रुपये मिळवून देण्याची युक्ती त्याला सांगितली तर वीस रुपयांकरिता प्रयत्न करणे हा माणसाचा स्वभावधर्मच नाही काय ? आजच्या भांडवलशाही समाजरचनेत किसान-कामगारांचे जे रक्तशोषण केले जाते ह्याकडे आणि श्रीमंत वर्गाकडून त्यांना जे बुद्धिपुरस्सर अज्ञानात ठेवले जाते त्याकडे पाहिले म्हणजे किसान-कामगारांच्या मेहनतीच्या जोरावर जगाचे धनी होऊ पाहणाऱ्या श्रीमंतांच्या नरडीचा घोट घेण्याची महत्त्वाकांक्षा किसान-कामगारांनी का बाळगू नये ? किसान-कामगार वर्गाची आज सामान्यतः अशी मनःस्थिती आहे. त्यामुळे त्यांच्या मनात धगधगत असलेल्या असंतोषाचा फायदा घेऊन ' मिशनरी वृत्ती ' पुरेपूर अंगात बाणलेले कम्युनिस्ट त्यांना सहज ' उचकवू ' शकतात आणि सकृद्दर्शनी तरी कम्युनिस्टांचे वागणे अन्यायमूलक वाटत नाही.

कामगार राष्ट्रीयच

पण अशा रीतीने कम्युनिस्टांनी घडवून आणलेल्या संपात कामगार सामील झाले म्हणजे ते कम्युनिस्टमतानुवर्ती असतात असे मात्र मुळीच नाही. कमीत कमी आज तरी सामान्य किसान-कामगारांचा राष्ट्रीय किंवा काँग्रेसचाच दृष्टिकोण आहे. पण कम्युनिस्टांच्या मायाजालात किसान-कामगार यावयास लागले आणि त्यांच्या आवश्यक मागण्या आपणास काँग्रेसचे किंवा राष्ट्रीय म्हणविणारे ऐतखाऊ श्रीमंत लोक पुरे करीत नाहीत असे त्यांना दिसले आणि उलट त्या श्रीमंतांचीच बाजू घेऊन कामगारांवर जाणतेपणाने किंवा अजाणतेपणाने काही अत्याचार सरकारकडूनच घडले तर कम्युनिस्टांचेच म्हणणे बरोबर आहे असा आपोआप त्यांचा बुद्धिभेद व्हावयास लागतो आणि हळूहळू ते कम्युनिस्टधार्जिणे होत जातात. राजकारणी कम्युनिस्ट कधी कधी मुद्दामच अशा तऱ्हेचा पेचप्रसंग उत्पन्न करण्याची योजना आखतात आणि त्यायोगे सामान्य जनतेची आणि विशेषतः कामगारांची दिशाभूल करणे सोपे जाते. उदाहरण म्हणून काँग्रेस सरकारला बदनाम करण्याच्या दृष्टीने अमळनेर येथे कम्युनिस्टांनी स्वतः बेजबाबदार रीतीने वागून सरकारकडून जो गोळीबार करविला त्याचे देता येईल. अशा वागणुकीने देशातील पुढाऱ्यांना कोणताही कार्यक्रम हाती घेणे अशक्य होते आणि काही झाले तरी सरकार आमच्याकरिता काही करतच नाही किंवा सरकार आमच्यावर गोळीबार करिते अशासारखा प्रचार कम्युनिस्टांना करिता येतो.

काँग्रेस सरकारच्या दृष्टिकोणातून

या स्थितीतून निघण्याचा मार्ग कोणता ? पण तत्पूर्वी आमच्या सरकारच्या दृष्टिकोणातून ह्या प्रश्नांचा विचार करू. आमचे सरकार हे काँग्रेसचे सरकार आहे. जनतेने निवडून दिलेले सरकार आहे. या सरकारात आणि पूर्वीच्या ९३ कलमी राजवटीत महदंतर आहे. पूर्वीच्या सरकारसमक्ष केवळ एकच प्रश्न होता. येन केन प्रकारेण, दंडुक्याच्या जोरावर ब्रिटिश साम्राज्याचे रक्षण करणे आणि संतोषाचा, सुव्यवस्थेचा, सुराज्याचा देखावा उत्पन्न करणे. एवढेच जुन्या सरकारचे कार्य होते. त्यामुळे कोठे वटहुकूम काढ, कोणास बिनाचौकशी डांबून ठेव, कोणाला १८१८ च्या कायद्याखाली दडप, असल्या गोष्टी जुन्या सरकारला नित्याच्याच होत्या. परंतु काँग्रेसचे सरकार जुन्या सरकारहून भिन्न आहे. जनतेचे ते सरकार आहे. जनतेला देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याकरिता आजपर्यंत त्यांनी आपले प्राण पणास लावले आहेत आणि यापुढेही कोणताही स्वार्थत्याग करावयास ते मागे पुढे पाहणार नाहीत.

आमच्या सरकारला दोन वेगवेगळी कार्ये पार पाडावयाची आहेत. एक म्हणजे देशात सुव्यवस्था टिकविणे आणि दुसरे म्हणजे पुढील लढ्याची तयारी करणे. अर्थात

देशाची सुव्यवस्था नष्ट करण्याचा जे जे प्रयत्न करतील त्यांचे त्यांचे निर्दाळण काँग्रेस सरकारला करावे लागणे अपरिहार्यच आहे. शिवाय काँग्रेस सरकारसमोर जर समाज-व्यवस्थेची आणि पुढील लढ्याच्या तयारीची काही योजना असेल तर ती योजना यशस्वी करण्याकरिता काँग्रेस मंत्रिमंडळाला तुम्ही पुरेसा काळ देणे सुद्धा तितकेच जरूर आहे. जर भाषणस्वातंत्र्याच्या – विचारस्वातंत्र्याच्या नावाखाली कोणी काँग्रेसच्या योजना हाणून पाडण्याचा प्रयत्न करणार असेल तर ते सहन करणे कोणालाही कठीणच जाईल.

स्वातंत्र्य की अतंत्रता

स्वातंत्र्याच्या शाब्दिक कल्पनेला काहीच अर्थ नाही. ज्यांना स्वातंत्र्याच्या कल्पनेचे महत्त्व कळते त्यांच्याच करिता स्वातंत्र्य या शब्दाचे महत्त्व आहे. स्वातंत्र्य म्हणजे अतंत्र वागणे नव्हे. अतंत्र वागण्याने निव्वळ अव्यवस्था, वेबंदशाही माजेल. भाषणस्वातंत्र्याचा अर्थ विषारी बडबड असू शकत नाही. तेव्हा काँग्रेससरकार अधिकारात आल्याबरोबर नोकरवर्गाच्या हीनदीन परिस्थितीचा फायदा घेऊन सरकारविरुद्ध काहूर माजवायचे आणि सरकारला राष्ट्राच्या पुनरुत्थानाच्या दृष्टीने मुळी सुद्धा प्रयत्न करू न देता संपाचा धाक दाखवून त्रस्त करून सोडावयाचे हे केव्हाही योग्य नाही. कोणती चळवळ कोणत्या वेळी करावी हे कम्युनिस्टांनाही कळत नाही असे नाही. लोकयुद्धाचा शंख फुंकीत कम्युनिस्ट नेते युद्धकार्याला अडथळा उत्पन्न होऊ नये म्हणून मजुरांना जेव्हा संपापासून परावृत्त करीत होते तेव्हा ते तसे का करीत याचा विचार केला तर निश्चित कळून येईल की, स्वातंत्र्य म्हणजे अतंत्र वागणे नव्हे हे कम्युनिस्टांनाही कळते. आणि म्हणून स्वातंत्र्याच्या नावाखाली कम्युनिस्ट जेव्हा अतंत्र वागावयास सुरुवात करितात तेव्हा सामान्य जनतेच्या डोळ्यांत धूळ फेकून आपल्या विरोधकांना बदनाम करण्याचा डाव त्यात असतो. आपल्या देशाची शक्ती वाढविण्याकरिता रशियाने जेव्हा निरनिराळ्या पंचवार्षिक योजना आखल्या तेव्हा व्यक्तिस्वातंत्र्याच्या नावावर ज्यांनी ज्यांनी त्याला विरोध केला किंवा ज्यांचा विरोध होईल अशी क्षणमात्र सुद्धा शंका रशियातील कम्युनिस्ट सरकारला आली त्यांचा त्यांचा काटा रशियाने आपल्या मार्गातून कसा वेगळा केला याचा पाढा कम्युनिस्टांच्या समोर वाचावयाची गरज आहे काय ?

कायद्याच्या बंधनात

आम्हाला हेही कबूल आहे की, पुष्कळदा अव्यापारेषु व्यापार करणाऱ्यांना कायद्याच्या बंधनात पकडता येत नाही. अशा वेळी काय करावयाचे हाही एक महत्त्वाचा प्रश्न होऊन जातो. सर्वसामान्य देशातील सरकार अशा वेळी त्यांना स्थानबद्ध करून ठेवते. रशियातील सरकार तर याही पलीकडे जाते.

परंतु काँग्रेस सरकारने सुद्धा असेच वागावयाचे काय ? देशात केवळ सुरक्षा ठेवणे एवढेच आजच्या सरकारचे कार्य असते तर सरकारच्या वागणुकीला आम्ही दोष दिला नसता. पण आमच्या सरकारचे तेवढेच कार्य नाही. सरकारला स्वातंत्र्याच्या पुढील लढ्याचीही तयारी करावयाची आहे, आणि हा लढा यशस्वी होण्याकरिता सरकारात मर्मस्थानी आमची किती माणसे आहेत याला जितके महत्त्व आहे तितकेच जनतेचे किती पाठबळ आम्हाला आहे याला सुद्धा महत्त्व आहे. सामान्य यंत्राप्रमाणेच राज्य-यंत्रातसुद्धा प्रत्येक लहान लहान भागाला महत्त्व आहे, मोठा अधिकारी तुमच्या बाजूस असला आणि त्याच्या हुकमाची अंमलबजावणी करणारे लोक जर तुमच्या बाजूला नसले तर तुम्हाला जे कार्य पुरे करावयाचे आहे ते कसे पुरे होईल ? आज सरकारी यंत्रातील दुय्यम वर्ग काँग्रेसला अनुकूल आहे, तेव्हा त्यांच्याच दररोजच्या अडचणींचा फायदा घेऊन " पाहा, काँग्रेस सरकार तुमच्याकरिता काहीच करीत नाही " असा आभास उत्पन्न करून त्यांना काँग्रेसविरोधी आणि कम्युनिस्टांना अनुकूल करण्याचा कम्युनिस्टांचा हा डाव आहे असा आमचा प्रामाणिक समज आहे. ज्या तडफेने आपल्या मागण्यांची भेंडोळी कामगारांच्या वतीने कम्युनिस्ट आज सरकारवर फेकीत आहेत, त्याकडे पाहिले म्हणजे ह्या मागण्या सरकार आज नक्कीच पुऱ्या करू शकत नाही, हे कळून येईल. नव्हे कम्युनिस्ट सरकार अस्तित्वात असते तरी ते पुरे करू शकले नसते, याची जाणीव कम्युनिस्टांना निश्चितपणे आहे. म्हणूनच काँग्रेसविरोधी प्रचार करून आपले बल वाढविण्याचा कम्युनिस्टांचा हा एक मार्ग आहे यात शंका नाही.

खटले भरणे तोडगा नव्हे !

परंतु याला तुम्ही उत्तर कसे देणार ? कम्युनिस्टांवर खटले न भरता स्थानबद्ध करून तुम्ही ठेवले तर कम्युनिस्ट आणि जनता म्हणणारच की हे पाहा, हे स्वातंत्र्याचे- भाषण-स्वातंत्र्याचे- विचारस्वातंत्र्याचे पाठीराखे- आणि याचा परिणाम काय होणार ? पुढील लढ्याच्या दृष्टीने ज्या लोकांची सहानुभूती मिळविण्याचा तुम्ही प्रयत्न करावयास पाहिजे तीच सहानुभूती तुम्ही गमावून बसणार ! म्हणजे कम्युनिस्टांना पकडून तुमचा काही फायदा होत नाही. शिवाय तुम्ही कितीही शुद्ध बुद्धीने कम्युनिस्टांना खटले न भरता तुरुंगात डांबून ठेवले तरी लोक म्हणणारच की, मागील सरकारात आणि ह्या सरकारात काय फरक आहे ? एकूण खटले न भरता डांबून ठेवणे हा काही या बाबतीत योग्य तोडगा होऊ शकत नाही. एक तर तुम्ही त्यांच्यावर खटले भरले पाहिजेत, किंवा कम्युनिस्ट स्वतः ज्या जनसंघटना आज उत्पन्न करीत आहेत त्या संघटना स्वतः उत्पन्न करून कम्युनिस्ट राजकारणाचे अंतरंग कामगारांच्या मनात स्पष्टपणे ठसवून दिले पाहिजे. आता बडे अधिकारी आणि सामान्य नोकरवर्ग यांच्यात हुजूर आणि चपराशी यांचे

नाते चालणार नाही. त्यांच्यामध्ये एक निराळेच नाते आता उत्पन्न व्हावयास पाहिजे. सरकारी नोकरीत म्हणा किंवा इतरत्र म्हणा केवळ पोटाची खळगी भरण्याकरिता आपण आलो नसून काही कार्याकरिता आपण आलो आहोत ही जाणीव त्यांच्यात उत्पन्न होऊ द्या. ती जाणीव उत्पन्न होण्याकरिता त्यांचे काँग्रेसानुकूल जनसंघ स्थापन होणे ही अत्यंत आवश्यक बाब आहे. असे जनसंघ तुम्ही स्थापन केले तरच कम्युनिस्टांच्या कारवाया तुम्ही बंद करू शकाल. आणि हळूहळू सरकारी वा अन्य कामगारांचा आर्थिक प्रश्न तुम्हांस सोडविता येईल. शिवाय पुढील लढ्याच्या दृष्टीने सुद्धा असे जनसंघ तुमच्या फार उपयोगात पडतील. उदाहरणार्थ, पोलिसांचा असा जनसंघ जर तुम्ही उत्पन्न केला तर काय होईल हे न सांगताही कळण्यासारखे आहे.

तात्पर्य, आमच्या तरी मते कम्युनिस्टांचा डाव आपणांस हाणून पाडावयाचा असेल तर काँग्रेसला आर्थिक तत्त्वावर चालणाऱ्या जनसंघटनाच्या बाबतीत कम्युनिस्टांपेक्षा अधिक कार्यक्षम झाले पाहिजे. केवळ कम्युनिस्टांना स्थानबद्ध करून ठेवणे हा काही त्यावरील रामबाण उपाय होऊ शकत नाही. उलट असा उपाय योजल्याने तुमच्या लोकप्रियतेला धक्का बसतो, पोचतो, हे विसरू नका. मंत्रिमंडळे स्थापन केल्यामुळे जनआंदोलनाचे आमचे कार्य संपले असे समजू नका आणि जनआंदोलनाच्या दृष्टीने प्रयत्न करणाऱ्या काँग्रेसच्या तरुण कार्यकर्त्यांत आणि तुमच्यात ज्यायोगे सहकार्य उत्पन्न होऊ शकेल असे काही तरी करा.

५

शिक्षकांना न्याय द्या !

१३-१-४७

येत्या पंधरा तारखेला प्रांतातील १५ हजार शिक्षकवर्ग संपावर जाणार आहे आणि त्यांच्या पावलावर पाऊल टाकून दुय्यम शिक्षकवर्ग सुद्धा संपावर जाण्याचा विचार करीत आहे. काही दिवसांपूर्वी आमच्या प्रांतातील शिक्षकवर्ग, आपल्या मागण्या पुऱ्या न झाल्यास संपावर जाणार असल्याची बतमी आम्ही दिली होती आणि त्याचबरोबर शिक्षकांच्या मागण्या अत्यंत न्याय्य स्वरूपाच्या असल्यामुळे त्या ताबडतोब मंजूर करण्यात याव्या नाहीतर त्यांना संपावर जाण्याशिवाय दुसरा मार्ग राहणार नाही असेही आम्ही आमच्या प्रासंगिक स्फुटातून सूचित केले होते. ज्यांच्या हाती राष्ट्राचे भवितव्य घडविण्याचे काम तुम्ही देता, राष्ट्राचे आधारस्तंभ निर्माण करण्याचे काम ज्यांच्यावर तुम्ही लादता, त्यांना धड माणूस म्हणूनही तुम्ही जगू देत नाही हा विचित्र विरोधाभास फक्त हिंदुस्थानसारख्या दुर्दैवी देशातच दिसू शकतो. गुलाम माता स्वातंत्र्याकरिताच जगणाऱ्या आणि स्वातंत्र्याकरिताच मरणाऱ्या वीरपुत्रांना जन्म देऊ शकत नाही आणि गुलाम शिक्षक, आर्थिक परिस्थितीमुळे लाचार झालेले शिक्षक, स्वतंत्र वृत्तीचा नागरिक उत्पन्न करू शकत नाहीत. पोटाचा प्रश्न हा सर्वांत महत्त्वाचा आहे. पोटाकरिता मनुष्य वाटेल त्या पापाला प्रवृत्त होतो. पापाला प्रवृत्त झालेल्या माणसाला सत्यासत्याची किंवा नीतीची चाड राहात नाही आणि नीतीची चाड नसलेला गुरू सत्प्रवृत्त नागरिक उत्पन्न करू शकत नाही.

आमच्या मागील स्फुटात शिक्षकांना आज बारा रुपयापासून अठरा रुपयापर्यंत पगार

मिळतो असे आम्ही म्हटले आहे. पण नुकत्याच हाती आलेल्या बातमीवरून आम्हाला असे कळते की, हे अल्पवेतनसुद्धा कित्येक जिल्हा कौंसिलच्या शिक्षकांना अनेक दिवस मिळाले नाही. हे खरे असेल तर आमच्या प्रांतात चालणाऱ्या अंदाधुंदीला काय म्हणावे ? प्रथम आवश्यक असलेले अन्न तुम्ही शिक्षकांना कबूल करणार नाही आणि जे कबूल कराल ते सुद्धा त्यांना वेळेवर देणार नाही. मग त्यापेक्षा त्यांनी सरळ चोरी केली किंवा डाका मारला किंवा काही श्रीमंतांची हांजी हांजी करून त्यांच्या स्तुतिपाठकाचे नीच काम पत्करले तर या नैतिक अधःपतनाबद्दल शिक्षकांपेक्षाही समाजाचा पुढारीवर्ग हा अधिक जबाबदार ठरणार नाही काय ? आम्हाला आज पुरोगामी आणि राष्ट्राची, स्वातंत्र्याची तळमळ असलेले शिक्षक पाहिजे आहेत. परंतु शिक्षकाला शिक्षकत्वाच्या घाण्यास जुंपून जर त्याची आंधळ्या बैलापेक्षाही अधिक केविलवाणी परिस्थिती तुम्ही उत्पन्न करणार असाल तर कोणता स्वाभिमानी मनुष्य राजीखुशीने शिक्षक होण्यास तयार होईल ? आणि मग सर्वांना सुशिक्षित आणि साक्षर करण्याच्या तुमच्या गर्जनासुद्धा वल्गनाच ठरणार नाहीत काय ?

ना. शिक्षणमंत्र्यांनी प्रत्येक शिक्षकाला किमानपक्षी तीस रुपये तरी पगार असावा अशी घोषणा केली असून नवीन योजनेप्रमाणे १ एप्रिल १९४६ पासून सर्व प्रायमरी शिक्षकांना वाटण्याकरिता तीस लाख रुपयांची मदत सरकारी खजिन्यातून देण्याचे कबूल केले आहे असे आम्ही ऐकतो. पण घोडे कोठे पेंड खाते आणि पाणी कोठे मुरते काही कळत नाही. जर मदत करावयाची असेल तर सरळ सरळ मदत करा. नसेल तर खोटे आमिष दाखवू नका.

आमच्या शिक्षकवर्गालाही आमचे एक सांगणे आहे. शिक्षकांच्या बाबतीत आज जो विरोधाभास दिसतो हा विरोधाभास नाही. भांडवलशाही समाजरचनेचेच हे एक स्वरूप आहे. शक्यतोवर आपल्या बोजाखाली सर्वांचे नैतिक अधःपतन करावयाचे आणि आपणास हवा असेल त्या तऱ्हेचा पोटभरू कारकूनवर्ग निर्माण करावयाचा हेच सरंजामी आणि भांडवलदार वर्गाच्या मताने शिक्षणाचे कार्य आहे. तेजस्वी आणि राष्ट्रीय बाण्याचा तरुण वर्ग निर्माण झाला तर भांडवलदार-मिरासदार लोकांचे आसन डळमळावयास लागेल याची त्यांना भीती वाटते. प्रामाणिक शिक्षकवर्गाला याच कारणाकरिता भांडवलदार वर्गाविरुद्ध लढावयाचे आहे. शिक्षकवर्गाने आजच्या भांडवलशाही समाजरचनेचे स्वरूप ओळखून नवसमाजनिर्मितीच्या कामी आघाडीवर राहावयास पाहिजे. याकरिता समाजवादी विचारसरणी आपल्या अंगी बाणवून ती विचारसरणी शिक्षणाद्वारे आपल्या शिष्यांच्या मनात बिंबवून तिचा प्रसार राष्ट्रभर करणे हेच शिक्षकांचे पवित्र कार्य आहे; आणि त्यांनी ते करावयास पाहिजे. शिक्षकवर्गावर आज एक मौलिक स्वरूपाचा आक्षेप घेण्यात येतो. शिक्षकवर्ग हा मध्यम वर्गीय असल्यामुळे क्रांतिपराङ्मुख आहे असा हा

आरोप आहे. पण आजच्या समाजरचनेची आच आता शिक्षकवर्गालाही लागली आहे. ती आच का लागली याचा शिक्षकवर्गाने अभ्यास केला तर शिक्षकवर्गाला हे निश्चित कळून येईल की शिक्षकाचे आयुष्य समाजाच्या इतर घटकांपासून अलिप्त राहू शकत नाही, आणि हे जर आमच्या शिक्षकवर्गाने ओळखले तर त्यांच्यातून साने गुरुजी किंवा आचार्य नरेंद्र देव यांच्यासारखे क्रांतिकारी शिक्षक निर्माण झाल्यावाचून राहणार नाहीत. क्रांतिकारी शिक्षक तुमच्यातून निर्माण करा, साने गुरुजी किंवा आचार्य नरेंद्र देव तुमच्यातून निर्माण करा एवढाच आमचा शिक्षक वर्गालाही सल्ला आहे. आज आपल्या हक्कासाठी लढण्याचा तुम्ही चंग बांधला आहे. याच आत्मविश्वासातून तुम्ही समाजाकरिता झगडू शकाल. म्हणून शिक्षकांनो! केवळ स्वतःचा प्रश्न सुटल्याबरोबर स्वस्थ बसण्याचा स्वार्थी विचार मनात न आणता सर्व समाजाला क्रांतिप्रवण करण्याच्या कार्याला हात घाला.

६

परिस्थितीस साजेसे क्रांतितंत्र निर्माण करा !

२७-१-४७

स्वातंत्र्यवादी हिंदी जनतेची संपूर्ण स्वातंत्र्याची उत्तुंग आकांक्षा ३१ डिसेंबर १९२९ रोजी रावी नदीच्या काठावर प्रशांत वातावरणात तरुण भारताचे तत्कालीन महनीय नेते पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मुखातून व्यक्त करण्यात आली! त्या गंभीर घोषणेने काँग्रेसला नवे भव्य ध्येय प्राप्त झाले; या ध्येयाच्या पूर्तीसाठी खडतर देशभक्तीची दीक्षा घेऊन स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत अविरत झगडण्याची प्रतिज्ञा राष्ट्राने करावी या हेतूने २६ जानेवारी हा दिवस 'स्वातंत्र्यदिन' म्हणून मुक्रर करण्यात आला; आणि १९३० सालापासून दरवर्षी परिस्थितीनुसार तो सर्वत्र साजरा होण्यास प्रारंभ झाला. आज १८ वा स्वातंत्र्यदिन आपण साजरा करीत आहोत.

काँग्रेससारख्या राष्ट्राच्या प्रतिनिधीभूत अशा राजकीय संस्थेत आपणास या राष्ट्रातील विविध विचारप्रणालींचे दर्शन घडते, जनमताच्या आदराला पात्र झालेल्या खऱ्याखुऱ्या जनसंघटनेच्या ध्येयात आपणास राष्ट्राच्या सामाजिक आकांक्षांचे प्रतिबिंब आढळते, आणि त्या ध्येयाच्या प्रस्थापनेसाठी राष्ट्र ज्या तंत्राचा अवलंब करते त्या तंत्राचा जन्म देशातील परिस्थितीतून निर्माण झालेल्या ज्या विराट सामाजिक शक्ती असतात त्यांच्या आविष्कारातूनच होत असतो.

बहुसंख्याक जनतेपुढील दैनंदिन प्रश्न सोडविण्याच्या दृष्टिकोणातूनच विविध विचारसरणी उदयाला येतात, आणि त्या विचारसरणीच्या संघर्षातून राष्ट्राला नवनवी ध्येये प्राप्त होतात. या ध्येयमार्गावर सर्वसामान्य जनतेची प्रगती व्हावी यासाठी मनात आणले तर

सर्वसामान्य नागरिकाला पेलता येईल असा व्यवहार्य कार्यक्रम राष्ट्रापुढे मांडला जातो. त्यांच्या यशस्वितेतून उदयाला येणाऱ्या घवघवीत सामाजिक शक्तींच्या मुळेच जनतेपुढील निकडीचे प्रश्न सोडविण्याचा मार्ग खुला होतो. आपल्यापुढील प्रश्न सोडविण्यासाठी किंवा आपले ध्येय हस्तगत करण्यासाठी जनता प्रयत्न करीत असताना या सामाजिक शक्तींचा जो आविष्कार होतो त्यातूनच राजकीय क्रांतितंत्राची घडण होते, आणि त्या क्रांतितंत्राचा परिस्थितिसापेक्ष विकास व विस्तार करीत गेल्याने उच्च ध्येयेही दृष्टिपथात येऊ शकतात व सिद्धही होतात.

झुंजार परंपरेचे बीजारोपण

काँग्रेसची उत्क्रांती काहीशी याच पद्धतीने झाली आहे. काँग्रेस स्थापन झाली त्या वेळचे तिचे स्वरूप व आज तिचे दिसणारे स्वरूप यात महदंतर आहे. काही सुशिक्षित हिंदी देशभक्तांनी काही उदारमतवादी ब्रिटिश मुत्सद्द्यांच्या मदतीने काँग्रेसची मुहूर्तमेढ रोवली आणि एका महान झुंजार परंपरेचे बीजारोपण केले. मूठभर जागृत लोकांनी सुरू केलेला तो प्रयत्न होता. हिंदी जनतेची सर्वांगीण प्रगती क्रमशः घडवून आणण्याच्या मर्यादित ध्येयाने तो उपक्रम करण्यात आला होता; ज्या शक्तीबरोबर आपला सामना व्हायचा आहे तिच्या अंतरंगाची धूसर कल्पना त्या वेळी काहींना आली होती. राष्ट्र-शक्ती अद्याप सुप्तावस्थेतच होती; अशा परिस्थितीत आपल्या तुटपुंज्या शक्तीप्रमाणेच सामाचा, युक्तिवादाचाच अवलंब करून प्राप्त परिस्थितीतून मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यात आला; अर्जविनंत्यांच्या तंत्राचाच अपरिहार्यपणे आश्रय केला गेला. पण त्यातूनही सुप्त राष्ट्रशक्तींना आवाहन करण्यात येऊ लागले; व हळूहळू राष्ट्राची जागृती होऊ लागली.

१९४२ पर्यंत काँग्रेसने केवढी मजल गाठली! मूठभर सुशिक्षितांनी सुरू केलेल्या चळवळीला कितीतरी व्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे. देशातील घराघरांतून जागृती झालेली आहे. देशव्यापी लढे करण्याचे सामर्थ्य काँग्रेसला प्राप्त झाले आहे. निर्भेळ स्वातंत्र्याचा पुरस्कार जनतेच्या वतीने ती आज करीत आहे. स्वातंत्र्योत्तर प्रस्थापित होणाऱ्या समाजरचनेचे व राज्यघटनेचे चित्रही आज कित्येकांकडून रंगविण्यात येत आहे. अर्जविनंत्याच्या तंत्राचा अव्हेर करून प्रतिसरकार निर्मितीस साजेशा लढाऊ तंत्राचा जनता अवलंब करताना दिसत आहे.

सत्तासंक्रमणाचा उपक्रम

सर्वांगीण प्रगतीच्या ध्येयाने बद्धपरिकर झालेली काँग्रेस आज सर्वांगीण सामाजिक क्रांतीची भाषा बोलत आहे; इतकेच नव्हे तर त्या सामाजिक क्रांतीच्या सन्निध येऊन

ठेपली आहे. अनत्याचारी असहकाराचा अवलंब करून मजल दर मजल आगे कूच करीत प्रचलित राजसत्तेला शह देऊन जनता संघटनेद्वारे प्रतिसामर्थ्य उत्पन्न करण्याचा व त्याच्या जोरावर जनताहितदक्ष लोकशाहीप्रधान सत्ता प्रस्थापित करण्याचा काँग्रेसने चंग बांधला आहे. घटनापरिषदेमार्फत हिंदी सत्तासंक्रमण शक्य तर घडवून आणण्याचा सांप्रत खटाटोप चालला आहे. तथापि या सनदशीर मार्गाने अंतिम ध्येयापर्यंत प्रगती होईलच याची काय हमी आहे ?

काँग्रेसद्वारे जी राष्ट्रशक्ती संघटित होत आली तिच्याच प्रसंगोपात्त दिव्य आविष्कारामुळेच देशाची येथवर प्रगती झाली. सत्तासंक्रमणासाठी ब्रिटिश साम्राज्यशाहीला भाग पाडण्याचे महान कार्य त्या जागृत जनशक्तीमुळेच झाले : तथापि आज चौफेर नजर टाकली असता काय वस्तुस्थिती निदर्शनास येते ? काँग्रेसच्या राष्ट्रवादाला सर्वत्र सुरुंग लावण्यात येत नाहीत का ? मध्ययुगीन सरंजामशाहीचे प्रबळ अवशेष राष्ट्राची प्रगती थोपवून धरण्यासाठी पद्धतशीरपणे उपयोगात आणले जात आहेत असे दिसत नाही का ? हिंदी लष्कर व हिंदी पोलिस हंगामी सरकार व प्रांतिक मंत्रिमंडळे यांच्या अधिकारावर राजरोस अधिक्षेप करून स्वतंत्र कारवाया करू शकतात याचा अनुभव येत नाही का ? काँग्रेसची संघटना प्रांताप्रांतांतून विस्कळीत होत आहे; काँग्रेसवाद्यांची शक्ती एकमेकांच्या विरुद्ध सत्तेची राजकारणे लढविण्यात खर्ची पडत आहे; आणि प्रतिगामी शक्तींना पुरोगामी व क्रांतिवादी शक्तींवर मात करण्यात विद्यमान परिस्थितीत प्रोत्साहन मिळत आहे.

४२ च्या क्रांतिसदृश आंदोलनातून निर्माण झालेल्या जनशक्तींना आज काय वळण लागत आहे ? ४२ च्या ऑगस्ट क्रांतीतून उदयाला आलेल्या सामाजिक प्रवृत्तींना आज काय वाव मिळत आहे ? त्या जनशक्ती वा सामाजिक प्रवृत्ती रोखून धरण्यासाठी आटोकाट प्रयत्न चालले आहेत, आणि काँग्रेसचे विद्यमान नेतृत्वही दुर्दैवाने त्या प्रयत्नात सामील झाल्यासारखे दिसत आहे; राष्ट्रशक्तींना विध्वंसक वा विधायक स्वरूपात अवसर न मिळाला तर त्या मरून जाणार नाहीत. विकृत स्वरूपात प्रगट होऊन कदाचित त्या सूड उगवल्याशिवाय राहणार नाहीत; काँग्रेस नेतृत्वाकडून या प्रचंड जनतासामर्थ्याची व पुरोगामी सामाजिक प्रवृत्तींची उपेक्षा करण्यात येत आहे. अर्थात या उपेक्षेची तमा न बाळगता जनतेच्या आकांक्षांना वाचा फोडून किसान-कामगारांच्या वर्गीय संघटना उभारण्याचे प्रयत्न जारीने व्हावयास पाहिजेत; देशात सर्वत्र दृग्गोचर होणाऱ्या सामाजिक शक्तींना विधायक वळण लावून जुन्या जमान्याच्या विध्वंसनासाठी संघटित करावयास पाहिजे. नाहीतर प्रतिक्रांतिवादी प्रवृत्तींचा जोर दिवसेंदिवस वाढत जाऊन घटनापरिषदेमार्फतही आपले चिरवांछित ध्येय हस्तगत करणे अशक्य होऊन बसेल आणि विनतोड राजकीय पेचप्रसंग निर्माण झाल्यावर आपण अगतिक व असहाय

आहोत असे आढळून येईल.

काँग्रेसचे विद्यमान नेतृत्व

काँग्रेसचे प्रस्थापित नेतृत्व अशा परिस्थितीत लढा पुकारणार नाही असे आम्ही म्हणत नाही. ४२ च्या लढ्यासारखी कदाचित निरुपायास्तव घोषणा केली जाईल. तथापि अशा घोषणा कालांतराने हवेत विरून जातात; पूर्ण योजनेच्या अभावी त्या पोकळ व फोल ठरतात; भावुकतेने व ध्येयनिष्ठेने रणांगणात उतरलेल्या जनशक्तींना अनिष्ट वळण लागून त्या निष्प्रभ ठरतात. घटना परिषदेतून काँग्रेस आपले ध्येय हस्तगत करू शकेल अशी चिन्हे दिसत नाहीत. मुस्लिम लीग, संस्थानिक, इतर अल्पसंख्याक जमाती व अंतिम ब्रिटिश मुत्सद्दी यांच्याशी विभक्त व संयुक्त समझोते करता करता काँग्रेसचे मूळचे ध्येय-चित्र विकृत झाल्याशिवाय राहणार नाही आणि विकृत ध्येयचित्राची कितीही प्रशंसा केली तरी ती कुणाला संमत होणार नाही. कदाचित अशी विकृती घटना समितीलाच झाली आणि काँग्रेसच्या प्रस्तुत पुढारीपणालाही ती असह्य वाटू लागली तर त्यावर ज्या मात्रेचा वळसा द्यावा लागेल तिचा पूर्वविचार व संग्रह केलेला नसल्यामुळे काँग्रेसही अगतिक बनेल, आणि आज काँग्रेस संघटनेकडे जे दुर्लक्ष होत आहे त्यामुळे क्रांतिशक्तीही विकृत होत जाऊन सर्वच बाजूंनी परिस्थिती अवघड होऊन बसेल.

धोक्याची सूचना

हा धोका दिवसेंदिवस वाढत आहे. काँग्रेसच्या नेतृत्वाला ठपका देण्याचा यात हेतू नाही. त्याच्या प्रामाणिकपणाबद्दल संशय घेण्याचाही आमचा उद्देश नाही. तथापि प्रत्येक नेतृत्वाला उदय आणि अस्त हे असतातच हे विसरून चालणार नाही. विद्यमान नेतृत्वाच्या मर्यादा संपत आल्या आहेत असे म्हणण्याने त्यांच्याबद्दल अनादर व्यक्त होतो असेही आम्हास वाटत नाही. काँग्रेसमध्ये वेळोवेळी जे नवीन नेतृत्व निर्माण झाले त्याची परिणती अखेर ब्रिटिशांच्या सद्हेतूवर विसंबून सनदशीर पद्धतीने हिंदी राजकारण चाल-विण्याच्या पुरस्कारातच झालेली आहे. ज्या वेळी झुंजार नेतेही ब्रिटिश मुत्सद्द्यांच्या योजना यशस्वी करण्याच्या नादात जनसंघटनेकडे दुर्लक्ष करू लागतात तेव्हा त्या नेतृत्वाची मर्यादा भरत आली असे समजण्यास इतिहासक्रमानेही हरकत नाही. तशी काहीशी स्थिती काँग्रेसच्या नेतृत्वाच्याबाबत दिसू लागली आहे; त्यापासून घ्यावयाचा बोध नव्या उमेदीच्या कार्यकर्त्यांनी घेऊन संघटनेच्या कार्याला जोमाने लागले पाहिजे.

समाजवाद हेच क्रांतीचे प्रभावी व अमोघ तंत्र

जनतेने स्वयंस्फूर्तीने ४२ साली उठाव केला. त्या वेळच्या परिस्थितीला तोंड देत असता

ज्या व्यवहार्य उपायांचा तिने अवलंब केला, त्यातूनच प्रतिकारतंत्राची प्रगती झाली. त्याचा विचार करून परिस्थितिसापेक्ष असा विकास व विस्तार घडवून आणणे आणि जनतेला त्याचे शिक्षण देऊन तयार राखणे हे आमचे महत्त्वाचे कार्य आहे. सामाजिक बहिष्कार, सार्वत्रिक संप, प्रस्थापित स्थापन संस्थेचे विध्वंसन, प्रतिसरकारचे प्रस्थापन इत्यादी गोष्टी क्रांतिकालात अवश्य व अपरिहार्य आहेत. इंडोनेशिया, इंडोचायना, ब्रह्मदेश, इजिप्त, अरबस्तान इत्यादी राष्ट्रांत साम्राज्यशाह्या उलटून टाकण्यासाठी प्राणपणाने कडवा प्रतिकार करणाऱ्या जनतेच्या क्रांतितंत्रातील कित्येक विचारार्ह व व्यवहार्य गोष्टी आत्मसात केल्या गेल्या पाहिजेत. हिंदी लढा हा आशिआटिक व आफ्रिकन परतंत्र राष्ट्रांच्याच लढ्याचा भाग आहे. छोट्या छोट्या राष्ट्रांनीही केलेली प्रगती अभिनंदनीय आहे. "आमचे वैशिष्ट्य आमचे प्रतिकारतंत्र, आमचे उदात्त तत्त्वज्ञान" एवढेच म्हणत बसल्याने सनातनी वृत्तीचाच परिपोष होईल. समाजवादी विचारसरणीचा नवयुवकांनी व्यापक विचार करायला हवा आणि हिंदी क्रांतीचे प्रभावी व अमोघ तंत्र बनवायला हवे. असे केल्यानेच नवोदित राष्ट्रशक्तीचा भव्य व दिव्य आविष्कार होऊ शकेल आणि राजकीय क्रांती सिद्ध होईल; इतकेच नव्हे तर ती भावी सामाजिक क्रांतीचे पूर्वचिन्ह ठरेल!

७

काँग्रेस समाजवादी पक्षाचे अवतारकार्य

३-२-४७

काँग्रेस समाजवादी पक्षाची रीतसर स्थापना जवळ जवळ बहुतेक सर्व प्रांतांतून करण्यात आली आहे, आणि पक्षसंघटनेचे कार्य कमी-अधिक प्रमाणात सर्वत्र सुरू झाले आहे. काँग्रेस समाजवादी पक्षाचे पुनरुज्जीवन करून ४२ सालच्या आंदोलनातून निर्माण झालेल्या नवीन व उपेक्षित सामाजिक शक्तींना राष्ट्रीय व सामाजिक ध्येयसंपादनाच्या कामी लावण्याची पक्ष-नेत्यांची मनीषा आहे. काँग्रेसच्या प्रांतिक नेतृत्वाकडून जनतेत जो अपूर्व उत्साह दिसून येतो त्याचा उपयोग विधायक कार्यासाठी मुळीच करून घेण्यात येत नाही; आज जी महान जागृती सर्वत्र आढळते तिचा उपयोग काँग्रेस संघटना मजबूत व शिस्तबद्ध बनविण्यासाठी केला जात नाही; कामगार-किसानांत आज ज्या नव्या आकांक्षा उत्पन्न झालेल्या दिसतात त्यांना योग्य वळण लावून त्यांच्या प्रचंड वर्गीय संघटना बांधण्याकडे फारशी प्रवृत्ती दिसत नाही. जनतेत आज नवीन वारे खेळत आहे हे अल्पविचारांतीही प्रत्ययास येते; जनतेचे ध्येय क्षितिजव्यापक होत चालले आहे याचीही अल्पनिरीक्षणांती साक्ष पटते; घटनापरिषदेची आज जी घडण झाली आहे, तिच्यावरून आपले किसान-कामगार प्रजाराज्याचे ध्येयस्वप्न सत्यसृष्टीत उतरेल अशी तिला यत्किंचितही आशा वाटत नाही; इतकेच नव्हे तर घटनापरिषदेमागे हिंदी जनतेच्या संघटित सामर्थ्याचे अधिष्ठान उभे केल्याशिवाय तिच्या यशस्वितेबद्दल जनतेच्या मनातील शंका जात नाही; काँग्रेसच्या प्रथम श्रेणीतील नेत्यांबद्दल तिला आदर वाटतो; पण आज त्यांच्या धोरणाबद्दल तिला खेद होतो; काँग्रेसच्या प्रांतीय नेत्यांबद्दल सामान्यतः तिचा

आदर नष्ट झाला आहे; आणि अद्यापही हातच्या संघटनायंत्राचा व पूर्वपुण्याईचा उपयोग करून त्यांचे आसन स्थिर आहे याची त्याला चीड येते आहे; अशा परिस्थितीत काँग्रेसच्या ध्येय-धोरणाशी इमान राखून व काँग्रेसची सर्वसामान्य शिस्त पाळून जनता संघटनाचा व किसान-कामगार प्रजाराज्याच्या पूर्वतयारीचा पुरस्कार करणाऱ्या काँग्रेस समाजवादी पक्षाकडेच सर्वसामान्य जागृत लोकमताचा कल झुकत आहे.

काँग्रेसचे राजकारण आज सनदशीर मार्गाने चालविता चालविता कित्येक नेत्यांना आपल्या क्रांतिकार्याचा विसर पडल्यासारखा दिसत आहे; काहींना तर त्याची आवश्यकताही उरलेली नाही असा भ्रम झालेला आढळत आहे; काँग्रेसच्या स्थापनेपासून एक प्रकारची क्रांतिपरंपरा निर्माण झाली व गेली ६० वर्षे हिंदुस्थानात बऱ्याच घडामोडी होऊन स्वातंत्र्यासंनिध काँग्रेस येऊन ठेपली ही गोष्ट खरी आहे. तथापि हिंदी समाजरचनेत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्यास अजून खूपच मजल मारावी लागणार आहे. तिचा फायदा संघटना मजबूत करण्यासाठी न केला तर प्रचंड सामाजिक शक्ती निरुपयोगी ठरणार आहे. किसान-कामगार प्रजाराज्याची घोषणा काँग्रेसने केलेली आहे; काँग्रेसच्या ध्येयात अद्याप तिचा अंतर्भाव जरी झालेला नसला तरी काँग्रेसनेत्यांनी प्रजाराज्य हे आपले ब्रीद म्हणून अनेकदा जाहीर केले आहे. अर्थात राजकीय दृष्ट्या काहीशी जागृत झालेली जनता 'प्रजाराज्या'त तिच्यावर येणाऱ्या महान सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडण्यास असमर्थ राहिली तर किसान-कामगार प्रजाराज्याच्या नावे आज जशी प्रांतिक काँग्रेस कमिटी बहुजन समाजाच्या नावे कार्य करते तशीच काहीशी हिंदी राज्यघटना चालविली जाईल; काँग्रेस जरी किसान आणि कामगारांची कैवारी आहे तरी ती संपूर्णतया किसान-कामगारनिष्ठ आहे असे आज तरी म्हणता येणार नाही. ज्या वेळी किसान-कामगार वर्गातून आजच्या जागृतीचा फायदा घेऊन हजारो कार्यकर्ते प्रांतोप्रांती निर्माण केले जातील व त्यांना योग्य ते शिक्षण व पुरेसा वाव मिळून काँग्रेस संघटनेत स्थान प्राप्त होईल तेव्हाच काँग्रेस किसान-कामगारनिष्ठ बनत जाईल.

काँग्रेस हेच साम्राज्यशाही नष्ट करून हिंदी स्वातंत्र्य हस्तगत करण्याचे प्रभावी साधन आहे; काँग्रेसमुळेच राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करून घेत असताना आणि घेतल्यानंतर किसान-कामगार प्रजाराज्याच्या प्रस्थापनेच्या ध्येयाला आकार प्राप्त होणार आहे. राजकीय अधिकार आणि हक्क श्रमिकांच्या हाती यावे अशी घोषणा करून ते त्यांना लाभणार नाहीत; ते आपणास मिळवावयाचे आहेत; ते मिळविण्याची आपली पात्रता आपण सिद्ध केली तरच ते मिळविल्यावर आपणास टिकविता येणार आहेत; याची जाणीव किसान-कामगार वर्गातील जागृत, होतकरू व ध्येयवादी नवयुवकांना प्रयत्नपूर्वक करून द्यावयास पाहिजे; अशा प्रयत्नातूनच काँग्रेसचा हळूहळू कायापालट घडून येऊन ती खरीखुरी कामगार-किसानांची बनेल. जी काँग्रेस किसान-कामगार प्रजाराज्य प्रस्थापनेचे साधन

ठरणार तीच जर किसान-कामगारनिष्ठ स्वरूपाची उपरोक्त अर्थाने नसेल तर अधिकार आणि हक्क संक्रमणानंतर श्रमिकांच्या हाती येतील याची काहीच हमी नाही. यासाठी काँग्रेसला किसान-कामगारांच्या वर्ग–जागृत संयुक्त राजकीय आघाडीचे स्वरूप व प्रतिष्ठा प्राप्त करून देणे अवश्य आहे; आणि हेच काँग्रेस समाजवादी पक्षाचे नजिकच्या भविष्य-कालातील कार्य आहे. हे कार्य जितक्या प्रमाणात स्वातंत्र्य हस्तगत करण्यापूर्वी यशस्वी होईल तितक्याच प्रमाणात अंतिम समाजवादी समाजक्रांती घडवून आणण्यास कामगार व किसान समर्थ ठरतील; आणि काँग्रेस समाजवादी पक्षही आपले अवतारकार्य पूर्ण करण्यास पात्र ठरेल!!!

८

जनतारूप व्हा !

१७-२-४७

शेतकरी-कामकऱ्यांचे रामराज्य स्थापन करण्याकरिता आमच्या काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी मंत्रिमंडळे स्थापन केली आहेत अशी त्यांची सद्भावना आहे. या 'अधिकारवादाच्या' भाष्यकारांची कायदेमंडळात गेल्याबरोबर चुटकीसरशी क्रांती करिता येते अशी 'अतिवास्तववादी' कल्पना होती असे दिसते. कायदेमंडळातून क्रांतिकारी विचारसरणीला पोषक अशा विधायक कार्यक्रमाची आखणी करिता येत नाही असे अर्थातच आमचे म्हणणे नाही. परंतु असा कार्यक्रम हाती घेण्याकरिता ज्या अनुकूल परिस्थितीची आणि शास्त्रपूत मनोभूमिकेची आवश्यकता आहे ती आमच्याजवळ नाही. असा कार्यक्रम हाती घेण्याकरिता परिस्थिती संचालनाची सूत्रे आमच्याजवळ असावयास पाहिजे होती. दुर्दैवाने ही सूत्रे आज आमच्याजवळ नसून आमच्या परकीय राज्यकर्त्यांच्या हाती आहेत. त्यामुळे आमचे कागदी घोडे त्यांना पाहिजे तसे नाचविण्याची शक्ती त्यांच्याजवळ आहे. म्हणूनच आमच्या प्रथमांकात विशद केल्याप्रमाणे आमची क्रांतिवादी भूमिका नष्ट करण्याकरिता, आमच्यातील तेजस्वी विचारसरणी खच्ची करून आम्हाला इंग्रजांच्या राजकारणात केवळ बाहुले म्हणून ठेवण्याकरिता म्हणून कायदेमंडळाच्या निवडणुकी हा इंग्रजांनी आमच्यावर टाकलेला डाव होता; आणि इंग्रजी डावाचे पाश आमच्या मानेभोवती करकचून आवळून असल्यामुळे आम्हाला इंग्रजांच्या या डावाला मान तुकवणे भाग पडले. पण अनुभवाने आम्ही शहाणे झालो नाही, आणि परिस्थितीला साजेशा नव्या क्रांतितंत्राचीही आम्ही निर्मिती केली नाही. उलट आपली चूक कबूल न करिता योग्य त्या

मार्गानेच आमचे पाऊल पडत आहे अशा खोट्या समाधानात आम्ही गर्क आहोत.

कायदेमंडळात आमचे नेते का गेले ? आमच्या नेत्यांनी मंत्रिमंडळे का स्थापन केली ? जनतेच्या इतर पुढाऱ्यांवर ते धंदेवाईक क्रांतिकारी आहेत असा अर्थशून्य आरोप करण्याकरिता तर ते मंत्रिमंडळात गेले नाहीत ना ? क्रांती करण्याकरिता आपण मंत्रिमंडळे स्थापन केली होती ना ? इतर लोक असतील धंदेवाईक क्रांतिकारक, पण आपण तर खरेखुरे क्रांतिकारी आहात ना ? मग मंत्रिमंडळात जाऊन आपण कोणती क्रांती घडवून आणली याचा पाढा आपण जनतेसमोर येऊन वाचू शकाल काय ?

कायदेमंडळात किंवा मंत्रिमंडळात एखाद्या नेत्यास जनता जेव्हा जावयास सांगते तेव्हा जनतेचीही आपल्या नेत्यांकडून काही अपेक्षा असते. आज जनतेची आपल्या नेत्यांबद्दल अशी तक्रार आहे की, जनता हळूहळू आपल्या नेत्यांना पारखी होत आहे. हळूहळू आमच्या पुढाऱ्यांचा जनतासंपर्क सुटत आहे. ज्या जनतेच्या जोरावर आमचे पुढारी निवडणुकीत यशस्वी झाले त्या जनतेला विश्वासात घेण्याऐवजी सरकारी राज्ययंत्रातील अधिकाऱ्यांवरच आमच्या नेत्यांचा अधिक विश्वास बसला आहे असा सामान्य जनांचा समज होत चालला असून त्यामुळे 'नोकरशाही' मनोवृत्ती निर्माण होते हा त्या खुर्चीचाच धर्म आहे की काय असे जनतेस वाटावयास लागले आहे.

कोणताही अधिकार आपल्याजवळ नसता कायदेमंडळाद्वारे क्रांती घडवून आणण्याची भाषा फक्त आमचे पुढारीच बोलू शकतात. परंतु इतिहासाचाच दाखला द्यावयाचा झाला तर क्रांती झाल्यावर, नवी मूल्ये प्रत्यक्षात आणण्याचे कंकण बांधून ज्या क्षणी नवसमाजाचे नेते अधिकारग्रहण करतात, जनतेचे रामराज्य स्थापन करतात, त्याच क्षणी ज्यांचा पिंड जुन्या राजवटीत पोसला आहे, ज्यांचे हितसंबंध जुन्या निर्माल्य राजवटीशी निगडित झाले आहेत त्या सर्व समाजकंटकांची, नोकरशहांची उचलबांगडी त्यांच्या स्थानावरून करण्यात येऊन ज्यांच्या भरवंशावरच जनतेच्या नेत्यांनी राज्यक्रांती घडवून आणलेली असते अशा विश्वासू आणि ध्येयनिष्ठ सहकाऱ्यांचीच मर्मस्थानी नेमणूक करण्यात येते. पण नोकरशाहीचा हृदयपालट झाला आहे, इंग्रज आपले चंबूगबाळे आटोपून येथून तावडतोब निघून जाणार आहे इत्यादी अवास्तव प्रमेयांनाच स्वयंप्रकाश सत्य मानल्यावर इतिहासाचा दाखला प्रमाण मानावयाचे कारण काय ?

बरे, जनतेचे असो, पण ज्या समाजकंटकांवर विश्वासून आमचे मंत्री स्वस्थ बसतात त्यांपैकी अनेकांचे त्यांच्याबद्दल काय मत आहे हेही पाहण्यालायक आहे. काँग्रेस सरकार अधिकारात आल्याबरोबर पहिल्या आठवड्यात आता आपले कसे होईल या भीतीने चळचळ कापावयास लागलेली नोकरशाही, आपले आसन कायम टिकावे म्हणून काँग्रेसच्या अनेक 'दादांची' शिफारसपत्रे घेऊन मंत्र्यांच्या घरी खेटे घालणारी नोकरशाही आज पूर्णपणे निश्चिंत झाली असून काँग्रेस आमचे काही वाकडे करू शकत नाही, अशा

मगरूरीत मस्त आहे. 'आता मंत्री म्हणून आलेली नवीन पोरे आम्हाला काय शहाणपणा शिकविणार ? त्यांना बनवायला काय वेळ लागतो ? उगीच नाही काळे केस पांढरे झाले.' असे नोकरशाहीतील अनेक रथी महारथी उघड उघड बोलू लागले आहेत. मंत्र्यांचा नोकरशाहीतील घटकांवर दाब पडण्याऐवजी नोकरशाहीतील अधिकारी सांगतील त्यावर सही करून त्यांच्या एकंदर कारवायांना मान्यता देणे एवढेच मंत्र्यांचे काम राहिले आहे असे सर्वसामान्य सरकारी नोकर बोलत आहेत. ही परिस्थिती खरी आहे की नाही हे आम्हास माहीत नाही. पण खरी असेल तर त्यामुळे ज्याप्रमाणे मंत्र्यांच्या इभ्रतीस धक्का लागणार आहे, त्याप्रमाणेच आमच्या कार्याचाही सर्वनाश होणार आहे.

आमच्या नेत्यांनी वैधानिक पद्धतीने समाजक्रांती आणि राज्यक्रांती घडवून आणण्याकरिता सत्ताग्रहण केले ना! मग सत्ताग्रहण केल्यावरोबर त्यांच्या सत्तेला का ग्रहण लागावे ? त्यांच्या हाताखालील लोकांनी कार्यपद्धतीचा (प्रोसीजर) बडगा दाखवून त्यांच्या अनेक योजना हाणून पाडाव्या म्हणून नाही ना त्यांनी मंत्रिमंडळ स्थापन केले ? कार्यपद्धतीचा अडथळा होत असेल तर कार्यपद्धतीच बदलावयास पाहिजे, योजना नव्हे. अर्थात एवढा सुज्ञपणा आमच्या मंत्रिमंडळात आहे याची आम्हास जाणीव आहे. पण त्याकरिता आमच्या मंत्र्यांनी नेहमीच एक गोष्ट ध्यानात ठेवावयास पाहिजे अशी आम्ही त्यांना सूचना करितो. त्यांनी मंत्रिमंडळ स्थापन केले ते इंग्रजांचे राज्य चालविण्याकरिता नव्हे, इंग्रजांची सत्ता हाणून पाडण्याकरिता. ज्या लोकांच्या भरवशावर ते राज्यकारभार हाकतात त्या लोकांना गेल्या कित्येक वर्षांत इंग्रजांचे राज्य कसे कायम टिकेल असाच विचार करण्याची सवय पडली आहे. भ्रामक का होईना पण इंग्रजांचे मीठ खात आहोत (जनतेचे नाही) आणि त्या मिठाला आपण जागलो पाहिजे अशी त्यांची प्रामाणिक समजूत आहे; आणि त्यामुळेच क्रांतिकारी दृष्टिकोणातून ते विचारच करू शकत नाहीत. इतकेच नव्हे तर ज्याप्रमाणे आजपर्यंत त्यांनी अनेकदा काँग्रेसद्रोह केला त्याचप्रमाणे यानंतरही ब्रिटिश सरकारशी संगनमत करून ते आजच्या काँग्रेस सरकारला कुचलण्यालाही कमी करणार नाहीत. याचे प्रत्यंतरच पाहिजे असेल तर नुकतेच हिंदुस्थानभर झालेल्या कम्युनिस्टांच्या झडतीचे देता येईल. अशी झडती होणार आहे याची पंडित जवाहरलालजी किंवा हिंदुस्थानचे गृहमंत्री सरदार पटेल यांना कल्पनाही नव्हती असे म्हणतात. असे असेल तर नोकरशाहीचा मूळ स्वभाव बदलला नाही असेच म्हणावे लागेल. स्वराज्य मिळेपर्यंत बिछान्यावर झोपणार नाही, राजवैभव भोगणार नाही, चांदीच्या ताटात जेवणार नाही अशी राणा प्रतापने प्रतिज्ञा केली. त्यांच्या वंशजांनी ती केवळ शब्दार्थाने कायम ठेवली. मश्रूच्या गादीवर झोपावयाचे असले तर गवताची एक काडी आपल्या प्रतिज्ञेच्या पूर्तीसाठी म्हणून ठेवावयाची आणि नंतर खुशाल ऐषारामात लोळावयाचे. चांदीच्या ताटात जेवावयाचे असेल तर पत्रावळीचा एक तुकडा नाममात्र ताटाखाली ठेवावयाचा आणि नंतर पंच-

पक्कान्नांवर ताव मारावयाचा. अशी जी पद्धती प्रतापच्या वंशजांनी सुरू केली तशी तर तुमची प्रतिज्ञा नाही ना? गव्हर्नरांना जरूर पडल्यास 'अरेस्ट' करू अशा प्रतिज्ञेने तुम्ही मंत्रिमंडळात सामील झाला आहात. ती प्रतिज्ञा ताटाखालच्या मांजरांना डोक्यावर बसवून का तुम्ही पुरी करणार आहात? अंतिम लढ्याचा प्रसंग आला तर आपले किती सरकारी अधिकारी आपल्या हुकुमाची अंमलबजावणी करणार आहेत? किती पोलिस अधिकारी आपल्या जीवास जपण्याकरिता तळहातावर आपले शिर घेऊन आपल्यास साथ द्यावयास तयार होणार आहेत? आपण एकदा याची खात्री करून घ्या! ऐश्वर्याच्या खोट्या धुंदीत राहू नका. आपणास स्वराज्य मिळालेच आहे अशा भ्रमातही राहू नका. केवळ नाममात्र सत्ता ताब्यात आल्यामुळे अपात्री पान देऊ नका. सुपीक जमिनीला पर्जन्याची आवश्यकता आहे. पर्वताच्या शिखरावर जलवृष्टी करून सुपीक जमीन कोरडी ठणठणीत ठेवू नका. नाही तर जगन्नाथ पंडिताप्रमाणेच आम्हासही

अयि जलधरशैलश्रेणिशृंगेषु तोयं
वितरसि बहुकोऽयं श्रीमदस्तावकीनः

असे म्हणण्याची पाळी येईल.

स्वराज्य मिळेपर्यंत राज्यक्रांतीच्या तयारीकरिता आणि स्वराज्य मिळाले तर नव-समाजाच्या निर्मितीकरिताच आपण कायदेमंडळात गेला आहात. इंग्रज राज्यकर्ते आणि काळी नोकरशाही यांना एकमेकापासून विभक्त करण्याकरिता म्हणून आपण राज्ययंत्रात घुसला आहात. राज्यकर्ते आणि नोकरशाही यांचा संबंध प्रकृतिपुरुषासारखा आहे. एकमेकापासून त्यांना विभक्त केले तर त्या दोघांनाही मोक्ष मिळाल्याशिवाय राहणार नाही. परंतु जर का त्यांची युती झाली तर मायेचे जग, पारतंत्र्याचे जगही निर्माण केल्यावाचून ते राहणार नाहीत. नोकरशाहीला राज्यकर्त्यांशी गुफ्तगू करावयाची असेल तर आपल्याच माध्यमातून व्हावयास पाहिजे. नाहीतर कोणत्या वेळी कोणते कारस्थान रचण्यात येईल हे कारस्थानाची पूर्तता झाल्यावरच आपणास कळेल. प्रत्यक्ष सूर्यापेक्षा सूर्याच्या उष्णतेमुळे तापलेली यःकश्चित वाळूच अधिक तापते. आजची नोकरशाही ही वाळूसारखी आहे हे लक्षात ठेवा; आणि म्हणून नोकरशाहीचा आणि राज्यकर्त्यांचा दुवा सांधणार नाही– कधीच सांधणार नाही– असे करा.

मूल्यपरिवर्तन करावयास मंत्रिमंडळात गेलेल्या आमच्या नेत्यांनो! आपणास आम्हास एक गोष्ट सांगावीशी वाटते. आपण कोण आहात हे बरोबर ओळखा, आपण जनतारूप आहात. जनतेचे आणि आपले अद्वैत असावयास पाहिजे. आपण जनतेचे आहात, जनतेकरिता आहात हे आपण विसरता कामा नये. आजपर्यंत ज्या त्यागाच्या आणि सेवेच्या भूमिकेवरून आपण ज्याप्रमाणे निरनिराळ्या लहानमोठ्या अधिकारांना निर्माल्य-वत समजत आलात त्याप्रमाणेच यानंतरही समजावयास पाहिजे. ऋष्यशृंगाप्रमाणे

मोहाला वळी पडून निर्माल्य मूल्यांना, खोट्या अधिकारांनाच, जर आपण मूल्य समजावयास लागाल तर जे कार्य जनतेने आपल्या हाती सोपविले आहे ते पुरे होणार नाही. आमच्या उपनिषदाचा अगदी शेवटचा उपदेश 'तत्त्वमसि' असा आहे. अद्वैत वेदान्त आमच्या रोमरोमात भिनला आहे असे म्हणतात. त्याची प्रतीती आता येऊ द्या. आपल्या कार्याने जनताजनार्दन आणि तुम्ही एकरूप आहात हे सिद्ध करा.

१०

गुलामगिरीची ही प्रतीके दृष्टीसमोरून नाहीशी करा !

२४-२-४७

साध्याही विषयात फार मोठा आशय साठवलेला असतो याचा प्रत्यय कविजनांप्रमाणेच राजकारणी लोकांनाही येतो. साम्राज्यवाद्यांना दुसऱ्या देशावर राज्य करावयाचे म्हणजे केवळ दुसरा देश जिंकून भागत नाही. गुलाम केलेल्या देशातील स्वत्व नाहीसे करून त्याला निःसत्त्व करून टाकण्याकरिता साम्राज्यवादी राष्ट्राचे सर्व तऱ्हेचे प्रयत्न सुरू असतात. आपल्या स्वत्वाचा विसर पाडण्याकरिता लहानसहान गोष्टींतून गुलाम राष्ट्रांतील लोकांसमोर मायाजालाचे पटल उत्पन्न करण्याचा आणि त्यातून आपणास पोषक असे वातावरण उत्पन्न करण्याचा साम्राज्यवाद्यांचा पद्धतशीर प्रयत्न सुरू असतो. इंग्रजी साम्राज्यशाहीसुद्धा या सामान्य नियमास अपवाद कशी असेल ? इंग्रजांनी आमच्या देशात उत्पन्न केलेला प्रतिइंग्रजरूपी नोकरशहांचा वर्ग हा याच धोरणाचा आविष्कार होय. आमच्या गेल्या अंकात नोकरशाहीच्या मनाच्या अंतरंगाचे थोडेसे दिग्दर्शन करण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. पण आमचे नष्टचर्य नोकरशाहीपुरतेच मर्यादित नाही. राष्ट्रीय विचारसरणीची तेजस्वी ज्योत यदाकदाचित एखाद्या ठिकाणी प्रकाशित झालीच तर अनुकूल परिस्थितीचा प्राणवायू तिला मिळू नये याची खबरदारी इंग्रजांनी पुरेपूर घेतली आहे. अर्थात इतकी सारी खबरदारी घेतल्यानंतर सुद्धा आमच्या राष्ट्रीय विचारसरणीच्या दीपज्योतीने पेट घेऊन आज ती साम्राज्यवादाला जाळून टाकून त्याची राखरांगोळी करण्याइतकी प्रभावी होऊ शकली आहे हा भाग वेगळा.

आमच्यातून स्वत्व नाहीसे करण्याकरिता इंग्रजांनी काय काय केले याचा पाढा वाचू

लागलो तर एक ग्रंथ होईल. पण या गोष्टींपैकी आजही अनेक गोष्टी जशाच्या तशा ठिकठिकाणी उभ्या आहेत. आमच्या सुदैवाने आज प्रातांत आणि केन्द्रात आमचे राष्ट्रीय सरकार स्थापन झाले आहे. त्यांनी मनात आणले तर लेखणीच्या एका फटकाऱ्यासरशी आमच्या गुलामगिरीच्या ह्या प्रतीकांची योग्य ती व्यवस्था लावता येईल. मुंबई, कलकत्ता, दिल्लीसारख्या कोणत्याही मोठ्या शहरी तुम्ही गेलात म्हणजे चौरस्त्यांत किंवा बगीच्यात किंवा सार्वजनिक ठिकाणी इंग्रजी साम्राज्याच्या उत्पादकांचे भव्य पुतळे उभारलेले तुम्हास दिसतील. इंग्रजांच्या शौर्यधैर्याचा पसारा आमच्या दृष्टीसमोर उभा करून त्यांतून इंग्रजाबद्दल दरारा आणि त्यांची भीती आम्हास वाटावयास लावणे हाच त्याचा हेतू आहे. अगदी लहानपणापासून दररोजच्या दररोज असे पुतळे तुमच्या दृष्टीस पडतील अशी व्यवस्था केली तर कोवळ्या मनाच्या निर्विकार बालकांवर त्याचा काय परिणाम होईल? गुलामगिरीची प्रतीके आमच्या डोळ्यासमोर सदैव राहावयास लागली तर इंग्रजांबद्दल आमच्या मनात चीड उत्पन्न होईल असे काही लोक सांगतात, पण ते बरोबर नाही. आम्हाला चीड येईल असे, आमच्या होत असलेल्या पिळवणुकीचे निदर्शक असे ह्या पुतळ्यात काहीसुद्धा नाही. आदरणीय व्यक्तींचे पुतळे उभारावयाचे असतात. आमच्या गुलामगिरीच्या परिमार्जनाचा एक भाग म्हणून या पुतळ्यांची ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयात ताबडतोब रवानगी करावयास पाहिजे.

आमच्या प्रेक्षणीय स्थळांना, रस्त्यांना किंवा गावांना इंग्रजांनी आमची नावे काढून टाकून नवी इंग्रजी नावे देण्याचा आचरटपणा केला आहे. आमच्या प्रांतातील भेडाघाट हे नर्मदेवर अत्यंत प्रेक्षणीय असे ठिकाण आहे, या ठिकाणी संगमरवरी खडकातून नर्मदा वाहात जाते. पण दिवसानुदिवस भेडाघाट हे नाव मागे पडून त्याची जागा 'मार्बल रॉक्स' या इंग्रजी नावाने घेतली आहे. निझामशाहीत वेरूळ नावाचे अत्यंत इतिहासप्रसिद्ध आणि तेथील लेण्यामुळे जगभर प्रख्यात झालेले ठिकाण आहे. वेरूळ हे महादेवाच्या बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक. पण कोणत्याही स्टेशनवर जा, 'वेरूळ' ऐवजी 'एलोरा' हे नाव आपणास वाचावयास मिळेल. जुन्या इतिहासापासून पृथक् केल्याबरोबर नावाशी निगडित असलेल्या इतिहासाचेही विस्मरण होते, आणि आमच्या राष्ट्रीय इतिहासाचे असे विस्मरण व्हावे असाच या कारस्थानाचा उद्देश आहे. आमच्या नेत्यांनी आमच्या राज्यकर्त्यांचे हे कारस्थान ओळखून अशी नामाभिधानेसुद्धा ताबडतोब बदलली पाहिजेत. आपल्या प्रांतात 'वणी' या नावाचे एक गाव आहे. आमच्या राज्यकर्त्यांनी 'वणी' ऐवजी 'वून' असा शब्दप्रयोग रूढ केला, रेल्वे स्टेशन वर किंवा आगगाडीच्या वेळापत्रकात तुम्हास हाच शब्द वाचावयास मिळेल. आज खास वणीचे लोकसुद्धा 'वणी' ऐवजी 'वून' हा शब्दप्रयोग करावयास लागले आहेत. आणि आपण होऊन आपणच स्वतः असा शब्दप्रयोग करणे यापेक्षा आणखी गुलामी राहू शकत नाही.

याप्रमाणेच 'मथुरे' ऐवजी मट्रा किंवा 'मुट्रा' असा शब्दप्रयोग आम्ही सर्रास करावयास लागलो असून असा शब्दप्रयोग करण्यात सुसंस्कृततेची एक पायरी आम्ही वर चढलो असे आम्हास वाटावयास लागले आहे. ही परिस्थिती ताबडतोब बदलवली पाहिजे. इतकेच नव्हे तर पी. डब्ल्यू. डी. खात्याच्या स्वाधीन असलेल्या प्रत्येक ठिकाणाला हिंदीच नाव दिले गेले पाहिजे. उदाहरण म्हणून पंचमढीचे देता येईल. ज्या ठिकाणी आमचे मंत्री राहतात त्या सर्व बंगल्यांना 'रॉक एण्ड', 'लँड्सडाऊन' वगैरेसारखी इंग्रजी नावे देण्यात आली आहेत आणि या दहा वर्षांत काँग्रेस मंत्रिमंडळे दोनदा अस्तित्वात येऊनसुद्धा ही नावे बदलली नाहीत. या दृष्टीने ना. पाटील यांचे आम्हास अभिनंदन करावेसे वाटते. त्यांनी आपल्या बंगल्यास 'क्रांतिकुंज' हे नाव दिले हे त्यांना खरोखरच भूषणास्पद आहे. हीच गोष्ट सर्वत्र व्हावयास हवी. 'सँढर्स्ट पूल', 'डचेस फॉल' किंवा 'ट्वायनॅम पूल' सारखी नावे आता तरी बदला आणि गुलामगिरीमुळे आमच्या अंगास लागलेला हा चिखल काढून टाका.

आमची ही अवनती टाळणे हे आमच्या नेत्यांनो, सर्वस्वी तुमच्या हातात आहे. आम्हाला नकळत आम्हाला दररोज हे गुलामगिरीचे शिक्षण मिळत आहे. आम्हास मिळणारे हे गुलामीचे शिक्षण ताबडतोब बंद करा, आणि गुलामगिरीची ही प्रतीके आमच्या दृष्टीसमोरून नाहीशी करा.

११

काँग्रेसचे अवतारकार्य अद्याप पुरे व्हावयाचे आहे

२७-२-४७

ता. २० फेब्रुवारी रोजी इंग्लंडचे मुख्य प्रधान श्री. ॲटली यांनी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याबाबत जी एक अत्यंत महत्त्वाची घोषणा केली त्यामुळे हिंदी राजकारणात एका नवीन अध्यायास सुरुवात झाली आहे. श्री. ॲटली यांच्या घोषणेत केवढी मुत्सद्देगिरी सामावलेली आहे याचे थोडेसे दिग्दर्शन आमच्या मागील लेखात आम्ही केले आहे, परंतु ॲटली यांच्या घोषणेत कितीही "नरो वा कुंजरो वा" असले तरी आंतरराष्ट्रीय राजकारणात हिंदुस्थानचे नैतिक सामर्थ्य त्यामुळे वाढणार हे निश्चित आहे आणि म्हणूनच ब्रिटिश लोक आणि त्यांचे प्रतिनिधी श्री. ॲटली हे घोषणांच्या बाबतीत प्रामाणिक असले काय किंवा नसले काय, या घोषणेमुळे आमच्या नेत्यांवर जी जबाबदारी येऊन पडली आहे तिचे महत्त्व मुळीच कमी होत नाही. इंग्रज प्रामाणिकपणे आमच्या देशातून निघून गेले तर आम्हाला जी समाजक्रांती करावी लागणार आहे त्याकरिता आणि न गेले तरी जी राज्यक्रांती करावी लागणार आहे त्याकरिता लागणारे बल हे एकाच प्रकारचे आहे आणि या बलाची आपण उपासना केली पाहिजे हे विसरून चालणार नाही. परंतु आजपर्यंतच्या इंग्रजांच्या घोषणांत कोणत्याही प्रकारची निश्चितता नसल्यामुळे आमच्याकडून या बलोपासनेच्या बाबतीत थोडीफार दिरंगाई झाली तरी त्याचा तादृश आणि तात्कालिक परिणाम आम्हाला विशेष जाणवू शकला नाही. परंतु श्री. ॲटली यांच्या घोषणेमुळे आमच्या बलोपासनेची आणि आपसातील मतभेद विसरण्याची मुदत त्यांनी ठरवून टाकली आहे. त्यांनी आम्हास ही तयारी करण्यास केवळ

पंधरा महिन्यांचा अवधी दिला आहे. या पंधरा महिन्यांत हिंदुस्थानचे नियंत्रण आमच्या हातात निर्धास्तपणे ठेवू शकेल अशी शक्तिशाली संघटना आणि काँग्रेसची प्रांतिक सरकारे आणि प्रांतिक काँग्रेस कमिट्या यांचा विचारसमन्वय जर आपण घडवून आणू शकलो नाही तर मनातल्या मनात तरी, ॲटलींची इच्छा प्रामाणिक नसेल तर आणि इंग्रज येथून निघून जाणार नसतील तर, बरे होईल असे म्हणण्याची पाळी आपल्यावर आल्यावाचून राहणार नाही. या दृष्टीने काही दिवसांपूर्वी म. गांधी यांनी म्हटले ते अगदी खरे आहे. "सत्तांतराला अवधी इतका थोडा देण्यात आला आहे की, आपसातील मतभेद हिंदुस्थानातील निरनिराळ्या जमातींचे पुढारी न विसरले तर आमच्या पारतंत्र्याला आमचे पुढारीच जबाबदार राहतील."

तात्पर्य, सत्तांतराला तयार व्हावयाचे असेल तर आम्ही आमच्यातील मतभेद विसरणे ही एक फारच महत्त्वाची बाब आहे. नुकतेच ॲटली यांनी कॉमन्सच्या सभेत त्यांच्या मागील घोषणेवर जो प्रकाश टाकला त्यात त्यांनी सुद्धा असे स्पष्ट म्हटले आहे की, सत्तांतराची तारीख आम्ही निश्चित करीत आहोत याचे कारण हिंदी पुढाऱ्यांनी एकंदर परिस्थितीची जबाबदारी ओळखून आपसातील मतभेद विसरावे हेच होय.

अशा परिस्थितीत काँग्रेसच्या बाहेर मतभेद विसरण्याचा प्रयत्न केला जात असता काँग्रेसमध्ये मात्र मतभेदांना ऊत यावा ही अत्यंत खेदाची गोष्ट होय. परंतु दुर्दैवाने काँग्रेसच्या घटनेत याच वेळी महत्त्वाचे मूलभूत बदल करण्यात येत असून काँग्रेसमध्ये कोणत्याही संघटित पक्षाला राहता येणार नाही अशी व्यवस्था करण्यात येणार आहे. असे का? शिस्तभंगामुळे ज्यांना काँग्रेसच्या बाहेर काढून टाकण्यात आले होते त्यांना सुद्धा '४२'च्या आंदोलनानंतर परत शुद्ध करून घेण्यात आले, मग आता एकजुटीची एवढी नितांत आवश्यकता असताना काँग्रेसमधून काँग्रेसनिष्ठ पक्षांना काढून टाकणारा बदल का करण्यात येतो आहे, याचा खुलासा होणे अपरिहार्य आहे.

आज काँग्रेसमध्ये डावा म्हणून समजला जाणारा (काँग्रेस) समाजवादी पक्ष येवढाच काय तो प्रमुख पक्ष आहे. मुख्यतः याच पक्षाचे स्थान काँग्रेसमधून नष्ट करण्याकरिता तर काँग्रेसश्रेष्ठींचा घटनेत बदल करण्याचा विचार नाही ना? पण असे असेल तर आम्ही आमच्या काँग्रेसधुरीणांना एक सवाल विचारू चाहतो. (काँग्रेस) समाजवादी लोकांची काँग्रेसनिष्ठा आजपर्यंत घसाला लागली नाही काय? काँग्रेसच्या शिस्तभंगाचे एकतरी उदाहरण समाजवाद्यांकडून आजपर्यंत घडल्याचे कोणी दाखवून देऊ शकेल काय? असे असताना या नाही त्या उपायाने शिस्तभंगाची तरवार या अस्सल काँग्रेसवाद्यांच्या डोक्यावर लटकत राहावी असा प्रयत्न आमच्या नेत्यांकडून होत असेल तर ते खास समयोचित नाही.

काँग्रेसश्रेष्ठींच्या या घटनाबदलाचा परिणाम समाजवाद्यांवरही झाला. त्यांनी कानपूर

येथे भरलेल्या पक्ष परिषदेत काँग्रेस न सोडण्याचा जरी निर्णय घेतला तरी "काँग्रेस अंतर्गत पक्ष असू नयेत" अशा विचाराच्या चौकटीत आपणांस बसता यावे याकरिता आपल्या पक्षाला असलेल्या 'काँग्रेस' या उपाधीचा त्यांनी त्याग केला, काँग्रेसेतर लोकांना आपल्या पक्षाचा दरवाजा खुला करून दिला आणि अशा रीतीने आम्ही आपला स्वतंत्र संसार थाटावयास तयार आहोत असे अधिकारारूढ काँग्रेसनेत्यांना बजावून सांगितले.

पण काँग्रेसश्रेष्ठींनी विचारांची भिन्नता असणाऱ्या काँग्रेसनिष्ठ संघटनेला काँग्रेसमध्ये राहू द्यावे किंवा देऊ नये आणि बलशाली झालेल्या समाजवादी पक्षाने काँग्रेसपासून फुटून आपला निराळा संसार थाटावा या दोन्हीही गोष्टी कितपत इष्ट अथवा अनिष्ट आहेत याचे मूल्यमापन करणे जरूर आहे.

आजपर्यंत राष्ट्रीय वृत्तीचे सर्व लोक काँग्रेसला खऱ्याखुऱ्या अर्थाने 'राष्ट्रीय लोकशाहीचे व्यासपीठ' समजत आले आहेत. काँग्रेसकडे पक्ष म्हणून आम्ही कधीही पाहू शकलो नाही. काँग्रेस म्हणजे राष्ट्र, राष्ट्र म्हणजे काँग्रेस हीच काँग्रेसकडे पाहण्याची काँग्रेसमधील सर्वसामान्य काँग्रेस कार्यकर्त्यांची दृष्टी होती. काँग्रेस म्हणजे साम्राज्यशाही विरोधाचे मूर्तिमंत स्वरूप होते. किसान मजदूर प्रजाराज्याचे काँग्रेस हे एकमेव प्रतीक होते. गुलाम हिंदुस्थानला ब्रिटिश साम्राज्यशाहीशी दोन हात करायचे असतील तर आपसांतील मतभेद विसरून जाऊन एकदिलाने ब्रिटिश साम्राज्यशाहीला विरोध करू शकेल अशी 'फळी', एक अभेद्य संघटना निर्माण करणे अवश्य होते आणि आपल्या विशाल भूमिकेमुळे १९२० पासून आजतागायत धडाडीने केलेल्या मार्गदर्शनामुळे आमची निष्ठा काँग्रेसवर बसली आणि आम्ही काँग्रेसनिष्ठ झालो. काँग्रेस ही लोकशाहीची पुरस्कर्त्री आहे. लोकशाहीत अंतर्गत मतभेदांना नेहमी स्थान असते. पण बहुमताचा निर्णय प्रमाण असतो. ब्रिटिश सत्तेसारख्या सत्तेशी झगडावयाचे असेल तर किरकोळ स्वरूपाच्या अनेक संस्था असण्याऐवजी सर्वांना एका शिस्तीत ठेवू शकेल अशी संस्था जनतेला पाहिजे होती आणि अशी संस्था काँग्रेसशिवाय इतरत्र सापडणे शक्य नव्हते. प्रत्येकाने आपले विचार जरूर मांडावे पण शिस्त मात्र काँग्रेसचीच पालन करावयाची असा आतापर्यंतचा राष्ट्रवाद्यांचा अलिखित दंडक होता. त्यामुळे पक्ष असतीलच तर फक्त काँग्रेसमध्येच असावे, बाहेर असू नयेत असे सर्वसामान्य काँग्रेस जनांप्रमाणेच आम्हांस वाटत होते आणि आजही वाटते. पण अशी कोणती गोष्ट घडली की आमच्या काँग्रेसश्रेष्ठींना काँग्रेसमध्ये पक्ष असू नयेत असे वाटावयाला लागले? केवळ बहुमतात आल्यामुळे इतर मतांच्या लोकांची गळचेपी करणे लोकशाहीच्या तत्त्वास दुखवणारे तरी खास आहे. काँग्रेसचे अवतारकार्य अजून पुरे व्हावयाचे आहे. अवतारकार्य समाप्त झाल्यानंतर काँग्रेसश्रेष्ठींनी काँग्रेसचे विसर्जन केले असते तरी आम्हाला काही म्हणावयाचे नव्हते. पण ज्या महाभागांनी काँग्रेसची कीर्ती उज्ज्वल केली त्यांचा मतभेद असूनसुद्धा ज्यांच्या कर्तृत्वाबद्दल

आदर वाटावयास पाहिजे अशा थोर देशभक्तांना काँग्रेस सोडावी लागली तर ती खरोखरच दुःखाची गोष्ट होईल.

त्याचप्रमाणे ज्यांनी आपल्या शौर्य, धैर्य, तेजस्वितेने काँग्रेसला बलशाली केले त्या समाजवाद्यांनी काँग्रेसचे अवतारकार्य पुरे होण्यापूर्वीच आपला अलग संसार थाटावा ही घटनासुद्धा आम्हाला दुःखद वाटते. ते काँग्रेसमधून बाहेर जरी पडले नसले तरी आपला अलग संसार या वेळी त्यांनी सुरू करणे कितपत इष्ट आहे हा प्रश्नच आहे. आपण होऊन आपला अलग पक्ष उत्पन्न करण्याऐवजी काँग्रेसच्या कार्याचे शिस्तीत पालन करीत असता जर त्यांना काँग्रेसमधून बाहेर पडण्यास काँग्रेसमधील अधिकारारूढ गट कारणीभूत झाला असता तर अधिक बरे झाले असते. वास्तविक आजच काँग्रेसमधून बाहेर पडण्याचे कारण आम्हास तरी दिसत नाही. काँग्रेसमधील अधिकारारूढ गटाशी त्यांचा मतभेद असेल, पण याचा अर्थ काँग्रेसच्या ध्येयाशी, कार्यक्रमाशी त्यांचा मतभेद आहे असा अर्थ मुळीच होत नाही. काँग्रेसने आजपर्यंत पास केलेले ठराव पाहिले तर आपणास असेच दिसून येईल की, हे ठराव समाजवाद्यांना जवळचे आहेत. हे पास केलेले ठराव प्रत्यक्षात आणावे, नेटाने कार्यवाहीत आणावे, यावरच समाजवाद्यांचा आतापर्यंत जोर होता. हे ठराव प्रत्यक्षात आणणे याचाच अर्थ समाजवादी कार्यक्रमाचा स्वीकार करणे होय.

अशा स्थितीत एका गटाने दुसऱ्या गटास काँग्रेसमधून बाहेर पडावयास भाग पाडणे, किंवा दुसऱ्या गटाने आपला अलग पक्ष निर्माण करणे, म्हणजे काँग्रेसची ताकद कमी करणे होय. आणि ३० जून १९४८ पर्यंत ज्याप्रमाणे काँग्रेस आणि काँग्रेसेतर पक्ष यांनी ब्रिटिशांनी देऊ केलेले स्वराज्य घेण्याकरिता एक होणे आवश्यक आहे त्याचप्रमाणे, काँग्रेसमधील दोन गटांनीसुद्धा आपसातील भेद विकोपास न जाऊ देणे हे अगत्याचे आहे. आमच्या पुढाऱ्यांना आम्हास ही सूचना देणे जरूर वाटते. ३० जून १९४८ पर्यंत काँग्रेसची ताकद कमी करणे म्हणजे आत्मघात करणे होय हे विसरून चालणार नाही.

१२

आम्हासही भटाभिक्षुकांचे राज्य नको !

१७-३-४७

सातारचे क्रांतिसिंह नाना पाटील आणि बहुजन समाजवादी पक्षाचे अध्वर्यू श्री. जेधे यांचा सध्या नागपूर प्रांतात दौरा चालू आहे. ४२ च्या क्रांतिकालात गाजविलेल्या अतुल पराक्रमामुळे आम्हांस क्रांतिवीर नाना पाटील यांच्याबद्दल निस्सीम आदर आहे. तसेच ज्या संस्थेला आम्ही आमच्या प्राणांपेक्षाही अधिक मोल देतो त्या काँग्रेसच्या महाराष्ट्र प्रांताचे अध्यक्ष या नात्याने दे. भ. केशवरावजी जेधे यांच्याबद्दलही आमच्या मनात अत्यंत आदराचे स्थान आहे. अशा दोन महाभागांचा दौरा सध्या आमच्या प्रांतात चालू आहे आणि त्यामुळे विलक्षण लोकजागृती होणार आहे हे आम्ही आमचे आणि आमच्या प्रांताचे मोठे भाग्य समजतो. 'इन्किलाब' काढण्याचा आम्ही उपक्रम केला याचेही कारण आमच्या परीने लोकजागृती करावयाची हेच होते. अशा स्थितीत आमच्या जीवनकार्याला जेधे-पाटील या नेतृवर्योंचा पाठिंबा मिळाला असता तर लाखातली गोष्ट झाली असती. दुर्दैवानें नागपूरच्या आपल्या भाषणात श्री. जेधे यांनी 'इन्किलाब'-वर बरेच तोंडसुख घेतले. श्री. जेधे यांनी 'इन्किलाब' वर तोंडसुख घेतले याचे आम्हास मुळीच वाईट वाटत नाही. कारण कोणाना कोणाचे शिव्याशाप ऐकावयास इन्किलाबला सवयच आहे. आम्हाला वाईट वाटते ते या गोष्टीचे की 'इन्किलाब' काय आहे याविषयी प्रत्यक्ष माहिती करून न घेता काही 'नतद्रष्ट' लोकांच्या भूलथापांवर विश्वास ठेवून महाराष्ट्रीय बहुजन समाजाचे अग्रगण्य पुढारी श्री. जेधे यांनी इन्किलाबवर झोड उठवली.

" अहमदनगरच्या रामदासाची " (म्हणजे श्री. अच्युतराव पटवर्धन यांची) भाटाप्रमाणे स्तुती करण्याकरिता आणि बहुजन समाजाला खच्ची करण्याकरिता म्हणून इन्किलाबचा जन्म झाला आहे असा आमच्यावर आरोप करण्यात आला आहे. हा आरोप निखालस खोटा असून आमच्या काही हितचिंतकांच्या सांगोवांगीवरून करण्यात आला आहे.

' इन्किलाब ' हे काँग्रेसनिष्ठ असून समाजवादी धोरणाचे आहे. जातीयतेचा वास सुद्धा ' इन्किलाब 'ला सहन होणार नाही. अर्थात आमच्या ब्राह्मणेतरवादी पुढाऱ्यांप्रमाणे तू भटजी आहेस की शेटजी आहेस, तुझ्या रक्तातून जानवे गेले आहे की तुझे बापजादे लोटा-कमंडलू घेऊन मारवाडातून येथे उतरले हा प्रश्नही इन्किलाब कधी कोणाला विचारणार नाही. अमक्याचे बापजादे असे होते म्हणून त्यांची मुलेही ' शेटजी-भटजी ' मनोवृत्तीची निघतील असा निष्कर्ष काढणे अतिसुबुद्ध अशा काही ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनाच शक्य आहे. आमचा पुढाऱ्यांबद्दलचा आदर ते पुढारी ब्राह्मण आहेत म्हणून नव्हे हे आमच्या बुद्धिमार्तंडांना समजावयास हवे. एखादा मनुष्य ' ब्राह्मण ' झाल्यामुळेच जर तो आमच्या आदरास पात्र झाला असता तर प्रत्येक गावात पळीपंचपात्र घेऊन देवपूजेचे सोंग करणारे भटजी थोडेथोडके का आहेत, त्यांची नसती का आम्हाला तोंड भरून स्तुती करता आली. आम्हाला आदर वाटतो तो कुणी अमक्या कुळात आणि अमक्या जातीत जन्मास आला म्हणून नव्हे तर त्याच्याजवळ अमुक अमुक गुण आहेत म्हणून. केवळ याच कारणामुळे आम्हाला अच्युतराव पटवर्धनांच्याबद्दलही आदर वाटतो आणि क्रांतिवीर नाना पाटलांबद्दलही आदर वाटतो. पण येथील काही स्वयंभू पुढाऱ्यांना ही शुद्ध भूमिका चालत नाही आणि म्हणूनच आमचे कुसळ त्यांच्या डोळ्यात खुपते. अर्थात ही गोष्ट खरी आहे की, आम्ही अच्युत पटवर्धनांना मानतो ते काही ते कोठचे रामदास म्हणून नव्हे, किंवा नाना पाटलांबद्दल आम्हाला आदर आहे तो काही ते शिवाजी आहेत म्हणून नव्हे.

पण आमच्या टीकाकारांना आमची क्षुल्लक गोष्ट सुद्धा पुरते. मागे एकदा नाना पाटलांचा उल्लेख करीत असता कंपोझिटरच्या चुकीमुळे पाटलांतील ' ला ' वरील अनुस्वार उडाला. लगेच आमच्यावर सरबत्ती सुरू झाली की नाना पाटलांचा अपमान करण्याच्या बुद्धीनेच हा अनुस्वार गाळला. त्याचप्रमाणे आमच्या एका अंकात आम्ही अच्युतरावांचे चरित्र प्रसिद्ध केले. आमच्यावर लगेच आरोप करण्यात आला की, अच्युतराव ' ब्राह्मण ' म्हणूनच त्यांचे चरित्र देण्यात आले. असे आरोप पोरकट आणि हास्यास्पद असतात एवढे सांगणे मात्र आम्हाला अनिवार्य वाटते. असो.

ब्राह्मणेतरांच्याबद्दल आमच्या पोटात किल्मिष आहे असे कोणीही समजू नये. ' महात्मा जोतिबा फुले ' यांच्याबद्दल आम्हाला नितांत आदर आहे. इतकेच नव्हे तर

आजपर्यंत ब्राह्मणजातीकडून इतर जातींना अन्याय झाला आहे असेच आमचे मत आहे. आम्ही स्वराज्य पाहिजे असे जेव्हा म्हणतो, तेव्हा आम्हाला भटाभिक्षुकांचे राज्य, किंवा केवळ गोब्राह्मणप्रतिपालकाचे राज्य अभिप्रेत असते असे कोणीही समजू नये. आम्हाला किसान-कामगार प्रजाराज्य हवे आहे. आणि किसान-कामगार प्रजाराज्य नेहमी बहुजन-समाजाचेच राहील.

आमच्या पहिल्या लेखात आम्ही वर्गकलह (क्लास स्ट्रगल) आणि जातिकलह (कास्ट स्ट्रगल) ह्या दोन भिन्न गोष्टी आहेत हे सांगितले होते. वर्गयुद्ध हे नेहमी भांडवलदार आणि गरीब किंवा शोषक आणि शोषित यांच्यात होते. हा अन्यायविरुद्ध न्याय्य असा लढा असतो आणि त्यात सर्व जातींचे लोक सामील असतात. एक माणूस ब्राह्मण आहे म्हणून एक बाजू घेईल आणि दुसरा अब्राह्मण आहे म्हणून दुसरी बाजू घेईल असे समजणे अविवेकी, अतिरेकी, अवास्तववादी आणि प्रतिगामीपणाचे आहे, आणि आपली वर्णी अमुक ठिकाणी लागावी, आपली पोळी तमुक ठिकाणी पिकावी या हेतूने काही स्वार्थैकनिष्ठ ढोंगी लोक अशा जातीयतावादाचा फैलाव करीत असतात. पण अशा क्षुद्र प्रचाराला आमच्या पुढाऱ्यांनी बळी पडणे गैर आहे. कारण ते केवळ एका जातीचे पुढारी नाहीत तर समाजाचे पुढारी आहेत. ते ब्राह्मणेतरांचे ज्याप्रमाणे पुढारी आहेत त्याचप्रमाणे ब्राह्मणांचेही आहेत; आणि ज्याप्रमाणे बदमाष आणि पैसेवाल्या ब्राह्मणांचे ते पुढारी नाहीत त्याचप्रमाणे बदमाष आणि धनवान ब्राह्मणेतरांचेही ते पुढारी नाहीत.

आजपर्यंत समाजातील सर्वांत अग्रेसर वर्ग म्हणून ब्राह्मणजातीने समाजाचा सर्वांत जास्त फायदा उचलला. यालाच पाहिजे तर तुम्ही ब्राह्मणसत्तावाद किंवा ब्राह्मणवाद म्हणू शकता. पण जेथे तुम्ही जाती नष्ट करण्याची भाषा बोलता आहात तेथे तुम्ही दुसऱ्या जातीची भांडवलशाही निर्माण करणार काय? आमचे समाजवादी पुढारी श्री. मगनलालजी बागडी यांनी वापरलेल्या आणि 'इन्किलाब'मध्ये उद्धृत केलेल्या 'मराठा-पुंजीवाद' या शब्दावर अर्ध्या हळकुंडाने पिवळे झालेले अनेक नेतृवर्य चिडले आहेत. पण 'मराठा समाजवाद' या शब्दांत न समजण्यासारखे काय आहे हेच आम्हास कळत नाही. पुंजीवाद ही वास्तविक कोण्या जातीची मक्तेदारी असू नये हे खरे. नौखालीत रक्ताचे पाट वाहविले जात असताना या दंग्यांशी अप्रत्यक्षपणे संबंध असलेले श्री. इस्पहानी हे कलकत्त्यातील सुप्रसिद्ध हॉटेलमध्ये बिर्लीबरबर मौजेच्या गप्पा सहज मारू शकतात. पण समाजातील अशिक्षिततेचा फायदा घेऊन मुस्लिम लीगप्रमाणेच काही विशिष्ट हिंदू जातीतील श्रीमंत धेंडांनी आपला व्यापार आणि प्रतिष्ठा वाढविण्याकरिता, आणि त्या जातीवरील आपला दबाव कायम राहावा म्हणून वर्णद्वेष फैलावण्याचे काम हाती घेतले, आणि ही जात जर मराठा असली तर अशा वादाला तुम्ही 'मराठा पुंजीवाद'

म्हणणार नाही तर काय म्हणणार ? आपले धन कायम राहावे, आपली दोन दोनशे गावांची मालगुजारी आणि जागिरदारी कायम राहावी आणि बहुजन समाज आपल्यावरच उलटू नये म्हणून काही श्रीमंत गुंडांनी चालविलेली ही शुद्ध थापेबाजी होय. हिटलरची जर्मनेतर विद्वेषाची चळवळ आणि ही जातीयतावादी चळवळ एकाच मालिकेतील होय. जेथे ब्राह्मणाची पत्रास ब्राह्मण कुळात जन्मलेले पण ' भटजी ' नसलेले लोकच ठेवावयास तयार नाहीत तेथे खाजवून खरूज काढून बहुजन समाजाला अशिक्षिततेमुळे भुलवून पुरोगामी तरुणांचे म्हणणे त्यांच्या कानावर पडू नये याकरिता रचण्यात आलेले हे एक कपटनाटक आहे.

आम्हाला भांडवलशाही मुळीच नको आहे. त्याचप्रमाणे भटाभिक्षुकांचे राज्य पण आहे. आम्हाला गरीब जनतेला गांजणाऱ्या धनाढ्य वर्गाचे राज्य नको आहे. मग ते ब्राह्मण श्रीमंतांचे असो वा ब्राह्मणेतर श्रीमंतांचे. भांडवलशाही नष्ट करण्याचा प्रश्न सर्वांत महत्त्वाचा आहे. भांडवलशाही नष्ट झाली तर आपोआपच ब्राह्मण श्रीमंत आणि ब्राह्मणेतर श्रीमंत नष्ट होतील. बहुजनवादी समाजवाद स्थापन करावयाचा म्हणजे ब्राह्मण श्रीमंतांबरोबर ब्राह्मणेतर धनवानही नष्ट होतील याची आम्ही काळजी घ्यावयास पाहिजे. ' इंद्राय तक्षकाय स्वाहा ' अशी आमची घोषणा पाहिजे. बहुजनसमाजातील लोकांनी त्यांच्या वर्गातील जातीय पुढाऱ्यांचे पुढारीपण फेकून द्यावयास पाहिजे. बहुजन समाजातील समाजकंटकांचे हे दडपण जर सर्वसामान्य जनतेने झुगारून दिले तर जातीयतावादाचे कारण उरणार नाही, आणि शुद्ध समाजवाद तेवढा शिल्लक राहील. सर्व गरिबांची जात एक आहे. सर्व श्रीमंतांची जात एक आहे. गरिबांचा लढा हा श्रीमंत सत्ताधिकाऱ्यांबरोबर आहे, आणि हा लढा सर्व जातींतील गांजलेले लोक एकत्र येऊनच देऊ शकतात. ब्राह्मण मालगुजार झाला म्हणजे तो ब्राह्मण कुळाचा खंड कमी करीत नाही, आणि मराठा मालगुजार झाला म्हणजे तो मराठा कुळाचा खंड माफ करीत नाही हे विसरून चालणार नाही.

ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर गरिबांनो एक व्हा. या आणीबाणीच्या काळात स्वार्थी पुढाऱ्यांच्या नादास लागून आमच्या देशात अनेक पाकिस्ताने निर्माण करू नका.

१३

क्षुल्लक कार्य साधण्यासाठी महत्कार्याचा बळी देऊ नका !

२३-३-४७

आज नागपुरात संपाचा वणवा पेटला आहे. प्रांतातील प्राथमिक शिक्षक गेल्या २४ तारीखेपासून संपावर गेले आहेत आणि आता त्यांचा असेंब्लीसमोर सत्याग्रह सुरू झाला आहे. काही शिक्षकांनी प्राणांतिक उपोषण सुरू केल्याचीही बातमी आहे. नागपुरातील बसकामगारांनीही काम तहकूब केले असल्यामुळे नागपुरातील बस सर्व्हिस बंद आहे. नागपुरातील मेहेतरही संपावर गेले आहेत आणि त्यामुळे गावसफाईचे काम जनसेवकांना करावे लागत आहे. काँग्रेसचे मंत्रीही गावात साचलेली घाण उपसण्यास गेले होते. आज सकाळपासून तर म्युनिसिपल वॉटर वर्क्सच्या कामगारांनाही या संपाची झळ लागली असून ते संपावर गेल्यामुळे आम जनतेसमोर एक फारच बिकट प्रश्न उपस्थित झाला असून या उन्हाळ्याच्या दिवसांत पाण्याशिवाय दिवस काढण्याचे त्यांच्या नशिबी आले आहे.

या सर्व घटनांच्या मागे काही मूलभूत आणि तात्त्विक गोष्टी आहेत. नागपुरात संप का होत आहेत ? संप होतातच का ? आणि संप टाळण्याचा काही मार्ग आहे काय ?

संपाचे मूळ आणि खरे कारण म्हणजे अर्थात संपावर जाणाऱ्या कामगारांची आर्थिक विवंचना हेच होय. धनशास्त्रात भांडवलाला जितके महत्त्व आहे त्यापेक्षा अधिक महत्त्व श्रमाला आहे. श्रमिकांची शक्ती ही फार प्रभावी शक्ती आहे हे निर्विवाद आहे. तेव्हा भांडवलशाही मनोवृत्तीला बळी पडून, भांडवलदार म्हणा, जिल्हा कौंसिले म्हणा, म्युनिसिपालिट्या म्हणा किंवा सरकार म्हणा, जेव्हा श्रमिकांच्या अडचणींकडे कानाडोळा

करते, आणि आपल्या अरेरावी वृत्तीचे प्रदर्शन करून श्रमिकांना श्रमाचे मूल्य तर जाऊच द्या पण त्यांना धड पोटभर खावयासही मिळू देत नाही तेव्हा आपल्या शक्तीच्या जोरावर काम बंद करण्याची भीती दाखवून, किंवा काम करून मजुरांना आपल्या मागण्या पुऱ्या करून घ्याव्या लागतात. आजच्या जगातील भांडवलशाहीची पोळी पिकविणाऱ्या समाजस्थितीकडे आणि विषम आर्थिक विभागणीकडे पाहिले म्हणजे श्रमिकांनी आपल्या मागण्या कितीही वाढविल्या तरी त्यात अन्याय्य असे काहीच नाही, आणि त्या मान्य करण्याचा अधिकार आमचा असेल तर त्या मान्य केल्याच पाहिजेत असे म्हणणे भाग आहे.

या दृष्टीने विचार केला तर शिक्षक असोत की मेहेतर असोत, वॉटर वर्क्सचे मजूर असोत किंवा बसकामगार असोत, त्यांचे मागणे न्याय्य आहे, नव्हे, आजच्यापेक्षाही त्या मागण्या वाढल्या तरी त्या न्याय्यच राहतील असे म्हणावे लागते. त्याचप्रमाणे ह्या मागण्या पुऱ्या करून घेण्याकरिता जरी कामगारांनी संपाच्या शस्त्राचा अवलंब केला तरी त्याबद्दल आपणास त्यांना दोष देता येणार नाही. कारण मजूर संपावर गेले म्हणजेच फक्त आपणास त्यांच्या जीवनाची आठवण येते आणि ती सुद्धा त्यांच्या संपावर जाण्यामुळे आपल्या जीवनातील सुखसोयींना झळ लागते म्हणून. मजुरांच्या वाढलेल्या मागण्या मान्य करणे म्हणजे सुद्धा त्यांच्या अठराविसवे दारिद्र्याला ठिगळ लावण्यासारखेच आहे. कारण वाढलेल्या मागण्या मान्य करणे म्हणजे चालू समाजस्थितीला एका परीने मान्यता देणे होय आणि आपणास तर नवसमाज निर्माण करावयाचा आहे, किसान-मजदूर प्रजाराज्य स्थापन करावयाचे आहे. आजची परिस्थिती आपणास आमूलाग्र बदलावयाची आहे.

परंतु संप केवळ आर्थिक कारणाकरिताच होतात असे समजणे चूक आहे. संपाच्या मागे राजकीय कारणेही असतात आणि पुष्कळदा सत्ता राजकारणाकरिता हपापलेल्या पुढारी वर्गास आपल्या पुढारीपणास वाव मिळावा म्हणूनही संपाची आवश्यकता भासते, मग या महत्त्वाकांक्षेच्या पायी श्रमिकवर्गाचे कल्याण होवो वा अकल्याण होवो. नागपुरात चालू असलेल्या संपांचा सूक्ष्म बुद्धीने विचार केला तर या संपांच्या मागे कोण-कोणत्या शक्ती कशा काम करीत आहेत याचे दर्शन होऊ शकेल.

नागपुरात चाललेले संप हे नागपुरच्या राजकीय प्रांगणात चाललेल्या चतुर्विध गटांच्या चुरशीचे दृश्य स्वरूप होय. या चुरशीत काँग्रेस आहे, फॉरवर्ड ब्लॉक आहे, प्रांतिक काँग्रेस कमिटी आहे, स्वतःच्या प्रतिष्ठेकरिता काँग्रेसला गाडण्याचा प्रयत्न करून पुन्हा साळसूदपणे स्वतःच्या प्रतिष्ठेकरिता काँग्रेसला गाडू नका, असा उपदेश करणारे तरुण भारत आहे, यात कायदेमंडळातील राजकारणधुरंधर आहेत, यात ज्यांच्या राजकारणाचे फासे विशेष सरळ पडले नाहीत असे आमदार आणि आमदारपत्न्या आहेत, आणि यात कम्युनिस्ट पक्षानेही आपले हात धुऊन घेतले आहेत.

प्रांतात चाललेल्या संपांत लहानसहान वैयक्तिक हेव्यादाव्यांपासून तात्त्विक राजकारणापर्यंतच्या सर्व छटा आहेत आणि त्यांपैकी काही लोकांचे अधिष्ठान तरी काँग्रेसद्वेष हेच आहे. दुर्दैवाने, अधिकारवशतेमुळे म्हणा किंवा आपल्या आकुंचित दृष्टिकोणामुळे म्हणा, काँग्रेसच्याच काही लोकांनी ह्या सर्व प्रकाराला चेतना दिली आहे.

आज प्रांतात तीव्र महागाई आहे. यंदाचे प्रांतातील पीक बुडाल्यामुळे प्रांतात दुष्काळ सुरू झाला आहे. ही महागाई आणि हा दुष्काळ अर्थातच सर्वांना भोवला. पण दुष्काळाला आणि महागाईला तोंड द्यावयाचे असेल तर सर्वांनी एकदिलानेच काम करावयास पाहिजे. पण त्याऐवजी काँग्रेस तुमच्यासाठी काही करीतच नाही, मंत्र्यांना १००० रु. पगार कशाला पाहिजे वगैरेसारखा प्रचार काँग्रेसची ताकद कमी करण्याच्या दृष्टीने सुरू झाला. याच्या उलट आमच्या काँग्रेस सरकारनेही इरेला पेटून 'शांतता आणि सुव्यवस्था' ठेवण्याच्या मिषाने नागरिक स्वातंत्र्याला लगाम घातला आणि लोकप्रियता व तडजोडीच्या जोरावर नव्हे तर पोलिस शक्तीच्या जोरावर शिक्षकांना आणि श्रमिकांना नामोहरम करण्याचे ठरविले. दोन्ही पक्षांकडून ही चूक झाली असे आम्हास मोठ्या खेदाने म्हणावे लागते. असे करणे म्हणजे शुद्ध आततायीपणा होय आणि आततायीपणा म्हणजे क्रांतिपणा नव्हे.

आपण शिक्षकांच्या संपाचेच उदाहरण घेऊ. शिक्षकांना आपल्या पगारवाढीकरिता संपावर जाणे क्रमप्राप्त होते. पण शिक्षक संपावर गेल्यानंतर आणि प्रांतिक सरकारने त्यांचा ३० रु. पगार आणि ११ रु. महागाई भत्ता मान्य केल्यानंतर शिक्षकांच्या संपात आजसारखी परिस्थिती निर्माण होणे ही निश्चितपणे खेदाची गोष्ट आहे. वैयक्तिक हेव्यादाव्यात आज शिक्षकांचा निष्कारण बळी घेतला जात आहे, असे आम्हास खेदपूर्वक म्हणावे लागते. राजकारणाच्या क्षेत्रात ना. मिश्र असे म्हणतात म्हणून आम्ही असे करू किंवा कॉमरेड रुईकर तसे म्हणतात म्हणून आम्ही तसे करू असे म्हणणे शुद्ध असमंजसपणाचे आहे. तसेच आम्हास इतका पगार आणि मंत्र्यांना इतका का असे म्हणणेही अयोग्य आहे. जोपर्यंत आजची समाजरचना कायम आहे, तोपर्यंत हे मंत्री नाही तर त्यांच्या जागी आणखीही कोणी मंत्री आले तरी त्यांना एका विशिष्ट तऱ्हेनेच राहावे लागणार आहे हे न समजणे अनुचित आहे. समाजात मूलभूत बदल केला गेला तरच ही गोष्ट दूर होणार आहे. शिक्षक संपावर असतानाचा पगार शिक्षकांना मिळावा की मिळू नये हा या वादाचा विषय आहे. हा वाद आमच्या दोन महनीय पुढाऱ्यांना आपसात मिटवता येऊ नये हे आम्हाला लांछनास्पद आहे तसेच केवळ एवढ्या क्षुल्लक गोष्टीकरिता सत्याग्रह करावा लागावा, किंवा शिक्षकांच्या हातात बेड्या पडाव्या आणि शिक्षकांना तुरुंगात टाकण्यात यावे ही पण लांछनास्पद गोष्ट आहे. शिक्षकांच्या पुढाऱ्यांनी या थरास गोष्टी नेणे आम्हास इष्ट वाटत नाही. पण त्याचबरोबर सुबत्ता आणि सुरक्षितता

राखण्याच्या नावाखाली गरीब शिक्षकांवर लाठी चार्ज होत असेल तर ती सुरक्षितता नाहीशी झाली तरी चालेल पण मंत्रिमंडळाने आपला राजीनामा जनतेच्या हातात द्यावयास पाहिजे.

या सर्व प्रकरणाचा फायदा कम्युनिस्ट आणि इतर काँग्रेसद्वेष्टे लोक घेतात हे विसरून चालणार नाही. काँग्रेसविरुद्ध वातावरण उत्पन्न होत आहे असे दिसताच या पर्वणीत कम्युनिस्टांनीही आपली साधून घेतली आणि असंतोषाच्या वातावरणात इतरही कामगारांना भडकवून आपल्या पक्षाचे कार्य झपाट्याने चालविले. लढाईच्या वेळी संप करू नका असे म्हणणाऱ्या कम्युनिस्टांना काँग्रेसचे सरकार झाले तरी ते एकदम सर्वांच्या मागण्या मान्य करू शकत नाही असे सांगण्याचा विवेक कोठून राहणार ? तसेच सामान्य कामगारांना राजकारणाची ही अंतःसूत्रे कशी कळणार ? जी गोष्ट मजुरांची आहे तीच गोष्ट थोड्या प्रमाणात शिक्षकांची आहे. शिक्षक काँग्रेसाभिमुख असले तरी त्यांना पकडून तुम्ही तुरुंगात टाकले की अगोदरच तुरुंगात कोंडून ठेवलेल्या कम्युनिस्टांच्या सान्निध्यात त्यांचा काँग्रेसद्वेष पराकोटीस गेल्यावाचून राहणार नाही हे निश्चित आहे. कामगारांची सर्व गाऱ्हाणी खरी आहेत पण काँग्रेसला पेचात आणण्याच्या दृष्टीनेच ही आज करण्यात आली आहेत हेही तितकेच खरे आहे आणि आजच्या परिस्थितीत मंत्रिमंडळातील पुढाऱ्यांनी म्हणा किंवा जनतेच्या पुढाऱ्यांनी म्हणा, काँग्रेसची ताकत कमी करणे बरोबर नाही.

जून १९४८ पर्यंत काँग्रेसची ताकत कमी कराल तर काँग्रेसची अनेक शकले होतील, कम्युनिस्टांना फावेल आणि तुम्ही आपल्याच हाताने आपल्या पायावर धोंडा पाडून घ्याल. म्हणून आमच्या शिक्षक बांधवांनी प्रां. काँ. कमिटीचा आदेश मान्य करून आपला संप मागे घ्यावा आणि प्रां. काँ. कमिटीनेही शिक्षकांच्या संपाच्या वेळचा पगाराचा प्रश्न न्याय्य बुद्धीने सोडवावा अशी आम्ही प्रार्थना करितो. नाहीतर क्षुल्लक कार्य साधण्याकरिता महत्कार्याचा बळी द्यावा लागेल आणि संप टाळण्याचे अंतिम स्वप्न जे किसान-मजदूर प्रजाराज्य ते लांबणीवर पडेल.



१४

हे अस्पृश्यतेचे पाप ताबडतोब धुऊन काढा—

३०-३-४७

ता. २४ मार्च रोजी मध्यप्रांत असेंब्लीत मा. डॉ. बारलिंगे यांनी अस्पृश्यतानिवारणाचे बिल सादर केले असून त्यात मंदिरप्रवेशाला पूर्ण बगल दिली आहे असे वृत्त स्थानिक वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाले आहे. अस्पृश्यतानिवारणाच्या दिशेने केले जाणारे सर्वच प्रयत्न अभिनंदनीय आहेत यात शंका नाही, परंतु हे प्रयत्न भीत भीत, दिरंगाईने, अर्धवट आणि अपूर्ण स्वरूपात का करण्यात यावेत ते आम्हाला कळत नाही. याबाबतीत आम्ही 'इन्किलाब'च्या पहिल्याच अंकात एक स्फुट लिहून प्रांतिक सरकारला सूचना केली होती; तिची आठवण फिरून करून देणे आणि अस्पृश्यतानिवारणाच्या प्रश्नाची किंचित सविस्तर चर्चा पुनः एकदा करणे आम्हाला जरुरीचे वाटते.

आज हिंदुस्थानात अंतर्गत भांडणे, मारामाऱ्या, खून, जाळपोळ यांचे सत्र चालू आहे, एवढेच काय, प्रत्यक्ष यादवी सुरू होते की काय अशी साधार भीतीही वाटू लागली आहे. आपण सर्व जरी तोंडाने 'हिंदुस्थान अखंड आहे' असा घोष करीत असलो तरी आपला देश आज अनेक भेदांनी आणि वैरांनी पछाडला गेला आहे हे विसरून चालणार नाही. हिंदी विरुद्ध ब्रिटिश या राष्ट्रीय द्वंद्वाबरोबरच हिंदूविरुद्ध मुसलमान, स्पृश्य हिंदूविरुद्ध अस्पृश्य हिंदू, ब्राह्मण विरुद्ध ब्राह्मणेतर, भांडवलदार विरुद्ध मजूर, जमीनदार विरुद्ध शेतकरी अशी कितीतरी अंतर्गत जातीय आणि वर्गीय द्वंद्वे झुंजली जात आहेत. यांपैकी शक्य तितके अंतःकलह जर आपल्याला ताबडतोब मिटवता आले तरच आपला जो परकीय साम्राज्यशाही सत्तेशी मुख्य लढा आहे तो लढणे सुलभ होणार आहे.

या द्वंद्वापैकी एक द्वंद्व आपल्याला ताबडतोब नाहीसे करता येणे शक्य आहे अशी आमची खात्री आहे. ते द्वंद्व म्हणजे स्पृश्य व अस्पृश्य हिंदूंचे. सवर्ण हिंदूंनी आजपर्यंत हजारो वर्षे अस्पृश्यांना इतक्या निर्दयतेने वागविले आहे की, त्यांचा आमच्या चांगुलपणावरील आणि प्रामाणिकपणावरील विश्वास पार उडून गेला आहे. आम्ही समतेच्या गोष्टी करीत नाही असे नाही; परंतु गप्पा आणि खरे बोलणे यांतील फरक आता लोकांना कळू लागला आहे. आज स्पृश्य हिंदूंना अस्पृश्यांची भूमिका फारशी कळू शकत नाही. ती भूमिका देशद्रोही आहे असे आपण म्हणतो; आणि ती तशी असेलही. परंतु तिच्यामागे कोणता भयंकर आणि दीर्घ अनुभव आहे याची जाणीव आपल्याला नसते. ती भूमिका हजारो वर्षे आपण केलेल्या पाशवी अत्याचारांचाच परिपाक आहे, ही गोष्ट आपण सहानुभूतिपूर्वक आणि प्रामाणिकपणे विचार करून ओळखली पाहिजे.

काही महिन्यांपूर्वी एका हरिजन पुढाऱ्याशी बोलत असता त्यांच्या तोंडून काही मते ऐकून आम्हाला अचंबा वाटला. आज सर्व लोक अस्पृश्यता नष्ट करावयाचा प्रयत्न करीत असता तुम्ही स्वतंत्र मतदारसंघ मागता हे अयोग्य नाही काय? असे आम्ही त्यांना विचारले तेव्हा त्यांनी उत्तर दिले की, "अस्पृश्यता नष्ट झाली तर ती अर्थातच आम्हाला हवी आहे; परंतु ती खरोखरच नाहीशी होईल असा विश्वास आम्हाला वाटत नाही. निदान जवळच्या भविष्यात ते शक्य दिसत नाही. याकरिता आमच्या या अभागी समाजाच्या निदान माणुसकीचे तरी संरक्षण व्हावे या हेतूने आमची स्वतंत्र मतदारसंघाची मागणी आहे. आम्ही अस्पृश्य राहू, परंतु आम्हाला शासनसंस्थेत अधिकार मिळेल आणि आमच्या समाजाचे कल्याण साधता येईल."

वरील उत्तरात हरिजनांची मनोभूमिका अगदी स्पष्टपणे ग्रथित झाली आहे. त्या भूमिकेशी आपल्याला सामना द्यायचा आहे. स्पृश्य विरुद्ध अस्पृश्य हिंदू हा लढा जर आपल्याला मिटवायचा असेल तर आपण प्रथम हरिजनांच्या मनात आपल्या सद्हेतूबद्दल आणि प्रामाणिकपणाबद्दल विश्वास निर्माण केला पाहिजे. हा विश्वास उत्पन्न करणे सोपे नाही. कारण शब्दांनी आणि अभिवचनांनी लोक फसेनासे झाले आहेत. अस्पृश्यतेचा नायनाट करण्याची भाषा तावातावाने व्यासपीठावरून बोलणारे खादीधारी पुढारीही पुष्कळदा शब्दाप्रमाणे वागण्यास तयार नसतात, असा कटू अनुभव आहे. याकरिता खरोखरीच्या प्रामाणिक आणि कळकळीच्या प्रयत्नांची गरज आहे.

मात्र आम्ही म्हणतो तसा विश्वास निर्माण करणे कठीण काम असले तरी ते अशक्य आहे असे आम्हाला मुळीच वाटत नाही. उलट ते यशस्वी करण्याचा एक सोपा आणि सरळ मार्ग आहे असेच आमचे मत आहे. तो मार्ग म्हणजे अस्पृश्यता बेकायदेशीर जाहीर करणे, आणि ती पाळणाऱ्या व्यक्तींना गुन्हेगार ठरवून शिक्षा करणे. देवळे, पाणवठे, खाणावळी आणि हॉटेले या सर्वांत अस्पृश्यांना सर्रास प्रवेश देऊ केला पाहिजे.

असा कायदा करून त्याची अंमलबजावणी केल्यास हे अस्पृश्यतेचे पाप एका वर्षाच्या आत धुऊन निघेल असा आम्हाला विश्वास वाटतो.

या दृष्टीने पाहता ना. डॉ. बारलिंगे यांच्या बिलात मंदिरप्रवेशाचा समावेश नाही ही एक उणीव राहून गेली असे म्हणावे लागते. या उणिवेसंबंधी बोलताना ना. डॉ. बारलिंगे असे म्हणाले म्हणतात की, 'लोकमत मंदिरप्रवेशाला अनुकूल आहे असे मला दिसून आले तर मी त्याचा समावेश अवश्य करीन' परंतु याबाबतीत लोकमत अजमावण्याची वाट पाहण्याचे वास्तविक काय प्रयोजन आहे? ते लोकमत वेळोवेळी भाषणे आणि लेख यांतून पुरेसे व्यक्त झालेले नाही काय? शिवाय जनतेने आपल्या विश्वासाचे म्हणून आपली निवड केली आहे; आता आपल्या अधिकारात आपल्या विवेक बुद्धीला पटेल ते सर्व करा. ते बिल जर असेंब्लीत नापास झाले तर गोष्ट निराळी पण ते आधीपासूनच असे दुर्बल आणि अपुरे करण्याची काय गरज आहे? यावर कदाचित असे म्हणता येईल, मंदिरप्रवेश जर कायद्याने सुरू केला तर लोकांच्या धार्मिक भावना दुखावतील. निदान धार्मिक बाबतीत तरी दडपशाही नको, म्हणून आम्ही हळूहळू मार्ग आक्रमित आहोत. परंतु हजारो वर्षे हरिजनांच्या भावनांची पायमल्ली केल्यानंतर आता चार दिवस काही आडमुठ्या अदूरदर्शी स्पृश्य हिंदूंच्या भावना दुखावतील म्हणून बिचकण्याचे काय कारण आहे? अहिंसेचे पुरस्कर्ते असूनही काँग्रेस सरकार हिंसेचा आणि दडपशाहीचा उपयोग करण्यास कचरतच नाही हे आता सिद्ध झाले आहे; मग एका भल्या कार्यातच ती भीती बाळगण्याचे काय प्रयोजन आहे?

योगायोगाची गोष्ट अशी की ज्या तारखेला हे वृत्त येथील स्थानिक वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाले त्याच तारखेला मुंबईच्या मंदिरप्रवेश बिलाची बातमीही प्रसिद्ध झाली. या दोन्ही बिलांची तुलना करणे, मोठे बोधप्रद आहे. ता. २५ रोजी मुंबई गॅझेटमध्ये हरिजनांना सर्व देवळांत प्रवेशाचा आणि पूजेचा हक्क देणाऱ्या नव्या बिलाचा मसुदा छापला गेला आहे. या बिलान्वये देवळांत प्रवेश आणि पूजा याविषयी भेदाभेद करणे हा गुन्हा होणार आहे. हे बिल आणल्याबद्दल मुंबई सरकार अभिनंदनास पात्र आहे. मुंबई सरकारची धडाडी अनुकरणीय आहे. गेल्या अनेक वर्षांत आमचे प्रांतिक सरकार मुंबई सरकारचे अनेक बाबतींत अनुकरण करीत आले आहे; तेव्हा याही बाबतीत तसे करील अशी आम्हाला आशा आहे. परंतु सर्वच बाबतींत नागपूरने मुंबईच्या मागे राहावे असे थोडेच आहे? मुंबईची धडाडी दाखवून येथील सरकारनेही राष्ट्रीय जीवनात अवश्य सुधारणा भराभर घडवून आणाव्या अशी आमची आग्रहाची विनंती आहे.

१५

हे लोकशाहीच्या मार्गाने जाणे नव्हे !

६–४–४७

गेल्या पंधरवड्यात हिंदुस्थानभर व विशेषतः मध्यप्रांतात समाजवादी कार्यकर्त्यांची जी धरपकड झाली आहे तिच्यामुळे प्रांतातील पुरोगामी जनतेत अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे. किसान आणि कामगार यांचे राज्य प्रस्थापित करण्याचे कंकण बांधलेल्या काँग्रेसचे अधिकृत सरकार जनतेच्या एकनिष्ठ सेवकांवर कायदेशीर बंधन घालण्यास उद्युक्त होते ही घटना चमत्कारिक आहे. त्यामुळे काँग्रेस सरकारची राजकीय, सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टे खरोखर काय आहेत असा प्रश्न सर्व समाजसेवकांच्या मनात उत्पन्न होणे साहजिक आहे. त्या उद्दिष्टांचा आणि त्यांच्या सिद्धीकरता अवलंबिल्या जाणाऱ्या धोरणाचा ऊहापोह करणे हे पुढील कार्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे झाले आहे.

वास्तविक काँग्रेस सरकारांचे अर्थविषयक धोरण काय आहे याविषयी बऱ्याच पूर्वीपासून शंका येण्यासारखे प्रसंग घडत आले आहेत. गेल्या जून महिन्याच्या आसपास प्रांतांतून काँग्रेस सरकारे अधिकारारूढ झाली. बहुजन समाजाच्या कल्याणाकरिता काँग्रेसची सरकारे त्या दृष्टीने सुधारणा घडवून आणतील असे वाटू लागले. सामान्य लोकांच्या गरजांना प्राधान्य दिले जाऊन शिक्षण आणि आरोग्य हे दोन आधारभूत उद्योगधंदे आहेत असे जाहीर करण्यात आले. अनेक प्रांतांतून वेगवेगळ्या धंद्यांचे राष्ट्रीयीकरण करण्याची भाषा बोलली जाऊ लागली. जमीनदारी नष्ट करण्याच्या योजना तयार होऊ लागल्या. आणि एकंदरीत असा आभास निर्माण झाला की आता समाज-

वादी समाज लवकरच विनासायास निर्माण होणार!

परंतु हे सर्व स्वप्न होते हे लगेच दिसून येऊ लागले. धंद्यांच्या राष्ट्रीयीकरणाची भाषा ओठावरच विरून गेली. मुंबई प्रांतातील मोटार वाहतुकीचे राष्ट्रीयीकरण करावे या योजनेला उद्देशून मुंबई प्रांतिक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. स. का. पाटील म्हणाले की, आपण राष्ट्रीयीकरणाचे स्तोम माजवू नये. ती योजना आता बारगळली आहे असे कळते. जमीनदारी नष्ट करावयास निघालेल्या मध्यप्रांतात सरकारने डोंगर पोखरून उंदीर काढला; आणि शेतकऱ्याने जमीनदाराला द्यावयाचा खंड काही टक्क्यांनी कमी केला. देशभर दारिद्र्य आणि अन्नवस्त्राच्या टंचाईमुळे कातावलेल्या कामकऱ्यांनी संप केले, तर त्याला उत्तर म्हणून औद्योगिक झगडे मिटविण्याकरिता नवे कायदे पास करण्यात आले आणि त्यावरहुकूम मजुरांचा संप करण्याचा हक्क काढून घेण्यात आला. औद्योगिक आणि शेतीविषयक सर्व असंतोषाचे पाप कम्युनिस्ट आणि सोशालिस्ट कार्यकर्त्यांच्या माथी मारण्यात आले. हजारो वर्षे अक्षरशः गुलामगिरीत सावकार आणि जमीनदार यांच्या लाथा खात आणि पाशवी जुलूम मुकाट्याने सहन करणारे बारली शेतकरी स्वाभिमान परत मिळवून माणसात आले आणि आपल्यास पशू बनविणाऱ्या राक्षसांबरोबर झगडा करू लागले तेव्हा हर्षभरित न होता त्यांना पुन्हा दडपण्याचे प्रयत्न केले गेले. त्यांनी केलेल्या दोनचार तुरळक जाळपोळींच्या आणि मारामारीच्या पराचा कावळा करण्यात येऊन त्यांच्या 'अत्याचारी' मार्गाचा निषेध करण्यात आला. हजारो वर्षेपर्यंत बारल्यांना अक्षरशः मारझोड करणाऱ्या, त्यांना गुराप्रमाणे बागविणाऱ्या आणि त्यांच्या स्त्रियांना भ्रष्ट करणाऱ्या जमीनदारवर्गाचे पूर्वीचे सर्व पाप विसरून जाऊन बारल्यांच्या अत्याचारांचा बाऊ करण्यात आला. तसेच अच्युत पटवर्धन, मगनलाल बागडी यासारख्या सर्वमान्य समाजवादी पुढाऱ्यांच्या घरांच्या झडत्या घेण्यात आल्या. शिक्षकसंप प्रकरणात गरीब आणि परिस्थितीने गांजलेल्या शिक्षकांच्या धरपकडीचे सत्र सुरू केले. भंग्यांच्या संपात 'भंग्यांचे रेशन बंद करू' अशी अन्यायमूलक भाषा बोलली गेली. मध्यप्रांताच्या अंदाजपत्रकात सार्वत्रिक शिक्षण आणि सामाजिक आरोग्य यांना जवळ जवळ फाटा देण्यात आला, आणि आता समाजवादी पुढाऱ्यांची आणि कार्यकर्त्यांची धरपकड सुरू झाली आहे.

या सर्व घटनापरंपरेचा अर्थ अगदी स्पष्ट आहे. सध्याची काँग्रेस सरकारे लोकांची नसून ती मूठभर पैसेवाल्यांची आहेत हे लहान मुलासही कळेल इतके स्पष्ट झाले आहे. त्यात जमीनमालक आणि कारखानदार यांच्या हितसंबंधांचे रक्षण करणाऱ्या लोकांचेच प्राधान्य आहे; आणि त्यामुळे या सरकारच्या हातून कोणत्याही प्रकारची मूलग्राही सुधारणा घडू शकेल ही आशा नाहीशी झाली. मूलग्राही सुधारणा करू म्हणणाऱ्या क्रांतिवाद्यांना आततायी आणि मूर्ख असे संबोधण्यात येऊन आपण उत्क्रांतिमार्गाने

हळूहळू प्रगती केली पाहिजे अशी बतावणी करण्यात येत आहे. परंतु या उत्क्रांतिवादी मार्गाने शेदीडशे वर्षे वाट पाहण्यास येथील गांजलेला बहुजनसमाज तयार नाही असे आम्ही निश्चित सांगू शकतो.

आता जनतेच्या लढ्यातील शेवटच्या अवस्थेत आपण पदार्पण करीत आहोत. आतापर्यंत काँग्रेस ही साम्राज्यशाहीशी लढणारी एकमेव संस्था होती. तिची शक्ती कमी होईल या भीतीने समाजवादी लोक अंतर्गत भेदांवर भर न देता साम्राज्यविरोधी आघाडीवर भांडवलशाही वर्गाबरोबर एकजूट करीत होते. पण जनतेत आज भरपूर जागृती झाली आहे. अशा स्थितीत पूर्वीप्रमाणे समाजवादी प्रवृत्तींना आळा घालण्याचे कारण आता उरलेले नाही. उलट या प्रवृत्तींना उत्तेजन देऊन, जनतेला आता या अंतिम लढ्याकरता तयार करण्याची वेळ आली आहे. त्या कार्याला आता कार्यकर्त्यांनी जोरात सुरुवात करावयास पाहिजे.

१६

जालियनवाला बाग

१३-४-४७

अठ्ठावीस वर्षांपूर्वी-१३ एप्रिल १९१९ रोजी-जालियनवाला बागेतील दुःखद घटना घडली. ह्याच दिवशी कुप्रसिद्ध जनरल डायरने १५७९ हून अधिक निरपराधी बायका, पुरुष आणि मुले यांना बंदुकीच्या गोळ्या घालून ठार मारले. हा जनरल जर एखादा जर्मन असता, तर त्याला भयंकर दुष्ट असा युद्ध-गुन्हेगार म्हणून फासावर चढविण्यात आले असते, परंतु राज्यकर्त्या इंग्रजांपैकी तो एक असल्यामुळे, त्या वेळचे पंजाबचे गव्हर्नर सर मिचेल ओडवायर, यांनी त्याच्या 'शूर कृत्याबद्दल' त्याचे अभिनंदन केले. "जालियनवाला बाग" ही हिंदी-ब्रिटिश संबंधांतील अमानुषता, लालसा आणि द्वेष यांनी परिपूर्ण अशी घटना होय.

भविष्यकालीन इतिहासकारांनी त्या दुःखप्रद घटनेचा कसाही अर्थ लावला तरी ज्या हुतात्म्यांनी आपले बलिदान करून हिंदवी स्वातंत्र्येतिहासात एक महत्त्वाचे स्थित्यंतर घडविले त्यांना आज आपण श्रद्धांजली अर्पण करू या!

नवभारताच्या इतिहासाशी जास्तीत जास्त निगडित झालेला जर कोणता दिवस असेल तर तो आजचा दिवस होय. २७ वर्षांपूर्वी आजच्या दिवशीच जालियनवाला बाग हत्याकांड घडले. अमृतसरच्या त्या इतिहासप्रसिद्ध बागेत कोंडीत पकडून शेकडो निरपराधी हिंदी कार्यकर्त्यांची कत्तल करण्याचा अग्रपूजेचा मान जनरल डायरने आजच्याच दिवशी प्रथम मिळविला. जनरल डायरच्या पावलावर पाऊल टाकून त्यानंतर आमच्या न्यायनिष्ठुर राज्यकर्त्यांनी अनेक वेळा आणि अनेक प्रकारे जालियनवाला बागेची बरहुकूम नक्कल

करण्याचा प्रयत्न केला आहे. नागपूर, चिमूर, आष्टी, देवळी, यावली, अमळनेर, बालिया आदी ठिकाणी ४२ साली आणि तदनंतर ब्रिटिश सरकारने गाजविलेला पराक्रम हिंदी जनता अद्याप विसरली नाही. परंतु गोऱ्या कातडीच्या सुसंस्कृततेची पहिली चमक १३ एप्रिल १९१९ रोजी सर्व जगास विज्ञात झाल्याने १३ एप्रिलचे महत्त्व काही विशेष आहे. जालियनवाला बाग हत्याकांडानंतरच आमच्या राष्ट्रीय चळवळीने जोरात पेट घेतला आणि आपण 'जून ४८ पर्यंत' येऊन पोचलो. जनरल डायरने अशा रीतीने आमच्या राष्ट्रीय चळवळीस फारच मोलाची मदत केली. जनरल डायरच्या या सत्कृत्याबद्दल प्रत्येक हिंदवासीयाने जनरल डायरचे आभार मानावयास पाहिजेत.

जालियनवाला बाग प्रकरणाने हिंदुस्थानच्या इतिहासात एका नवीन युगास सुरुवात झाली. जनतेचा इंग्रजांबद्दलचा असंतोष उफाळून वर आला आणि त्यातून सामुदायिक आंदोलनाचा जन्म झाला. महात्माजींच्या नेतृत्वाखाली उभारण्यात आलेल्या २०-३०-३२ किंवा ४२ सारख्या चळवळी अगदी खऱ्या अर्थाने जालियनवाला बाग अत्याचारातून उत्पन्न झालेल्या लोकजागृतीचेच फळ होय. ही लोकजागृती घडवून आणण्याकरिता आमच्या राष्ट्रातील उमद्या नवयुवकांना राष्ट्रमंदिराच्या पायाचे दगड व्हावे लागले, आपल्या सर्वस्वाचे बलिदान करावे लागले, ही गोष्ट विसरून चालणार नाही. आज आपण राष्ट्रमंदिराचा कळस चढवीत आहोत. अशा प्रसंगी ज्या हुतात्म्यांच्या आत्मसमर्पणामुळे आपणांस आपले ईप्सित साध्य करण्याची संधी मिळत आहे, त्यांचे पुण्यस्मरण करणे आवश्यक आहे, नव्हे, ज्या ध्येयाकरिता त्या हुतात्म्यांनी आपल्या छातीवर गोळ्या झेलण्यास कमी केले नाही त्या ध्येयाचेही विस्मरण होऊ न देणे आवश्यक आहे. ध्येय आपल्या दृष्टिपथात येताच ध्येयभ्रष्ट होण्याची किंवा ध्येयाचे विस्मरण होऊन खोट्या अधिकारांच्या नादी लागण्याची परिस्थिती उत्पन्न होते असा इतिहास आहे. अशा खोट्या अधिकारांना आपण फसू नये, खोट्या आमिषांना आपण बळी पडू नये याकरिता आमच्या या पुण्य पुरुषांची चरित्रे सदैव आमच्या डोळ्यासमोरच असावयास पाहिजेत. "दिन खून का हमारे प्यारो न भूल जाना" असा जालियनवाला बाग हुतात्म्यांचा संदेश आहे. आपण तो कधीही विसरता कामा नये.

आमच्या जालियनवाला बाग क्रांतिकारकांचा संदेश आज आम्ही कसा अंमलात आणू शकतो ? ज्या वेळी जालियनवाला बाग हत्याकांड घडले त्या वेळी आमच्या राष्ट्रीय आंदोलनाची गाडी एका विशिष्ट टप्प्यापर्यंतच येऊन पोचली होती. आमच्या राष्ट्रवादाचा पूर्ण विकास त्या वेळी झाला नव्हता. आमचा देशी भांडवलदार वर्गसुद्धा त्या वेळी बाल्यावस्थेतच होता. त्यामुळे आमच्या लढ्याचेही एकमेव लक्ष्य त्यावेळी परकीय राज्यकर्त्यांना या देशातून बाहेर कसे काढता येईल यावरच केंद्रीभूत झाले होते. आमच्या हुतात्म्यांच्या रक्ताच्या प्रत्येक थेंबातून हाच संदेश आम्हास ऐकविण्यात येत होता. ८ ऑगस्ट १९४२-

च्या ठरावाने आणि ९ ऑगस्टनंतर झालेल्या 'चले जाव' आंदोलनाने या संदेशाची बव्हंशाने पूर्तता झाली; आणि आज आपण नवीन युगात प्रवेश करीत आहोत. यानंतर आपला लढा हा इंग्रज राज्यकर्त्यांबरोबर कदाचित होईलही, पण इंग्रजांपेक्षाही तारुण्याने मुसमुसलेल्या आमच्या भांडवलशहांबरोबर आमचा लढा होण्याचा संभव अधिक आहे. अशा परिस्थितीत आमच्या हुतात्म्यांच्या संदेशातील शब्द जरी तेच असले तरी त्याचा अर्थ पूर्वीपेक्षा भिन्न आणि अधिक व्यापक झाला आहे. आमच्या हुतात्म्यांचा लढा हा न्यायाचा लढा होता; तो अन्यायाविरुद्ध लढा होता. तो सर्व प्रजेला स्वतंत्र आणि सुखी करण्याकरिता लढा होता. केवळ परकीय राज्यकर्त्यांपासून आपण स्वतंत्र झाल्याने सर्व प्रजा सुखी होईल हा केवळ भ्रम आहे हे आता सिद्ध झाले आहे; सर्व प्रजा केवळ समाजवादाच्या प्रस्थापनेनंतरच गुलामीतून मुक्त होऊ शकते. अशा परिस्थितीत आमच्या हुतात्म्यांच्या बलिदानाचा आणि संदेशाचा खरा अर्थ समजून घ्यावयास पाहिजे आणि समाजवादी समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या कार्यास आपण संघटित रीतीने लागले पाहिजे. आपण जेव्हा ह्या कार्यास लागू त्याच वेळी हुतात्म्यांच्या बलिदानाची आम्हांस चाड आहे हे सिद्ध होईल. राष्ट्रातील तरुणांनो! जालियनवाला बाग हुतात्म्यांचा संदेश अमलात आणा!

१७

सरदारांचे समाजवादी तरुणांना आव्हान

२०-४-४७

सरदार वल्लभभाई पटेल यांनी या महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात गुजराथला जी धावती भेट दिली तिला काँग्रेसपक्षीय राजकारणाच्या दृष्टीने बरेच महत्त्व आहे. केव्हाही एखादी महत्त्वपूर्ण घोषणा करावयाची झाल्यास सरदारजी मुंबई किंवा गुजराथ विशेष पसंत करतात असा जणू नियमच झाला आहे. अहमदाबाद, आनंद, रास, करमसद, नडियाद इत्यादी ठिकाणी हंगामी सरकारच्या गृहमंत्र्यांनी जी जी भाषणे केली त्यांत त्यांनी देशाच्या सद्यःस्थितीचा साकल्याने आढावा घेतला; मुस्लिम लीगला आपल्या नेहमीच्या रोखठोक पद्धतीने इशारा दिला; मुस्लिम लीगच्या अव्यवहार्य व अविवेकी दडपणाने काँग्रेस दबून जाणार नाही हे त्यांनी खणखणीत शब्दात पुन्हा जाहीर केले. संस्थानिकांनी युगमानाचा विचार करावा आणि शहाणपणाने आपले धोरण ठरवावे; ब्रिटनसारखी बलाढ्य साम्राज्यवादी सत्ता आपल्या सार्वभौमत्वाचे उदक हिंदी जनतेच्या हातावर सोडून निजधामास चालली असता परभृत व प्रतिगामी संस्थानिकांनी वस्तु-स्थितीकडे डोळेझाक करून सार्वभौमत्वाचे बिरुद पुन्हा धारण करण्याचा हास्यास्पद प्रयत्न करू नये असे स्पष्टपणे बजावले. काँग्रेसचे अवतारकार्य संपत आले असून सांप्रतच्या सत्तासंक्रमणावस्थेत नव्या मन्वंतराची धूसर छाया दिसू लागली आहे, तिचा सर्वांगीण विचार नव्या वास्तववादी व क्रांतिवादी दृष्टिकोणातून करून त्वरेने बदलत्या परिस्थितीवर आरूढ होण्यातच हिंदी जनतेचे कल्याण आहे. आर्थिक अरिष्टाचे भय वाढते आहे. जर आपण ताबडतोब नव्या पायावर आर्थिक घडी बसविण्याच्या उद्योगाला लागलो

नाही तर स्वतंत्र हिंदी राष्ट्रावर अनपेक्षितरीत्या अत्यंत अरिष्ट कोसळल्याशिवाय राहणार नाही असेही भविष्य त्यांनी वर्तविले.

पण याहीपेक्षा नवलाईची गोष्ट म्हणजे गुजराथच्या आपल्या दौऱ्यात काँग्रेस कार्यकर्त्यांबरोबर चर्चा चालली असता एका प्रश्नाला उत्तर देताना सरदारानी आपण निश्चितपणे भांडवलशाहीविरोधी असल्याची घोषणा केली; काँग्रेस मंत्र्यांना हंगामी सरकारच्या द्वारे फारसे जनहित साधता आले नाही हे त्यांनी मान्य केले व प्रांतिक सरकारवर जर विवेकपूर्ण व जागृत जनमताचे दडपण आणले गेले तर लोकहितकारक काही भरीव सुधारणा होणे शक्य असल्यामुळे जनतेच्या लोकनियुक्त मंत्रिमंडळाला हलविण्याचा मूलभूत हक्क मर्यादित प्रमाणात मान्य केला. काँग्रेस मंत्रिमंडळे लोकमताच्या प्रचंड पाठिंब्यावर अधिकारारूढ झाली असली तरी राज्ययंत्रावर घडलेल्या राजकीय स्थित्यंतराचा अद्याप काहीच परिणाम झालेला नाही. इतकेच नव्हे तर कित्येक काँग्रेस मंत्रीही कित्येक विषयाची व प्रश्नाची बारकाईने छाननी करण्याची तसदी न घेता पुढे आलेल्या कागदावर आंधळेपणाने सही करून मोकळे होतात असा आपला अनुभव असल्याचेही त्यांनी सांगितले.

हिंदी स्वातंत्र्ययुद्धाचे पर्व आता समाप्त झाले. या जनता युद्धात गांधीजींच्यासारख्या कुशल, धोरणी व समयज्ञ अशा सेनानीच्या आधिपत्याखाली आपण बारगीर म्हणून लढलो; गुलामगिरीच्या अवजड शृंखला तोडून स्वातंत्र्यसंगरात अखेर हिंदी जनता यशस्वी झाली असून ब्रिटिश आपल्या साम्राज्याला तिलांजली देऊन महाप्रयाणाच्या उद्योगाला लागले आहेत; हिंदी स्वातंत्र्यसूर्याच्या चिरवांछित उदयाबरोबर प्रजाराज्यपर्वास सुरुवात होत असून पंडित जवाहरलाल नेहरूंसारख्या त्यागी, धैर्यशाली, चतुर व धोरणी अशा नव्या युगाच्या थोर मानकऱ्याच्या व खंद्या लोकनायकाच्या नेतृत्वाखाली यापुढे आपणास नवी घडी बसवावयाची असून तिचे शिलेदार बनण्यासाठी हिंदी युवकांनी अहमहमिकेने पुढे आले पाहिजे व प्रांतिक आणि मध्यवर्ती लोकनियुक्त सरकारच्या अवघड जबाबदाऱ्या अंगावर घेण्याची तयारी व कार्यक्षमता दाखवून नवा हिंदुस्थान घडविण्याच्या उपक्रमाला लागले पाहिजे, असा सामान्यपणे सरदारांच्या भाषणाचा आशय होता.

सरदार पटेलांची वरील अर्थाची वक्तव्ये वाचली की सरदारांची भाषा गेल्या दोन-तीन महिन्यांत इतकी का बदलली असा विचार साहजिकच मनात येतो.

सत्तरीच्या पुढे सरकलेल्या सरदारांना आपल्या वार्धक्याची जाणीव तर त्रस्त करीत नसेल ?

किंवा काँग्रेस दिवसेंदिवस जनमनातून उतरत चालली आहे, बहुजनसमाजाचा आसरा काँग्रेसला खरोखर तुटत चालला आहे; प्रांतिक व मध्यवर्ती काँग्रेस समित्या अधिकाधिक

कमकुवत बनत चालल्या असून सत्ताकेंद्राजवळ जसजशी काँग्रेस जात चालली तसतशा जुन्या सत्ताळू काँग्रेसजनांच्या आकांक्षा व अपेक्षा मोकाट सुटून काँग्रेसांतर्गत यादवी विकोपाला जात आहे हे सुचिन्ह नव्हे हे तर वास्तववादी सरदारांना दिसत नसेल ?

किंवा, पंडित नेहरू व आपण यांच्या मतभिन्नतेचा फायदा घेऊन कित्येक 'अनु-वल्लभां'नी प्रांतोप्रांती जी गटबाजी चालविली आहे त्याचा वीट येऊन त्या सर्वांचे कान एकदा उपटून त्यांच्या हाती देण्याच्या इराद्याने तर नाही ना वल्लभभाईंनी पंडितजींची मुक्तकंठाने प्रशंसा केली व गांधीजींचे वारसदार व स्वतंत्र भारताचे पंचप्राण म्हणून त्यांच्या नेतृत्वास निःसंदिग्ध शब्दात संमती दिली ?

कदाचित काँग्रेसच्या अवतारसमातीचा काळ समीप आला याची जाणीव झाल्याबरोबर त्या काँग्रेसचे गेली वीस वर्षे आधारभूत झालेले नेतृत्वही संपुष्टात येण्याची आवश्यकता उत्पन्न झाली आहे; नव्या दमाच्या, नव्या दृष्टिकोणाच्या व नव्या मनोवृत्तीच्या लोक-नेत्यांच्या हाती राष्ट्राचे सुकाणू जाणे इतिहासक्रमाने अपरिहार्य झाले असून ज्याप्रमाणे ब्रिटिशांनी शिस्तशीरपणे सार्वभौम सत्तासंक्रमण करण्याचा निर्णय घेतला आहे तसाच संभाव्य यादवीमध्ये काँग्रेसांतर्गत नेतृत्वसंक्रमणाचा निर्णय घेणे जरूर झाले आहे असा सरदारजींच्या वक्तव्यांचा अर्थ होण्याजोगा आहे.

कदाचित स्वतंत्र हिंदुस्थानकडे आंतरराष्ट्रीय राजकारणात पौरस्त्य राष्ट्रांचे स्वयंसिद्ध नेतृत्व येत आहे ही गोष्ट एशियन रिलेशन्स कॉन्फरन्सने सिद्ध केली आहे. जागतिक शांतता की यादवी हे ऐतिहासिक आव्हान मानवतेला ग्रासून राहिले आहे. राष्ट्रीय समस्या हिंदी मुत्सद्देगिरीला पराभूत करीत आहे. जगात समाजवादी वारे घोंघावत असून नवसमाजनिर्मिती समाजवादी सिद्धान्ताच्या आधारे केल्याशिवाय मानवी दुःख, दारिद्र्य, दैन्य, दुष्काळ, बेकारी, उपासमार, अन्याय, विषमता, गुलामगिरी, अज्ञान इत्यादी सामाजिक प्रश्न समाधानकारकपणे सोडविता येणार नाहीत असा जो सूर दिल्लीच्या परि-षदेतील सूत्रधारांच्या विचारात ध्वनित झाला त्यामुळे पंडित नेहरू यांना आपले निर्भेळ सहकार्य देणे यातच हिंदुस्थानची सेवा आहे असेही सरदारांचे मत बनणे शक्य आहे.

पण सरदारांच्या आजवरच्या कृतीत व आजच्या उक्तीत दिसत असणारी तफावत कोणाच्या नजरेआड होणे शक्य नाही. ज्या हिंदी तरुणांना संघटित होऊन राज्यधुरा आपल्या खांद्यावर घेण्यास सरदार आज परोपरीने सांगू लागले आहेत, त्या तरुण पिढीचा ते काँग्रेसनिष्ठ असतानाही मनोभंग व तेजोभंग करण्याची एकही संधी सरदारांनी कधी वाया दवडली नाही. तरुण मनाला निसर्गतः जिथे आकर्षण वाटते व जिची आवश्यक-ताही गतेतिहाससिद्ध होती, त्या क्रांतिभावनेची व क्रांतिकारी विचारसरणीची हुर्रे उडविण्याचे व ध्येयवादी तरुणांना दूर लोटून सत्ताळू व संधिसाधू अनुवल्लभांचा गोतावळा जमवून काँग्रेसला विकलांग बनविण्याचे पातकही (अजाणतेपणानेही असेल) पण

सरदारांच्या हातून झाले आहे. आजही प्रांतोप्रांती नवविचाराच्या काँग्रेसनिष्ठ तरुणांना काँग्रेसबाहेर काढून लावण्याचा जोराने प्रयत्न चालू असता, काँग्रेसची घटना आपणांस सोयीस्कर अशी बनवून सर्व पुरोगामी दृष्टीच्या तरुणांना तिच्यात राहून कार्य करणे अशक्य बनविण्याचे डाव खेळले जात असता, किसान-कामगारांच्या वर्गीय प्रश्नांना चालना देणाऱ्या काँग्रेसनिष्ठ तरुण कार्यकर्त्यांना काँग्रेसनिष्ठ मंत्रिमंडळाच्या आदेशानुसार तुरुंगाची हवा दाखविण्याची दृश्ये दिसू लागली असता, त्याबाबतीत काहीच सुधारणा न करण्याची तसदी सरदारांनी न घेतली तर त्यांनी नवयुगाच्या निर्मितीबद्दल व तद्विषयक कर्तव्याबद्दल कितीही नगारे वाजविले तरी त्याचा काहीही उपयोग होणार नाही.

सोशॅलिस्ट विचारांच्या तरुणांकडून उद्या काँग्रेसच्या जुन्या व जड पुढाऱ्यांना विरोध केला जाणे संभवनीय दिसत आहे. पंडित नेहरू विरुद्ध सरदार पटेल अशी दुही जुन्या काँग्रेस नेतृत्वात राहिली तर परिणामी ती समाजवादी राजकारणाच्या दृष्टीने जुन्या नेतृत्वाला बाधकच ठरणे शक्य आहे. अर्थात जर काँग्रेसमधील आपल्या सत्ताळू अनुयायांना सरदारांनी आताच खडसावून आवळून न धरले तर पंडित नेहरूंच्या सारखा सोशॅलिस्ट प्रवृत्तीचा मोहरा नेता करून सोशॅलिस्टांना टोकून काढण्याचाच यामागे हेतू आहे असाच त्यांच्या बोलण्याचा लोक अर्थ लावणार आहेत.

सरदारांच्या म्हणण्यामागील हेतू काहीही असो, नेमस्त समाजवाद्यांना साजेशी का होईना, जी भाषा सरदारांच्या मुखातून ऐकायला येऊ लागली आहे त्यातही समाजवाद्यांनी एक तात्त्विक विजय संपादिला आहे खास. पंडित नेहरूंसारख्या सोशॅलिस्ट विचारसरणीच्या पुढाऱ्याचे नेतृत्व मान्य करणे, कोणत्या का उद्देशाने असो, जर सरदारांना भाग पडले असले तर त्यातही समाजवाद्यांचा नैतिक विजयच आहे. हिंदी तरुणांनी आता राज्ययंत्र चालविण्याची जबाबदारी घेण्यास पुढे यावे अशी जी हाक सरदारांना द्यावी लागत आहे, त्यातही जागृत हिंदी तरुण बहुशः समाजवादी प्रवृत्तीचे असल्यामुळे समाजवादी तरुणांचा लौकिक विजय आहे.

अर्थात राष्ट्रीय क्रांतीचे समाजवादी क्रांतीत रूपांतर करण्यासाठी लागणाऱ्या वर्गीय संघटना देशव्यापक स्वरूपात उभारण्याचे कार्य समाजवाद्यांचेच आहे; त्यांनीच ते अंगिकारले व उभारले पाहिजे. सरदार वल्लभभाईंच्या भाषणातून मिळाले तर प्रोत्साहन, वाटले तर आव्हान लक्षात घेऊन कामाला लागणे व सोशॅलिस्ट चळवळ मजबूत व प्रातिनिधिक करणे हेच सोशॅलिस्टांचे आजचे कर्तव्य आहे.

१८

द्या पाकिस्तान आणि व्हा मोकळे

२७-४-४७

इंग्रज आपले चंबूगबाळे आटोपून ज्या दिवशी हिंदुस्थानातून निघून जातील त्या दिवशी आमची हिंदुमुसलमानांतील तेढ आपसात मिटेल असा आमच्या राष्ट्रातील सुशिक्षित लोकांचा विश्वास होता. आझाद हिंद फौजेतील हिंदुमुसलमानांच्या एकीचा एवढ्याच कारणाकरिता आम्ही आमच्या समोर आदर्श ठेवला होता. इतकेच नव्हे तर आमच्यातील सुशिक्षित व पुरोगामी वृत्तीचे जे तरुण होते त्यांना आपण हिंदू आहोत (म्हणजे हिंदू आईबापांच्या पोटी जन्माला आलो आहोत) याची जाणीवही नव्हती. अर्थात केवळ वैचारिक भूमिकेवरूनच विचार केला तर वरील भूमिका निःसंशय बरोबर होती याची आम्हांस शंका नाही. परंतु श्री. जिना यांच्या अडेलतट्टू धोरणामुळे आज सर्व हिंदुस्थानभर जो एक जातीय वैमनस्याचा डोंब उसळला आहे त्यामुळे वरील शुद्ध वैचारिक भूमिकेची राखरांगोळी झाली असून बचावाच्या दृष्टीने तरी त्या भूमिकेला चिकटून राहणे आत्मघातकीपणाचे होणार आहे. मुसलमान-हिंदुद्वेषाचे बीज हे चर्चिल-सारख्या साम्राज्यशहांच्या कारवायांमुळे आमच्यात शिरले हे निर्विवाद सत्य आहे; आणि आजही चर्चिलसारख्या दुष्ट मनोवृत्तीचे साम्राज्यपिपासू लोक हिंदु-मुसलमानांतील द्वेष वाढविण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण केवळ एवढे म्हटल्याने आमच्या समोर असलेला प्रश्न आम्ही सोडविला असे होत नाही. उलट इंग्रज लोक जाण्याची भाषा बोलू लागताच इंग्रजांच्या वरदानाने मत्त झालेला हा भस्मासुर आता ज्या ज्या गोष्टींबद्दल आम्हाला अभिमान वाटत होता त्या त्या वस्तूंवर हात फिरवून त्या नष्ट करू लागला

आहे आणि आता हा भस्मासुर इंग्रजांनाही आटोपणे कठिण झाले आहे. १६ ऑगस्ट १९४६ च्या पाकिस्तान दिनापासून सुरू झालेल्या या मुस्लिम भस्मासुराच्या गुंडपणाच्या एकेक करामती ऐकल्या म्हणजे मन दुःखाने विदीर्ण झाल्यावाचून राहात नाही.

१६ ऑगस्टला कलकत्त्यात सर्व हिंदूंची आमकत्तल करण्याचा प्रयत्न झाला. पण तो फसला. नोआखलीतील सर्व हिंदूंना हाल हाल करून मारण्याचा, बायकांची अब्रू घेण्याचा प्रयत्न झाला. इतक्यानेच थांबले नाही, तरुण स्त्रियांचे स्तन कापण्यापर्यंत यांची मजल गेली. बिहारमध्ये हिंदूंनी यांचे जे उट्टे काढले त्यामुळे, आणि गांधीजींच्या नोआखलीतील इतिहासप्रसिद्ध दौऱ्यामुळे जिनासाहेब आणि त्यांची लोभी प्रभावळ यांच्या कार्याला थोडासा खंड पडला. पण पुनः ठिकठिकाणी दंगे उकरून काढण्यात आले. पंजाबात दंगे, वायव्य सरहद्द प्रांतात दंगे, युक्त प्रांतात दंगे, मुंबईत दंगे, कलकत्त्यात दंगे, पुनः नोआखलीत दंगे! दंगे नाहीत कोठे? आणि जेथे नाहीत तेथे सुद्धा दंग्याचे वातावरण आहेच. पूर्वी हिंदु-मुसलमानांचे दंगे होत. पण दंगे करण्यात पवित्र असे काही वाटत नसे. पण आता हे सर्व बदलले आहे. दंगे करणे म्हणजे काहीतरी ईश्वरदत्त कार्य करणे होय असे साऱ्यांना वाटू लागले आहे. आमचे प्रतिनिधी नुकतेच कलकत्ता आणि पूर्व बंगालचा दौरा आटोपून आले आहेत. सर्व गोष्टींचे आस्थापूर्वक निरीक्षण केल्यानंतर त्यांना असे दिसून आले आहे की दुसऱ्या जातीच्या लोकांना भोसकणे हे एक पवित्र कार्य आहे असे सुशिक्षितापासून अशिक्षितांपर्यंत बहुतेक सर्व लोक समजावयास लागले आहेत. पूर्ण विचार केल्यानंतर हा दोन राष्ट्रांतील झगडा वाटावयास लागतो. बंगालसारख्या ठिकाणी आपण जाऊन राहिलो तर एका भूमीवरच दोन राष्ट्रे उत्पन्न झाल्याचा आपणास भास होतो.

या दंग्याचा आजचा प्रकार इतका भयंकर आहे की मागच्या ऑगस्टमध्ये कलकत्त्यात झालेल्या हिंदु-मुसलमानांच्या दंगलीत ता. १६, १७, १८ या तीन दिवसांत १२ हजार लोक कापण्यात आले आणि ५०००० जखमी झाले असे म्हणतात. नुकत्याच संपलेल्या महायुद्धात कोणत्याही लढाईत तीन दिवसांत १२००० लोक कामास आल्याचे दिसत नाही, यावरून सध्या सुरू असलेल्या दंगलीचे भीषण स्वरूप कोणाच्याही ध्यानात येईल.

चालू असलेल्या प्रकाराने निडर होऊनच की काय आता लीगतर्फे आसामवर चढाई करण्यात येणार असल्याचे वृत्त आले आहे, हैदराबादचे निझामी संस्थान नष्ट करण्याचे तर बाजूलाच राहिले, पण हैदराबादच्या निझामाचीच बन्हाड पादाक्रांत करण्याची महत्त्वाकांक्षा असल्याचे दिसू लागले आहे. नव्हे, हे पाकिस्तानचे भूत आता ब्रह्मदेशातही शिरले असून ब्रह्मदेशातील मुसलमानांचे एक पाकिस्तान हिन्दी पाकिस्तानला जोडण्याची भाषा जोरात पुढे येत आहे. नुकतेच श्री. जिना आणि महात्मा गांधी यांच्या सहीचे एक पत्रक शांततारक्षणार्थ प्रसिद्ध करण्यात आले. परंतु त्याचा काहीसुद्धा परिणाम झाल्याचे

दिसत नाही. निदान मुसलमानांच्या बाबतीत तरी त्याचा काही परिणाम होणार नव्हता ही गोष्ट पत्रक वाचताच कोणासही सांगता आली असती. उलट पत्रक निघाल्यानंतर गोधात राहणाऱ्या मुसलमान बायासुद्धा पेशावर येथील ऑल इंडिया रेडिओ हाऊसवर चालून जाऊन नासधूस करावयास लागण्याइतक्या बेताल झाल्या आहेत. असो.

आणखी एका गोष्टीचा विचार होणे जरूर आहे. आज हिंदूत आणि मुसलमानांत सुद्धा पूर्ण राष्ट्रीय बाण्याचे अनेक लोक आहेत. पण त्यांना ही भूमिका कुटपर्यंत टिकविता येईल हा प्रश्नच आहे. मी कितीही राष्ट्रीय वृत्तीचा असलो तरी जोपर्यंत माझा जीव हा दुसऱ्यावर अवलंबून आहे तोपर्यंत दुसरा मनुष्य हा राष्ट्रीय वृत्तीचा नसला तर माझ्या राष्ट्रीय वृत्तीला काही किंमतच उरत नाही. माझ्या राष्ट्रीय वृत्तीचा परिणाम केवळ दुसऱ्याच्या सुऱ्याला बळी पडण्यात होण्याचाच अधिक संभव आहे. अशा स्थितीत संशयाचे वातावरण सर्वत्र पसरले असता निर्मळ राष्ट्रीयतेचे त्यात विसर्जन न झाले तरच नवल. आजच्या दंग्यात अनेक निरपराधी लोक निष्कारण बळी पडत आहेत याचे कारण हे नव्हे की ते स्वतः अराष्ट्रीय आहेत; त्यांना अराष्ट्रीय वातावरणात वावरावे लागते हेच त्याचे खरे कारण होय. निव्वळ बाह्यस्वरूपावरून कोणता मनुष्य कसा आहे हे ओळखता येत नाही आणि जातीयतेचे संशयी वातावरण सर्वत्र पसरले असता त्याच्या बाह्य-रूपावरूनच स्वतःच्या रक्षणाकरिता दुसऱ्यावर हल्ला करावयास जाईपर्यंत पाळी येते. आजच्या अशा परिस्थितीत एखादा हिंदू मनुष्य तो कितीही राष्ट्रीय असला तरी मुसलमान वस्तीत उतरणार नाही, आणि कितीही राष्ट्रीय वृत्तीचा मुसलमान असला तरी, संरक्षण घेतल्यावाचून हिंदू वस्तीत येणार नाही.

या परिस्थितीतून बाहेर पडण्याचा मार्ग कोणता? एकराष्ट्रीयत्वाची कल्पना ही पुष्कळ अंशी मानसिक आहे. आजपर्यंत आपण हिंदुस्थानला एक राष्ट्र समजत आलो आणि हिंदू व मुसलमान हे भिन्नधर्मीय असूनही त्यांना एका राष्ट्राचे घटक समजत आलो याचे कारण पुष्कळ अंशी दोन्ही जमाती आपण एका राष्ट्राचे घटक आहोत असे समजत होत्या. कोणत्याही कारणामुळे असो, आमच्या दुर्दैवाने ही परिस्थिती बदलली आहे. ज्याप्रमाणे कुटुंबातून विभक्त व्हावयाचे म्हटले तर कुटुंबातील एखाद्या उनाड घटकाला ओढून ताणून कुटुंबात ठेवता येत नाही, त्याचप्रमाणे मुसलमानांनी आपल्याकरिता स्वतंत्र राष्ट्राचाच हट्ट धरला तर त्यांना रोखून ठेवता येणार नाही. जड अंतःकरणाने का होईना पण आपणास त्यांना संमती देणे भाग आहे. अशा स्थितीत मुसलमानांना पाकिस्तान पाहिजे आहे ना, देऊन टाका पाकिस्तान त्यांना आणि व्हा मोकळे, हाच आजच्या परिस्थितीतून निघण्याचा खरा मार्ग असावयास पाहिजे.

पण हाही मार्ग सुकर होईल की नाही याची शंका आहे आणि त्याचे कारण पाकिस्तानी लीगी मुसलमानांना केवळ पाकिस्तानच नको आहे तर दुसऱ्या जमातीवर

कुरघोडीच करावयाची आहे. पण अशा रीतीने ते कुरघोडीच करावयाचा प्रयत्न करतील तर सरदार वल्लभभाई पटेल यांच्या शब्दात सांगावयाचे म्हणजे जरूर तर तरवारीनेही त्यांना उत्तर देणे भाग पडेल, आणि त्यासाठी आपण तयार असावयास पाहिजे. नुकताच बंगाल आणि पंजाब यांच्या फाळणीचा प्रश्न जोरात पुढे येऊ लागला आहे, 'अमृत-बझार पत्रिके'ने केलेला 'गॅलॉप पोल' मध्ये शेकडा ९८ लोकांनी फाळणीच्या बाजूने मत दिले यावरून आज बंगालचे लोक मुसलमानांना पूर्व बंगाल द्यावयास तयार झाले आहेत असे दिसते. तसेच पंजाबचा, मुसलमानी बहुसंख्या असलेला प्रदेश आणि सिंध व वायव्य सरहद्द प्रांत सुद्धा मुसलमानांना देऊन टाकण्यास हरकत असू नये. पाहिजे तर या मुसलमानी मुलखात काँग्रेसने आपला राष्ट्रीय पक्ष वाढविण्याचा प्रयत्न करावा, पण आता हा जातीय प्रश्न सोडविण्याची दिरंगाई करू नये. मात्र मुसलमानांनी यापेक्षा कोणताही अधिक भाग मागितला तर त्यांचा नक्षा ताबडतोब उतरविला पाहिजे. हाच आजच्या परिस्थितीत वास्तववाची मार्ग आहे. तो आपण अवलंबला नाही तर भ्रमाच्या भोपळ्याची मोट बांधण्यातच आपल्याला समाधान मानावे लागेल!

१९

फाळणी आणि समाजवाद

४-७-४७

आमच्या मागील अग्रलेखात आज देशभर भडकलेल्या जातीय प्रश्नावर आम्ही आपल्या परीने एक उपाय सुचविला होता. मुसलमान बहुसंख्य वस्तीचा पूर्व बंगाल आणि पश्चिम पंजाबचा प्रदेश मुसलमान जनतेच्या स्वाधीन करून देणे, आणि अखंड भारतात सामील व्हावयाचे की नाही हे त्यांच्यावरच सोपविणे हा तो उपाय होता. आजच्या परिस्थितीत निर्भेळ राष्ट्रीय भूमिका टिकविणे अशक्यप्राय असल्यामुळेच आम्ही हा उपाय सुचविला होता. अर्थात हा उपाय सुचविताना आमची मूळची समाजवादी आणि राष्ट्रीय भूमिका सोडून देऊन आता आम्ही अराष्ट्रीय, जातीय आणि आकुंचित दृष्टिकोणातून या प्रश्नाकडे पाहावयास लागलो असे कोणीही समजू नये. परंतु आज आमच्या समोर उपस्थित झालेला प्रश्न जातीय असल्यामुळे राष्ट्रीय दृष्टिकोणातून हा प्रश्न सोडवीत असतानासुद्धा या प्रश्नाचे जातीय स्वरूप पूर्णतया नष्ट होणे शक्य नाही हेही प्रत्येकाने ध्यानात घ्यावयास पाहिजे.

जातीय प्रश्न सोडविण्यात दिरंगाई करू नये, असे आम्ही म्हणतो त्याचे कारण तरी हेच आहे की शक्य तितक्या लवकर आजच्या जातीय प्रश्नापेक्षाही अधिक महत्त्वाचे प्रश्न आपणांस सोडवावयाचे आहेत. जातीय प्रश्न हा सर्वसामान्य समाजनियमांनुसार उत्पन्न होणारा प्रश्न नाही. तो प्रत्येक देशात उत्पन्न होत नाही, तो प्रत्येक भूमीत फोफावत नाही. या जातीय प्रश्नाचा वृक्ष आपल्याच येथे रुजला आणि त्याने आपल्या प्रगतीत विघ्न आणले याचे कारण म्हणजे मुसलमानांच्या जिनाछाप पुढाऱ्यांची प्रतिगामी वृत्ती.

जनता या पुरोगामी पुढाऱ्यांच्या जितकी आहारी जाईल तितका ह्या जातीय प्रश्नासारख्या मुद्दाम उकरून काढलेल्या प्रश्नांचा आगडोंब अधिक उसळेल आणि त्यामुळे ज्यावर समाजाची घडी किंवा हित-अहित अवलंबून आहेत अशा खऱ्या सामाजिक प्रश्नांना ग्रहण लागेल आणि हे खरे सामाजिक आणि आर्थिक प्रश्न सोडवण्यात आपण जितकी दिरंगाई करू तितका नवसमाजाचे आपले स्वप्न प्रत्यक्षात येण्यास वेळ लागेल असे हे दुष्ट वर्तुळ आहे. या दुष्ट वर्तुळातून बाहेर यावयाचे असेल तर आतापर्यंत आपल्या हृदयाशी बाळगलेल्या, प्रेमाने सांभाळलेल्या गोजिरवाण्या पण निर्माल्य झालेल्या मूल्यांचे एक घाव दोन तुकडे करून, आणि या दुष्ट वर्तुळाचा वेध करूनच आपला प्रगतीचा मार्ग आखणे क्रमप्राप्त आहे.

पाकिस्तान आणि प्रांतांची फाळणी मान्य केल्याने जिकडे तिकडे एकदम आबादी-आबाद होऊन रामराज्याची ध्वजा फडकेल असे आम्हास वाटते असे कोणीही समजू नये. उलट संकटांचे डोंगर पुढे अधिकाधिक उंच होत जात आहेत याची आम्हांस जाणीव आहे. पण ही शेवटची चढण एकदा ओलांडल्यानंतरच आपल्याला मजूर-प्रजा-राज्याचे दर्शन होणार असल्यामुळे आज धूमकेतूसारखा एकाएकी उत्पन्न झालेला हा जातीय प्रश्न, ही राष्ट्राला लागलेली कीड, हा जातीय रोगाचा कॅन्सर कापून टाकणे अगत्याचे आहे.

जून ४८ मध्ये आमचे राज्यकर्ते आमच्या हाती राष्ट्राचे भवितव्य सोपवून प्रस्थान करणार आहेत. ते येथून जाताच किसान-मजुरांचे खरेखुरे राज्य स्थापन होणे अशक्य आहे. आमच्या राष्ट्रातील भांडवलशहा, गरिबांच्या श्रमावर स्वतःच्या संपत्तीत कोट्यवधी रुपयांची भर टाकून गरीब जनतेचे शोषण करावयास कमी न करणारे व्यापारी हुकूम-शहा, आपल्या हाती सत्ता ठेवण्याचा प्रयत्न केल्यावाचून राहणार नाहीत. या भांडवल-शहांना स्वतःची जात नाही. हिंदू असो की मुसलमान असो, भांडवलशहा असणे हीच त्यांची जात आणि दुसऱ्यांचे शोषण करून स्वतःचे धन वाढविणे हाच त्यांचा धर्म. स्वतःच्या पोळीवर तूप ओढण्याकरिता जातीय प्रश्नांचा भस्मासुर हे सहजच उत्पन्न करू शकतात, नव्हे असा भस्मासुर उत्पन्न करण्याइतके उदारधन हे लोक आहेत हे विसरून चालणार नाही. कलकत्ता येथे नुकताच झालेला दंगा, हिंदू आणि मुसलमान ट्रॅमवे-काम-गारांची भरीव एकजूट धर्माच्या नावाखाली तोडून त्यांच्यात फूट पाडण्याकरिता भांडवल-शहा व त्यांच्याच हाताला हात लावून 'मम' म्हणणारे सरंजामी लीगी सरकार यांनी उत्पन्न केला होता असे प्रामाणिक बंगाली नागरिकांचे मत आहे. अशा स्थितीत जातीय प्रश्न आपण तडकाफडकी न सोडविला तर जातीय प्रश्नाचा हैदोस असाच कायम ठेवून जागृत झालेल्या किसान-कामगारांच्या प्रश्नास बगल देणे आमच्या भांडवलदारवर्गास सोयीचे होईल. हिंदुस्थानच्या भवितव्याचा, आणि नवसमाजनिर्माण करण्याच्या दृष्टीने

किसान-कामगारांची वर्गीय संघटना करून शासनसत्ता त्या वर्गाच्या हातात आणून देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. परंतु जोपर्यंत हा जातीय प्रश्न सुटत नाही, तोपर्यंत किसान-कामगार सत्ताग्रहणाच्या प्रश्नास ग्रहणच लागले आहे असे म्हणणे भाग आहे. कारण नाही म्हटले तरी अशिक्षित जनतेच्या मनात धर्माविषयी आस्था आहे आणि मुसलमान समाज तर बोलूनचालूनच धर्मवेडा आहे. अशा स्थितीत धर्मरक्षणाचे खूळ त्यांच्या डोक्यात भरवून त्यांच्याकडून जबरदस्तीने परस्परांना दहशत बसविणे कठीण काम नाही. उदाहरण म्हणून बंगालचेच घेता येईल. आज बंगालमध्ये कायमधारा (Permanent Settlement) पद्धती अस्तित्वात आहे. ही पद्धती सामान्य किसानाच्या दृष्टीने अत्यंत अन्याय्य आहे. ही पद्धती नष्ट करण्याकरिता बंगालमध्ये चळवळ व्हावयास पाहिजे हे निर्विवाद आहे. या चळवळीमध्ये हिंदू किसान आणि मुसलमान किसान सामील होऊन त्यांनी तेथील जमीनदारांविरुद्ध बंड करावयास पाहिजे. मग जमीनदार हिंदू असो वा मुसलमान असो आणि आज बंगालच्या काही भागामध्ये चाललेल्या तिभागा चळवळीमधे हिंदु-मुसलमानांची एकजूट दिसतेही. परंतु धर्माच्या नावाखाली ही एकजूट फोडणे कठीण होणार नाही. नव्हे, बंगालच्या इतर भागामधे चाललेल्या जातीय वैमनस्याने ही चळवळ मलीन न झाली तरच आश्चर्य ! या उलट जर मुसलमानांना बंगाल व पंजाबचा बहुसंख्य असलेला भाग देऊन टाकला तर तावडतोब त्या मुसलमान राष्ट्रात किसान-कामगारांचा प्रश्न जोर केल्यावाचून राहणार नाही. इस्पहानीसारखे मुसलमान भांडवलशहा मुसलमान जनतेचे शोषण करीत नाहीत असे थोडेच आहे ? तसेच आपले धर्मबंधू म्हणून मुसलमान जनतासुद्धा मुसलमान भांडवलशहांचे शोषण सहन करील असेही म्हणणे चूक आहे. जी गोष्ट मुसलमानांच्या पाकिस्तानात होईल तीच गोष्ट हिंदूंच्या हिंदुराष्ट्रात होईल आणि हिंदुमुसलमानांतील धर्मद्वेषाचे बीज असलेला प्रश्नच नाहीसा झाल्याने कोणासही वर्गीय लढ्यांना जातीय स्वरूप देता न येऊन किसान-मजुरांना आपले राज्य कायम करणे सोपे जाईल. याच कारणामुळे वरपांगी जातीय दिसणाऱ्या या प्रश्नाचा उलगडा बंगाल-पंजाबची फाळणी करून मुसलमान बहुसंख्य असलेला प्रदेश मुसलमान जनतेच्या स्वाधीन केल्यानेच होणार आहे.

परस्परविद्वेषाच्या भावनेने आज आम्हाला इतके पछाडले आहे की, आम्हाला आमच्या दैनंदिन आर्थिक आपत्तीचे कारण सध्याची अन्यायमूलक विषम समाजरचना आहे, याचा पूर्णतया विसर पडला आहे. चुकीने पण अत्यंत निष्ठेने दुसरी जमात हीच आमच्या परवशतेचे कारण आहे असे आम्ही समजून चालतो आणि असे समजणे हे भांडवलशहांच्या आणि धर्मपंडितांच्या दृष्टीने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे फायद्याचेही आहे. तेव्हा प्रांताची फाळणी केल्याने धर्मद्वेषाच्या नावाखाली स्वतःच्याच धर्माच्या हजारो किसान-मजुरांचे शोषण करणाऱ्यांजवळचे एक अमोघ शस्त्र आपण हिसकावून घेतल्या-

सारखे होणार आहे. हे शस्त्र हिसकावून घेतल्याबरोबर किसान-कामगार समाजवादी संघटनेत संघटित झाल्याबाचून राहणार नाहीत आणि समाजवादी संघटनेत त्यांना खरे शिक्षण मिळाल्यानंतर धर्माच्या खोट्या नावाखाली त्यांना कोण लुबाडू शकणार आहे ?

समाजवाद्याने वस्तुनिष्ठ असले पाहिजे. नुसते ध्येयवादी असून चालणार नाही. आपले ध्येय दृष्टीसमोर ठेवून मार्गातील काटे साफ करीतच आपण आपला मार्ग चोखाळला पाहिजे. नाहीतर ध्येय कायमचेच दूर राहून ते कधीच साध्य करिता येणार नाही.

२०

सरकारी शाळांचा उपयोग बहुजन समाजाला होऊ द्या !

११-५-४७

किसान-कामगारांचे राज्य आम्हालाच पाहिजे आहे असे नाही तर काँग्रेसलाही पाहिजे आहे; आणि आज अस्तित्वात असलेली मंत्रिमंडळे काँग्रेसची असल्यामुळे 'किसान-मजदूर प्रजाराज्य' आणण्याचा प्रयत्न करणे, निदान किसान-कामगारांच्या सुख-सोयींची कदर करण्याचा प्रयत्न करणे हे काँग्रेस मंत्रिमंडळाचे कर्तव्य झाले आहे.

जून ४८ मध्ये आमचे राज्यकर्ते हिंदुस्थान सोडून जाण्याची भाषा बोलावयास लागले आहेत. ते जातील किंवा त्यांना जावे लागेल असे आपण धरून चालावयास हरकत नाही. ते गेल्यानंतर आम्ही येथे जी राज्यव्यवस्था निर्माण करू तिचे स्वरूप लोकशाहीचेच राहणार आहे. या लोकशाही राज्यव्यवस्थेची घटनाही तयार करण्याचे काम आता सुरू झाले आहे.

लोकशाही म्हणजे जनतेचे राज्य. लोकशाही म्हणजे बहुजन समाजाचे राज्य. अल्पसंख्य लोकांनी आपल्या शक्तीच्या किंवा बुद्धीच्या जोरावर बहुसंख्य लोकांना गुलामगिरीच्या पाशात अडकवून ठेवणे म्हणजे लोकशाही नव्हे. बुद्धिजीवी लोक जर खरोखर प्रामाणिक आणि लोकशाहीचे खरे प्रवर्तक आणि समर्थक असतील तर अज्ञ, अशिक्षित आणि मागासलेल्या जनतेला सुशिक्षित करून, लोकशाहीचे खरे रहस्य त्यांना समजावून सांगून राज्याचा किंवा समाजाचा शकट हाकण्याची जबाबदारी मूठभर लोकांकडे न ठेवता सर्व समाजावर सोपवतील.

मूल सज्ञान होण्यास ज्याप्रमाणे आपण कायद्याने त्याचे अठरा वर्षांचे होणे ही मर्यादा

मान्य केली आहे, त्याप्रमाणे सर्व समाजास सज्ञान करण्याची आपण काही कालमर्यादा आखली पाहिजे. यालाच योजना म्हणतात. बहुजन समाजाला 'सज्ञान' करण्याकरिता एक सर्वांगीण योजना आखण्याची आज वेळ आहे, पण आम्ही योजना आखण्यात कुचराई केली आणि बहुजन समाज अशिक्षित राहिला तर आम्ही जन्मभर त्यांचे विश्वस्त राहू किंवा त्यांना गुलामगिरीत ठेवू असे म्हणणे अन्यायमूलक होईल.

बहुजन समाजाला सुशिक्षित करण्याकरिता, शिक्षण, कमीत कमी प्राथमिक आणि दुय्यम शिक्षण हे सक्तीचे आणि मोफत असावयास पाहिजे. कदाचित आमच्या दारिद्र्यामुळे आमच्या सरकारला हे आज शक्य होणार नाही. आणि जे शक्य नाही त्याचा आग्रहही धरण्यात अर्थ नाही. पण ज्या बहुजन समाजातील लोकांना आपल्या मुलांना शिकविण्याची इच्छा आहे, त्यांना तर मुलांच्या शिक्षणाकरिता संस्था असल्या पाहिजेत ना ? आमचे मित्र डॉ. भिंगारे म्हणतात त्याप्रमाणे श्रीमन्त आणि पांढरपेशा वर्गातील मुलांना सरकारी शाळेत प्रवेश न मिळाला तर त्यांना स्वतःच्या शिक्षणसंस्था उत्पन्न करिता येतील. पण बहुजन समाजाचे मात्र तसे होणार नाही. बहुजन समाजातील मुले शिक्षणास आंचवल्यावाचून राहणार नाहीत.

आज सरकारी शाळेत अत्यंत हुषार मुलांवाचून इतरांना प्रवेश मिळत नाही, तसेच फारच थोड्या मुलांना शाळेत दाखल करून घेण्यात येते. पण सर्व समाजालाच सुशिक्षित करण्याचे व्रत आपणास जेथे घ्यावयाचे आहे तेथे ही जुनी कसोटी उपयोगी पडेल असे समजणे बरोबर होणार नाही. टराबीक मुलांनाच प्रवेश द्यावयाचा, हुषार मुलांनाच प्रवेश द्यावयाचा असे म्हटले तर आजपर्यंत पिढ्यान् पिढ्या अशिक्षित राहिलेल्या वर्गातील मुले श्रीमंत आणि पांढरपेशा वर्गातील मुलांची कशी बरोबरी करणार ? म्हणजे बहुजन समाजातील मुलांना अशिक्षित राहणे भाग आहे.

सरकारी शाळांतील प्रवेशावर मर्यादाच घालावयाची असेल, तर सरकारी शाळा प्रथम बहुजन समाजातील मुलांकरिताच खुल्या झाल्या पाहिजेत. सरकार ज्यांच्यावर करांचे जास्तीत जास्त ओझे लादते त्या वर्गालाच सरकारी सोयींचा प्रथम उपयोग झाला पाहिजे. श्रीमंत आणि पांढरपेशा वर्गातील मुले ही अशिक्षित राहणार नाहीत. त्यांच्या मुलांच्या शिक्षणाकरिता स्वतंत्र संस्था आपोआप निर्माण होतील. किसानमजदूर प्रजाराज्य स्थापन करण्याच्या दृष्टीने सरकारने प्रथम बहुजन समाजाचाच विचार करावयास पाहिजे. नाहीतर आपल्या कर्तव्यास ते चुकले असे सिद्ध होईल.

२१

पंचवार्षिक योजना समित्या निर्माण करा !

२५-५-४७

आमच्या मागील एका अग्रलेखात सर्वांगीण पंचवार्षिक योजना आखण्याची वेळ आता आली आहे असे आम्ही प्रतिपादन केले होते. इंग्रजांचे येथून उच्चाटण झाल्याबरोबर आपले हात स्वर्गास पोचतील आणि रामराज्याचे दर्शन आपणास घडेल असे समजणे चूक आहे ही गोष्ट कोणताही सुज्ञ माणूस कबूल करील. अशा स्थितीत राष्ट्राच्या पुनर्रचनेच्या कामास आपण आजपासूनच सुरुवात करावयास पाहिजे. या पुनर्रचनेच्या कार्याची जबाबदारी जितकी आजच्या प्रांतिक आणि राष्ट्रीय सरकारवर आहे तितकीच ती हिंदी नागरिकांवर आहे ही गोष्ट विसरून चालणार नाही.

या दृष्टीने आमच्या प्रांतिक सरकारने युद्धोत्तर पुनर्घटनेच्या कामास तातडीने हात घातला आणि प्रांतात औद्योगिक सुधारणा करण्याच्या कामी ६३ कोटी रुपये खर्च करावयाचे ठरविले. याबद्दल मध्यप्रांतीय सरकार निःसंशय अभिनंदनास पात्र आहे. पण प्रांताच्या पुनर्रचनेच्या दृष्टीने ५ वर्षांत ६३ कोटी रुपये खर्च केल्याने विशेष प्रगती होईल असे आम्हास वाटत नसल्याने आणि ६३ कोटी रुपयांपेक्षा अधिक पैसे खर्च करणे आपल्या प्रांतासारख्या गरीब प्रांताला शक्य नसल्यामुळे सरकारच्या पंचवार्षिक योजनेत अनेक गोष्टी नाहीत याबद्दल आम्ही सरकारला दोष लावणार नाही.

पण असे जरी असले तरी जेव्हा आम्ही पंचवार्षिक योजनेचा विचार करतो तेव्हा आमच्या प्रांतात किती नवीन गिरण्या निघाल्या, पंचवार्षिक योजना यशस्वी करण्याकरिता लक्ष पगाराच्या किती लोकांची वर्णी सरकारी अधिकारावर लागली, किती ठिकाणी

वीज उत्पन्न करण्याचे कारखाने निवाले इत्यादी गोष्टींची आम्हांस विशेष फिकीर नसते. आमची पंचवार्षिक योजना ही सर्वसामान्य हिंदी जनतेचे जीवनमान (Standard of living) वाढविण्याकरिता त्यांना पोटभर अन्न आणि अंगभर वस्त्र मिळवून देण्याकरिता, त्यांना साक्षर आणि सज्ञान बनविण्याकरिता, त्यांना त्यांच्या नागरिकत्वाची जाणीव करून देण्याकरिता, थोडक्यात सामान्य माणसाला आवश्यक असलेल्या सर्व सुखसोयी त्यांना मिळवून देण्याकरिता - असावयास पाहिजे असे आमचे मत आहे. वरील ध्येय डोळ्यांसमोर ठेवून जर आम्ही योजना आखली नाही तर त्या योजनेचा उपयोग सर्वसामान्य नागरिकाला होण्याऐवजी काही संपन्न भांडवलशहांनाच होण्याचा संभव आहे. तेव्हा प्रांतीय सरकारने आखलेल्या योजनांचा जास्तीत जास्त उपयोग आपल्या सुखसोयीकडे करून घेण्याचा प्रयत्न जनतेने करावयास पाहिजे असे आम्ही त्यांच्या निदर्शनास आणू इच्छितो.

सरकारी पंचवार्षिक योजनेचा उपयोग आपल्या हिताकरिता जनतेला करून घ्यावयाचा असेल तर सरकारी पंचवार्षिक योजनेप्रमाणेच सरकारी योजनेस सहाय्यभूत होणारी अशी योजना जनतेने प्रत्येक तालुक्यातालुक्यातून आखावयास पाहिजे. सरकारला जनतेचे कितीही हित करावयाची इच्छा असली तरी आजच्या आर्थिक परिस्थितीत सरकारच्या वाट्यास आलेल्या ६३ कोटी रुपयांत जनतेची उन्नती ती काय होणार ? ६३ कोटी रुपयांत सरकारला कारखानेही काढावयाचे आहेत, शिक्षणावरही त्यांना खर्च करावयाचा आहे, जंगलखाते आणि शेतकीखाते यांनाही या पुनर्रचनेच्या बजेटमधून वाटा द्यावयाचा आहे. यातूनच सडका आणि पूल वगैरेही बांधावयाचे आहेत, आणि हा सर्व खर्च मध्यप्रांतासारख्या अवाढव्य पसरलेल्या १९ जिल्ह्यांच्या प्रांतात होणार आहे. त्यामुळे आपली उन्नती करावयास जनतेचे सरकार आहेच, आपण आपली काळजी वाहण्याची जरुरी नाही अशा समजुतीत आपण राहिलो, तर आपली हानी होणार आहे. कारण येवढ्या पैशांत जनतेची सर्वांगीण उन्नती होणे शक्य नाही.

बरे, सरकारला सुद्धा आजच्या वित्तप्रधान जगात जनतेच्या सर्वांगीण प्रगतीची योजना आखणे शक्य आहे काय ? प्रत्येक प्रामाणिक माणूस याचे उत्तर 'नाही' असेच देईल. कारण सरकारने योजनेवर अधिक पैसा खर्च करावयाचे ठरविले तरी सरकार हा पैसा कोठून आणणार ? जनतेने कराच्या रूपाने दिलेल्या पैशाच्या भरवशावरच कोणतेही सरकार किंवा शासनसंस्था आपला कारभार हाकत असते, आणि पंचवार्षिक योजनेवर अधिक पैसा खर्च करावयाचा, याचा सरळ अर्थच असा की जनतेला कराच्या ओझ्याखाली अधिक दडपावयाचे आणि तेही आज इष्ट नाही. तेव्हा आजची सरकारची पंचवार्षिक योजना ही जनतेच्या स्वयंप्रेरित प्रेरणेनेच अंमलात आणून यशस्वी करावयास पाहिजे.

जनतेच्या हिताकरिताच आपणास पंचवार्षिक योजनेची आवश्यकता असल्यामुळे ही

योजना यशस्वी करण्यात जनतेचीही मदत पाहिजे हे निर्विवाद आहे. याकरिताच सरकारी पंचवार्षिक योजनेप्रमाणेच प्रत्येक तालुक्यातालुक्यातून काँग्रेस कमिटीने किंवा जनतेच्या एखाद्या प्रातिनिधिक संस्थेने आपल्या तालुक्याची योजना आखण्याकरिता आणि ती अंमलात आणण्याकरिता आजपासूनच बद्धपरिकर झाले पाहिजे. ज्याप्रमाणे पुष्कळशा दुधात थोडेसे दही घातल्याने ते विरजते, त्याप्रमाणे सरकारी योजनेकडे आपण केवळ दह्याच्या दृष्टीनेच पाहावयास पाहिजे. आमच्याजवळ आमच्या तपशीलवार योजनेचे दूध तयार असेल तरच सरकारी योजनेचे दही त्यात पडताच सर्वत्र दही झालेले दिसेल. उलट जर आमच्याच जवळ आमच्या उन्नतीची योजना नसेल तर पाण्यात पडलेल्या दह्याप्रमाणे सरकारी योजना कुचकामाची ठरेल. आज प्रत्येक तहसिलीत राष्ट्रीय संपत्ती (National Wealth) विपुल आहे आणि जनतेजवळ श्रमाचे बलही अफाट आहे. तेव्हा जनतेने मनात आणले तर निष्कांचन असतानासुद्धा या दोन शक्तींच्या जोरावर आपल्या राष्ट्रास संपन्न राष्ट्र सहज बनविता येईल.

त्याकरिता, प्रत्येक तालुक्याने सरकारी पंचवार्षिक योजनेचा फायदा घेऊन आपली पंचवार्षिक योजना आखली पाहिजे आणि कायदेमंडळातील लोकप्रतिनिधी आणि काँग्रेस कमिटी यांच्या मदतीने पंचवार्षिक योजना-समित्या निर्माण केल्या पाहिजेत व सरकारला सांगितले पाहिजे की, तालुक्यांची पुनर्घटना ही सरकार आणि जनतेने उत्पन्न केलेली 'पंचवार्षिक योजना समिती' या दोहोंच्याही सहकार्याने आणि लोकशाहीच्या तत्त्वानुसार होईल. असे केल्यानेच जनतेच्या सरकारने आखलेली पंचवार्षिक योजना ही जनताभिमुख होईल. नाहीतर प्रतिगामी नोकरशाहीच्या हातात सरकारी पंचवार्षिक योजनेचे खोबरे होण्याची वेळ येईल.

२२

युद्धोत्तरकालीन रेल्वे-सुधारणा

१–६–४७

रेल्वे-वाहतुकीच्या अडचणीपायी युद्धकाळात हिंदी जनतेला सोसाव्या लागणाऱ्या त्रासाचे परिमार्जन करण्याकरिता हिंदुस्थान सरकारने युद्धोत्तरकालात आगगाडीत अनेक सुखसोयी करण्याचे मधाचे बोट हिंदी जनतेला दाखविले होते. हे आमिष प्रत्यक्षात आणण्याकरिता म्हणून हिंदुस्थान सरकारने युद्धोत्तरकालीन आगगाडीचे एक धावते प्रदर्शन सर्व हिंदुस्थानभर चालविले असून गेल्या आठवड्यात या 'प्रदर्शनी' आगगाडीचा मोर्चा नागपूरवरही वळला होता. नागपुरातील अनेक नागरिक, हिंदुस्थान सरकारने आपले सर्व कसब ओतून तयार केलेली आगगाडी पाहण्यास गेले. नव्या आगगाडीचे चकचकीत डबे पाहून आणि डोळ्यांना बाधक न होणारे आगगाडीतील प्रकाशदीप पाहून अनेकांनी संतोष व्यक्त केला आणि अनेक वर्तमानपत्रांनी मुक्तकंठाने आगगाडीची स्तुती केली. दुर्दैवाने आगगाडीच्या डब्यात कोणत्या सोयी करण्यात आल्या आहेत आणि कोणत्या नाहीत, पण करावयास पाहिजे याचे विवेचन करण्याची गरज मात्र कोणालाच भासली नाही. कोणतीही नवीन गोष्ट दिसली की तिची स्तुती करावयाची हा माणसाचा स्वभावधर्मच आहे; पण गाडीत बसून प्रवास करावयाचा झाला म्हणजे डब्यातील अडचणी कळू लागतात. या दृष्टीने या नव्या युद्धोत्तरकालीन आगगाडीत काय सोयी-गैरसोयी आहेत याचा खालील लेखात विचार करावयाचा ठरविले आहे.

आम्ही जेव्हा जनतेकरिता भरपूर सुखसोयी असलेली ही आगगाडी पाहावयास

गेलो, तेव्हा आम्हास या आगगाडीत तिसऱ्या वर्गापेक्षा दुसऱ्या व पहिल्या वर्गाच्याच डब्यांचा भरणा अधिक दिसून आला. परंतु रेल्वे-सुधारणाबद्दल बोलताना सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने विचार करावयास पाहिजे. पहिल्या-दुसऱ्या वर्गाने प्रवास करणाऱ्या दहापाच श्रीमंतांना किंवा सरकारी अधिकाऱ्यांना दहापाच सोयी अधिक झाल्या काय किंवा कमी झाल्या काय, त्यामुळे समाजाचे नुकसान होईल असे आम्हास वाटत नाही. शिवाय थोडयाच दिवसांत विमानाची वाहतूक सर्वत्र सुरू झाल्यानंतर वरच्या वर्गाने प्रवास करणारे लोक विमानाने प्रवास करावयास लागतील आणि मग पहिल्या व दुसऱ्या वर्गातील डब्यांतील सुखसोयींना विशेष अर्थ उरणार नाही. जवळचा प्रवास करणारे प्रवासी अर्थात आगगाडीनेच प्रवास करण्याचा संभव आहे, पण त्याकरिता फार्जील सुखसोयी करण्यात विशेष अर्थ नाही असे आमचे मत आहे.

तेव्हा रेल्वे-सुधारणांचा विचार करिताना सामान्य जनतेच्या दृष्टीने पण अधिक खोलात जाऊन आपण विचार करावयास पाहिजे.

प्रथमतः आपण ही गोष्ट ध्यानात घ्यावयास पाहिजे की, रेल्वेचे प्रवासी हे दोन जातीचे असतात : (१) लांबचा प्रवास करणारे आणि (२) जवळचा प्रवास करणारे. तिसऱ्या वर्गाचे प्रवासी झाले तरी लांबच्या प्रवाशांना प्रवासाच्या विशेष सुखसोयी पाहिजेतच. विशेषतः झोपण्याची आणि संडासाची व्यवस्था ही त्यांच्याकरिता चांगली असावयास पाहिजेच. याकरिता आजच्या दुसऱ्या आणि पहिल्या वर्गातील प्रवाशांप्रमाणेच त्यांना आपली जागा (बर्थ) 'रिझर्व' करिता आली पाहिजे. बाकांना गादी लावण्यापेक्षा रात्रीच्या प्रवाशांना झोपण्यास जागा असणे अधिक आवश्यक आहे. आज आगगाडीत लांबचे प्रवासी आणि जवळचे प्रवासी असा भेद करण्यात न आल्यामुळे मालगाडीत माल भरावा त्याप्रमाणे प्रवासी भरण्यात येतात.

जी गोष्ट झोपण्याच्या जागेची, तीच गोष्ट संडासाची आहे. संडासाचा उपयोग कसा करावा हीही गोष्ट अनेक प्रवाशांना माहीत नसते हे खरे आहे. पण पुष्कळदा गणिताचे मोजमाप घेऊन आणि स्थापत्यशास्त्रातील सर्व कौशल्य खर्ची घालूनच तिसऱ्या वर्गातील संडास तयार करण्यात येत असतात. नागपुरात तरी प्रदर्शनात आणलेल्या आगगाडीचा संडास असा होता. त्यामुळे संडास स्वच्छ राहात नाहीत, सामान्य प्रवाशांकरिता संडासाची बैठक ही शक्यतोवर रुंद आणि इतर जागेपेक्षा अधिक खोलात असावयास पाहिजे. तसेच ताबडतोब मल साफ व्हावा म्हणून 'फ्लश'ची व्यवस्थाही संडासामध्ये असावयास पाहिजे. फ्लशचे पाणी दोन ठिकाणांहून येत असल्यास अधिक चांगले. त्याचप्रमाणे 'बेसिन' आणि आरसा वगैरेंचीही व्यवस्था संडासामध्ये असणे अत्यंत आवश्यक आहे. शिवाय सर्वसामान्य अजाण लोक घाण करण्यात पटाईत असतात, त्यांना वाटेल तेथे शिंकण्याचा किंवा वाटेल तेथे थुंकण्याचा काही विधिनिषेध नसतो हे

गृहित धरून गाडीबरोबर एक मेहतर असणे फारच आवश्यक आहे. जसजसा शिक्षणाचा प्रसार होत जाईल, तसतसा सामान्य प्रवासी आपली कर्तव्ये पाळावयास शिकेल. पण तोपर्यंत सर्वसामान्य प्रवाशाकरिता लहान मुलाकरिता आपण जशी व्यवस्था केली असती तशी करावयास पाहिजे.

नवीन आगगाड्यांत तीन सुधारणा मात्र खरोखरच चांगल्या आहेत. गाडीची रुंदी वाढवून सामान्य लोकांकरिता असलेल्या बाकांची रुंदी वाढविल्याने बाक जास्त ऐसपैस झाले आहेत. तसेच पंख्यांची सोय झाल्यामुळे अधिक हवा डब्यात खेळती राहणार आहे. तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था झाल्यामुळे प्रवाशांची गैरसोय पुष्कळच कमी होणार आहे. मात्र ही पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आजच्यापेक्षा पुष्कळच अधिक चांगली करिता येईल असे आम्हास वाटते. डब्याच्या मध्यभागी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याऐवजी पाण्याकरिता एक स्वतंत्र खोली तयार केली तर अधिक चांगले होईल.

उतारूना जरूर वाटेल तेव्हा गाडी थांबविता यावी याकरिता 'गाडी' थांबविण्याची साखळी आज गाडीत लावलेली असते. पण साखळी केव्हा ओढली तर त्याचा अयोग्य उपयोग होणार नाही याची जाणीव प्रवाशांना तर जाऊच द्या, पण रेल्वे अधिकाऱ्यांनाही असलेली दिसत नाही. त्यामुळे अनेक लोकांना रेल्वे अधिकाऱ्यांकडून अपमान सहन करून घ्यावे लागले आहेत, अनेकांना पोलिसांकडून बंदिस्त व्हावे लागले आहे, आणि अनेकांना रेल्वेवर फिर्यादी दाखल कराव्या लागल्या आहेत. याकरिता या रेल्वेतील साखळीचा उपयोग केव्हा आणि कसा करावा हे प्रवाशांना कळले पाहिजे. नाहीतर साखळी ओढल्याने ५० रु. दंड होतो एवढ्याच भीतीने आगगाडीतील अनेक प्रवासी संडासामध्ये पाणी नसताना किंवा संडास साफ नसताना सुद्धा साखळी ओढावयास कचरत असतात. याकरिता कोणकोणत्या वेळी साखळी ओढावयास हरकत असू नये याची माहिती प्रत्येक डब्यात लावावयास पाहिजे. आमच्या मते संडासामध्ये पाणी नसेल तर किंवा संडास साफ नसेल तर किंवा डब्यात कोणी घाण करीत असेल तर किंवा डब्यात भांडणे चालली असतील किंवा कोणी आजारी झाले असेल तर किंवा रात्री दहानंतर लांबच्या प्रवासाच्या डब्यात कोणी जवळचा प्रवासी येण्याचा प्रयत्न करीत असेल तर, साखळी ओढण्याचा हक्क रेल्वे-प्रवाशांना असावा.

पुष्कळदा मध्येच कोठेतरी संडासामधील पाण्याच्या टाकीतील पाणी संपलेले आढळून येते आणि मग गार्डाने जरी मनात आणले तरी त्याला प्रवाशांना पाणी देता येत नाही. याकरिता गार्डाच्या डब्यावर एक 'राखीव' पाण्याची टाकी असावी आणि ती सर्व डब्यांशी जोडण्यात यावी. फारच जरूर असेल त्या वेळी या टाकीचा नळ उघडून गार्डाला एखाद्या अडलेल्या प्रवाशास मदत करिता येईल, आणि त्यामुळे त्या प्रवाशाचे हाल वाचतील.

आणखी एक सूचना आम्हास करावीशी वाटते, आज डब्यामध्ये वाटेल तो माणूस वाटेल तेव्हा धूम्रपान करीत असतो, यामुळे इतर लोकांना त्रास होतो, याकरिता मुंबईच्या ट्राम व बसेसमध्ये व्यवस्था असते त्याप्रमाणे धूम्रपान करणाऱ्यांकरिता काही ठरलेले बाक असावेत.

आजपर्यंत आमच्या नेत्यांनी आगगाडीतील प्रवासात वर्गभेद आणि वर्णभेद असू नये अशा घोषणा वारंवार केल्या आहेत. महात्माजींनी तर याच एका कारणाकरिता वरच्या दर्जाने प्रवास करणे सुद्धा बंद केले. असे असताना अद्यापही आमच्या युद्धोत्तर पुनर्घटनेच्या योजनेबरहुकूम तयार करण्यात आलेल्या आगगाडीत तिसऱ्या दर्जाच्या उतारूंपेक्षा इतर लोकांचीच सोय करणे सर्वथा अनुचित आहे. रेल्वेत आज करण्यात येत असलेले वर्गीकरण संपूर्णपणे नाहीसे करावयास पाहिजे. रेल्वेत यानंतर फक्त दोनच वर्ग हवेत. प्रथमतः (१) जवळच्या प्रवाशाकरिता आणि (२) लांबच्या प्रवाशाकरिता. जवळच्या प्रवाशाकरिता पहिला दुसरा वर्ग ठेवण्याची अजिबात जरुरी नाही. सर्वांनाच सारख्या सुखसोयी मिळाल्या पाहिजेत. लांबच्या प्रवाशांकरिता दोन वर्ग करावयास हरकत असू नये : (१) स्वस्त तिकिटांचा आणि (२) महाग तिकिटांचा, पण स्वस्त तिकिटांच्या डब्यात सुद्धा वर सुचविलेल्या सुधारणा अंमलात यावयास पाहिजेत.

२३

जून १९४७ ते जून १९४८

८-६-४७

ता. २० फेब्रुवारी रोजी इंग्लंडचे पंतप्रधान श्री. ॲटली यांनी जून ४८ पर्यंत हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्याची जेव्हा घोषणा केली तेव्हा ब्रिटिशांच्या फसव्या राजनीतीचेच ते एक स्वरूप असून या घोषणेतून काही निष्पन्न होणार नाही असे सर्वसामान्य जनतेचे मत पडले. परंतु जागतिक राजकारणाचे फासे उलट किंवा सुलट पाडणे ही मनुष्याच्या हातातील गोष्ट नाही, आणि हे फासे एकदा पडावयास सुरुवात झाली म्हणजे मनुष्य केवढाही राजकारणधुरंधर आणि साम्राज्यपिपासू असला तरी जागतिक शक्तींचा नियंता बनण्याऐवजी जागतिक शक्तींकडूनच त्याचे नियंत्रण केले जाते. ब्रिटिश साम्राज्याचे माजी पंतप्रधान श्री. चर्चिल यांनी काही दिवसांपूर्वी "आमच्या साम्राज्याचे दिवाळे वाजवण्याकरिता काही आम्ही चालू महायुद्ध लढत नाही." अशा अर्थाचे उन्मत्तपणाचे उद्‌गार काढले होते. श्री. चर्चिल यांच्या दुर्दैवाने त्यांच्या हयातीतच आपल्या साम्राज्याचा मृत्यू पाहण्याचे दुर्भाग्य त्यांच्या नशिबी आले आहे. ता. ३ जून रोजी हिंदुस्थानचे विद्यमान व्हाइसरॉय लॉर्ड माउन्टबॅटन यांनी हिंदुस्थानला स्वराज्य देण्याची जी योजना हिंदी जनतेसमोर मांडली त्यामुळे चर्चिलसारख्या दुष्ट साम्राज्यपिपासूंना आपली साम्राज्यपिपासा भागविण्याकरिता आता दुसऱ्याच कोणत्यातरी मृगजलाचा आश्रय घ्यावा लागणार आहे, हे स्पष्ट झाले आहे. हिंदुस्थानचा मोह इंग्रजांनी सोडला आणि चर्चिलसारख्यांना सोडावा लागला हेच ठीक झाले. नाहीतर आपली साम्राज्यतृष्णा भागविण्याकरिता जर त्यांनी हिंदुस्थानचा आश्रय घेतला असता तर जागृत झालेल्या जनता-

शक्तीच्या तेजाने इंग्रजी साम्राज्यशहा जळून खाक झाले असते. परंतु दिवसमानाप्रमाणे आमच्या राज्यकर्त्यांनाही आपले डोळे उघडावे लागले, किंबहुना चर्चिलवाद्यांचा पराभव होऊन समाजवादी सरकारची इंग्लंडमध्ये प्रतिष्ठापना झाल्यामुळेच साम्राज्यवादी इंग्रजांचे डोळे उघडले आणि हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्याचा निर्णय त्यांना घ्यावा लागला. आता पुढील सात आठवड्यांत हिंदुस्थानला साम्राज्यांतर्गत स्वराज्याचे अधिकार मिळणार असून पुढील जूनपर्यंत आम्हाला पूर्ण स्वराज्याचे दर्शन घडणार आहे.

लॉर्ड माउंटबॅटन यांनी हिंदी जनतेला ता. ३ जून रोजी सादर केलेली योजना दोषलांछित नाही असे आम्ही समजत नाही. पण तरीही आम्ही त्या योजनेबद्दल लॉर्डसाहेबांना धन्यवाद देतो. पं. जवाहरलाल नेहरू यांनी आपल्या भाषणात सांगितल्याप्रमाणे या योजनेचा स्वीकार करणे हेच आजच्या परिस्थितीत उचित आणि वास्तवतेस धरून होय.

चालू योजनेत, हिंदुमुसलमान जमाती हिंदुस्थानच्या एकराज्यात यावयास तयार नसतील तर, हिंदुस्थानच्या विभक्तीकरणास संमती दिली आहे. केवळ भावनेच्या दृष्टीने विचार केला तर आजपर्यंत आम्ही ज्या भावना हृदयाशी कवटाळल्या, ज्या आसेतुहिमाचल स्वतंत्र भारताचे आम्ही स्वप्न पाहिले, ज्या हिंदु-मुसलमान जमातींची जातिधर्मनिरपेक्षपणे एका राष्ट्राचे घटक म्हणून आम्ही संभावना केली; केवळ आम्हीच नव्हे तर, सर महंमद इक्बालसारख्या मुसलमान कवींनीसुद्धा ज्याची संभावना केली, त्या भरतखंडाचे खंड पडल्याचे पाहून कोणत्या हिंदभूमीच्या सुपुत्राच्या नेत्रांत आसू आल्यावाचून राहणार नाहीत ? हिंदुस्थानमधील स्वराज्याची चळवळ ही वास्तविक लॉर्ड कर्झन यांनी केलेली बंगालची फाळणी रोखण्याकरिता सुरू झाली. दुर्दैवाने स्वराज्याच्या चळवळीच्या नांदीप्रमाणेच स्वराज्याच्या चळवळीचे भरतवाक्यही प्रांताच्या आणि राष्ट्राच्या फाळणीनेच व्हावयाचे होते.

परंतु ही अश्रू ढाळण्याची वेळ नव्हे. भावनेच्या भरात आमच्या शरीराच्या सडलेल्या तुकड्यांवर शस्त्रक्रिया करू नये असे आम्हास कितीही वाटले तरी सरतेशेवटी ते फायद्याचे नसते. सडलेले तुकडे शरीरातून काढूनच टाकावे लागतात. कोणत्याही कारणामुळे असो, मग ते चर्चिलप्रभृतीच्या कुटिल नीतीमुळे असो, की जिनांच्या हिटलरी महत्त्वाकांक्षेमुळे, आज हिंदुस्थानच्या पाकिस्तानी प्रांतात जातीयतेचे हलाहल संचरले आहे. हे विष सर्व राष्ट्रात भिनण्यापूर्वीच विषमय झालेला भाग काढून टाकणे, हाच त्यावरचा उपाय होता, आणि शेवटी नाखुषीने का होईना, आम्हाला तो अंमलात आणावा लागला. मागील एका अग्रलेखात एका भूमीवर दोन राष्ट्रे राहू शकत नाहीत असे आम्ही प्रतिपादिले होते. बंगालसारख्या ठिकाणी आज पाकिस्तानी नीतीमुळे दोन राष्ट्रे वावरत असल्याचा भास होतो. तेव्हा ही परिस्थिती टाळण्याकरिता पाकिस्तानच द्यावयाचे असेल तर या

प्रांताची फाळणी होणे आवश्यक होते.

देशातील प्रत्येक सांस्कृतिक तुकड्यांना स्वयंनिर्णयाचा किंवा राष्ट्रातून बाहेर पडण्याचा हक्क आज सर्वमान्य झाला आहे. या नियमान्वये जर पूर्व बंगाल, पश्चिम पंजाब, सिंध, वायव्य सरहद्द प्रांत, किंवा आसाममधील सिल्हेट जिल्हा यांना हिंदुस्थानातून बाहेर पडावयाचे असेल तर त्यांना कोण रोखू शकणार? केवळ आम्हांला त्यांनी बाहेर पडू नये असे वाटते, म्हणून आम्ही त्यांना कसे रोखू शकणार? दोन बंधू आपसात भांडले आणि त्यांचे एकत्र राहणे अशक्य झाले तर त्यांनी अलग होणे यातच शहाणपणा आहे. आईला दोन भाऊ अलग होताना अवघड वाटणे अपरिहार्य आहे. पण शेवटी अलग होण्यातच अधिक शहाणपणा आहे. म. गांधींचे हृदय आईसारखे आहे. हिंदू व मुसलमान जमातींवर त्यांचे मातृतुल्य प्रेम आहे, आणि म्हणूनच त्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत अखंड हिंदुस्थानचा ध्यास घेतला. पण शेवटी दोन्ही जमातींच्या कल्याणाच्या दृष्टीने त्यांचे अलग होणे हीच योग्य गोष्ट आहे असे ओळखून, नाखुषीने का होईना पण व्हाइसरॉयच्या योजनेस त्यांनी संमती दिली याचेही मर्म हेच आहे.

जून ४८ मध्ये हिंदुस्थानची सर्व सत्ता हिंदी प्रजेच्या हाती येणार आहे. त्या महापर्वाची सुरुवात जून ४७ च्या व्हाइसरॉयच्या घोषणेनेच झाली आहे, तेव्हा ही योजना कशीही असली तरी आपण तिचा स्वीकार करून जून ४८ ची वाट चालू या. उगीच शाब्दिक अवडंबराचा आश्रय घेऊन ही योजना लाथाडण्यात अर्थ नाही. आज आपणांसमोर अनेक गहन प्रश्न उत्पन्न झाले आहेत. जून ४८ पर्यंत आपणांस एक संपन्न समाजवादी राष्ट्र उदयास आणावयाचे आहे. त्याकरिता नवीन प्रश्न, नवीन विचार, नवीन दृष्टी आपणांस यावयास पाहिजे. नवे शिक्षण आपणांस मिळाले पाहिजे. नवे लढे– किसान कामगारांचे लढे– आता आपणांस हिरीरीने लढले पाहिजेत, किसान कामगारांचे लढ्याचे मोर्चे आजपासूनच आपण बांधावयास सुरुवात केली पाहिजे. आपल्याच दृष्टीने विचार करावयाचा म्हणजे तीन भागांत विभागलेला महाराष्ट्र आपण एक करण्याचा प्रयत्न करावयास पाहिजे.

शिवाय संस्थानांचा प्रश्न महत्त्वाचा आहे. आज इंग्रजांनी आपणास स्वराज्य कबूल केले खरे. पण संस्थाने कायमच राहिली. या संस्थानांतून चर्चिलादी साम्राज्यशहांचे पंचमस्तंभ निर्माण करण्याचे काम चालू राहणार नाही याची खात्री काय? याकरिता आमच्या जनताशक्तीचा लोंढा आता संस्थानांकडे वळला पाहिजे. हिंदू असोत की मुसलमान, संस्थाने नष्ट तरी झाली पाहिजेत किंवा तेथे अंतर्गत लोकशाही स्थापन झाली पाहिजे, आणि त्यांनी हिंदी संघात प्रवेश मिळविला पाहिजे. हैदराबादसारखी काही मोठी संस्थाने आजपासूनच आपले पाय पसरावयास लागली आहेत. त्याला वेळीच पायबंद घातला नाही तर पाकिस्तानी प्रांतांच्या मदतीने एक नवा हैदोस देशात सुरू होण्याचा

संभव आहे. आजच वऱ्हाड गिळंकृत करण्याचा हैदराबादचा उपक्रम असून वऱ्हाडातील काही पुढाऱ्यांची निझामशी 'निका' लावण्यास हरकत नाही. पण या पुढाऱ्यांची जरी निझामशी निका लावण्यास हरकत नसली तरी ही गोष्ट अत्यंत लाजिरवाणी आहे. आमचे राज्यकर्ते वऱ्हाडच्या प्रश्नाबाबत काय धोरण स्वीकारणार हे आजपर्यंत आपणांस माहीत नव्हते. पण आता व्हाईसरॉयच्या घोषणेनंतर वऱ्हाडबाबत काहीही करण्याचा अधिकार इंग्रजांना उरला नाही. तेव्हा वऱ्हाडच्या जनतेने आपल्या पायांवर उभे राहून हैदराबादचा हैदोस ताबडतोब थांबविला पाहिजे.

तात्पर्य, आता जून ४७ पासूनच नव्या पर्वाची छाया पडावयास सुरुवात झाली आहे. या नव्या पर्वाबरोबर नवे प्रश्नही उदयास येणार आहेत. हे नवे प्रश्न नव्या जोमाने सोडवावयास आपणास आता तयार झाले पाहिजे. आपल्या तयारीवरच किसान मजूर राज्याचे आपले स्वप्न प्रत्यक्षात येण्याची शक्यता आहे.

२४

स्वातंत्र्याच्या मार्गातील निझामाचा काटा दूर करा !

१५-६-४७

आज बरेच दिवस हैदराबादचे वऱ्हाडवर आक्रमण होणार म्हणून वर्तमानपत्रांतून ओरड चालली होती. इतकेच नव्हे तर निझामाचे प्रांतीय पुढारी आणि हिंदुस्थान सरकार यांच्याशी काही बोलणे चालले असल्याची दाट वदंता वातावरणात दुमदुमत होती. परंतु आतापर्यंत हैदराबादसंबंधी, किंबहुना एकंदर संस्थानांसंबंधीच काहीही न लिहिण्याचा संकल्प आम्ही काटेकोरपणाने पाळला. जोपर्यंत ब्रिटिश मुलखातील प्रश्न पूर्णपणे सुटत नाही तोपर्यंत संस्थानांच्या 'अंधेरी नगरीत' तोंड घालणे आम्हास मोठेसे इष्ट वाटले नाही.

परंतु तीन जूनच्या आमच्या राज्यकर्त्यांच्या घोषणेने देशाच्या परिस्थितीत आमूलाग्र फरक पडला आहे. काँग्रेसबद्दल कावीळ झालेल्या व केवळ नावानेच तरुण असलेल्या भारतीय वृत्तपत्रांतील विदूषकांनी केवढाही शंखनाद केला तरी काँग्रेसने घेतलेली भूमिका हीच शहाणपणाची भूमिका होती यासंबंधी जनतेच्या मनात तिळप्राय शंका नाही. मात्र देशाची फाळणी झाल्यावरोबर आणि मुसलमानांना पाकिस्तान दिल्यावरोबर, चला आता आपले जीवनकार्य संपले अशा उन्मादात कोणीही राहण्याचे कारण नाही. वास्तविक ही पुढे येणाऱ्या आपत्तीची, पुढे कराव्या लागणाऱ्या लढ्याची सुरुवात आहे. यापुढील मार्गात फुलांच्या पायघड्या पसरल्या आहेत असे कोणीही समजू नये. आपल्या ध्येयाप्रत पोचण्याच्या अगोदर अनेक समाजकंटकांना आपल्या मार्गातून आपणास दूर करावे लागणार आहे हे विसरून चालणार नाही.

दरिद्री पाकिस्तान पण लष्करी घमेंड

थोड्याशा अगतिकत्वाने का होईना, आपण ज्याप्रमाणे देशाच्या फाळणीस आणि मुसलमानांच्या पाकिस्तानास मान्यता दिली त्याचप्रमाणे लीगकौन्सिलनेही काही धोरणानेच कोणत्याही रीतीने फायदेशीर नसणाऱ्या पाकिस्तानास मान्यता दिली आहे. आज आहे एवढेच पाकिस्तान 'यावच्चंद्रदिवाकरौ' राहणार असेल तर कोणताही शहाणा मुसलमान आपले हे दरिद्री पाकिस्तान संपन्न हिंदुस्थानास जोडण्याकरिता विनवणी केल्यावाचून राहणार नाही. पण महत्त्वाकांक्षी हिटलरच्या पावलावर पाऊल टाकू पाहणाऱ्या आणि पाकिस्तानच्या 'शहानशहाचे' स्वप्न पडू लागलेल्या जिनाशहांच्या कार्यक्रमात केवळ एवढ्याच पाकिस्तानवर संतुष्ट राहावयाचे नाही आणि म्हणून आर्थिक दृष्टीने भिकारी असलेले पाकिस्तान आपल्या पुढील राजकीय महत्त्वाकांक्षेचे मनोरे प्रत्यक्षात आणण्याकरिता जीनाशहांनी मान्य केले आहे. तरवारीच्या जोरावर उरलेले पाकिस्तान किंवा पुराणप्रसिद्ध मोगल साम्राज्य जिंकण्याचे स्वप्न बुद्धिभ्रंश झालेल्या लिगी मुसलमानांना आणि त्यांच्या शेख महंमद जीनाशहाला पडू लागले आहे यात शंका नाही. लीग कौन्सिलच्या ठरावातच हिंदुस्थानच्या काही भागावर आपला डोळा असल्याची कबुली देण्यात आली आहे. नव्हे, अशा रीतीने हिंदू मुलखावर स्वारी करण्याचे कितीही वेडगळपणाचे असले तरी मुसलमानांचा हा दुसरा प्रेषित त्या मार्गाने जाण्यास मुळीच कचरणार नाही हेही तितकेच खरे आहे.

हिंदुस्थानातील मुसलमान

अशा परिस्थितीत पाकिस्तानी वेडगळपणास हाणून पाडण्याकरिता आपण वेळीच लागले पाहिजे. उद्या जर पाकिस्तानच्या शहानशहांनी हिंदुस्थानवर स्वारी करावयाचे ठरविले तर त्यांना दोन गोष्टींचा फार मोठा फायदा मिळणार आहे. एक तर भोपाळ-हैदराबादसारखी संस्थाने आज त्यांचे साहाय्य करावयास सज्ज आहेत. दुसरे वर्ग-जागृतीची (Class Consciousness) मुळीसुद्धा कल्पना नसलेले हिंदुस्थानातील मुसलमान त्यांना पाणपोयीच्या ठायी होणार आहेत. या मुसलमानांनी गेल्या निवडणुकीत पाकिस्तानच्या बाजूने कौल दिला ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. पण त्यांच्या इतर भाईबंदांप्रमाणे त्यांचे पाकिस्तानचे स्वप्न अद्याप प्रत्यक्षात उतरले नाही. त्यामुळे शहानशहा जीनांची तघलघी मोहीम हिंदुस्थानभर सुरू झाल्याबरोबर हिंदुस्थानातील धर्मवेडे मुसलमान जीनाशहांच्या मदतीस धावल्यावाचून राहणार नाहीत. निदान पाकिस्तानच्या बाजूने मते देणाऱ्यांचा, जोपर्यंत त्यांच्याकडून हिंदुस्थानच्या राष्ट्रनिष्ठेचा पुरावा मिळत नाही, तोपर्यंत विश्वास धरणे योग्य नाही. अशा स्थितीत जीनाशहांच्या आक्रमणास तोंड देता यावे म्हणून हिंदुस्थानातील मुसलमानांचे नागरिकत्व प्रथम रद्द

करून, ते हिंदुस्थाननिष्ठेची शपथ घ्यावयास तयार असतील तरच त्यांना हिंदुस्थानचे नागरिक म्हणून स्वीकारण्यात यावे.

हितशत्रूंचा चंचुप्रवेश अपायकारक

स्वतंत्र भारतातील राज्यव्यवस्था कशी असावी असा प्रश्न आम्हांस कोणी केला तर ती समाजवादी असावी, धर्मनिरपेक्ष असावी, अमुक मनुष्य हिंदू म्हणून तो आपला आणि अमुक मुसलमान म्हणून तो परका, असा भेदभाव तेथे असू नये असे आमचे स्पष्ट मत आहे, परंतु ही राष्ट्र स्थापन झाल्यानंतरची भानगड आहे. राष्ट्र उत्पन्न करीत असताना आपले हितशत्रू चंचुप्रवेश करून आपला मर्मभेद करणार नाहीत याबद्दल आपण जागरूक असावयासच पाहिजे. आणि मुसलमानांबद्दल आपण अधिक जागरूक असावयास पाहिजे असे आम्ही म्हणतो याचे कारणही हेच आहे की, मुसलमान आजपर्यंत तरी आपणांस परके समजत आले आहेत. हिंदुस्थाननिष्ठ असण्याऐवजी ते पाकिस्ताननिष्ठ आहेत.

हैदराबादचे संस्थान नष्ट करा !

याच भूमिकेवरून हिंदुस्थानच्या मुसलमानांच्या प्रश्नापेक्षाही हिंदुस्थानातील मुसलमान संस्थानांचा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. वास्तविक आम्हांस आज कोणत्याही संस्थानिकाची मिरासदारी नको आहे. हैदराबादचे संस्थान असो की म्हैसूरचे असो, त्रावणकोरचे असो की काश्मीरचे, संस्थानची मालकी ही तेथल्या प्रजेची आहे, मग ती प्रजा हिंदू असो की मुसलमान. इतकेच नव्हे तर मुसलमान बहुसंख्य प्रजा असलेली संस्थाने तावडतोब मुस्लिम प्रजेच्या हातातच गेली पाहिजेत. पण असे जरी असले तरी हैदराबादसारख्या संस्थानाला आज अनेक दृष्टींनी विशेष महत्त्व आहे. ब्रिटिश लोक हिंदुस्थान सोडून जात आहेत हे पाहून हैदराबाद स्वतंत्र राज्य स्थापण्यात आणि वेळप्रसंग पडल्यास जीनाशहांच्या मदतीस कसे जाता येईल याचे स्वप्नचित्र रंगविण्यात मग्न आहे.

नुकतेच हैदराबादने छत्तारीच्या नबाबांच्या खांद्यावर आपल्या राज्याची धुरा टाकली आहे. तसेच हैदराबादकरिता स्वतंत्र बंदर मिळविण्याकरिता गोव्याच्या पोर्तुगीज सरकारशीही निझामांनी वाटाघाटी सुरू केल्याची बातमी आहे. अशा रीतीने हिंदुस्थानात राहून आपले स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे पाण्यात राहून माश्यांशी वैर करणे होय. हिंदुबहुसंख्य प्रजा असलेला हा प्रदेश हिंदुस्थानातच राहिला पाहिजे. छत्तारीचे नबाबजादे असोत की निझाम उल्मुल्काचे वंशज असोत, स्वतःचे स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचेही पाताळयंत्र आता हिंदी जनता त्यांना साधू देणार नाही. निझाम

छत्तारीचे हे कारस्थान हाणून पाडण्याकरिता, स्वामी रामानंद तीर्थ यांनी घोषित केल्याप्रमाणे, हैदराबादच्या जनतेने आता तावडतोब तयार झाले पाहिजे. प्रत्यक्ष प्रतिकाराची, जनसामर्थ्याची चुणूक निझामाला दाखविण्याची हीच वेळ आहे. आता लढा करण्यात जर दिरंगाई झाली तर देशाचा घात होणार आहे. हैदराबादने जनताद्रोह करून स्वतंत्र हैदराबादचा सवता सुभा स्थापन करण्याची घोषणा करिताच हैदराबादच्या हिंदी जनतेने निझामाला नेस्तनाबूद करण्याकरिता रणशिंग फुंकले पाहिजे. आजच्या लोकशाहीच्या काळात जनताद्रोह करण्याचा काय परिणाम होतो हे आता निझामला दाखवूनच दिले पाहिजे. वऱ्हाडचा विभाग आपल्या घशात टाकण्याच्या आशेत निमग्न असतानाच निझामाला दिसले पाहिजे की आपले हैदराबादचेच आसन डळमळीत आहे. हिंदुस्थानच्या बहुसंख्य हिंदुप्रजा असलेल्या हैदराबादेत निझामासारख्या उपटसुंभाने दिमाखाने राज्य करणे, आणि स्वतंत्र हैदराबाद स्थापन करण्याची वल्गना करणे म्हणजे हैदराबादच्या जनतेचा, हिंदी लोकांचा आणि लोकशाहीयुगाचा अपमान आहे. हैदराबादचे संस्थान तावडतोब नेस्तनाबूद करून हिंदी राष्ट्राच्या प्रगतीच्या मार्गावरील हा निझामाचा काटा तावडतोब नाहीसा करावयास पाहिजे. हैदराबादवर निझामचा मुळीच हक्क नाही. हैदराबादवर हक्क आहे आंध्रदेशाचा, महाराष्ट्राचा, कर्नाटकाचा. या लोकांपासून दरोडेखोरीने पचविलेले हैदराबाद संस्थान ज्याचे त्याला मिळाले पाहिजे. निझामला जर या उपर केवळ एक नागरिक म्हणून हैदराबादेत राहावयाचे नसेल तर त्याने खुशाल पाकिस्तानात आपली नबाबी गाजवावी. पाकिस्तानात जाण्याचा मार्ग त्याला मोकळा आहे.

हैदराबादच्या लढ्याला कदाचित हिंदुस्थान सरकारला आज पाठिंबा देता येणार नाही. पण कोणत्याही लढ्याकरिता कोणत्याही सरकारच्या मदतीची अपेक्षा करावयाचे कारण नाही. जनतेचा लढा हा जनतेनेच करावयाचा असतो. हैदराबादच्या जनतेने लढ्याचे शिंग फुंकले पाहिजे. हिंदी जनता, मध्यप्रांत वऱ्हाडची जनता, हैदराबादच्या जनतेला निश्चित मदत करील. पाकिस्तानचा डाव हाणून पाडण्याकरिता हैदराबादचे कुसळ आपल्या डोळ्यातून काढूनच टाकावयास पाहिजे. हैदराबादच्या जनतेला आम्ही ही विनंती करितो की, हैदराबादचे संस्थान नष्ट करा आणि आपले गमावलेले स्वातंत्र्य परत मिळवा.

२५

निझामापासून वऱ्हाडचे रक्षण करा !

२२-६-४७

हिंदुस्थानी राजकारणाच्या बुद्धिबळाच्या पटावर निझामने ज्या रीतीने आपले प्यादे व वजीर चालविले आहेत त्यावरून निझामला कोणाला केव्हा, आणि कसा शह लावावयाचा आहे हे जर आपणास स्पष्ट न झाले तर आपली कीवच करावी लागेल. आज अनेक दिवसांपासून आपणास स्वतंत्र बंदर नाही म्हणूनच आपली प्रगती होत नाही, नाहीतर जगातील प्रथम श्रेणीचे मुस्लिम राष्ट्र म्हणून हैदराबादचा लौकिक आज राहिला असता, आणि तुर्कस्थानने नष्ट केलेली कालिफाची गादी आपल्याला चालविता आली असती अशी निझामाची शेख महंमदी कल्पना झालेली आहे. त्यामुळे आजच्या लोकशाहीच्या कालगुणांमुळे ब्रिटिश साम्राज्यासारख्या जगातील सर्वश्रेष्ठ साम्राज्याला सामान्य जनतेसमोर नमते घ्यावे लागून हिंदुस्थान सोडून जावे लागत आहे असे दिसत असताना सुद्धा कोठे पोर्तुगीजांपासून गोवे विकत घेण्याच्या वाटाघाटी कर तर कोठे उत्तर सरकार प्रांतावर आपला अधिकार सांग आणि विजगापट्टम आपल्या राज्यास जोडण्याची खटपट कर, तर 'प्रिन्स ऑफ वेल्स' या इंग्रजी मायन्यावरहुकूम नक्कल करून 'प्रिन्स ऑफ बेरार' ही पदवी आपल्या कर्तबगार चिरंजीवांना अर्पण करून वऱ्हाडवर आपले स्वामित्व असल्याचा खोटा देखावा निर्माण कर, अशा एक दोन नव्हे तर अनेक माकडचेष्टा निझामाने चालविल्या आहेत. पण ह्या माकडचेष्टा जर कृतीत उतरविण्याचा खटाटोप निझामाने चालविला नसता तर या माकडचेष्टांकडे विशेष लक्ष देण्याचे कारण नव्हते. पण ब्रिटिश येथून निघून जात आहेत असे पाहून निझामच्या लष्करी सामर्थ्यास

अंकुर फुटू लागले असून लष्करी शक्तीच्या जोरावर निझामउल्मुल्काचे दिवटे चिरंजीव आता वऱ्हाड पादाक्रांत करून आपल्या राज्यास जोडणार आहेत. नुकतीच अशी एक बातमी आली आहे की, निझामने आपली फौज वऱ्हाडच्या सरहद्दीवर जमवून ठेवली असून हिंदुस्थानातून ब्रिटिशांनी आपला पाय काढताच निझामचे विजिगीषू सैन्य वऱ्हाडावर कूच करणार आहे, आणि वऱ्हाडच्या पादशाहाचे एकनिष्ठ सेवक असण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून असलेले काही वऱ्हाडातील माजी हिंदुसभावादी आणि इतर सूर्याजी पिसाळ वऱ्हाड निझामास आपल्या टिचभर पोटाकरिता विकणार आहेत. अर्थात निझामाच्या एकदोनच नव्हे तर छप्पन्न फौजा जरी वऱ्हाडवर चाल करून आल्या आणि एक-दोनच नव्हे तर सतराशे ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर सूर्याजी पिसाळ पिसाळून आपल्या भाईबंदांना चावा घेण्यास उठले तरी वऱ्हाड निझामाला हस्तगत करिता येणार नाही ही गोष्ट निराळी. पण असे जरी असले तरी सोळा ऑगस्टला निझामचे सैन्य पैनगंगा नदी ओलांडून वऱ्हाडात शिरण्याचा वेडेपणा करणारच नाही असे नाही आणि त्यामुळे या प्रश्नाकडे केवळ दुर्लक्ष करून चालणार नाही.

निझामाची वऱ्हाडवर स्वारी होऊ नये याबद्दल आपण आजपासूनच जागरूक असावयास पाहिजे. वऱ्हाडच्या संरक्षणाकरिता हिंदुस्थान सरकारचे युद्धमंत्री श्री. बलदेवसिंग यांना जी तयारी करावयाची असेल ती ते करतीलच. पण वऱ्हाडच्या संरक्षणाची जबाबदारी ही सरकारची आहे असे समजून जनतेने स्वस्थ बसावयाचे कारण नाही. निझामलगतच्या प्रत्येक मुलखातून वऱ्हाड, मध्यप्रांत, आंध्र, कर्नाटक आणि महाराष्ट्र यातून आता वऱ्हाड संरक्षण समित्या निर्माण झाल्या पाहिजेत, आणि सोळा ऑगस्टला किंवा तदनंतर जर वऱ्हाडवर (किंवा गोवा आणि विजगापट्टमवर) स्वारी करण्याचा हास्यास्पद प्रयत्न निझामाकडून झालाच तर निझामाच्या आजूबाजूच्या मुलखातून जनतेच्या सर्व फौजा हैदराबाद संस्थानात शिरून त्यांनी निझामचा कंडू शमन केला पाहिजे.

हैदराबाद संस्थान निझामच्या मालकीचे नसून हैदराबादच्या जनतेच्या–मराठा, तेलगू आणि कानडी लोकांच्या मालकीचे आहे. त्यांनी आपल्या स्वातंत्र्याकरिता उठावणी करण्याची हीच वेळ आहे, असे आम्ही आमच्या मागील अग्रलेखात प्रतिपादन केले होते आणि स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रभावी नेतृत्वाखाली हैदराबादची जनता बंड केल्यावाचून राहणार नाही याबद्दलही आम्हास शंका नाही. परंतु आमच्या परंपरेत, ज्याला सत्याग्रह म्हणून संबोधण्यात येते, त्या मार्गाचा इतउत्तर अवलंब करण्याचा मात्र आपण प्रयत्न करता कामा नये. ४२ च्या बंडाने दाखवून दिलेल्या उघड बंडाच्या मार्गाचा राज्यतंत्र काबीज करण्याच्या मार्गाचा अवलंब आपण केला पाहिजे. केवळ नावापुरता एखादा कायदा तोडून हैदराबादच्या तुरुंगात सडत राहण्याची ही वेळ नाही. निझामाचे तक्त फोडण्याची, हैदराबादेत लोकशाहीची प्राणप्रतिष्ठा करण्याची ही वेळ आहे आणि

२५

निझामापासून वऱ्हाडचे रक्षण करा !

२२-६-४७

हिंदुस्थानी राजकारणाच्या बुद्धिबळाच्या पटावर निझामने ज्या रीतीने आपले प्यादे व वजीर चालविले आहेत त्यावरून निझामला कोणाला केव्हा, आणि कसा शह लावावयाचा आहे हे जर आपणास स्पष्ट न झाले तर आपली कीवच करावी लागेल. आज अनेक दिवसांपासून आपणास स्वतंत्र बंदर नाही म्हणूनच आपली प्रगती होत नाही, नाहीतर जगातील प्रथम श्रेणीचे मुस्लिम राष्ट्र म्हणून हैदराबादचा लौकिक आज राहिला असता, आणि तुर्कस्थानने नष्ट केलेली कालिफाची गादी आपल्याला चालविता आली असती अशी निझामाची शेख महंमदी कल्पना झालेली आहे. त्यामुळे आजच्या लोकशाहीच्या कालगुणांमुळे ब्रिटिश साम्राज्यासारख्या जगातील सर्वश्रेष्ठ साम्राज्याला सामान्य जनतेसमोर नमते घ्यावे लागून हिंदुस्थान सोडून जावे लागत आहे असे दिसत असताना सुद्धा कोठे पोर्तुगीजांपासून गोवे विकत घेण्याच्या वाटाघाटी कर तर कोठे उत्तर सरकार प्रांतावर आपला अधिकार सांग आणि विजगापट्टम आपल्या राज्यास जोडण्याची खटपट कर, तर 'प्रिन्स ऑफ वेल्स' या इंग्रजी मायन्याबरहुकूम नकल करून 'प्रिन्स ऑफ बेरार' ही पदवी आपल्या कर्तबगार चिरंजीवांना अर्पण करून वऱ्हाडवर आपले स्वामित्व असल्याचा खोटा देखावा निर्माण कर, अशा एक दोन नव्हे तर अनेक माकडचेष्टा निझामाने चालविल्या आहेत. पण ह्या माकडचेष्टा जर कृतीत उतरविण्याचा खटाटोप निझामाने चालविला नसता तर या माकडचेष्टांकडे विशेष लक्ष देण्याचे कारण नव्हते. पण ब्रिटिश येथून निघून जात आहेत असे पाहून निझामच्या लष्करी सामर्थ्यास

अंकुर फुटू लागले असून लष्करी शक्तीच्या जोरावर निझामउल्मुल्काचे दिवटे चिरंजीव आता वऱ्हाड पादाक्रांत करून आपल्या राज्यास जोडणार आहेत. नुकतीच अशी एक बातमी आली आहे की, निझामने आपली फौज वऱ्हाडच्या सरहद्दीवर जमवून ठेवली असून हिंदुस्थानातून ब्रिटिशांनी आपला पाय काढताच निझामचे विजिगीषू सैन्य वऱ्हाडावर कूच करणार आहे, आणि वऱ्हाडच्या पादशाहाचे एकनिष्ठ सेवक असण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून असलेले काही वऱ्हाडातील माजी हिंदुसभावादी आणि इतर सूर्याजी पिसाळ वऱ्हाड निझामास आपल्या टिचभर पोटाकरिता विकणार आहेत. अर्थात निझामाच्या एकदोनच नव्हे तर छप्पन्न फौजा जरी वऱ्हाडवर चाल करून आल्या आणि एक-दोनच नव्हे तर सतराशे ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर सूर्याजी पिसाळ पिसाळून आपल्या भाईबंदांना चावा घेण्यास उठले तरी वऱ्हाड निझामाला हस्तगत करिता येणार नाही ही गोष्ट निराळी. पण असे जरी असले तरी सोळा ऑगस्टला निझामचे सैन्य पैनगंगा नदी ओलांडून वऱ्हाडात शिरण्याचा वेडेपणा करणारच नाही असे नाही आणि त्यामुळे या प्रश्नाकडे केवळ दुर्लक्ष करून चालणार नाही.

निझामाची वऱ्हाडवर स्वारी होऊ नये याबद्दल आपण आजपासूनच जागरूक असावयास पाहिजे. वऱ्हाडच्या संरक्षणाकरिता हिंदुस्थान सरकारचे युद्धमंत्री श्री. बलदेवसिंग यांना जी तयारी करावयाची असेल ती ते करतीलच. पण वऱ्हाडच्या संरक्षणाची जबाबदारी ही सरकारची आहे असे समजून जनतेने स्वस्थ बसावयाचे कारण नाही. निझामलगतच्या प्रत्येक मुलखातून वऱ्हाड, मध्यप्रांत, आंध्र, कर्नाटक आणि महाराष्ट्र यातून आता वऱ्हाड संरक्षण समित्या निर्माण झाल्या पाहिजेत, आणि सोळा ऑगस्टला किंवा तदनंतर जर वऱ्हाडवर (किंवा गोवा आणि विजगापट्टमवर) स्वारी करण्याचा हास्यास्पद प्रयत्न निझामाकडून झालाच तर निझामाच्या आजूबाजूच्या मुलखातून जनतेच्या सर्व फौजा हैदराबाद संस्थानात शिरून त्यांनी निझामचा कंडू शमन केला पाहिजे.

हैदराबाद संस्थान निझामच्या मालकीचे नसून हैदराबादच्या जनतेच्या–मराठा, तेलगू आणि कानडी लोकांच्या मालकीचे आहे. त्यांनी आपल्या स्वातंत्र्याकरिता उठावणी करण्याची हीच वेळ आहे, असे आम्ही आमच्या मागील अग्रलेखात प्रतिपादन केले होते आणि स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रभावी नेतृत्वाखाली हैदराबादची जनता बंड केल्यावाचून राहणार नाही याबद्दलही आम्हास शंका नाही. परंतु आमच्या परंपरेत, ज्याला सत्याग्रह म्हणून संबोधण्यात येते, त्या मार्गाचा इतउत्तर अवलंब करण्याचा मात्र आपण प्रयत्न करता कामा नये. ४२ च्या बंडाने दाखवून दिलेल्या उघड बंडाच्या मार्गाचा राज्यतंत्र काबीज करण्याच्या मार्गाचा अवलंब आपण केला पाहिजे. केवळ नावापुरता एखादा कायदा तोडून हैदराबादच्या तुरुंगात सडत राहण्याची ही वेळ नाही. निझामाचे तक्त फोडण्याची, हैदराबादेत लोकशाहीची प्राणप्रतिष्ठा करण्याची ही वेळ आहे आणि

हैदराबादच्या जनतेने या महायज्ञास प्रारंभ केला तर त्यांच्या मदतीस जाण्याचीही हीच वेळ आहे. वऱ्हाड संरक्षणाचा प्रश्न आणि निझामी संस्थान नष्ट करण्याचा प्रश्न एकरूप आहेत. ते एकमेकांपासून विलग करता येणार नाहीत. हिंदुस्थानी मुलखावर निझामची स्वारी झाली तर हैदराबादी जनतेने आणि हैदराबादेत जनतेचा लढा सुरू झाला तर हिंदी जनतेने एकमेकांच्या मदतीस जावयासच पाहिजे.

तसेच वऱ्हाडवर निझामाने स्वारी करण्याचा प्रयत्न केला किंवा पोर्तगीजांजवळून गोमांतक विकत घेण्याचा उपद्व्याप आरंभिला तर हिंदुस्थान सरकारने डोळे उघडे ठेवून स्वस्थ बसण्याचे कारण नाही. हिंदी फौजांनी ताबडतोब निझामला शत्रू मुलूख म्हणून जाहीर करून ताबडतोब युद्ध सुरू केले पाहिजे आणि निझामास वठणीवर आणले पाहिजे. कोणतेही राज्य हे राजाच्या मालकीचे नसून प्रजेच्या मालकीचे असते आणि वऱ्हाड म्हणा किंवा गोमांतक म्हणा विकण्याचा किंवा विकत घेण्याचा कोणासही अधिकार नाही. आणि कोणी अशा तऱ्हेचा उपद्व्याप करावयास लागला तर, मग तो निझाम असो की पोर्तुगीज असो, त्याचा नक्षा ताबडतोब उतरविला पाहिजे. निझामच्या अशा काही हालचाली सुरू झाल्या आहेत काय याची हिंदुस्थान सरकारने ताबडतोब चौकशी करावयास पाहिजे. आणि कोठे थोडेसेही पाणी मुरते आहे, अशी शंका आल्यास गोवा आणि हैदराबाद या दोन्ही प्रदेशांवर ताबडतोब चढाई करून तेथील राज्यकर्त्यांची सत्ता संपुष्टात आणली पाहिजे.

आज निझामच्या भोवतालच्या सर्व प्रदेशात, विशेषतः मध्यप्रांतात, जनतेची अनेक स्वयंसेवक दले अस्तित्वात आहेत. आणि ब्रिटिश सत्तेला तोंड देण्यात त्यांनी आपआपल्या परीने प्रयत्नही केला आहे. या सर्व दलांनी आता रिकामटेकड्या परिषदा घेण्यात आपली शक्ती खर्च न करिता वऱ्हाड संरक्षणाचा प्रश्न आणि हैदराबाद जनक्रांतीचा प्रश्न ताबडतोब आपल्या हाती घेतला पाहिजे. वऱ्हाडच्या किसान-कामगारांची आणि तरुणांची दले उभारून, त्यांना लष्करी शिक्षण देऊन, जरूर पडल्यास गनिमी काव्याने लढण्यास त्यांना प्रवृत्त केले पाहिजे. आज प्रांतातील युवकांना वऱ्हाड आवाहन करीत आहे. प्रांतातील सर्व राष्ट्रीय दले या आवाहनाचा स्वीकार करून वऱ्हाडी जनतेचे निझामापासून संरक्षण करण्याची तयारी करतील काय ?

२६

हैदराबादची जनता आपणास बोलावीत आहे

६-७-४७

हैदराबाद संस्थान आम्ही ताबडतोब खालसा केले पाहिजे.

गेली १७ वर्षे हिंदुस्थान सरकारपासून हिंदी संस्थानिकांना विभक्त करण्याचे ब्रिटिशांचे धोरण आहे. त्यामुळेच हंगामी सरकारला संस्थानांवर आपला अधिकार प्रस्थापित करता आला नाही ही गोष्ट दिल्ली राजकीय परिषदेत भाषण करिताना पं. जवाहरलालजी यांनी निस्संदिग्ध शब्दात सांगितली. त्याचबरोबर संस्थानिकांनी ताबडतोब घटना समितीत सामील झाले पाहिजे. संस्थानिकांनी हे आमंत्रण नाकारल्यास हिंदुस्थान सरकार या छोट्या-मोठ्या संस्थानिकांना परदेशांशी स्वतंत्र तह करू देणार नाही, व वेळी प्रसंगी मध्यवर्ती सत्तेशी त्यांना दोन हात करणेसुद्धा भाग पडेल असा गंभीर इषारा पण त्यांनी दिला.

पण हैदराबादसारख्या मस्त संस्थानची आपल्या डोळ्यावरील धुंदी एवढ्याने नाहीशी होईल असे समजणे गैर आहे. आणि त्यामुळेच हिंदुस्थान सरकारला जरी ही धुंदी उतरविणे आज शक्य नसले तरी हिंदी जनतेने निझामच्या डोळ्यावर आलेली ही नशा ताबडतोब नाहीशी करावयास पाहिजे. बहुसंख्य हिंदू प्रजा असलेल्या हिंदुस्थानात हैदराबादचा पाकिस्तानी काटा यानंतरही सहन करणे म्हणजे आपला सर्वनाश करून घेणे होय.

खास हैदराबादी प्रजेच्या दृष्टीने सुद्धा हैदराबादची झोटिंगशाही अनिष्ट आहे. स्वातंत्र्यात प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाची शाश्वती आणि तिच्या विकासाची शक्यता या

दोनही गोष्टी अभिप्रेत आहेत.

१५ ऑगस्टच्या सुमारास हैदराबादचा लढा निश्चितपणे सुरू होईल. आम्ही जर तो सुरू न केला तर निझाम आमच्यावर तो जबरदस्तीने लादतील. तो लढा आमच्या ४२ च्या लढ्याप्रमाणे अयशस्वी होऊ द्यावयाचा नसेल तर आजपासूनच आम्ही प्रयत्न करावयास पाहिजे. लढा यशस्वी झाला तर हैदराबादेत जनक्रांती, इन्किलाब होणार आहे, आणि त्याच बरोबर सर्व हिंदुस्थानात सुखसंपदा नांदणार आहे. उलट लढा अयशस्वी झाला तर आमच्या जनशक्तीला पुनः कित्येक वर्षे वर तोंड काढता येणार नाही.

याकरिता आमची सर्व शक्ती एकवटून निझामाला एक शेवटचा 'तडाखा' हाणलाच पाहिजे. हैदराबादच्या या अंतिम युद्धाची तयारी करण्याकरिता, मध्यप्रान्त-वऱ्हाड आणि महाराष्ट्रातील जनतेच्या सेवकांनो, आपण आजपासूनच तयारी करा, आणि हैदराबाद युद्ध समित्या स्थापन करून आंध्र आणि कर्नाटक येथील जनतेला मार्गदर्शन करा. लोकनेत्यांनो आपणास अनुकूल काल आहे. विजयश्री आपणास माळ घातल्यावाचून राहणार नाही. उठा आणि कामास लागा. हैदराबादची जनता आपणास बोलावीत आहे.

२७

आमचे वऱ्हाड आम्ही निझामला देणार नाही

१३-७-४७

'बळी तो कान पिळी' असा न्याय आहे. याच न्यायाने अनेक साम्राज्ये निर्माण झाली किंवा ती धुळीला मिळाली. परंतु बळी तो कान पिळी हा न्याय अंमलात आणण्याकरिता कामचलाऊ का होईना व्यवस्था निर्माण व्हावी लागते. या नियमान्वये जबरदस्तीने लुबाडलेल्या धनदौलतीच्या आणि जमिनीच्या रक्षणाकरिता कायदा निर्माण झाला. या कायद्यान्वये केवळ कायदा करणाऱ्या सरकारला दुसऱ्यावर जुलूम जबरदस्ती करण्याची परवानगी मिळाली पण व्यक्तींना मात्र दुसऱ्याची धनदौलत उघडउघड लुबाडण्याची मनाई करण्यात आली. कठोर सत्याच्या अंतिम खोलीत शिरून न्याय देण्याची कायद्याला गरज नाही. आज अस्तित्वात असलेला कायदा आंधळा आहे. परंपरेचे पालन करणे एवढेच कायद्याला माहीत. 'बळी तो कान पिळी' या न्यायाने धनदौलत किंवा जमीनजुमला मिळविण्याचा आणि कायद्याचा बडगा दाखवून तो पचवावयाचा ही आजपर्यंतची जगाची रीत आहे. या रीतीतूनच 'खाजगी मालमत्ते'ची कल्पना निर्माण झाली. आज या कायद्याच्या जोरावरच वऱ्हाडवरील सार्वभौमत्व माझे आहे असा निझामाला दावा करिता आला आणि केवळ घटनात्मक दृष्टिकोणातून आणि अस्तित्वात असलेल्या कायद्याच्या आंधळ्या चाकोरीतूनच विचार करावयाचा झाला तर आज आमच्या राज्यकर्त्यांनी वऱ्हाडबाबत जी भूमिका स्वीकारली आहे तिचे इंगितही हेच आहे. इंग्रजांनी 'बळी तो कान पिळी' या न्यायाने सर्व हिंदुस्थान जसा स्वतःच्या घशात घातला तसा वऱ्हाड घातला नाही. वऱ्हाड त्यांना जबरदस्तीनेही आपल्या

साम्राज्यास जोडता आला असता. परंतु तसे न करता त्यांनी तो भाडेपट्ट्याच्या कराराने घेतला. त्यामुळे 'मालकमबगुजा' जमिनीवर ज्याप्रमाणे त्या जमिनीचा मालक आपला मालकी हक्क सांगतो, त्याचप्रमाणे वऱ्हाडवर निझामाने हक्क सांगण्यास सुरुवात केली आणि शेवटी कायद्याच्या पेचप्रसंगातून सुटका करून घेणे अशक्य आहे असे भासवून आमचे राज्यकर्ते वऱ्हाडचे उदक निझामच्या हातावर सोडणार असे स्पष्ट दिसू लागले.

पण जगात 'बळी तो कान पिळी' या न्यायापेक्षाही अधिक श्रेष्ठ असा न्याय आहे. आणि तो म्हणजे जनतेचा अधिकार. जोपर्यंत जनतेला आपल्या हक्काची जाणीव झाली नाही तोपर्यंत एका व्यक्तीला किंवा व्यक्तिसमूहाला सर्व समाजावर कुरघोडी करण्याला किंवा आपल्याला पाहिजे असलेला कायदा निर्माण करण्याला मुभा मिळाली म्हणून यावच्चंद्रदिवाकरौ समाज निझामासारख्या कंटकांना वाढवील असे समजणे चूक आहे. शेवटी बळी तो कान पिळी हाच जरी न्यायाचा नियम मानला तरी जनतेचे बल हे सर्वश्रेष्ठ आहे आणि मोठमोठी राजसिंहासने या शक्तीपुढे कोलमडून पडली आणि अनेक सम्राटांना आपला राजमुकुट उतरवून या शक्तीपुढे नत व्हावे लागले. ज्यांच्या साम्राज्यावर सूर्य कधी मावळत नाही असा ज्यांचा दिमाख होता त्या ब्रिटिश साम्राज्यशहांनासुद्धा शेवटी जनशक्तीपुढे हार खावी लागली. तेव्हा जेथे मोठमोठ्यांची डाळ शिजली नाही तेथे निझामसारख्या साम्राज्य-स्वप्नाळूची डाळ शिजेल असे समजणे वेडेपणाचे आहे.

देश किंवा प्रांत कोणाचीही खाजगी मालमत्ता होऊ शकत नाही. पैसे देऊन देश विकत घेता आले असते तर सर्व जगावर केवळ वाण्यांचेच राज्य झाले असते. देश किंवा प्रांत भाडेपट्ट्याने घेणेसुद्धा अशाच तऱ्हेचे आहे. जर वऱ्हाडशी केलेल्या भाडेपट्ट्याच्या जोरावर ब्रिटिश सरकार वऱ्हाड निझामला देणार असेल तर, वऱ्हाडी जनतेने निझामला सक्रिय उत्तर दिले पाहिजे. निझामला हे कळून चुकले पाहिजे की वऱ्हाड तर जाऊच द्या पण हैदराबादही त्याच्या मालकीचे नाही. दुसऱ्याजवळून जबरदस्तीने बळकावलेले संस्थान लोकशक्ती जागृत नाही तोपर्यंत जवळ ठेवता येते. पण लोकशक्ती जागृत झाल्यानंतरही जर संस्थानिकांनी आपली मिजास चालू ठेवली तर रशियाच्या झारची जी अवस्था झाली त्यापेक्षा निझामासारख्या संस्थानिकांची दुसरी अवस्था होणार नाही, हे त्यांनी पक्के लक्षात ठेवावे.

घटनात्मक दृष्टीने श्री. अल्लादि यांनी सुचविल्याप्रमाणे 'स्वतंत्र हिंद' कायद्यात वऱ्हाडबद्दल स्पष्ट उल्लेख करून वऱ्हाडची स्वायत्तता अबाधित ठेवण्याची खबरदारी आमचे नेते घेतीलच, पण या वैधानिक लढाईत आमचे पुढारी यशस्वी होतीलच असे समजण्याचे कारण नाही. कारण कायदा आंधळा आहे. या आंधळ्या कायद्याचा आश्रय घेऊन आमच्या राज्यकर्त्यांनी वऱ्हाडचे उदक निझामच्या हातावर सोडले तर लोकांची

ताकद जनतेची ताकद ही काय चीज आहे हे वडिलोपार्जित पराक्रमावर पुष्ट होऊ पाहणाऱ्या संस्थानी पांजरपोळांना कळावयास पाहिजे.

वऱ्हाडच्या संरक्षणाचा लढा हा प्रतिगामी शक्तीविरुद्ध लढा आहे. प्रतिगामी शक्तीचे बळ हे नेहमीच पैशाचे असते. पुरोगामी शक्तीचे बल हे नेहमीच श्रमाचे असते. हैदराबाद-वऱ्हाड लढ्यात काही प्रतिगामी शक्तींना वश करून घेण्याकरिता निझामने वऱ्हाडात ठिकठिकाणी साखर पेरावयास सुरुवात केली आहे, पण हे साखर पेरणे नसून सुरुंग पेरणे आहे हे वऱ्हाडी जनतेने लक्षात ठेवावयास पाहिजे. अमीर असो वा गरीब असो, वऱ्हाडकरिता लढणे हे प्रत्येक वैदर्भीयाचे कर्तव्य आहे. स्वातंत्र्ययुद्धात निझामाची साथ करून सूर्याजी पिसाळाचा शिक्का आपल्या कपाळावर लावून घेऊ नका. सूर्याजी पिसाळाचा कपाळमोक्ष झाल्यावाचून राहणार नाही.

वऱ्हाडचे स्वातंत्र्ययुद्ध जवळ आहे. सर्व हिंदुस्थानच्या आकांक्षा फलद्रूप होत असताना वऱ्हाडचे मात्र येऊ घातलेले स्वातंत्र्य नष्ट होण्याची वेळ आहे. केवळ जन-शक्तीच ते परत आणू शकेल.

संयुक्त महाराष्ट्रच पाहिजे

आजचा वऱ्हाडचा प्रश्न हा सर्व महाराष्ट्राचा प्रश्न आहे हे सर्व महाराष्ट्रबंधूंनी सुद्धा लक्षात ठेवले पाहिजे. ब्रिटिशांनी पंजाब आणि बंगालची फाळणी करण्याचा आपला डाव तडीस नेला. आता वऱ्हाडचे उदक निझामच्या हातावर सोडून महाराष्ट्राच्या हृदयात पाचर मारण्यात येत आहे. महाराष्ट्राला दुभंग केल्याने महाराष्ट्राची शक्ती क्षीण होणार आहे. निझामला ते पाहिजे आहे, परकीयांना ते पाहिजे आहे, दुसऱ्यांच्या शक्तीवर ज्यांचा देह पोसला जातो अशा पोटभरू लोकांनाही ते पाहिजे आहे. पण आम जनतेला ते नको आहे. वऱ्हाडच्या जनतेला महाराष्ट्राची फाळणी कधीच फायद्यात पडणार नाही. एकच भाषा बोलणारे, एकाच हाडामांसाचे लोक त्यामुळे एकमेकांना दुरावणार आहेत. वऱ्हाडवर अनेक आघात होत असताना वऱ्हाडची नव्हे सर्व महाराष्ट्राची जनशक्ती अशा रीतीने खच्ची करणे योग्य नाही. महाराष्ट्राची शक्ती खच्ची करणारे लोक हे महाराष्ट्राचे-विदर्भाचे शत्रू आहेत.

मार्गात आलेल्या सर्व कंटकांना बाजूस सारून आम्ही वऱ्हाडचा लढा लढलाच पाहिजे. वऱ्हाड आमचा आहे, आम्ही तो निझामास कधीही देणार नाही.

२८

आता तरी नवी दृष्टी येऊ द्या – लेखांक १ ला

२०–७–४७

काँग्रेसने चालविलेल्या आजपर्यंतच्या सर्व चळवळी जनतेकरिता होत्या आणि म्हणूनच त्या स्वराज्याकरिता, स्वातंत्र्याकरिताही होत्या. असहकाराची चळवळ असो की मिठाचा सत्याग्रह असो, सायमन कमिशनविरुद्धचे आंदोलन असो, वैयक्तिक सत्याग्रह असो, की भारत छोडो चळवळ असो, या सर्व चळवळींतून एकच सूर गवसतो, एकच विचार स्पष्ट होतो; काँग्रेसच्या सर्व चळवळी जनतेच्या हिताकरिता, गौरवाकरिता होत्या हे ते सत्य होय. त्यामुळेच निवडणुकीच्या आखाड्यात काँग्रेस जेव्हा उतरली तेव्हा जनतेच्या मतांवर काँग्रेसचा पुरेपूर विश्वास होता. जनता काँग्रेसशिवाय दुसऱ्या कोणालाच निवडून देणार नाही याची काँग्रेसला बालंबाल खात्री होती; आणि त्याप्रमाणे आजपर्यंत जनतेने काँग्रेसलाच साथ दिली आहे. परंतु काँग्रेसचा जनतेबद्दलचा विश्वास आता ढळू लागला आहे. प्रत्येक वेळी जनतेचा कौल आपल्याच बाजूस पडेल याची काँग्रेसला खात्री राहिली नाही, तसेच जनतेचाही काँग्रेसवरील विश्वास डळमळावयास लागला आहे. जनतेच्या स्वातंत्र्याकरिता लढणाऱ्या आणि ते जनतेला मिळवून देणाऱ्या संस्थेबद्दल लोकांच्या मनात असा अनादर का उत्पन्न झाला ?

संस्कृतात एक श्लोक आहे : हत्तीच्या भ्रमाने सिंहाच्या छाव्याने मोठमोठ्या गिरिशिला चूर्ण केल्या. परंतु दुर्दैवाने त्या गजारिश्रेष्ठाला मांसाचा एक लेशभर सुद्धा तुकडा मिळाला नाही. हिंदी जनतेने ब्रिटिश साम्राज्यशाहीशी झुंजण्याकरिता आपल्या पराक्रमाची शर्थ केली आणि आपल्या मानेवरील जोखड फेकूनही दिले. परंतु ज्या आशेने

तिने हा सर्व लढा केला ती आशा कितपत यशस्वी झाली ? कुंपणानेच शेत खाल्ले आणि किसान-मजदूर-प्रजा-राज्याचे स्वप्न मातीच्या ढेकळासारखे विरून गेले.

जनतेच्या डोळ्याला आज काय दिसते ? त्यागाचे चीज नाही, भोगास सोकावलेली तीच नोकरशाही, तेच गंजलेले राज्ययंत्र, त्यांचा तोच जुलूम, आणि तोच तमाशा. जे काँग्रेस मंत्रिमंडळाच्या कारकीर्दीत बदलले नाही ते स्वराज्यात तरी बदलेल कशावरून ? मनुष्य आशेवर जगत असतो. पूर्वी काँग्रेसचा जमाना आला तर ही परिस्थिती बदलेल अशी जनतेस आशा होती. पण आता तीही राहिली नाही. सर्व प्रतिभा नष्ट झाल्यामुळे चालू स्थितीशी तादात्म्य पावणारा प्रगतिपराङ्मुख नोकरवर्गच पुनः आपल्या जागी अढळ आहे. लोकनेत्यांचा जनता संपर्क सुटत चालला आहे आणि नोकरशाहीसंपर्क मात्र वाढत चालला आहे. 'स्वराज्य मिळविणारे' राज्याचा गाडा चालवू शकत नाहीत, असेही अनेक पुढारी बोलताना आढळतात. एक अर्थाने ही गोष्ट खरी आहे. पण तितकीच हीही गोष्ट खरी आहे की, 'क्रांती'बरोबर जुन्या युगाचे खरकटे, म्हातारी, प्रतिगामी झालेली नोकरशाहीसुद्धा बदलत असते. आज हिंदुस्थानास शांततेने स्वराज्य दान झाले आहे म्हणून; लढून जर का आम्ही आमचे स्वराज्य हस्तगत केले असते तर आजच्या नोकरशाहीतील कोणताही नोकरशहा आपल्या जागेवर शिल्लक राहिला नसता. समाजाच्या प्रगतीसाठी चिखलात रुतून स्थिर आणि जड झालेल्या समाजकंटकांच्या टाळक्यात हातोडा हाणावाच लागतो. मग तो अहिंसक पद्धतीने असो की हिंसक. याचेच नाव आहे राज्यक्रांती, आणि याचेच नाव आहे मूल्यांचे मूल्यीकरण. वेळोवेळी अशा तऱ्हेची राज्यक्रांती न झाली तर समाज निस्सत्त्व आणि चैतन्यहीन होतो. त्यात मुळीसुद्धा जीव राहात नाही.

आज आमच्या देशात अशीच परिस्थिती उत्पन्न झाली आहे आणि त्यामुळेच सर्व समाज चैतन्यहीन दिसत आहे. पण राज्यक्रांतीशिवाय आपणास स्वराज्य मिळाले असले तरी नवसमाजनिर्मितीचे आपले स्वप्न अद्याप प्रत्यक्षात यावयाचे आहे. नव्हे आपण वेळीच सावध न झालो तर ते जागच्या जागीच विरून जाण्याचा आणि त्यामुळे आपल्या आणि काँग्रेसच्या आजपर्यंतच्या कार्यावरही बोळा फिरण्याचा संभव आहे. अशा परिस्थितीत जी गोष्ट क्रांतीमुळे सहजासहजी आली असती ती समाजक्रांतीकरिता म्हणून आपण मुद्दाम केली पाहिजे.

ही नव्या युगाची सुरुवात आहे. हा स्वातंत्र्याचा प्रभातकाल आहे. स्वातंत्र्य प्रजेकरिता असते. प्रजेला स्वतंत्र करावयाचे असेल तर आपण आपल्या आजपर्यंतच्या समाजमूल्यांचे परीक्षण करून त्याचे पुनः मूल्यीकरण (Transvaluation) करावयास पाहिजे. नव्या युगाच्या सुमुहूर्तावर जुन्या समाजमूल्यांचे मूल्यीकरण करा, नवी दृष्टी येऊ द्या. तरच आपणास नवी सृष्टी निर्माण करिता येईल.

२९

आता तरी नवी दृष्टी येऊ द्या – लेखांक २ रा

२७-७-४७

आमच्या मागील अग्रलेखात, स्वातंत्र्य नजीक आले तरी स्वातंत्र्याबरोबर येणारा हर्षोत्साह जनतेत का संचरला नाही याचे निदान करण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. स्वातंत्र्याची 'प्रसादचिन्हे' म्हणून आलेली काँग्रेससरकारे यांच्याकडून जनतेने काही अपेक्षा केल्या होत्या. कोणत्याही कारणामुळे असो, अन्नवस्त्राचा देशात दुष्काळ पडल्यामुळे असो की १९३५ च्या कायद्याप्रमाणे जनतेच्या हिताच्या अनेक सुधारणा करणे देशातील प्रांतोप्रांतींच्या मंत्रिमंडळांना शक्य झाले नाही म्हणून असो, पण जनतेच्या अपेक्षा काँग्रेस सरकारला पुऱ्या करता आल्या नाहीत. पण केवळ एवढ्याच गोष्टीमुळे सामान्य जनतेच्या मनात काँग्रेसबद्दल नैराश्य येण्याचे विशेष कारण नव्हते. रशियामध्ये १९१७ साली राज्यक्रांती झाल्यानंतर सुरुवातीस केरेन्स्की सरकार अस्तित्वात आले. रशियात त्या वेळी हिंदुस्थानपेक्षाही अधिक बिकट परिस्थिती उत्पन्न झाली होती. आणि तरीही जनतेच्या प्रश्नाकडे लक्ष देण्याचे केरेन्स्की सरकारने टाळले. त्याचा परिणाम केरेन्स्की सरकारबद्दल प्रतिकूल मत होण्यात झाला. ताबडतोब नवीन क्रांती होऊन केरेन्स्की सरकार गडगडले आणि जनतेचा नेता लेनिन हा सोव्हिएट युनियनचा नियंता बनला. रशियात समाजवादी क्रांती झाली त्या वेळी सर्वत्र औदासीन्य पसरले होते. लोक अन्नाला मोताद झाले होते. पांघरण्यालासुद्धा लोकांजवळ वस्त्रे नव्हती. लढण्यास पुरेसे सैन्य आणि दारूगोळा नव्हता. प्रतिक्रांतीची सर्व सैन्ये आणि जगातील सर्व भांडवलशाही राष्ट्रे गिधाडांसारखी समाजवादी रशियावर तुटून पडली होती, आणि तरीसुद्धा त्या

युद्धात समाजवादी रशिया विजयी झाला. सर्व जगाचा पराभव करून, मजबूत समाजवादी सत्ता लेनिनला प्रस्थापित करता आली. कारण जनतेला आपला वास्तववादी नेता लेनिन याबद्दल विश्वास होता आणि लेनिनलाही जनतेबद्दल विश्वास होता. लेनिन आपल्याला कधीही दगा देणार नाही याची जनतेला खात्री होती. आपण उपाशी मरणार असू तर लेनिनसुद्धा उपाशी मरेल ही गोष्ट जनता प्रत्यही पाहात होती. केवळ दोन बटाटे आणि एक पावाचा तुकडा यावर जनतेकरिता अहोरात्र खपणारा लेनिन जनतेशी द्रोह करणे शक्य नव्हते. आणि म्हणूनच जनतेने लेनिनला साथ दिली. ऑक्टोबर क्रांती झाल्याबरोबर सर्वत्र नवचैतन्य खेळू लागले. १५ ऑगस्टला आपल्या देशात शांततेने होणारे सत्तादान 'ऑक्टोबर क्रांती' ठरावी एवढीच आमची इच्छा आहे.

ब्रिटिश राज्ययंत्रातील खिळे आणि स्वातंत्र्याच्या मार्गातील खीळ

येत्या १५ ऑगस्टला आम्ही आमच्या भाग्याचे विधाते बनणार आहोत. अनेक शतकांपासून अस्तंगत झालेल्या आमच्या स्वातंत्र्यमूल्याचे आता आम्हास दर्शन होणार आहे. याच मुमुहूर्तावर आमची सर्व समाजमूल्ये पुनः एकदा पारखून घेऊन आमचे राष्ट्र आणि आमचा समाज बलशाली बनविण्याकरिता आपण बद्धपरिकर झालो पाहिजे याच दृष्टीने आमच्या राष्ट्र संरक्षणाच्या कार्याची पहिली दिशा म्हणून जुन्या खिळखिळ्या झालेल्या राज्ययंत्रातील मर्मस्थानी लोकांच्या विश्वासातील लोकांची नेमणूक केली पाहिजे असे आम्ही प्रतिपादन केले होते. अमेरिकेसारख्या ठिकाणी आज अशी पद्धती अस्तित्वात आहे. प्रेसिडेंटच्या बरोबरच सर्व खात्यांचे प्रमुखसुद्धा नवीन निवडण्यात येतात आणि असेच करणे योग्यही आहे. जनतेशी चालबाजी करून ब्रिटिश साम्राज्याचे सदस्य बनलेल्या हांजीहांजीखोर लोकांना नवी दृष्टी कशी येणार आणि ते जनतेच्या हिताशी तद्रूप तरी कसे होणार!

प्रथम बलशाली हिंदुस्थान

पण केवळ राज्ययंत्रात नवीन खिळे घालून काम भागणार नाही. कोणत्या दिशेने आपण राज्ययंत्र हाकले तर जनतेचे कल्याण होणार आहे हेही आपणांस कळावयास पाहिजे.

आमच्या दुर्दैवाने म्हणा किंवा कालचक्राचा महिमा म्हणून म्हणा एका हिंदुस्थानचे दोन तुकडे झाले आहेत. पण या घटनेवर आसू ढाळीत बसल्याने दोन तुकडे परत एक होतील असे समजणे अवास्तव आहे. एका आरशाचे दोन तुकडे झाल्यानंतर त्यांना जोडून पुनः त्यांचा एक आरसा कधीही आणि कोणालाही करता येत नाही. आरशाचे तुकडे कितीही एकमेकांना जोडले तरी दोन तुकडे ते दोन तुकडे. हिंदुस्थानचे दोन तुकडे

झाल्यानंतर 'हिंदु' हिंदुस्थानचे बलशाली समाजवादी राष्ट्र बनविण्याचे सोडून 'अखंड हिंदुस्थान' ह्या जीर्णमूल्य घोषणेचा जप करीत बसणे अत्यंत मूर्खपणाचे आणि देशघातकीपणाचे आहे. अशा घोषणा करण्यात केवढाही जहालपणा दिसला तरी तशा घोषणाबहादुरांना नवी दृष्टी तर आलीच नाही पण त्यांच्या डोळ्यावरील जुनी झापडही गेली नाही असेच म्हणावे लागेल. अशा घोषणांचा पाकिस्तानवर काहीही परिणाम व्हावयाचा नाही. पण आमच्या मुसलमानधार्जिण्या वृत्तीमुळे आणि मृगजळाचा ध्यास घेण्यामुळे आम्ही मात्र निर्बलच राहू. आम्हास अखंड हिंदुस्थान पाहिजे असले तरी दुर्बल हिंदुस्थानचा खंड अखंड हिंदुस्थान निर्माण करू शकणार नाही. हिंदुस्थानात हिंदुपदशाही स्थापन झाली पाहिजे असे आमचे म्हणणे आहे, असा आमच्या म्हणण्याचा कोणी विपर्यास करू नये. परंतु जे आमच्या राष्ट्रास वस्तुतः आवश्यक आहे तेच आम्ही केले पाहिजे. अखंड हिंदुस्थानकरिता आम्ही जेव्हा लढलो तेव्हा ज्या ज्या मूल्याचे आम्ही जतन केले, त्या मूल्याचे 'अखंड हिंदुस्थान' मृगजल ठरले तरी जतन करीत बसणे योग्य होणार नाही. जगाच्या चढाओढीत आमचे राष्ट्र टिकवायचे असेल तर 'अखंड हिंदुस्थानचा' घोष केल्याबरोबरच त्याच्या अनुषंगाने येणाऱ्या इतर गोष्टींचाही विचार करावयास आपण तयार झाले पाहिजे.

स्वतंत्र हिंदुस्थानची नवी सृष्टी निर्माण करिताना आपणास आणखीही अनेक बाबतींत नवी दृष्टी यावयास पाहिजे. पण त्याचा विचार पुढील लेखांकात करू.



३०

आता तरी नवी दृष्टी येऊ द्या – लेखांक ३ रा

३-८-४७

१५ ऑगस्टला आमच्या देशात नवीन युगास सुरुवात होणार आहे, आजपर्यंत आम्ही परतंत्र होतो. आता आम्ही स्वतंत्र होणार आहोत. परतंत्र देशातील प्रश्न आणि स्वतंत्र राष्ट्रातील प्रश्न भिन्न असतात ही गोष्ट आम्हांस कळावयास पाहिजे. स्वातंत्र्यप्रेमी परतंत्र लोकांपुढील मुख्य कार्य परकीसत्ता उलथून पाडण्याचे असते. उलट स्वतंत्र झालेल्या जनतेला नवे राष्ट्र, नवा समाज, नवे जग निर्माण करावयाचे असते. परतंत्र लोकांचे मुख्य कार्य हे विघातक असते. विधायक म्हणून करण्यात येणारा कार्यक्रम हा सुद्धा पुढील विनाशक झुंजीची तयारी किंवा साधन म्हणूनच आपण अमलात आणीत असतो. उलट स्वतंत्र झालेल्या लोकांचे मुख्य कार्य उत्पादक असते. वरील कारणामुळेच परतंत्र देशातील पुढारी राज्यकर्त्यांविरुद्ध असंतोष पसरविण्याचा प्रयत्न (agitation) करीत असतात. परकीय सत्ता निःशक्त करीत करीत नष्ट करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. देशात अशांतता (chaos) माजली तरी चालेल, पण परकी सत्ता नको असे त्या वेळी धोरण असते आणि म्हणून पुष्कळदा जनतेस अतंत्र वागण्यासही शिकविण्यात येते.

वरील सामान्य नियमास परतंत्र हिंदुस्थान अपवाद नव्हते. पारतंत्र्यातून स्वातंत्र्याकडे जाण्याच्या मार्गावर वाढत्या असंतोषाचे टप्पे असतात. हा असंतोष अत्यंत प्रखर झाला, त्याला जनशक्तीची जोड मिळाली आणि चमत्कार झाल्याप्रमाणे जुनी सत्ता जाऊन नवीन सत्ता आली तर आपण (राज्य) क्रांती झाली असे समजतो. पण वास्तविक प्रत्येक असंतोषाच्या पोटी क्रांतीची बीजे साठवलेली असतात. शांततेने सत्तादान झाले तरी सुद्धा

असतात. कारण शेवटी गुलाम देशाचे आणि गुलाम देशांतील पुढाऱ्यांचे अस्त्र एकच– असंतोष. आणि या अस्त्राचा प्रयोग करणे म्हणजे असंतोषप्रवर्तक आणि असंतोष-प्रसारक लोकांची संख्या वाढविणे. ज्या वेळी अशा असंतुष्ट लोकांची संख्या इतकी वाढते, की इतउत्तर आपल्याला आपल्या शक्तीच्या भरवशावर जनतेला आपल्या गुलामगिरीत अडकवून ठेवता येणार नाही ही गोष्ट राज्यकर्त्यांना दिसते त्याच वेळी पुढील अनर्थ टाळण्याकरिता शांततेने सत्तादान होत असते. पण अशा रीतीने शांततेने सत्तादान जेव्हा होते तेव्हा देशातील प्रतिगामी लोकांच्या हाती सत्ता जाते, जुन्या नोकरशाहीची चौकट तशीच कायम राहते, सत्तादान होईपर्यंत क्रांतीसाठी ज्यांचे बाहू फुरफुरत असतात असे लोकसुद्धा अधिकारासाठी हपापू लागतात. ते तत्त्वच्युत होऊ लागतात, त्यांच्यात अधिकाराची लालसा उत्पन्न होते आणि मिळालेल्या अधिकारास ते बळी पडतात. अर्थात काही लोक याला अपवाद असू शकतात.

अधिकाराच्या ठिकाणी ज्यांची वर्णी लागली नाही असाही वर्ग देशात असतो, त्यांची अधिकारावर वर्णी लागली नसते कारण हुकमी लोकमत त्यांच्या बाजूस नसते. पण हे क्रांतीचे पाईक अशी समजूत करून चालतात की क्रांतिनिष्ठ असल्यामुळेच आपण अधिकारलालसेस बळी पडलो नाही. असे लोक आपल्या पूर्वकर्मांवर (केलेल्या किंवा न केलेल्या) जगत असतात आणि कोणत्याही सांदीपनीने किंवा शुक्राचार्याने यांना असंतोष उत्पन्न करण्याशिवाय दुसरी विद्या शिकविली नसल्यामुळे जनतेत केवळ असंतोष फैलावण्याचा प्रयोग ते सर्रास करीत असतात. अशा लोकांचेही दोन प्रकार आहेत. यांपैकी काही लोकांना हे निश्चित माहीत असते की अधिकारी पदावर असलेल्या लोकां-विरुद्ध असंतोष फैलावणे हाच केवळ आपल्या बाजूस लोकमत वळविण्याचा एकमेव मार्ग आहे. याच लोकांतील उरलेल्या काही लोकांची क्रांतीची नशा अद्याप उतरलेली नसते, आणि आपण ज्या ज्या माकडचेष्टा करतो, त्या सर्व क्रांतीच्या प्रक्रियेचाच एक भाग आहेत असे समजून आपल्या वस्तादाच्या सुरात सूर मिसळून हे बहादूर क्रांतीची गीते गात आपल्या वस्तादाशी 'अहो रूपम् अहो ध्वनीची' साथ करीत फिरत असतात. ४२ चा काळ संपून पाच वर्षे झाली आणि देशातील वातावरण आमूलाग्र बदलले तरी अद्यापही ४२ च्या पुण्यावर जगू पाहणारे लोक या वर्गात मोडू शकतील.

असे लोक जरी क्रांतीची भाषा बोलत असले तरी असंतोष उत्पन्न करणारे जोशिले भाषण करण्याखेरीज, राष्ट्रसंवर्धनास आवश्यक असलेली कोणतीच गोष्ट त्यांना करिता येत नाही. पण याकरिता अशा लोकांनाही दोष देण्यात अर्थ नाही.

असंतोषाच्या कार्यक्रमाखेरीज इतर कोणताही कार्यक्रम आम्ही आजतागायत चोखाळला नाही. गांधीजी विधायक कार्यक्रमावर भर देत होते. पण विधायक कार्य-क्रमाच्या पोटकमिट्या नेमण्याखेरीज आमच्याकडून पद्धतशीर असे काहीच झाले नाही.

गांधीजींच्या विधायक कार्यक्रमाची आपण केवळ थट्टाच केली. पण गांधीजींचा विधायक कार्यक्रम जरी सोडला तरी कार्यकर्ते निर्माण करण्याच्या दृष्टीने आम्ही खरोखर काही करू शकलो नाही. आमच्यापैकी मी मी म्हणणाऱ्या मोठ्या कार्यकर्त्यांना सुद्धा आपल्याला निर्माण करावयाच्या नव्या जगाची कल्पना नव्हती, अस्तित्वात आणावयाच्या नव्या मूल्यांची जाणीव नव्हती, किंवहुना ज्या ज्या गोष्टींकरिता आपण झगडलो किंवा झगडतो त्यांचा पुसटतासुद्धा परिचय नव्हता. यामुळेच ज्या 'रामराज्याचा' किंवा किसान मजूर प्रजाराज्याचा आपण अहर्निश जप करीत होतो, त्याची रूपरेखा आतापर्यंत आपणास आखता आली नाही.

पण मागील घटनांना महत्त्व असले तरी सर्व जुन्या इतिहासाला मूठमाती देण्याची वेळ आता आली आहे. आपण आता आपल्या देशाचे आणि भाग्याचे नियंते बनलो आहोत. आपल्याला आता नवीन इतिहास घडवावयाचा आहे; नवीन राष्ट्र उदयास आणावयाचे आहे. त्याकरिता किसान-मजुरांच्या प्रश्नाचा अभ्यास करून ते समजून घेणारे कार्यकर्ते आता आपण पैदा केले पाहिजेत. केवळ असंतुष्ट लोकांचा तांडा आता आपणास चालणार नाही. असंतोष ही क्रांतीला आवश्यक अशी बाब असली तरीसुद्धा निर्मातृत्व (Creative faculty) नसलेले असंतुष्ट लोक काही खरे क्रांतिकारक होऊ शकत नाहीत. आपल्याला निर्माण करावयाच्या जगाचे चित्र क्रांतिकारकांना ज्ञात असावयास पाहिजे. केवळ शौर्य, धैर्य किंवा निष्ठा असून काम भागणार नाही. आमची ४२ ची क्रांती अयशस्वी का झाली हे आता तरी आम्ही समजवून घ्यावयास पाहिजे. आमच्यापाशी बहादूर लोक कमी होते म्हणून आमची क्रांती अपयशस्वी झाली असे समजणे चूक आहे. आमच्याजवळ निष्ठावान लोक कमी होते म्हणून आमची ४२ची क्रांती अयशस्वी झाली असेही समजणे चूक आहे. आमची क्रांती अयशस्वी झाली याचे कारण एकच. ज्याप्रमाणे आम्ही एक सत्ता नष्ट करू शकलो त्याप्रमाणे दुसरी सत्ता उत्पन्न करू शकलो नाही. आम्हास असंतोष उत्पन्न करणे माहीत होते पण नवीन जग निर्माण करणे, हाती आलेल्या सत्तेचे नियंत्रण करणे आम्हास माहीत नव्हते. आम्हांस चक्रव्यूहात जाणे माहीत होते पण त्यातून बाहेर येणे माहीत नव्हते. आमच्या आजपर्यंतच्या सर्व अपयशाचे सार एकच– आमच्याजवळचा विधायक कार्यकर्त्यांचा अभाव. स्वराज्याच्या वारूवर आरोहण करीत असताना आतातरी आमच्यातील ही कमजोरी आम्ही नष्ट केली पाहिजे. आता तरी आम्हाला नवी दृष्टी आली पाहिजे. नाहीतर आपणास नवी सृष्टी उत्पन्न करिता येणार नाही.

३१

स्वतंत्र भारता, तुझा जयजयकार असो !

१५-८-१९४७

आज आपण स्वतंत्र राष्ट्राचे नागरिक झालो आहोत. स्वतंत्र राष्ट्राचे नागरिक म्हणून आपल्या गतेतिहासाचे सिंहावलोकन करू लागलो तर आपणास अनेक गोष्टी शिकता येतील. दारिद्र्य आणि गुलामगिरी माणसाला कोणत्या पापाला प्रवृत्त करीत नाहीत ? माणसातील माणुसकी या दोनच कारणांनी नाहीशी होते आणि म्हणूनच साम्राज्य-शहांना गुलाम लोकांतून नेहमीच सूर्याजी पिसाळ मिळत राहतात आणि याच सूर्याजी पिसाळाच्या भरवंशावर साम्राज्यशहाचे राज्य गुलाम लोकांवर अखंड चालू राहते. साम्राज्यशहांच्या या अक्काबाईच्या फेऱ्यातून निघणे ही सामान्य गोष्ट नाही. परंतु आपल्या सुदैवाने आज आपण साम्राज्यशहांच्या मगरमिठीतून बाहेर निसटलो आहोत. या प्रसंगी आपले अधःपतन थांबवून आपण तेजस्वी आणि खरोखरच स्वतंत्र होण्याचा प्रयत्न करावयास पाहिजे.

'स्वतंत्र' होणे म्हणजे काय हे आपण नीट समजावून घेतले पाहिजे. स्वतंत्र होणे म्हणजे अतंत्र होणे नव्हे, अतंत्र मनुष्य हा परतंत्र मनुष्यापेक्षाही अधिक अगतिक होतो. रशियन राज्यक्रांतीच्या वेळेची गोष्ट सांगतात, एका म्हाताऱ्या बाईला वाटले– स्वतंत्र होणे म्हणजे अतंत्र वागणे– सर्व ताळतंत्र सोडून वागणे, सर्व निसर्गनियमांना किंवा समाज-नियमांना सोडून वागणे, अतंत्र वागत असता शेवटी बिचारीचा एका मोटारगाडीला बळी पडला. या गोष्टीपासून आपण धडा शिकावयास पाहिजे. स्वतंत्र होणे म्हणजे बेजबाबदार रीतीने वागणे नव्हे तर जबाबदारी ओळखून वागणे आहे. स्वातंत्र्यात प्रत्येक व्यक्तीच्या

जीवनाची शाश्वती आणि त्याच्या विकासाची शक्यता अभिप्रेत असते. प्रत्येक मनुष्य आपली जबाबदारी ओळखून वागला तरच हे शक्य आहे, तरच आपणास खरे स्वातंत्र्य मिळण्याचा संभव आहे. ज्या समाजातील घटक बेजबाबदार आहेत त्या समाजात व्यक्तीच्या जीवनाची किंवा त्याच्या विकासाची काय खात्री राहणार? मिळणाऱ्या स्वातंत्र्याबरोबर अंगावर पडलेल्या वाढत्या जबाबदाऱ्या ओळखण्यासही आपण शिकले पाहिजे.

आम्हास स्वातंत्र्य मिळाले पण आमचे क्रांतीचे काम अद्याप पुरे व्हावयाचे आहे. समाजात आणि समाजमूल्यांत बदल घडवून आणणे हाच क्रांतीचा आत्मा आहे. राजकीय स्वातंत्र्य हे केवळ साधनमात्र असते. वर्षानुवर्षे गुलामगिरीत सडत राहिल्याने आपला झालेला अधःपात भरून काढणे याचेच नाव आहे समाजक्रांती. आणि या समाजक्रांतीकरिता आता आपण कंकण बांधावयास पाहिजे. माणसाचा अधःपात हा गुलामगिरी आणि दारिद्र्य यामुळे होतो. त्यापैकी गुलामगिरीच्या आपल्या शृंखला तुटल्या आहेत. आता दारिद्र्याची बंधने तुटू द्या. दारिद्र्याची बंधने जोपर्यंत तुटत नाहीत तोपर्यंत समाजातील प्रत्येक घटकास आपल्या जीवनविकासाकरिता सारख्या संधी मिळतील असे समजणे चूक आहे. दारिद्र्याची पकड हीच एक मोठी गुलामी आहे, आणि आज हिंदुस्थान स्वतंत्र झाला तरी ही दारिद्र्याची पकड अद्याप सैल झाली नाही.

ही दारिद्र्याची पकड नाहीशी करावयाची असेल तर आपणास तावडतोब समाजवादाचाच स्वीकार केला पाहिजे आणि नव्या युगाशी तादात्म्य होणारे नेते समाजवादाचा स्वीकार करतील अशी आशा बाळगावयास हरकत नाही.

समाजवादी व्यवस्था आणि किसानमजूर राज्य आम्ही एकसम समजतो. किसान-मजूर राज्य म्हणजे अतंत्र वागणाऱ्या किसान-कामगारांचे राज्य नव्हे. किसान-कामगार राज्य म्हणजे निर्बुद्ध लोकांचेही राज्य नव्हे. निदान आम्हास असा अर्थ अभिप्रेत नाही. कोणत्याही किसानाला किंवा कोणत्याही कामगाराला राज्यशकटाच्या जबाबदारीच्या कोणत्याही जागेवर बसवून द्यावे असे कोणताही शहाणा माणूस म्हणणार नाही. पण त्याचबरोबर राज्ययंत्रातील जबाबदारीच्या पदावर बसण्याची काही ठरावीक (Vested interests) लोकांचीच मक्तेदारी आहे असे समजणे ही चूक आहे.

जागृत किसान-कामगारांतून सुद्धा अत्यंत लायक मनुष्य निपजू शकतो. फक्त त्याला संधी मिळाली पाहिजे. आज ही संधी प्रायः किसान-कामगारांच्या दारिद्र्यामुळेच त्यांना मिळत नाही. उद्या किसान-कामगारांना जीवन-विकासाची संधी मिळाली, तर त्यांच्यातून मोठमोठे राजपुरुष निपजणार नाहीत असे कोण सांगू शकेल? तेव्हा किसान-कामगार राज्य म्हणजे निर्बुद्ध लोकांचे राज्य असा समज कोणीही करून घेऊ नये. आज असा गैरसमज प्रसृत होतो याचे कारण राज्यसंस्था ही जनतेच्या 'सोय्या' करिता असत

नाही, तर शोषणाकरिता असते. जेथे जनतेचे शोषण करणे हा राज्यसंस्थेचा एक भाग होऊन जातो तेथे राज्यतंत्रात अधिकारावर असलेल्या लोकांना आपली शक्ती टिकविणे, येन केन प्रकारेण टिकविणे हेच साध्य होऊन बसते. आणि त्यातूनच बहुजन समाजाच्या गांजणुकीस सुरुवात होते.

परंतु शासनसंस्थेत ज्याप्रमाणे राज्ययंत्रातील अधिकारी लोकांच्या 'शक्तीची' कल्पना अभिप्रेत असते त्याचप्रमाणे सर्व समाजाच्या सौख्याचीही कल्पना अभिप्रेत असावयास पाहिजे. "सर्वेऽपि सुखिनः सन्तु" 'सर्व लोकांनी सुखी व्हावे' याकरिता प्रयत्न करणे हेच भारतीय कल्पनेप्रमाणे शासनसंस्थेचे कार्य आहे. आणि हेच शासन-संस्थेचे कार्य असावयास पाहिजे. केवळ समाजघटकाचे शोषण करणे हेच जर शासन-संस्थेचे कार्य असेल तर शासनसंस्था पाहिजे तरी कशाला ? पण समाजसौख्याची कल्पना सोडून देऊन माणूस, अधिकार प्राप्त झाल्याबरोबर जेव्हा स्वसौख्याचाच विचार करू लागतो तेव्हा सर्व समाजाला सुखी करण्याचे त्याचे काम तसेच राहते आणि तो स्वतःची शक्ती कशी वाढेल याचाच विचार करू लागतो, त्याच्याचसारखे विचार करणारे काही स्वार्थी संधिसाधु लोक त्याला मिळतात आणि मग शासनसंस्थेचे कार्य आणि समाजकारण बाजूला राहते व स्वतःच्या स्वार्थाकरिता हे सारे लोक शक्तीची उपासना करू लागतात. अशाच लोकांच्या डोक्यातून किसान-कामगारांच्या हातात राज्याची धुरा देणे अयोग्य आहे अशी विचारसरणी प्रसृत होते.

परंतु शक्तीची उपासना नव्हे, तर सर्व समाजाला सुखी करणे, त्यांना पोटभर खाऊ घालणे, अंगभर घालायला देणे, आणि जीवनाच्या सुखसोयी त्यांना प्राप्त करून देणे, केवळ मूठभर गर्भश्रीमंतांना नव्हे तर समाजातील सर्व घटकांना, किसान-मजुरांनासुद्धा प्राप्त करून देणे हेच जर आपल्याला अभिप्रेत असेल तर असे राज्य किसान-कामगारांचे राज्य नव्हे तर काय निर्बुद्ध लोकांचे राज्य होईल ? जर राज्ययंत्रातील अधिकारावर असलेल्या लोकांच्या वशिल्याने एखाद्या माणसास संधी मिळणार नसेल आणि माणसाच्या खऱ्या कर्तृत्वामुळेच एखाद्यास संधी मिळणार असेल तर अशा राज्याला का निर्बुद्ध लोकांचे राज्य म्हणावयाचे ? किसान-कामगार राज्य हे किसान-कामगारांचेही राज्य आहे आणि किसान-कामगारांकरिताही आहे.

किसान-कामगारांची शक्ती अमोघ आहे, त्यांच्या शक्तीचा ज्यांना बाऊ वाटतो तेच किसान-कामगारांच्या राज्याला निर्बुद्ध लोकांचे राज्य म्हणून संबोधतील. परंतु किसान-कामगारांचे राज्य हे सर्व समाजाचे राज्य असल्यामुळे सामान्य माणसाला ते विलोभनीयच वाटेल.

आता आपण स्वातंत्र्याची वाट चढून आलो. आपले स्वातंत्र्य हे या किसान-कामगार राज्याची शिडी ठरू द्या. भारताच्या स्वातंत्र्यातूनच आम्ही किसान-कामगार

राज्याचे स्वप्न पाहात असल्यामुळेच आम्हास भारताचे स्वातंत्र्य अत्यंत महत्त्वाचे वाटते. स्वतंत्र भारता, तुझा जयजयकार असो. आमचे किसान-कामगार राज्याचे स्वप्न खरे ठरू दे, जयहिन्द !!


ग्रामीण ग्रंथालय दापोली
ग्रं. क्र. .....
ग्रंथ. शाखा (स्थानिक प्रत)

३२

आता चला समाजक्रांतीच्या वाटेने

३१-८-४७

१५ ऑगस्टचा सुखसोहळा साऱ्या हिंदी जनतेने मोठ्या आनंदाने पार पाडला. हिंदी जनता स्वातंत्र्याची वाट चढून आली असून ज्या काँग्रेसचे नेतृत्व तिने स्वातंत्र्यशिखर गाठण्याकरिता स्वीकारले त्या काँग्रेसच्या ध्येयाची पूर्ती झाली आहे. जगातील अत्यंत बलवान अशा साम्राज्यशाहीच्या मगरमिठीतून हिंदी जनतेने स्वतःला सोडवून घेतले आहे. निःशस्त्र आणि दुर्बल जनतेने एका महान नेत्याचे लढ्याचे तंत्र वापरून ब्रिटिश साम्राज्यशहांना आपले चंबुगवाळे उचलण्यास भाग पाडले आहे.

१५ ऑगस्टपासून आम्ही आमच्या भवितव्याचे स्वामी झालो आहोत. आमच्यावरील गुलामगिरीचे जू आम्ही फेकून दिले आहे. अर्थात आजवर ब्रिटिशांच्या हातात असलेली राजकीय सत्ता आमच्या हातात आली आहे. हिंदी राज्यनौकेचे सुकाणू हिंदी पुढाऱ्यांच्या हातात आले आहे.

परंतु, आम्ही स्वातंत्र्य अंकात सांगितल्याप्रमाणे स्वातंत्र्यप्राप्तीबरोबरच आमच्या शिरावर फार मोठ्या जबाबदाऱ्या येऊन पडल्या आहेत. त्या नीट पार पाडणे हे आमचे आद्य कर्तव्य आहे.

आणि त्या पार पाडत असताना आमच्या मार्गात असलेल्या अडचणींची व संकटांची पूर्ण माहिती असणे आवश्यक आहे. कारण ब्रिटिश साम्राज्यशहांच्या गेल्या १५०-२०० वर्षांच्या धुमाकुळाने हिंदी राज्यकारभारात, अर्थकारणात व एकंदर सामाजिक जीवनात अनेक लहान-मोठे गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यांच्या वास्तव्यात त्यांनी

स्वतःच्या फायद्याकरिता अनेक बऱ्यावाईट गोष्टी गेल्या; अनेक भानगडी निर्माण केल्या. त्या सर्वांना निस्तरून आम्हाला पुढील मार्ग आक्रमावयाचा आहे. उज्ज्वल भविष्याकडे आम्ही डोळे लावून बसलो असलो तरी सद्यःस्थितीच्या सत्यस्वरूपाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. नव्हे, तिचे नीट, वास्तविक आकलन करणे आवश्यक आहे, अपरिहार्य आहे.

'इन्किलाब'च्या स्तंभातून आम्ही नेहमी किसान-कामगार राज्याचा पुरस्कार करीत आलो आहोत. सामाजिक मूल्यात परिवर्तन घडवून आणणे म्हणजेच क्रांती असे आम्ही समजतो.

ही सामाजिक मूल्ये कोणती ? परकीय सत्तेच्या पायाखाली चिरडल्यामुळे, गुलामगिरीत सडल्यामुळे गेली कित्येक वर्षे आमचा अधःपात होत होता. हा अधःपात नाहीसा करून आमचे गेलेले स्वत्व मिळविण्यासाठी आम्ही स्वातंत्र्यलढा पुकारला. आणि अनेक वर्षांच्या झुंजीनंतर, अनेकांच्या रक्तसिंचनानंतर आम्ही आपले साध्य साध्य केले. राजकीय स्वातंत्र्यप्राप्तीने आमच्या जागतिक दृष्टिकोणात फरक झाला आहे. आमची इतर राष्ट्रांकडे, परकीयांकडे पाहण्याची दृष्टी बदलली आहे. आमच्या मूल्यात बदल झाला आहे.

परंतु केवळ राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करूनच खरी सामाजिक क्रांती होत नसते. स्वतंत्र पण आर्थिक दृष्ट्या अत्यंत मागासलेले, दारिद्र्यात खितपत पडलेले लाखो लोक आज हिंदुस्थानात आहेत. ब्रिटिश साम्राज्यशहांच्या फायद्याकरिता हिंदी जनतेला दारिद्र्याचे जीवन कंठणे भाग पडत होते. किंबहुना त्यांना तसे ठेवण्यानेच त्यांची हिंदुस्थानावरील पकड पक्की राहू शकत होती. आम्ही आता आमचे राज्यशकट स्वतः हाकणार असून हिंदी जनतेचे हे दारिद्र्य नाहीसे करण्याचे कार्य आम्हालाच करावयाचे आहे. आजवर काँग्रेस म्हणजे जनतेची संघटना, काँग्रेसचे ध्येय ते जनतेचे ध्येय, काँग्रेसचा स्वार्थत्याग म्हणजेच जनतेचा स्वार्थत्याग, हाच अर्थ अभिप्रेत होता. काँग्रेसला हिंदी जनतेच्या जोरावरच राज्ययंत्र काबीज करता आले असल्याने त्या जनतेच्या हिताकरिता सर्व खटपट तिच्या पुढाऱ्यांनी करणे आवश्यक आहे, नव्हे, ते त्यांचे कर्तव्य आहे.

हिंदी जनतेच्या हलाखीच्या परिस्थितीकडे पाहिल्यास, आमच्या क्रांतीचे कार्य अद्याप पुरे व्हावयाचे आहे असे आम्ही जे म्हणतो, त्याचा अर्थ ध्यानात येईल. हिंदी जीवन पाच लक्ष खेड्यांत व्यतीत केले जाते. खेड्यापाड्यातून पसरलेल्या ह्या अफाट जनतेची आजची आर्थिक परिस्थिती अत्यंत शोचनीय आहे. जमीनदारांनी लाथाडावे, सावकारांनी लुबाडावे व सरकारी अधिकाऱ्यांनी गांजावे अशी आमच्या बहुसंख्य किसानांची अवस्था आहे. ह्या दुर्लक्षित्या गेलेल्या हिंदी किसानवर्गावर जमीनदार, मालगुजार, जहागिरदार व सावकार आदी प्रतिक्रियावादी व सरंजामी शक्तीची पकड ब्रिटिश साम्राज्यशाहीत

पक्की करण्यात आली. काँग्रेसची सरकारे प्रांताप्रांतातून दीड वर्षापूर्वी स्थापन झाल्यापासून ह्या परिस्थितीत म्हणण्याजोगा काहीच बदल घडून आला नसून किसानांची गांजणूक व पिळवणूक पूर्वीप्रमाणेच सर्रास तशीच चालू आहे.

जवळजवळ असाच प्रकार शहराशहरातून पसरलेल्या वाढत्या कामगारवर्गाच्या बाबतीतही दृष्टोत्पत्तीस येतो. रात्रंदिवस काम करूनही पोटभर अन्न व अंगभर वस्त्र न मिळणाऱ्या मजूरवर्गाला कोण ओळखीत नाही ? जीवनाच्या प्राथमिक व आत्यंतिक गरजाही जेथे भागविणे शक्य नाही तेथे स्वतःच्या विकासाकरिता आवश्यक अशा शिक्षणादी सुखसोयी त्यांना कोठून मिळणार ?

आमच्या क्रांतीचा अर्थ हाच की हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यातून पसरलेल्या ह्या बहुजन समाजाला शाश्वतीचे, सुखाचे व समाधानाचे जीवन कंठणे सुलभ झाले पाहिजे. बहुजन समाजाला दारिद्र्याच्या गर्तेतून वर ओढणे व त्याबरोबरच त्याचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलून त्यास आपल्या स्वत्वाची जाणीव करून देणे म्हणजेच समाजक्रांती. राजकीय स्वातंत्र्य ही समाजक्रांती घडवून आणण्याचे केवळ साधन होय; त्या समाजक्रांतीच्या मार्गावरील एक टप्पा होय.

तेव्हा, राजकीय स्वातंत्र्य प्राप्त झाले, आता आमचे कार्य संपले, असे म्हणून आम्हांस स्वस्थ बसता येणार नाही. किसान-कामगारांच्या राज्याचे स्वप्न खरे होण्याकरिता भारतीय स्वातंत्र्याची आवश्यकता होती. नवसमाज-निर्मितीला आवश्यक असा पाया तयार झाला आहे. खरी इमारत यापुढेच बांधावयाची आहे. ती इमारत बांधण्याकरिता आम्हाला कामास लागले पाहिजे. आणि हिंदुस्थानच्या अफाट मनुष्यशक्तीचा फायदा एक पक्की इमारत बांधण्याकरिता घेणे आवश्यक आहे. ह्या जनशक्तीला उपेक्षून बांधली जाणारी इमारत पक्की असणे शक्य नाही. ती फार काळ टिकणार नाही. कारण ती अमोघ जनशक्ती स्वस्थ बसण्यास तयार नाही. किसान-कामगारांचे राज्य स्थापन करून त्यांच्या आजवर उपेक्षिलेल्या आशा-आकांक्षांची तृप्ती करणे ही आमची जबाबदारी आम्ही पार पाडली पाहिजे. समाजवादातच हिंदुस्थानचे कल्याण आहे.

३३

आमच्या सहनशीलतेची मर्यादा कधी संपणार ?

७–९–४७

"आम्ही समाजवादी आहोत. आमचा जात-पात-धर्मांवर विश्वास नाही. आम्ही हिंदु-मुसलमान हा भेद मानीत नाही. आमचा अखंड भारतावरील विश्वास अढळ आहे." अशा प्रकारचे विचार उदात्त आणि ध्येयनिष्ठेचे द्योतक खास आहेत. पण परिस्थिती मात्र निराळी आहे.

आम्हास पाहिजे असो की नसो, भारतखंडाचे दोन खंड झाले आहेत. पाकिस्तानात आणि हिंदुस्थानात दोन स्वतंत्र शासनसंस्था स्थापन झाल्या आहेत. आणि हिंदुस्थानच्या 'पाकिस्तान' विभागातून जगातील बलाढ्य राष्ट्र उत्पन्न करण्याची डरकाळी पाकिस्तानी गव्हर्नर जनरल फोडू लागले आहेत. पाकिस्तान विभागातून अल्पसंख्याकांनी निघून जावे अशीही भाषा ऐकण्यात येऊ लागली आहे. पश्चिम पंजाबात काय चालले आहे समजण्यास मार्ग नाही. पण तिकडून येणारे लोक सांगत आहेत की पाकिस्तानला निर्हिंदु करण्याचा अभिनव प्रयोग आज पंजाबात चालला आहे. हिंदूंच्या प्रेतांचा खच पडला आहे. हिंदूंच्या बायकांची अब्रू चव्हाट्यावर आली आहे, बायकांना पळविण्याचे सत्र सुरू आहे. प्रतिकार करणाऱ्यांवर बलात्कार होत आहेत. मृत किंवा जिवंत स्त्रियांचे स्तन कापण्यात धन्यता मानण्यात येत आहे. जातीयतेचे विष सैन्यात पसरल्याचीही बातमी आहे. रेल्वे वाहतूक बंद आहे. काय आहे आणि काय नाही हेच सांगता येत नाही. पाकिस्तानचे आणि हिंदुस्थानचे सरकारी अधिकारी एका टेबलाभोवती बसून जरी परिस्थिती कशी काबूत आणावी याचा विचार करीत असले तरी पाकिस्तानमधील हिंदू

आणि मुसलमान आज युद्धाच्या वाटेवर आहेत.

अशी एकंदर परिस्थिती आहे. या वेळी आम्ही काय करावयास पाहिजे ? पाकिस्तानात काय अत्याचार चालले आहेत यासंबंधी पाकिस्तानातील अल्पसंख्याकांनी आणि हिंदुस्थान सरकारने काही तरी ठरविलेच पाहिजे. काही दुराग्रही आणि नादान लोकांच्या हट्टामुळे देशाची फाळणी झाल्यावरोबर केवळ पाकिस्तानात गेल्यामुळे एकाच हाडा-मांसाचे आणि एकाच रक्ताचे आमचे बंधू आम्हास दुरावू शकत नाहीत. त्यांच्या जीविताचा वाटेल तसा खेळखंडोबा करण्याचा अधिकार महंमद पैगंबरासही नाही, मग महंमद जीनांना तो कोठून असणार ? आमच्या भाईबंदांची स्थिती धोबीका कुत्ता न घरका न घाटका अशी होता कामा नये. आणि आमची स्वतंत्र भारताची शासनसंस्था जर या दुष्ट प्रवृत्तींना आळा घालण्यास असमर्थ ठरत असेल तर आमच्या शासकांनी तसे निःसंदिग्ध शब्दांत जाहीर करावे. वसिष्ठाच्या गाईप्रमाणे भारतीय जनता स्वतः आपले रक्षण करील, पण आपले कर्तव्य म्हणून तरी आमच्या राज्यकर्त्यांनी स्वस्थ बसता कामा नये. सहनशीलतेची कमाल मर्यादा अजून संपली नाही काय ? यानंतर पडखाणे म्हणजे आमचा सर्वनाश करून घेणे होय. साम्राज्यलालसेने नव्हे तर आमच्या-वरील आणि आमच्या भाईबंदांवरील अत्याचार थांबविण्याकरिता तरी आपण आता स्वस्थ बसता कामा नये. जरूर पडल्यास पाकिस्तानवर स्वारी करूनसुद्धा आम्ही आमचे स्वत्वरक्षण केले पाहिजे.

आणि हिंदुस्थानात ? येथे मुसलमानांची बेगुमान वृत्ती तशीच कायम आहे. कल-कत्त्यास पुनः दंगा झाल्याची आणि त्यात कित्येक लोक मारले गेल्याची बातमी आली आहे, कलकत्त्याची पुनरावृत्ती मुंबईसही झाली आहे.

दोन जमातींत एकोपा घडवून आणण्याकरिता गांधीजींनी आज प्रायोपवेशनही करून पाहिले. पण त्यांच्या प्रयत्नांना कितपत यश येईल आणि ते किती काळ टिकेल हाही एक महत्त्वाचा प्रश्न आहे.

येत्या निवडणुकीत पाकिस्तानच्या बाजूने मते देणाऱ्या या राष्ट्रद्रोही लोकांना अजून पाकिस्तानचे नागरिक होऊन मिरविण्याचा मान मिळाला नाही. हिंदूंच्या हिंदुस्थानातून बृहन्पाकिस्तान निर्माण करण्याचे दुष्ट स्वप्न हिंदुस्थानातील बाटग्या मुसलमानांना सध्या पडत आहे. आणि जातिवंत मुसलमानापेक्षा बाटगा मुसलमान अधिक भयंकर असतो ही म्हण प्रसिद्धच आहे.

पाकिस्तानातील अल्पसंख्याकांच्या प्रश्नाप्रमाणेच हिंदुस्थानातील अल्पसंख्याक मुसल-मानांच्या प्रश्नासही महत्त्व आहे. कारण पाकिस्तान वेगळे झाले तरी हिंदुस्थानातील मुसलमान हिंदुस्थानातील जीवनाशी आणि आपल्या स्वधर्मेतर भाईबंदांशी समरस होऊ शकत नाहीत. जशी त्यांची मक्का हिंदुस्थानच्या बाहेर तसे त्यांचे राष्ट्रही

हिंदुस्थानच्या बाहेर, पाकिस्तानात. त्यांचे सर्व लक्ष तेथे केंद्रित झाले आहे. परंतु आमचे राष्ट्र बलशाली करण्याच्या दृष्टीने हा प्रकार असाच चालू ठेवणे म्हणजेसुद्धा राष्ट्रद्रोह करणे होईल. सहनशीलतेलाही मर्यादा असतात, सापाला दूध पाजीत राहणे फायद्याचे होत नाही.

आम्ही धर्माने हिंदू आहोत म्हणून असे बोलत नाही. आमचा कोणत्याही तथाकथित धर्मावर विश्वास नाही. मग 'हिंदु' म्हणून समजल्या जाणाऱ्या धर्मावर तो कसा असेल? पण कोणीही आमच्या देशाच्या पाठीत खंजीर खुपसावा आणि आम्ही तो उघड्या डोळ्यांनी पाहावा हे योग्य कसे ठरेल? आमची ख्रिश्चनांच्या विरुद्ध तक्रार नाही. आमची यहुद्यांच्या विरुद्ध तक्रार नाही. आमची पारशांच्या विरुद्ध तक्रार नाही. आमची तक्रार आहे केवळ धर्मवेड्या मुसलमानांबद्दल. त्यांचा धर्मवेडपटपणा आमच्या अस्तनीतील निखारा ठरणार आहे. धर्माच्या नावाखाली आमच्या देशाला नेस्तनाबूद करण्यास ते कधीही कचरणार नाहीत.

आज पाकिस्तान एकजिनसी होऊ पाहात आहे. तेथील मुसलमानेतर जनतेचा पद्धतशीर खून किंवा हकालपट्टी होत आहे. पण सहनशीलतेच्या नावाखाली–विशाल हृदयाच्या नावाखाली आमच्या आंथरुणात साप घेऊन आम्ही झोपणार? सहनशीलतेलाही मर्यादा असतात हे आम्हांस कधी कळणार! पाकिस्तानने आमच्यावर स्वारी केली, हैदराबादने पाकिस्तानला साथ दिली आणि आमच्या पाकिस्ताननिष्ठ मुसलमानांनी पाकिस्तानी सुरात सूर मिसळला म्हणजे का आम्हांला कळणार खरी वस्तुस्थिती?

हिंदुस्थानातील आपण बहुसंख्य नागरिक हिंदू आहोत, आणि मूठभर लोक मुसलमान आहेत म्हणून नव्हे तर आमच्या शासनसंस्थेला शह लागणार आहे म्हणून, धर्मवेड्या मुसलमानांची बडदास्त ठेवण्याचे यानंतर तरी आम्ही सोडून दिले पाहिजे. आमचा जातिधर्मावर विश्वास नाही, मग मुसलमानांना अलग कसे ठेवता येणार, असेच आम्ही म्हणत राहिलो तर आमचे समाजवादाचे स्वप्न तर कधी अस्तित्वात येणारच नाही पण मुसलमानांची साम्राज्यशाही मात्र आमच्या शरीरावर नंगानाच करिताना दिसल्यावाचून राहणार नाही.

आणि मुसलमान आज युद्धाच्या वाटेवर आहेत.

अशी एकंदर परिस्थिती आहे. या वेळी आम्ही काय करावयास पाहिजे ? पाकिस्तानात काय अत्याचार चालले आहेत यासंबंधी पाकिस्तानातील अल्पसंख्याकांनी आणि हिंदुस्थान सरकारने काही तरी ठरविलेच पाहिजे. काही दुराग्रही आणि नादान लोकांच्या हट्टामुळे देशाची फाळणी झाल्याबरोबर केवळ पाकिस्तानात गेल्यामुळे एकाच हाडा-मांसाचे आणि एकाच रक्ताचे आमचे बंधू आम्हास दुरावू शकत नाहीत. त्यांच्या जीविताचा वाटेल तसा खेळखंडोबा करण्याचा अधिकार महंमद पैगंबरासही नाही, मग महंमद जीनांना तो कोठून असणार ? आमच्या भाईबंदांची स्थिती धोबीका कुत्ता न घरका न घाटका अशी होता कामा नये. आणि आमची स्वतंत्र भारताची शासनसंस्था जर या दुष्ट प्रवृत्तींना आळा घालण्यास असमर्थ ठरत असेल तर आमच्या शासकांनी तसे निःसंदिग्ध शब्दांत जाहीर करावे. वसिष्ठाच्या गाईप्रमाणे भारतीय जनता स्वतः आपले रक्षण करील, पण आपले कर्तव्य म्हणून तरी आमच्या राज्यकर्त्यांनी स्वस्थ बसता कामा नये. सहनशीलतेची कमाल मर्यादा अजून संपली नाही काय ? यानंतर पडखाणे म्हणजे आमचा सर्वनाश करून घेणे होय. साम्राज्यलालसेने नव्हे तर आमच्या-वरील आणि आमच्या भाईबंदांवरील अत्याचार थांबविण्याकरिता तरी आपण आता स्वस्थ बसता कामा नये. जरूर पडल्यास पाकिस्तानवर स्वारी करूनसुद्धा आम्ही आमचे स्वत्वरक्षण केले पाहिजे.

आणि हिंदुस्थानात ? येथे मुसलमानांची बेगुमान वृत्ती तशीच कायम आहे. कल-कत्त्यास पुनः दंगा झाल्याची आणि त्यात कित्येक लोक मारले गेल्याची बातमी आली आहे, कलकत्त्याची पुनरावृत्ती मुंबईसही झाली आहे.

दोन जमातींत एकोपा घडवून आणण्याकरिता गांधीजींनी आज प्रायोपवेशनही करून पाहिले. पण त्यांच्या प्रयत्नांना कितपत यश येईल आणि ते किती काळ टिकेल हाही एक महत्त्वाचा प्रश्न आहे.

येत्या निवडणुकीत पाकिस्तानच्या बाजूने मते देणाऱ्या या राष्ट्रद्रोही लोकांना अजून पाकिस्तानचे नागरिक होऊन मिरविण्याचा मान मिळाला नाही. हिंदूंच्या हिंदुस्थानातून बृहन्पाकिस्तान निर्माण करण्याचे दुष्ट स्वप्न हिंदुस्थानातील बाटग्या मुसलमानांना सध्या पडत आहे. आणि जातिवंत मुसलमानापेक्षा बाटगा मुसलमान अधिक भयंकर असतो ही म्हण प्रसिद्धच आहे.

पाकिस्तानातील अल्पसंख्याकांच्या प्रश्नाप्रमाणेच हिंदुस्थानातील अल्पसंख्याक मुसल-मानांच्या प्रश्नासही महत्त्व आहे. कारण पाकिस्तान वेगळे झाले तरी हिंदुस्थानातील मुसलमान हिंदुस्थानातील जीवनाशी आणि आपल्या स्वधर्मेतर भाईबंदांशी समरस होऊ शकत नाहीत. जशी त्यांची मक्का हिंदुस्थानच्या बाहेर तसे त्यांचे राष्ट्रही

हिंदुस्थानच्या बाहेर, पाकिस्तानात. त्यांचे सर्व लक्ष तेथे केंद्रित झाले आहे. परंतु आमचे राष्ट्र बलशाली करण्याच्या दृष्टीने हा प्रकार असाच चालू ठेवणे म्हणजेसुद्धा राष्ट्रद्रोह करणे होईल. सहनशीलतेलाही मर्यादा असतात, सापाला दूध पाजीत राहणे फायद्याचे होत नाही.

आम्ही धर्माने हिंदू आहोत म्हणून असे बोलत नाही. आमचा कोणत्याही तथाकथित धर्मावर विश्वास नाही. मग 'हिंदु' म्हणून समजल्या जाणाऱ्या धर्मावर तो कसा असेल? पण कोणीही आमच्या देशाच्या पाठीत खंजीर खुपसावा आणि आम्ही तो उघड्या डोळ्यांनी पाहावा हे योग्य कसे ठरेल? आमची ख्रिश्चनांच्या विरुद्ध तक्रार नाही. आमची यहुद्यांच्या विरुद्ध तक्रार नाही. आमची पारशांच्या विरुद्ध तक्रार नाही. आमची तक्रार आहे केवळ धर्मवेड्या मुसलमानांबद्दल. त्यांचा धर्मवेडपटपणा आमच्या अस्तनीतील निखारा ठरणार आहे. धर्माच्या नावाखाली आमच्या देशाला नेस्तनाबूद करण्यास ते कधीही कचरणार नाहीत.

आज पाकिस्तान एकजिनसी होऊ पाहात आहे. तेथील मुसलमानेतर जनतेचा पद्धतशीर खून किंवा हकालपट्टी होत आहे. पण सहनशीलतेच्या नावाखाली–विशाल हृदयाच्या नावाखाली आमच्या आंथरुणात साप घेऊन आम्ही झोपणार? सहनशीलतेलाही मर्यादा असतात हे आम्हांस कधी कळणार! पाकिस्तानने आमच्यावर स्वारी केली, हैदराबादने पाकिस्तानला साथ दिली आणि आमच्या पाकिस्ताननिष्ठ मुसलमानांनी पाकिस्तानी सुरात सूर मिसळला म्हणजे का आम्हांला कळणार खरी वस्तुस्थिती?

हिंदुस्थानातील आपण बहुसंख्य नागरिक हिंदू आहोत, आणि मूठभर लोक मुसलमान आहेत म्हणून नव्हे तर आमच्या शासनसंस्थेला शह लागणार आहे म्हणून, धर्मवेड्या मुसलमानांची बडदास्त ठेवण्याचे यानंतर तरी आम्ही सोडून दिले पाहिजे. आमचा जातिधर्मावर विश्वास नाही, मग मुसलमानांना अलग कसे ठेवता येणार, असेच आम्ही म्हणत राहिलो तर आमचे समाजवादाचे स्वप्न तर कधी अस्तित्वात येणारच नाही पण मुसलमानांची साम्राज्यशाही मात्र आमच्या शरीरावर नंगानाच करिताना दिसल्यावाचून राहणार नाही.

३४

ग्रामोद्धार आणि परिश्रम सहकाराची कल्पना !

१४-९-४७

आज कित्येक लोकांची अशीच समजूत झालेली दिसते की ग्रामोद्धाराची जबाबदारी केवळ सरकार आणि श्रीमंतवर्ग यावरच आहे. शासनाला आवश्यक असलेला सर्व पैका सरकार शेतकऱ्यांवर कर बसवूनच मिळविते. मग ग्रामसुधारणेची जबाबदारी सरकारने आपल्या शिरावर घ्यावयास नको काय ? शेतकऱ्यांवरील कराच्या रूपाने मिळालेला पैसा जर ग्रामसुधारणेस अपुरा असेल तर सरकारने श्रीमंत व्यापाऱ्यांवर कर बसवून हा पैसा वसूल केला पाहिजे.

वरील म्हणण्यात अगदीच तथ्य नाही असे नाही. परंतु ग्रामसुधारणेची जबाबदारी सरकारवर आहे आणि त्यांनी श्रीमंतांवर अधिक कर बसवून ग्रामोद्धारास लागणारा पैसा उभा करावा असे म्हटल्याने सर्वसामान्य जनतेची जबाबदारी संपते असे समजणे बरोबर नाही. ग्रामोद्धाराची जी मूलप्रक्रिया आपणास या देशात सुरू करावयाची आहे तिचे हे मूलतत्त्व किंवा रहस्य नव्हे. खेड्यांचा उद्धार शेवटी खेडयांनाच करावा लागेल हे तत्त्व आमच्या लोकांच्या मनावर जितक्या लवकर बिंबेल तितके आमचे कार्य सुकर होणार आहे. केवळ सरकारवर किंवा श्रीमंत लोकांच्या पैशांवर अवलंबून राहणे म्हणजे दुसऱ्यांच्या ओंजळीने पाणी पिणे होय आणि दुसऱ्यांच्या ओंजळीने पाणी पिण्याने काम भागणार नाही. सरकारला ग्रामोद्धाराची कितीही इच्छा असली तरी स्वतःच्या आणि श्रीमंतांजवळच्या पैशावर, जनतेच्या सहकार्याशिवाय सरकारला ग्रामोद्धार करिता येईल ही समजूत चुकीची आहे. कोणतेही काम केवळ पैशाने होत नसते आणि आजच्या

धनव्यवस्थेत श्रीमंताजवळून उभ्या केलेल्या पैशाने आपल्या देशातील सर्व खेड्यांचे स्वरूप बदलून जाईल असे समजणे हास्यास्पद आहे. सरकारचे कार्य मुख्यतः दिग्दर्शन करण्याचे आहे. सरकारने दिग्दर्शन केलेल्या मार्गाने कोणतीही योजना तपशीलवार अंमलात आणणे हे शेवटी जनतेचेच काम आहे. सरकारचे स्वरूप हे विरजणाच्या दह्यासारखे आहे. जनतेचे दुधासारखे आहे. दही हे आपले साध्य मानले तरी सरकार फार तर ह्या दह्याला आवश्यक असलेले विरजण पुरवू शकेल.

श्रीमंतांच्या किंवा सरकारच्या पैशाचा ओघ खेड्यांकडे वळू नये असा आमच्या म्हणण्याचा अर्थ नव्हे. पण, सरकारने ग्रामोद्धाराकरिता शक्य तितका जास्त पैसा द्यावा, धनिकांनीही आपला पैसा खेड्यांतच खर्च करावा हे तत्त्व मान्य केल्यानंतरही या द्रव्याने खेडुतांना त्यांच्या श्रमाचा मोबदला देऊन कामे करून घ्यावयास सुरुवात केली तर सामान्य गणितज्ञही सांगू शकेल की अशा रीतीने पुढील शंभर वर्षांतदेखील गावांची खरीखुरी प्रगती होणे शक्य नाही. एवढे मोठे अवाढव्य काम आपल्यासमोर आहे की त्याला इतका थोडा पैसा पुरणेच शक्य नाही. परंतु ग्रामोद्धाराकरिता केवळ पैशाचीच गरज आहे असे समजणे हा फार मोठा भ्रम आहे. जेथे धन अपुरे पडते तेथे श्रमाने काम होते. फक्त संघटित श्रम करण्याची– खेड्यांच्या पुनर्घटनेकरिता जास्तीचे काम करण्याची इच्छा मात्र आमच्या ग्रामीण जनतेला झाली पाहिजे.

राष्ट्रीय संपत्ती केवळ पैशाने कधी वाढत नाही. पैसा हे केवळ वस्तूची किंमत ठरविण्याचे साधन आहे. बाजारात पैसा वाढला तर वस्तूंची किंमत वाढते. सन १९३९ मध्ये जेवढा पैसा बाजारात फिरता होता, त्याच्या जवळजवळ सहा ते सातपट पैसा आज बाजारात उपलब्ध आहे, आणि त्यामुळे वस्तूंच्या किंमतीही आज भरमसाट वाढलेल्या दिसतात. पण या योगाने राष्ट्रातील एकंदर वस्तू वाढल्या असे मात्र होत नाही. राष्ट्रीय संपत्तीचे वाढणे किंवा घटणे हे राष्ट्रामधील एकंदर परिश्रमाच्या वाढण्यावर किंवा घटण्यावर अवलंबून आहे. कोणत्याही वस्तूचे वास्तविक मूल्य ती वस्तू उत्पन्न करण्याकरिता लागणाऱ्या श्रमावरच अवलंबून असावयास पाहिजे. तात्पर्य, राष्ट्रीय संपत्तीकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोणच बदलला पाहिजे. श्रम हाच राष्ट्रीय संपत्तीचा सर्वांत मोठा घटक होय. श्रमाच्याऐवजी आपण अर्थाला– पैशाला अवास्तव महत्त्व देतो हीच आपली चूक आहे. अर्थमूल व्यवस्था हेच आमच्या खेड्यातील अनर्थाचे कारण आहे.

वरील तत्त्व खरे असेल तर खेड्यातील संपत्ती वाढविण्याचा एकच उपाय आहे, आणि तो म्हणजे खेड्यातील श्रमाचे एकंदर परिमाण वाढविण्याचा. यावर कोणी असे म्हणतील की खेड्यातला माणूस जितके श्रम करितो, तितके शहरातला माणूस करीत नाही. इतके असूनसुद्धा खेड्यातील माणसालाच जास्त काम करावयास सांगावयाचे हा काय न्याय झाला ? पण याचे उत्तर फार सरळ आहे. आज आपल्यासमोर ग्रामसुधारणेचा

प्रश्न आहे. शहरसुधारणेचा नाही. शहरातील माणूस किती काम करितो याच्याशी आज आपला काहीच तादृश संबंध नाही. खेड्यातील संपत्ती कशी वाढवावी एवढाच प्रश्न आहे. आणि त्याला दुसरा उपाय नाही. आजही आपल्या खेडुतांची पुष्कळच शक्ती वाया जाते, हे नाकबूल करण्यात अर्थ नाही. ही वाया जाणारी शक्ती एकत्रित करून कामाला लागली तर आपल्या राष्ट्राची संपत्ती पुष्कळच प्रमाणात वाढेल आणि खराखुरा ग्रामोद्धार होईल. ही सर्व शक्ती एकवटून कामाला लावायची असली तर आपल्याला श्रमजीवी लोकांचे संघटन करावे लागेल. अशा संघटनांनाच श्रमजीवी लोकांच्या सहकारी संस्था अथवा Labour Co-operatives असे म्हणावयास पाहिजे. प्रत्येक खेड्यातून किंवा ग्रामसंघातून अशा सहकारी संस्था स्थापन झाल्या तर पैशाचा मोबदला न देतासुद्धा खेड्यातील आवश्यक सुधारणा अशा संस्थांमार्फत करून घेता येतील. खेड्यात सुधारणा घडवून आणणे हे जर तेथल्या खेडुतांचेच काम आहे तर त्यांच्या श्रमाचा मोबदला कोण देणार ? काम त्यांचे आणि करणारेही तेच. घरचा मालक घरकामाचा मोबदला थोडाच घेतो. ज्या प्रमाणात आम्हास खेडुतांची ही सर्व श्रमशक्ती एकवटता येईल त्या प्रमाणातच आमची एकंदर प्रगती होणार आहे.

ना. डॉ. बारलिंगे यांचेकडे ' सहकारी खाते ' आहे. सहकारी संस्था म्हणजे समाजवादाचा पायाच होय. आपल्या देशात ' लेबर-को-ऑपरेटिव्हज' ची स्थापना झाली तर खराखुरा समाजवाद अस्तित्वात येईल. ' लेबर-को-ऑपरेटिव्हज 'ची मूळ कल्पना ना. डॉ. बारलिंगे यांचीच आहे आणि त्यांच्याच चालनेमुळे आज ही कल्पना ठिकठिकाणी मूळ धरीत आहे. परंतु आता केवळ या कल्पनेवर संतुष्ट राहून काम भागणार नाही, आता सरकारी तज्ज्ञांनी योजना तपशीलवार तयार करावयास पाहिजे, आणि आमच्या शेतकरी–कामकरी जनतेनेही अशा संस्था ताबडतोब अस्तित्वात आणावयास पाहिजेत. जनतेने सहकार केला तरच राष्ट्राची प्रगती होत असते. रशियाची पंचवार्षिक योजना जनतेच्या सहकार्यानेच यशस्वी झाली हे सांगितलेच पाहिजे असे नाही. अशाच तऱ्हेच्या श्रमदान-पद्धतीवर सुरू केलेल्या संस्था युरोपियन देशात अनेक आढळतात. आपल्या देशातही अशा तऱ्हेचे सहकारी रीतीने केलेले काम आपण करीत नाही असे नाही. पण आपल्या कामात संघटितपणा नसतो, आणि ध्येयही नसते. संघटितपणे आणि ध्येयनिष्ठेने आपण या कामास सुरुवात केली तर पुढील पाच वर्षांत देशाचे स्वरूप बदलल्यावाचून राहणार नाही.

अर्थात केवळ श्रम एकवटण्याची क्रिया चालू करण्यानेच काम भागेल असे नाही. कमीत कमी श्रमात जास्तीत जास्त कार्य कसे करता येईल ही कलाही उत्तरोत्तर आम्हाला अवगत झाली पाहिजे. याकरिता यंत्राप्रमाणेच बुद्धीचाही उपयोग करावयास आपण शिकले पाहिजे. आज आमच्या समाजातील बुद्धी जवळ जवळ निष्प्रभ झालेली आहे.

पुस्तके वाचून परीक्षा उत्तीर्ण होणे इकडेच सर्व बुद्धीचा ओघ वाहात आहे. उत्तरोत्तर आमच्या बुद्धीचा उपयोग आमचे व्यावहारिक प्रश्न सोडविण्याकरिताच झाला पाहिजे. उसनी बुद्धी आणि उसना पैसा कधीही कामावर पडावयाचा नाही हे तत्त्व ज्या दिवशी आमच्या शेतकऱ्या-कामकऱ्यांच्या मनावर बिंबेल त्या दिवशी आमचे स्वराज्य हे सुराज्य होईल, आणि ना. डॉ. बारलिंगे यांच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे आमची खेडी ही केवळ ग्रामयंत्रे न राहता ग्रामशरीरे बनतील.

श्रमदान पद्धतीवर उभारलेल्या या समाजवादी क्रांतिकारक योजनेची खोली ज्या दिवशी आम्हाला कळेल त्या दिवशी आमची खेडी चैतन्याची केन्द्रे झाल्यावाचून राहणार नाहीत.

३५

ही सामंतशाहीची सडकी प्रेते कुठपर्यंत टिकवणार ?

२१-९-४७

अनेक वर्षांच्या दारुण संग्रामानंतर हिंदी जनतेचा स्वातंत्र्यलढ्यात विजय होऊन १५ ऑगस्ट, १९४७ रोजी ब्रिटिश साम्राज्यशाहीने तिच्या हातावर हिंदी स्वातंत्र्याचे उदक सोडले, ही आता इतिहासजमा घटना झालेली आहे. परंतु हिंदुस्थानातील दीर्घकालीन वास्तव्याने तरबेज झालेल्या ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या कुटिल राजनीतीने हे उदक सोडण्यापूर्वी अनेक प्रश्न निर्माण करून त्या स्वातंत्र्याचे स्वरूप मलूल करून ठेवले आहे. पाकिस्तानचे स्वतंत्र राष्ट्र निर्माण करून आणि संस्थानिकांना आपले स्वातंत्र्य जाहीर करण्यास उत्तेजन देऊन जाता जाता ब्रिटिश साम्राज्यशाहीने हिंदी स्वातंत्र्यपूर्तीत अनेक अडथळे निर्माण केले आहेत. हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागात चालू असलेले अमानुष जातीय दंगे व काही उन्मत्त संस्थानिकांची अरेरावी वागणूक हे या कुटिल राजनीतीचेच आविष्कार होत.

हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यापासून गेल्या काही आठवड्यांत सुरू झालेल्या जात्यंध पाशवीपणाचे सत्र बंद करण्यासाठी हिंदी सरकार हरप्रकारे प्रयत्न करीत असून त्यात बऱ्याच अंशी त्यांना यशही प्राप्त होत आहे. परंतु हे जरी खरे असले तरी ब्रिटिश सरकारने हिंदुस्थान सोडण्याची घोषणा केल्यापासून काही हिंदी संस्थानिकांनी स्वातंत्र्य जाहीर करण्याचा जो उन्मत्त आविर्भाव आणला आहे व जे प्रजाहितविरोधी धोरण चालविले आहे त्याकडे आमच्या हिंदी सरकारचे जवळ जवळ दुर्लक्षच होत आहे असे म्हटले तरी चालेल. गेले कित्येक महिने हैदराबादच्या निझामांनी आपल्या मुसलमान

प्रजेच्या साहाय्याने बहुसंख्य हिंदूंवरच हरप्रकारे जुल्म, अत्याचार चालविले आहेत. ब्रिटिश सरकारच्या उच्चाटनानंतर आपले 'स्वातंत्र्य' जाहीर करून फर्मानी निझामने हिंदी संघराज्याचा उपमर्द चालविला आहे. त्यासारखेच स्वातंत्र्याच्या गप्पा मारणारे त्रावणकोर संस्थान आता दबले असले तरी निझामाची अरेरावी अजून कायम आहे. कसेही करून आपले स्वातंत्र्य टिकविण्याची त्याची खटपट चालू असून त्याकरिता संरक्षणाची जय्यत तयारी होत आहे; एवढेच नव्हे तर खुद्द हैदराबाद संस्थानाकरिता स्वतंत्र रिझर्व्ह बँक निर्माण करण्याचे घाटत आहे.

अशाच प्रकारे स्वातंत्र्य जाहीर करण्याचे धाडस आणखी काहींनी करून पाहून जेव्हा आपली डाळ शिजत नाही असे त्यांना दिसले तेव्हा त्यांनी इतर प्रकारांनी आपले 'अंतर्गत स्वातंत्र्य' अबाधित राखण्याची खटपट चालविली आहे. नावापुरती काही संस्थाने हिंदी संघराज्यात सामील झाली असून आतून त्यांनी अनेक प्रकारचे राष्ट्रविरोधी कट रचणे चालू ठेवले आहे. त्रावणकोरच्या संस्थानाधिपतीने त्या संस्थानात असलेल्या आणि ॲटम बॉम्बच्या निर्मितीला आवश्यक असलेल्या युरेनियमच्या खाणी चालविण्याचे हक्क ब्रिटिश कंपनीला विकले आहेत.

आणि बहुतेक संस्थानांत आजही पूर्वीचीच सत्तांध व हुकुमशाही संस्थानिकांची अथवा त्यांच्या दिवाणांची राजवट चालू आहे. ब्रिटिश साम्राज्यशाहीचा पाठिंबा होता तोवर सर्व संस्थानांत सरसहा सरंजामी राजवट चालणे शक्य होते. परंतु हिंदी स्वातंत्र्योदयाबरोबर बहुतेक संस्थानिकांनी कालाचा ओघ ओळखून पटापट जबाबदार राज्यपद्धतीची आश्वासने देण्यास सुरुवात केली. मात्र त्यांपैकी कोणीही ही आश्वासने अजून पूर्ण केली नाहीत. विशेषतः म्हैसूरचे राजेसाहेब हे आपल्या प्रधानाकरवी असली खोटी आश्वासने देऊन जनतेला लोकराज्य देण्याऐवजी तिचा विश्वासघातकीपणाने गळा कापणाऱ्यांपैकी आहेत हे तेथे गेले १५ दिवस घडत असलेल्या पोलिसी अत्याचारांवरून स्पष्ट होते. जबाबदार राज्यपद्धतीसाठी स्टेट काँग्रेसने सत्याग्रहाची मोहीम सुरू केली म्हणून त्या संस्थानात तेथील सध्याचे पंतप्रधान अगदी कालपर्यंत ब्रिटिश साम्राज्यशाहीचे बगलबच्चे श्री. रामस्वामी मुदलियार यांनी सर्रास दडपशाही चालू केली आहे.

अशा तऱ्हेने हिंदी रंगभूमीवरील हे संस्थानिकांचे तांडवनृत्य चालू आहे. कोणत्याही संस्थानात प्रजेला नाममात्रही स्वातंत्र्य नसून तिची हरप्रकारे पिळणूक होत आहे. जी जबाबदार राज्यपद्धतीची मागणी अनेक वर्षांपूर्वीच वास्तविक पुरी करण्यात यावयाची ती अजून कोठेच पुरी करण्यात आली नसून उलट ती मागणी लोकप्रतिनिधींनी चालविली हा गुन्हा ठरून त्यांची धरपकड होत आहे. आपल्यासारख्याच काही मूठभर जमीनदार, सरंजामदार लोकांच्या साहाय्याने हिंदुस्थानातील पाचशेहून अधिक संस्थानिक तेथील लाखो संस्थानी प्रजेच्या जीविताशी खेळत आहेत. तिला लुबाडणे व नागविणे

अव्याहत चालू आहे. अशा रीतीने ब्रिटिशांचे हिंदुस्थानावरील जोखड नाहीसे होताच आपलेही नष्टचर्य संपुष्टात येईल या संस्थानी प्रजेच्या भोळ्या आशेला जबर धक्का बसला आहे.

तेव्हा आपल्या दास्यविमोचनाकरिता या संस्थानी जनतेने गुलामगिरीच्या मगरमिठीतून नुकत्याच सुटलेल्या हिंदी डोमिनियनच्या प्रजेकडे व तिच्या सरकारकडे मोठ्या केविलवाण्या नजरेने व आशेने पाहणे हे साहजिकच आहे. हैदराबाद स्टेट काँग्रेसची मध्यप्रांत व मुंबई सरकारला मदतीसाठी हाक ही त्याचेच द्योतक आहे. त्याचप्रमाणे म्हैसूर, त्रावणकोर व इतर संस्थानी काँग्रेसच्या द्वारे अखिल भारतातील संस्थानी प्रजा तिच्या स्वातंत्र्यलढ्यात मदतीची मागणी करीत आहे.

ह्या तिच्या आर्त हाकेस ओ देणे हे केवळ आसपासच्या प्रांतिक सरकारचे व जनतेचेच कर्तव्य नसून हिंदी केन्द्र सरकारचेही आहे. कारण संस्थानी जनतेच्या स्वातंत्र्याचा प्रश्न केवळ त्या संस्थानापुरताच मर्यादित राहिलेला नाही. संस्थानिकांनी आपल्या मर्जीखातर सोडविण्याच्या 'अंतर्गत' प्रश्नांपैकी तो एक नसून सर्व हिंदी राष्ट्राचा संरक्षणाचा प्रश्न आहे. हैदराबादसारख्या मोठ्या संस्थानाचे स्वतंत्र अस्तित्व हे हिंदी स्वातंत्र्यदेवतेच्या हृदयातील अत्यंत मोठे शल्य आहे. शिवाय हिंदी जनतेबरोबरच जर संस्थानी जनतेची प्रगती झाली नाही तर ती एकंदर हिंदी राष्ट्राच्या ध्येयपूर्तीस बाधक होणार आहे. त्याचबरोबर अनेक संस्थानांत ज्या प्रचंड प्रतिगामी शक्तीची पकड आजही कायम आहे ती बहुसंख्य जनतेच्या हिताच्या दृष्टीने अत्यंत मारक होणार आहे.

याकरिता प्रथम प्रत्येक संस्थानात लोकशाही पद्धतीवर आधारलेली जबाबदार राज्यपद्धती निर्माण करणे हे हिंदी सरकारचे कर्तव्य आहे. हरेक संस्थानिकाला तशी ताकीद देऊन जनतेच्या हाती ताबडतोब सत्ता देण्याकरिता त्यांना भाग पाडले पाहिजे व जेथे जेथे संस्थानी प्रजेचा स्वातंत्र्यलढा चालू असेल तेथे तेथे त्यांना हरप्रकारे मदत करून त्यात त्यांना विजयी करण्याचा उघड प्रयत्न केला पाहिजे. प्रांतिक सरकारेसुद्धा लागून असलेल्या संस्थानांवर अनेक प्रकारे दडपण आणून तेथे जनतेची सत्ता प्रस्थापित करण्यास मदत करू शकतात. तशी मदत थोड्या-फार प्रमाणात कोठे कोठे देण्यातही येत आहे. परंतु ती अत्यंत थोडी असून तिच्याहून कितीतरी जास्त मदतीची अपेक्षा संस्थानी प्रजा करीत आहे.

आणि त्याकरिता हिंदी जनतेनेच पुढे येऊन आपल्या केन्द्र व प्रांतिक सरकारांना ती मदत देण्यास उद्युक्त केले पाहिजे. तसे करणे हे प्रत्येक हिंदी म्हणविणाऱ्याचे कर्तव्य आहे. कारण आम्ही स्वतः स्वातंत्र्यलढा केला आहे, आम्ही स्वतः स्वातंत्र्यप्राप्तीकरिता अखंड त्याग व कष्ट केले आहेत. गुलामगिरीचे आमच्या मानेवरील जू झुगारून देऊन ब्रिटिशांपासून आपले स्वातंत्र्य हस्तगत करण्यासाठी द्याव्या लागलेल्या मोलाची आम्हाला

पुरेपूर कल्पना आहे. आणि म्हणूनच निरनिराळ्या संस्थानांत चालू असलेल्या जनतेच्या स्वातंत्र्यसंग्रामात तिची हार होणार नाही हे आम्हीच– जनतेनेच पाहिले पाहिजे व आपल्याबरोबर हिंदी सरकारलाही अंतर्गत शांततेला धोका उत्पन्न करणारा संस्थानी राजवटींचा काटा काढण्यासाठी पुढे येण्याचे आव्हान केले पाहिजे.

३६

आंतरराष्ट्रीय सहकार्याची आवश्यकता

२८-९-४७

दुसरे जागतिक महायुद्ध संपून दोन वर्षांहून अधिक कालावधी लोटला आहे. ते महायुद्ध सुरू करण्यास कारणीभूत होणाऱ्या हिटलर-मुसोलिनीचे पारिपत्य झाले असून ज्या देशांनी त्यांचे पुढारीपण मान्य केले त्या जर्मनी, इटालीसारख्या बलाढ्य राष्ट्रांनी दोस्त राष्ट्रांपुढे नांगी टाकून अगदी बिनशर्त आपले भवितव्य त्यांच्या हातात दिले आणि त्यानंतर थोड्याच दिवसांनी हिरोशिमावर झालेल्या ॲटम बॉम्बच्या भयंकर वर्षावामुळे जपान्यांचे धावे दणाणून जाऊन त्यांनीही चीन आदी आशियातील देशांत चालविलेला धुमाकूळ थांबविला. खुद्द जपानमध्ये अमेरिकेने आपले वर्चस्व पूर्णपणे प्रस्थापित करून आपल्या इच्छेप्रमाणे तेथे गेली १॥-२ वर्षे राज्यकारभार चालविला आहे.

आणि राष्ट्राराष्ट्रांच्या या अमानुष संघर्षातूनच चिरंतन जागतिक शांततेसाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या कल्पनेला चालना मिळाली. वैयक्तिक महत्त्वांकाक्षेने उद्युक्त झालेल्या जर्मनी इटलीच्या हुकुमशहांनी आपल्या राष्ट्रांना चढाऊ धोरणाचा स्वीकार करण्यास सतत १५-२० वर्षे शिक्षण दिले, आणि कमजोर व दुर्बल अशा लहान राष्ट्रांवर आपली सत्ता प्रस्थापित केली. परंतु या चढाऊ धोरणाची परिसीमा होऊ लागली तेव्हा युद्धाच्या आगीचा डोंब उसळला व अखेर त्या आगीतच हुकुमशहांची राख होऊन त्यांनी उभारलेला राष्ट्रवर्चस्वाचा डोलारा कोसळला. जगातील प्रत्येक राष्ट्रात देशादेशातील सहकार्याच्या कल्पनेची मुळे जास्त जोमाने पकड धरू लागली. १९१९ साली त्या वेळचे अमेरिकेचे प्रेसिडेन्ट विल्सन यांनी अत्यंत उत्साहाने प्रतिपादिलेल्या परंतु मध्यंतरीच्या काळात

उपेक्षिल्या गेलेल्या ह्या जागतिक सहकार्याच्या कल्पनेला १९४५ साली पुनः एकदा आवश्यक ती परिस्थिती लाभली. लहान-मोठ्या देशांतील पुढाऱ्यांना ह्या सहकार्याची आवश्यकता पटून त्यांनीही त्याकरिता प्रचार केला आणि त्यातूनच 'यूनो' (U.N.O.) ह्या नावाने ओळखली जाणारी जगातील लहानमोठ्या ५५ राष्ट्रांची प्रचंड संघटना निर्माण झाली.

परंतु गेल्या दोन वर्षांत या संघटनेने केलेली एकूण कामगिरी व शांतता प्रस्थापनेच्या बाबतीत केलेली प्रगती पाहिली म्हणजे अजूनही जागतिक सहकार्य हे मुख्यतः मोठ्या राष्ट्रांच्या सहकार्यावरच अवलंबून आहे हे स्पष्ट दिसते. ज्या मोठ्या राष्ट्रांनी ही संघटना निर्माण करण्यात पुढाकार घेतला, कष्ट घेतले, त्यांच्यातच सहकार्याचा अभाव दिसून येत आहे. चर्चिल, रुझवेल्ट व स्टॅलिन त्या तीन बड्या राष्ट्रांच्या नेत्यांनी युद्धसमाप्तीपूर्वी काही दिवस अगोदर ज्या गंभीरतेने एकमेकांना युद्धोत्तरकालात पूर्ण सहकार्य देण्याची माल्टा येथे घोषणा केली त्या घोषणेच्या अगदी विरुद्ध त्या राष्ट्रांची गेल्या दीड वर्षात वागणूक चालू आहे. शिवाय शांतता प्रस्थापनेसाठी आवश्यक असा बदल मोठ्या साम्राज्यशहांच्या धोरणात अजूनही झाला नाही. ब्रिटिशांची गोष्ट सोडल्यास फ्रेंच, डच, बेल्जियम आदी साम्राज्यवाद्यांनी काळाचा ओघ न ओळखता आपल्या वसाहतींवरील ताबा सोडण्याची तयारी केली नसून उलट तेथील आपले वर्चस्व कायम करण्याच्या मागे ते लागले आहेत. इंडोनेशियन लोकांच्या स्वातंत्र्यलढ्याला शक्तीच्या जोरावर क्रूरपणे दाबण्याचा डच प्रयत्न, व इंडोचायनामधील जागृत जनतेच्या राष्ट्रीय भावनांना फ्रेंचांनी बॉम्बवर्षावाने दिलेले उत्तर हा युद्धसमातीनंतरचा मृत्युपंथाला लागलेल्या साम्राज्यशाहीचा इतिहास होय, आणि ब्रिटन, अमेरिकेसारख्या मोठ्या राष्ट्रांनी त्यांच्या या साम्राज्यवादी धोरणात त्यांना कोणत्या ना कोणत्या रीतीने मदत केली आहे. त्याचबरोबर खुद्द अमेरिका, चीन व युरोपमधील ग्रीस वगैरे देशात शांतताप्रस्थापनेच्या नावाखाली आपले भांडवलशाही हात-पाय पसरू लागली आहे, व अमेरिकेला शह देण्यासाठीच की काय, रशियासुद्धा तिचेच धोरण अवलंबून पूर्व युरोपियन देशात व प्रशिया आदी राष्ट्रांत आपले वर्चस्व स्थापण्याचा प्रयत्न करीत आहे.

'युनो' यांपैकी कोणत्याच कारवाईवर निर्बंध घालण्यात यशस्वी होऊ शकली नसून तिच्या 'जागतिक' व्यासपीठावरून मोठी राष्ट्रे एकमेकाला निर्लज्जपणे शिव्या हासडीत आहेत, सध्याच्या अगतिकतेला जबाबदार धरीत आहेत आणि अशा तऱ्हेने त्यांनी युनोचा अवमान चालविला आहे. सध्या चालू असलेल्या युनोच्या अधिवेशनात रशियाने अमेरिका-इंग्लंड ही राष्ट्रे युनोची प्रतिस्पर्धी आहेत असा आरोप केला आणि त्या दोन राष्ट्रांनी युनोच्या कामगिरीत सतत अडथळे आणण्याबद्दल रशियालाच जबाबदार धरले आहे!

मोठ्या राष्ट्रांचा आपल्या वर्चस्वासाठी हा सर्व खेळ चालू आहे हे यावरून उघड होते. जगातील जास्तीत जास्त प्रदेशात कोणत्या ना कोणत्या रीतीने आपली हुकमत चालावी असा त्यांचा सारखा प्रयत्न चालू आहे. लहानसहान व दुर्बल राष्ट्रांना आपल्या हुकमतीखाली आणण्याकरिता 'आर्थिक मदतीचा' उपयोग चालू आहे.

म्हणून जागतिक सहकार्यात अडथळा आणणाऱ्या राष्ट्रीय वर्चस्वाच्या भावनेला प्रथम तिलांजली देणे अत्यावश्यक आहे. आज प्रत्येक राष्ट्र जगाचा एक अविभाज्य घटक झाला आहे. संकुचित राष्ट्रीयत्वाच्या भावनेत केलेल्या कोणत्याही कृत्याचा परिणाम बाहेरील राष्ट्रांवरही होण्याचा संभव असतो, आणि म्हणून राष्ट्राराष्ट्रांनी आपली राष्ट्रीयत्वाची भावना व त्याचबरोबर दुसऱ्या राष्ट्रावर सत्ता गाजविण्याची कल्पना सोडून दिली पाहिजे व त्यांची जागा एकमेकांच्या सर्वगामी उन्नतीसाठी हरप्रकारच्या सहकार्याने घेतली पाहिजे. त्याकरिता युनोसारख्या ज्या अनेक आंतरराष्ट्रीय संघटना गेल्या दोन वर्षांत निर्माण करण्यात आल्या आहेत त्यांत सर्व राष्ट्रांनी एकत्र येऊन एक सामायिक कार्यक्रम सफल करण्याच्या मार्गास लागले पाहिजे. जगातील प्रत्येक राष्ट्राच्या बहुसंख्य पीडित जनतेला आपली सर्व तऱ्हेची उन्नती करण्यास आवश्यक ते बदल होणे जरूर आहे. म्हणजेच प्रत्येक व्यक्तीला सामाजिक, आर्थिक व राजकीय स्वातंत्र्य मिळून जास्तीत जास्त सुखासमाधानाचे जीवित कंठणे शक्य झाले पाहिजे. प्रत्येक राष्ट्रात राजकीय हक्क जनतेला मिळाले आहेत की नाही ते पाहणे, त्यांच्यावर कोणतीही सामाजिक बंधने नसण्याची खबरदारी घेणे, व त्यांना कोणत्याही प्रकारे आपले आर्थिक जीवन खडतर आहे असे वाटू न देणे ह्या सर्व जबाबदाऱ्या युनो व तत्सम जागतिक संघटनांच्या असून त्या पार पाडणे त्यांचे कर्तव्य होय. अर्थात त्याकरिता कोणत्याही प्रकारे कोठल्याच मोठ्या राष्ट्राची मिरासदारी सहन करण्याची आवश्यकता नाही व त्यांची आपले वर्चस्व जबरदस्तीने कायम ठेवण्याची अगर प्रस्थापित करण्याची खटपट चालू देण्याची तर मुळीच गरज नाही. किंबहुना असे होऊ न देण्याची हरतऱ्हेने खबरदारी घेतली गेली पाहिजे.

नाहीतर ज्या राष्ट्रवर्चस्वाच्या भावनेतून निर्माण झालेल्या हुकुमशहांना नष्ट करण्यासाठी प्रचंड युद्ध झाले, त्याचा खरोखर काहीच उपयोग झाला नाही असे म्हणावे लागेल व गेली कित्येक वर्षे ज्या आशेने सामान्य जनता युद्धामुळे निर्माण झालेली परिस्थिती नाहीशी होण्याची वाट पाहात होती त्या तिच्या आशेचा भंग होऊन तिच्या जीविताशी सध्या चाललेला खेळ तसाच चालू राहील.

३७

'नाहीतर युद्ध पुकारावे लागेल !'

५-१०-४७

हिंदुस्थानच्या विभाजनानंतर पंजाब व बंगालमध्ये जातीय दंग्यांना अत्यंत विराट स्वरूप प्राप्त होऊन जवळ जवळ सर्वच हिंदुस्थानभर हिंदुमुसलमानांत एक प्रकारे दंगेखोरीचे वातावरण पसरले आहे. बंगालमध्ये महात्मा गांधींनी आपल्या उपवासाच्या दिव्याने तेथील हिंदु-मुसलमानांतील जात्यंधतेचे विषारी सत्र थांबविले, परंतु दुर्दैवाने पंजाबमध्ये अजूनही फार मोठ्या प्रमाणावर एका जातीचे दुसऱ्या जातीच्या अल्पसंख्याकांवर हल्ले चालू असून त्यामुळे लाखोंनी अल्पसंख्य निर्वासित आपली घरेदारे सोडून पळत आहेत. वर्षानुवर्षे, पिढ्यान्पिढ्या वस्ती करून आपली जन्मभूमी मानलेली गावे एकूणएक अल्पसंख्य जमातीचे लोक सोडून जात आहेत.

ह्या निर्वासितांना सुखरूपपणे त्यांच्या राष्ट्रात पोचविण्याची जबाबदारी ही हिंद व पाकिस्तान सरकारांची आहे. हिंद वसाहतीतील अल्पसंख्य मुसलमानांना अगदी बिनधोकपणे पाकिस्तानात पोहोचविणे हिंद सरकार गेले कित्येक दिवस करीत आहे. परंतु वारंवार पश्चिम पंजाबातून येणाऱ्या बातम्यांवरून असे स्पष्ट दिसते की, पाकिस्तान सरकार मात्र त्यांच्या सरहद्दीतील अल्पसंख्य हिंदु-शिखांना हिंद वसाहतीत सुखरूपपणे आणून पोहोचवू शकत नाही. किंबहुना, हिंदु-शीख निर्वासितांनी भरलेल्या आगगाड्यांवर राजरोसपणे पश्चिम पंजाबात सशस्त्र मुसलमान गुंडांचे हल्ले चालू आहेत आणि त्यांच्या त्या कामगिरीत पाकिस्तानी पोलिस व लष्करही सामील झाले आहे. अशा तऱ्हेने हजारो हिंदु-शिखांच्या कत्तलीचा व बायकांमुलांना पळविण्याचा कार्यक्रम पश्चिम पंजाबात सर्रास

चालू असून तेथील सरकारचे त्याकडे बिलकूल लक्ष नाही. अल्पसंख्याकांच्या रक्षणाच्या पाकिस्तानी पुढारी मोठ्या गप्पा मारतात व हिंद सरकार अल्पसंख्य मुसलमानांचे रक्षण करीत नाहीत म्हणून ते मोठ्याने आक्रोशही करतात. मात्र त्याचबरोबर खुद्द त्यांच्या ताब्यात असलेल्या भागात अल्पसंख्य जमातींचा वाटेल तसा छळ मुसलमानांकडून चालू आहे. जे निर्वासित हिंद वसाहतीत येणार असतात त्यांच्या जवळून त्यांची बहुतेक सारी चीजवस्तू घेण्यात येते, त्यांना स्वतःबरोबर कपडे, अन्न किंवा नेता येण्याजोगी मालमत्ता, यापैकी काहीच पाकिस्तान सरकार नेऊ देत नाही. बहुसंख्य मुसलमानांच्या राक्षसी जुलमांच्या जोडीला पाकिस्तानी सरकारची ही गांजणूक चालू आहे. आपली सर्व मालमत्ता घरदार सोडून, जीव घेऊन पळणारे अल्पसंख्य जर क्रूर मुसलमानांच्या क्रूर घातकी हल्ल्यातून वाचलेच तर पाकिस्तानी सरकार त्यांना त्रास देण्याकरिता व नागविण्याकरिता तयार असतेच.

अशा ह्या अल्पसंख्यांच्या गांजणुकीच्या वाढत्या बातम्या येत आहेत. एकीकडे करारा-प्रमाणे हिंद सरकार अल्पसंख्यांच्या संरक्षणाचे कर्तव्यपालन बजावीत आहे. दिल्ली किंवा पूर्व पंजाबातील मुसलमानांवरील अत्याचार यांचे ताबडतोब पारिपत्य करण्यात नेहरू सरकार यशस्वी झाले आहे. परंतु दुसरीकडे पाकिस्तान सरकार कराराचा भंग करून अल्पसंख्यांचे अजिबात संरक्षण तर करीत नाहीच पण उलट त्यांची गांजणूक मात्र करते. दररोज हजारोंनी दिल्लीत येणाऱ्या अन्न-वस्त्र-विहीन हिंदु-शीख निर्वासितांच्या करुण कहाण्या हिंद सरकारला, महात्मा गांधींना व हिंद जनतेला हेच सांगत आहेत आणि त्यांच्या ह्या करुण कहाण्या केवळ हिंदी लोकांच्याच नव्हे तर महात्मा गांधींसारख्या अहिंसेच्या प्रमुख उपासकालाही युद्धाच्या गोष्टी करण्यास उद्युक्त करीत आहेत.

एका दृष्टीने महात्मा गांधींनी इषारा दिला हे बरोबरच झाले. कारण कधी कधी त्यांच्यापेक्षा त्यांचा शिष्यगणच अहिंसेचे फाजील अवंडबर माजवीत असतो. तेव्हा महात्माजींनी दिलेल्या ह्या इषाऱ्यापासून आमच्या हिंद सरकारने काय तो बोध घ्यावा, कारण आजवर आम्ही मुसलमानांच्या बहुतेक मागण्या पुरवीत आलो असून त्याचाच परिणाम पाकिस्तानच्या मागणीचा हट्ट पुरविण्यात झाला, परंतु आता याउपर कोणत्याही प्रकारे त्यांची कुरघोडी सहन करण्यास हिंद सरकार किंवा हिंदी जनता तयार नाही हे त्यांना दाखवून दिले पाहिजे. आमच्या सहनशीलतेलाही मर्यादा ही आहेच आणि मुसलमानांच्या अल्पसंख्यांवरील अत्याचारांची परिसीमा झाली आहे. आमची सहन-शीलता आणखी यापुढे त्यांचे अत्याचारांचे सत्र चालू देण्यास तयार नाही व त्याला लागलीच आळा बसणे अत्यावश्यक आहे हे हिंदी जनतेने व हिंद सरकारने पाकिस्तानी सरकारला एका कडक व निर्वाणीच्या ताकदीद्वारे कळविले पाहिजे.

पाकिस्तान सरकार ताबडतोब अल्पसंख्यांच्या संरक्षणाची जबाबदारी पार पाडण्याच्या

कामास न लागल्यास त्याचे परिणाम फार वाईट होतील. अगोदरच हिंद वसाहतीत हिंदु-शिखांच्या मनात मुसलमानांविषयी जबरदस्त तेढ निर्माण झाली आहे. जिकडेतिकडे पंजाबातील मुसलमानांच्या अत्याचाराचा सूड घेण्याची प्रतिक्रिया वाढत्या प्रमाणात आहे. मुसलमानांत घबराटीचे व संशयाचे वातावरण पसरले असून त्यांची धावपळ सुरू आहे. काही हैदराबादकडे पळताहेत तर काही भोपाळकडे. अशी स्थिती हिंद वसाहतीत केवळ पाकिस्तानमध्ये होणाऱ्या हिंदु-शिखांवरील अत्याचारांमुळे निर्माण झाली आहे आणि जे मुसलमान हिंद सरकारच्या व हिंदी जनतेच्या चांगल्या वागणुकीचा फायदा घेऊन अजूनही येथे राहिले आहेत त्यांपैकी काहींनी पंचमस्तंभी कारवाया सुरू केल्या आहेत. आणि म्हणून त्यांनाही पंडीत जवाहरलाल नेहरूंना अशी ताकीद द्यावी लागली की, 'हिंद वसाहतीत राजनिष्ठापूर्वक राहावयाचे असेल तरच आम्ही तुम्हाला संरक्षण देऊ व राहावयाची परवानगी देऊ; नाहीतर ताबडतोब पाकिस्तानचा मार्ग धरा, तिकडे तुम्हाला पोहोचविण्याची व्यवस्था करतो.'

हिंद वसाहतीतील काही लीगी पुढाऱ्यांच्या डोक्यात त्यांच्या जीविताला धोका पोहोचण्याची परिस्थिती निर्माण होताच प्रकाश पडू लागला आहे. युक्तप्रांत, मध्यप्रांत, ओरिसा आदी प्रांतांतील लीगी मुसलमानांना पाकिस्तानचे स्वप्न खरे झाल्यावर त्यापासून होणाऱ्या संकटांची जाणीव होऊ लागली आहे. ओरिसाच्या एका लीगी पुढाऱ्याने तर चक्क द्विराष्ट्र तत्त्वाच्या पुरस्कारामुळेच पाकिस्तानमुळेच जात्यंधतेचे भूत संचार करीत आहे असे म्हटले! आणि म्हणूनच हिंदी वसाहतीतील अनेक लीगी पुढारी श्री. जिनांना असे स्पष्टपणे बजावीत आहेत की त्यांची हिंद वसाहतीतील सुरक्षितता पाकिस्तानमध्ये अल्पसंख्य हिन्दु-शिखांना ज्या प्रकारे वागविण्यात येईल त्यावर अवलंबून आहे!! त्यावरून हिन्दी मुसलमानांना पाकिस्तान सरकारच्या धोरणाचा अप्रत्यक्षपणे तरी धिक्कार करणे भाग पडत आहे.

परंतु अशा तऱ्हेने पाकिस्तान सरकारला उमज पडेल ही आशा फोल ठरली आहे. उलट त्यांच्याच चिथावणीने चालू असलेले दंगे थांबविण्याकरिता त्या सरकारने ब्रिटिश संघराज्यातील सर्व राष्ट्रांना ते थांबविण्याकरिता 'काही तरी' प्रयत्न करण्याची विनंती केली आहे! अशा तऱ्हेने ज्या ब्रिटिश सरकारच्या कृपाछत्राखाली पाकिस्तानची जोपासना झाली त्याच ब्रिटिश सरकारकडे (व नाममात्र इतर वसाहत सरकारांना) मदतीसाठी याचना करून मुस्लिम लीगच्या परधार्जिण्या पुढाऱ्यांनी काँग्रेसने व हिंदी जनतेने अत्यंत कष्टाने प्राप्त केलेल्या स्वातंत्र्यावर घाला घालण्याचा कट रचला आहे. हिंद सरकारशी अल्पसंख्यांच्या संरक्षणासाठी अनेक करार करून त्यांपैकी एकही पार पाडण्यास असमर्थ ठरलेले हे मुस्लिम 'राष्ट्र' साम्राज्यवादी ब्रिटिशांकडे मदतीसाठी तोंड वेंगाडत आहे, आणि अनेक वर्षांपर्यंत स्वातंत्र्यप्राप्तीच्या मार्गात अडथळा आणून आता स्वातंत्र्यप्राप्ती

नंतर लगेच दीड महिन्याने ते स्वातंत्र्य घालविण्याच्या तयारीला लागले आहे. हिंदी जनता व हिंद सरकार हे चाळे मात्र अजिबात चालू देण्यास तयार नाही. यापुढे पाकिस्तान सरकारने अल्पसंख्य संरक्षणात थोडीही ढिलाई दाखविली तर ते युद्धकृत्य (An act of war) समजून त्यांचा मुकाबला करणे आवश्यक आहे.

पाकिस्तानी मुसलमानांसारखे आम्ही जातीय नाही अथवा आमच्या डोळ्यांवर हिंदुत्वाचा थोडाही कैफ चढला नाही. आम्ही राजकारणात जातीयवादाचा शिरकाव होऊ देणे इष्ट नाही, या मताचे आहोत. बहुजन समाजाला– मग तो हिंदू, मुसलमान, शीख, पार्शी, ईसाई कोणत्याही धर्माचा असो– सुखसमाधानाने जीवित कंठणे सुकर व्हावे याकडे राज्यतंत्र चालविणाऱ्यांनी लक्ष द्यावे असेच आमचे नेहमीचे म्हणणे आहे. परंतु जेव्हा एखादे राष्ट्र जात्यंधतेने दुसऱ्या राष्ट्राच्या अल्पसंख्याकांवर नीच हल्ले करून त्याला आव्हान देते, तेव्हा ते आव्हान स्वीकारणे आवश्यक आहे असे आम्हाला वाटते. आणि पाकिस्तानच्या मुसलमानी अत्याचारांचा गेल्या काही महिन्यांचा पाढा हे हिंद सरकारला आव्हान होय. हिंद सरकारने ते स्वीकारावे-आपल्या व आपल्या जनतेच्या रक्षणाकरिता स्वीकारावे– एवढेच आमचे म्हणणे आहे. पाकिस्तानविरुद्ध युद्ध पुकारावेच लागले तर ते त्यांचे चाळे थांबविण्याकरिता, त्यांच्यावर आक्रमण करून त्यांना आपल्या हुकमतीखाली आणण्यासाठी नव्हे आणि ते युद्ध पुकारण्यापूर्वी एकदा शेवटची ताकीद देणेही इष्ट आहे. जर त्या ताकिदीलाही न जुमानता पाकिस्तान सरकारने आपल्या सरहद्दीतील नीच अत्याचार बंद केले नाहीत व हिंद सरकारचा उपमर्द चालू ठेवला, तर महात्मा गांधींनी म्हटल्याप्रमाणे, हिंद सरकारला युद्धच पुकारावे लागेल!

३८

मंत्रिमंडळ विरोधकांचा पोकळवासा

१२–१०–४७

१५ ऑगस्टच्या सुमारास आणि तदनंतर प्रांतांत घडलेल्या काही घटनांमुळे या वेळेच्या कायदेमंडळाच्या बैठकीच्या वेळी पक्षसभेत काही बदसूर निघणार याची जाणीव ज्या तऱ्हेचा प्रचार नागपुरातील काही वृत्तपत्रांनी केला त्यामुळे प्रत्येकास होती, आणि त्यामुळेच प्रांतातील साऱ्या जनतेचे लक्ष कायदेमंडळाच्या बैठकीवर स्थिर झाले होते. लोकांच्या अपेक्षेप्रमाणे काही काँग्रेस सदस्यांनी आमचा मंत्रिमंडळावर विश्वास नाही अशा तऱ्हेच्या ठरावाची नोटीस ता. ६ ला रात्री पक्षाला सादर केली. ता. ८ ला रात्री त्याप्रमाणे पक्षनेते ना. शुक्ला यांच्या घरी बैठक बोलावण्यात आली. पण त्याला अविश्वासाचा ठराव आणणाऱ्यांपैकी कोणीही हजर राहिले नाही; आणि शेवटी आचार्य दादा धर्माधिकारी यांनी मंत्रिमंडळावर विश्वासाचा ठराव आणला आणि तो ७३ विरुद्ध ३ अशा प्रचंड बहुमताने पास झाला. अशा रीतीने काँग्रेस पक्षसदस्यांनी आपला मंत्रिमंडळावर पूर्ण विश्वास असल्याची ग्वाही दिली. मंत्रिमंडळ अविश्वासाच्या अग्निदिव्यातून सुखरूप बाहेर पडले आणि विरोधकांचा विरोध सपशेल वितळून गेला.

पण, या दिव्यातून मंत्रिमंडळ सुखरूप बाहेर पडले, आणि विरोधकांचा विरोध फुसका ठरला याला आमच्या दृष्टीने विशेष महत्त्व नाही. आमच्या प्रांतावर काँग्रेस पक्षातील एका विशिष्ट गटानेच राज्य करावे असा आमचा कटाक्ष नाही. किंबहुना आजच्या मंत्रिमंडळापेक्षा अधिक लोकहितदक्ष मंत्रिमंडळ अस्तित्वात येऊ नये असेही आम्हांस कधी वाटले नाही. परंतु कायदेमंडळातील राजकारणाची सूत्रे ज्या एका किंवा अनेक

व्यक्तींच्या हातात असतात त्यांनी त्यांचा उपयोग स्वतःची प्रतिष्ठा वाढविण्याकरिता करून जनकार्याचा चुथडा करू नये असे मात्र आम्हांस वाटते आणि या कसोटीवरून आजच्या मंत्रिमंडळास विरोध कोणत्या दृष्टिकोणातून करण्यात आला आहे याची छाननी होणे जरूर आहे.

मंत्रिमंडळाविरुद्ध अविश्वासाचा ठराव का आणण्यात आला ? अविश्वास आणणाऱ्यांचा मंत्रिमंडळाशी काही तात्त्विक विरोध आहे काय ? असल्यास ठराव आणणाऱ्यांनी तसे जाहीर केले आहे काय ? की केवळ ना. पं. मिश्रांचे वर्चस्व आम्हांस नको, आम्हांस ना. बियाणी यांचेच वर्चस्व पाहिजे, आम्हाला ना. पं. शुक्ल मुख्यप्रधान नकोत, आम्हांस श्री. खेडकर किंवा श्री. कुंजीलाल दुबे हेच मुख्यप्रधान पाहिजेत, एवढीच मंत्रिमंडळावरील अविश्वासाची तात्त्विक भूमिका आहे काय ? अशा व्यक्तिनिष्ठेच्या भूताने आम्हांस पछाडले तर कदाचित दररोजच एक नवीन मंत्रिमंडळ अस्तित्वात येऊ शकेल.

मंत्रिमंडळावर अविश्वासाचा ठराव का आणण्यात आला ? आतापर्यंत तुम्ही राज्योपभोग घेतला, आता आम्हांस घेऊ द्या, एवढीच विरोधकांची भूमिका असेल तर भिस्त्याच्या राज्याप्रमाणे विरोधकांचे राज्यही औट घटकेपेक्षा अधिक काळ टिकणार नाही. विरोध करताना किंवा अविश्वासाचा ठराव आणताना आपण अविश्वासाचा ठराव का आणतो किंवा विरोध का करतो याची स्पष्ट कल्पना विरोधकांना असावयास पाहिजे. मंत्रिमंडळाचे अमुक-अमुक काम हे परागतिक आहे, या मंत्रिमंडळाकडून प्रांताचा कारभार व्यवस्थित आणि सुरळीत चालला नाही, आजचे मंत्री हे जनहितविरोधी आहेत अशा स्वरूपाचे निश्चित आणि निर्भीड धोरण विरोधकांचे असावयास पाहिजे. पण विरोधकांनी आम्ही कोणत्या तत्त्वाकरिता झगडा सुरू केला आहे याचा तिळमात्रसुद्धा उल्लेख कोठेही केला नाही, किंवा विरोधक कोणता कार्यक्रम यशस्वी करून दाखवू शकतात आणि तो यशस्वी करणे त्यांना कसे शक्य आहे आणि आजच्या मंत्रिमंडळाला कसे व का शक्य नाही याबद्दल त्यांनी जनतेच्या काहीही निदर्शनास आणले नाही. उदा. आजचे मंत्रिमंडळ हे काँग्रेसचे आणि जनतेचे मंत्रिमंडळ असले तरी समाजवादी मंत्रिमंडळ नव्हे. समाजवादी मंत्रिमंडळ असते तर त्यांनी एका विशिष्ट पद्धतीने राज्यकारभार केला असता. पण अशा तऱ्हेचे समाजवादी मंत्रिमंडळ आजच्या स्थितीत अस्तित्वात येऊ शकते काय याचाही विचार करावयास नको काय ?

'अविश्वासाचा ठराव' हा दिसावयास जरी अभावात्मक (Negative) दिसला तरी त्यालाही एक भावरूप बाजू आहे. अविश्वासाचा ठराव म्हणजे प्रांताच्या कारभाराची जबाबदारी घेण्याची तयारी. त्याकरिता विरोधकांनी आपला कार्यक्रम आणि आपली चमू आणि तिचा नेता हा जनतेच्या आणि पक्षाच्या समोर आणावयास पाहिजे. मंत्र्यांना त्यांच्या आसनावरून खाली ओढून त्या जागी विराजमान होऊ पाहणारे नेतेच जर

मंत्र्यांना भिऊन 'भूमिगत — अंडरग्राऊंड' होऊ लागले तर विरोधकांची कुवत किती आहे हे जनतेला ओळखण्यास वेळ लागणार नाही. जेथे मंत्रिमंडळाला खाली आणण्यासाठी जरूर पडल्यास तरवारी पाजळण्याची तयारी पाहिजे, तेथे अंधारात मंत्र्यांना शिव्या देणाऱ्या आणि उजेडात त्यांच्या समोर लांगूलचालन करणाऱ्या नादान लोकांचा पाड तो काय लागणार ? अशा तऱ्हेचे नादान लोक लाखाच्या संख्येत जरी उत्पन्न झाले तरी त्यामुळे मंत्रिमंडळाला धोका उत्पन्न होणार नाही. अशा लोकांना 'यस्मिन् कुले त्वमुत्पन्नो गजलत्र न हन्यते' असे म्हणण्यावाचून काय गत्यंतर आहे ?

मंत्रिविरोधकांची गुप्तमतदानाची मागणीही दिसावयास सोज्वळ दिसली तरी अशाच स्वरूपाची आहे. सामान्य निवडणुकीत गुप्त मतदान असणे लोकशाही तत्त्वाला अनुसरून असले तरी जेथे एका नेत्यावर अविश्वास दाखवून दुसरा नेता निवडावयाचा असतो तेथे याच परंपरेचा पुरस्कार करणे योग्य आहे असे आम्हांस वाटत नाही. याची कारणे दोन : एकतर हा उघड उघड विरोधाचा भाग आहे. गुप्तपणे एकाला विरोध करून उघडपणे पुनः त्याची हांजी हांजी करावयाचा प्रयत्न करणे नीतिदृष्ट्या अत्यंत हीन दर्जाचे आहे, यात मुळीच शंका नाही. जे निर्भय नाहीत त्यांच्या गर्जना म्हणजे वल्गनाच होत हे कोणासही समजू शकते. चालू सत्ता उलटवून टाकावयाची असेल तर आजच्या सत्तेपेक्षा अधिक मूल्यवान अशी सत्ताच अस्तित्वात यावयास पाहिजे. आणि ज्या दोषाकरिता आजच्या प्रांतशासकांवर विरोधकांचा राग होण्याचा संभव आहे, त्याच दोषाला जर विरोधकही बळी पडणार असतील तर मंत्रिमंडळात बदल झाला काय किंवा न झाला काय जनतेला त्याचे काय सोयर-सुतक ?

दुसरे, सत्तारूढ असणाऱ्या गटाविरुद्ध असंतुष्ट राहणारा एक गणगांचा वर्ग नेहमीच राहात असतो. पण कोणतेही निर्मेयत्व (Creative faculty) या वर्गात नसल्यामुळे, केवळ एक एका सत्तेचा चुथडा करीत राहणे येवढेच या वर्गाचे कार्य होऊन बसते. असे लोक मागे राहून सत्तारूढ लोकांचे जितके चिमटे काढणे शक्य असते तितके काढीत जातात. तसेच सत्तालोलुप लोकांचा एक गट प्रत्येक समाजात असतो. थोडेसे आमिष दाखविले की हे लोक त्याला सहज बळी पडू शकतात; आणि दाखविलेल्या आमिषाची फळे जोपर्यंत त्यांना चाखता येत नाहीत तोपर्यंत सत्तारूढाशी उघड वैर करण्याची यांची हिंमत नसते. गुप्तमतदानाची याचना जी होत असते ती अशाच लोकांच्या सोयीकरिता. पण अशा लोकांची सोय पाहणे म्हणजे व्यवस्थेचा पचका करून घेणे होय; आणि ज्यांना व्यवस्थेशीर बदल घडवून आणावयाचा असेल ते अशा कर्तृत्व-शून्य, भ्याड पण सत्तालोलुप लोकांच्या हातचे खेळणे होणार नाहीत. याच कारणास्तव अविश्वासाच्या ठरावावर गुप्त मतदान घेणे अप्रयोजकपणाचे आहे.

आज आमच्या प्रांतात अस्तित्वात असलेल्या मंत्रिमंडळात काही दोष नसतीलच असे

आम्हास म्हणावयाचे नाही. पण जगात निर्दोष असा माणूस कोण आढळेल ? मंत्र्यांच्या दोषांची चर्चा करून त्यांना या दोषापासून परावृत्त करण्याऐवजी त्यांच्यावर एकदम अविश्वासाचा ठराव आणणे अयोग्य आहे. देशातील दुर्भिक्ष्यामुळे आणि राजकीय परिस्थितीमुळे प्रांताच्या विकासाच्या दृष्टीने मंत्रिमंडळाला विधायक असे विशेष करता आले नाही. परंतु हे याच मंत्रिमंडळाला करिता आले नाही असे नाही, तर कोणत्याही मंत्रिमंडळाला यक्षिणीची कांडी फिरवून आजच्या परिस्थितीत प्रांताचा पूर्ण विकास करून दाखविता आला नसता. समाजवादी मंत्रिमंडळालासुद्धा आला नसता. तेव्हा मंत्रिमंडळाला कार्यप्रवृत्त करावयाचे सोडून त्यांच्या मार्गात अडथळे आणणे आणि समाजाला हितकारक गोष्टी स्वतः करून व मंत्र्यांकडून करवून घेण्याऐवजी एकमेकांना विरुद्ध आणि अनिष्ट अशी 'गटबंदी' करण्यात प्रांताची सर्व शक्ती खर्च करणे मुळीच इष्ट नाही. विशेषतः पाकिस्तानचे भूत आपल्या सर्वांच्या मानगुटीवर असताना तर मुळीच नाही.

अविश्वासाचा ठराव आणणाऱ्या लोकांत चांगले लोक नसतील असे आम्हास म्हणावयाचे नाही. पण या विरोधकांत सामान्यतः 'असंतोषा'वरच जगणारे, बहुजन समाजवादाची भांग प्यालेले, काही प्रतिगामी नोकरशहांच्या सल्ल्यानेच चालणारे, आणि सत्तेकरिताच हपापलेले असे सर्वसाधारण लोक आहेत व असे अठरा धान्यांचे कडबोळे प्रांताचे 'कल्याण' केल्यावाचून राहिले नसते हे निश्चित आहे. या कडबोळ्याच्या बाजूने जर काँग्रेस सदस्यांनी आपल्या मनाचा कौल दिला असता तर प्रांतात काय सावळागोंधळ झाला असता याची कल्पनाच करणे कठीण आहे. सुदैवाने असेंब्लीतील काँग्रेस सदस्यांनी या प्रसंगातून प्रांतास बचावले याबद्दल त्यांचे अभिनंदन करणे निःसंशय जरूर आहे.

आणखी एका रीतीने मंत्रिमंडळ या अग्निदिव्यातून बाहेर पडले हे बरेच झाले. आता मंत्रिमंडळाची ताकद शतशः वाढली आहे. विरोधकांना मात्र डोळ्यात राख गेल्यामुळे डोळे चोळत बसावे लागले आहे. या शक्तीचा उपयोग मंत्रिमंडळ योग्य रीतीने करील आणि नोकरशहांच्या जुलमातून जनतेस सोडवील अशी आम्ही आशा व्यक्त करितो.

३९

जुनागड खालसा करा !

१९–१०–४७

गेले कित्येक दिवस हिंदी स्वातंत्र्याचा पाया डळमळीत करण्याचे प्रयत्न चालू आहेत. जाता जाता ब्रिटिश साम्राज्यशाहीने हिंदुस्थान खंडित करूनच स्वातंत्र्याचे उदक सोडले आणि त्याशिवाय पाचशेहून अधिक लहानमोठ्या संस्थानांना हिंदुस्थानभर धुमाकूळ घालण्यास 'स्वातंत्र्य' देऊन मोकळे रान दिले. हिंदुस्थानच्या विभाजनाने जातीय प्रश्न न सुटता पंजाबात व इतरत्र अमानुष दंग्यांचे पीक मात्र आले, त्याचप्रमाणे ह्या शेकडो लहान-मोठ्या संस्थानिकांना त्यांच्या प्रजेचे भवितव्य ठरविण्याचे 'स्वातंत्र्य' देऊन संस्थानी प्रजेबरोबरच हिंदी प्रजेलाही धोका उत्पन्न झाला. हैदराबादसारखी अडेलतट्टू संस्थाने अजूनही 'स्वतंत्र'च आहेत. त्रावणकोर, भोपाळसारख्यांनी तो तमाशा करण्याचा प्रयत्न करून व बरेच दिवस प्रजेला त्रास देऊन शेवटी नाइलाजास्तव हिंदी संघराज्यात सामील होण्याचा निर्णय घेतला तर जुनागड ह्या काठेवाडातील एका लहानशा संस्थानच्या हुकुमशाही नबाबाने संस्थानी प्रजेला न विचारता, तिच्या इच्छेविरुद्ध पाकिस्तानमध्ये सामील करून घेतले आहे.

ह्या संस्थानची बहुसंख्य प्रजा हिंदू व मुस्लिमेतर आहे. केवळ तेथील राजा मात्र मुसलमान असल्यामुळेच एवढा गोंधळ त्याने घातला आहे. शिवाय जून ३ च्या घोषणेत संस्थानांनी पाकिस्तान अथवा हिंद संघराज्यापैकी कोणत्याही वसाहतीत भौगोलिक परिस्थितीनुसार सामील व्हावे असा त्यांना जो आदेश देण्यात आला होता, त्याच्याही अगदी विरुद्ध असा जुनागडच्या नबाबाचा हा निर्णय आहे. कारण जुनागडची सरहद्द

कोठेही पाकिस्तानला लागून नसून सर्व दृष्टींनी ते संस्थान हिंदी संघराज्यातच सामील होणे आवश्यक आहे. समुद्रकिनाऱ्याला लागून असल्यामुळे तर संरक्षणाच्या दृष्टीने त्याचे महत्त्व हिंदी संघराज्याला फारच आहे. परंतु हिंद सरकारच्या कोणत्याच म्हणण्याकडे लक्ष न देता अगदी बेगुमानपणे तेथील नबाबाने आपले वर्तन चालविले आहे. काही दिवसांपूर्वी हिंद सरकारच्या संस्थानी खात्याचे सेक्रेटरी श्री. मेनन जुनागडला नबाबाशी वाटाघाटी करण्यास गेले असता त्यांना त्यांची भेट न घेताच हात हालवीत परत यावे लागले!

ही अशी परिस्थिती का निर्माण झाली? ब्रिटिशांनी जाण्यापूर्वी हरप्रकारे प्रतिगामी शक्तींना फूस दिली हे मान्य केल्यावरही स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आमचे सरकार अशा प्रतिगामी शक्तींना चिरडून का टाकीत नाही हा सवाल उरतोच. हिंदी सरकार हे जनतेच्या इच्छेनुसारच विराजमान झाले आहे. संस्थानातही तद्वतच परिस्थिती निर्माण करणे हे त्याचे कर्तव्य असूनही तिकडे त्याचे सतत दुर्लक्ष होत आहे. अर्थात त्यांनी आपले सर्व लक्ष संस्थानाकडेच केंद्रित करावे असे आमचे म्हणणे नाही, कारण पंजाबमधील निर्वासितांचा प्रश्नही अत्यंत महत्त्वाचा आहे हे खरे. परंतु लाखो संस्थानी प्रजेचे हितरक्षण हेही तेवढेच महत्त्वाचे कार्य आहे हे कोणीही मान्य करील, किंबहुना स्वतः हिंदी सरकारही ते मान्य करीत आले आहे. असे असूनही, व संस्थानी प्रजा संपूर्णतया हिंदी सरकारला साथ देण्यास तयार असतानाही तिच्या मदतीला धावून जाण्याचे काम अजूनही आमचे सरकार करीत नाही हे आश्चर्यच नव्हे काय?

जुनागडसारखे एक चिमुरडे संस्थान गेले कित्येक दिवस हिंदी सरकारला सतावीत आहे. हैदराबाद एवढे ते अवाढव्यही नाही किंवा त्याची स्वतःची मोठी फौजही नाही. परंतु वनराज सिंहाला एका डासाने सतवावे तशी ही परिस्थिती निर्माण झाली आहे खरी! मेटाकुटीला येऊन त्या डासाशी सिंहाने वाटाघाटी करण्यापर्यंत पाळी आणली आहे!

आमचे सरकार उगीचच ह्या मार्गाचा अवलंब करीत आहे, शिवाय पाकिस्तान सरकारलाही या लहानशा प्रश्नात गोवण्याचे काहीच कारण नव्हते. प्रश्न साधा, सोपा व सरळ आहे. हिंदी संघराज्यात बहुसंख्य मुस्लिमेतर प्रजा असलेल्या सर्व संस्थानांनी सामील झालेच पाहिजे. तो प्रश्न प्रजेचा असून जेथे प्रजा सामील होण्यास राजी आहे, तेथील सरंजामी व जुन्या राजवटीचे अवशेष असलेले नबाब राजे यांना कोणताही निर्णय घेण्याचा हक्क नाही. जुनागडच्या नबाबाने तो निर्णय स्वतः घेऊन प्रजेच्या हक्काची पायमल्ली केली– नव्हे, प्रजेचा उपमर्द केला आहे. तेव्हा हिंदी संघराज्य सरकारने ताबडतोब त्या नबाबाला त्याची जागा दाखवून देणे अत्यावश्यक आहे, आणि त्याकरिता जुनागडच्या प्रजेने जे प्रतिसरकार स्थापन केले आहे त्यास हरप्रकारे मदत देणे हेच त्यांचे

कर्तव्य होय. एवढेच नव्हे, तर जुनागडमध्ये आपल्या फौजा पाठवून तेथील नवाबाच्या पित्त्यांना हुसकावून लावून खरे जनतेचे सरकार प्रस्थापित केले पाहिजे. जुनागडच्या सरहद्दीवर फौजा पाठवून अथवा नौदल व वायुदल पाठवून ह्या प्रश्नाचा समाधानकारक रीत्या निकाल लागणार नाही.

काही प्रश्न असे असतात की त्यामध्ये तडजोडीला किंवा सामोपचाराला अजिबात वाव नसतो. हिंदी संस्थानिकांचा प्रश्न हा त्यांपैकीच एक होय. हजारो वर्षे त्यांनी प्रजेला पिळून तिच्या जीवावर स्वतःचे व आपल्या पित्त्यांचे पिंड पोसले. ती प्रजा आपल्या हक्कांची जाणीव झाल्याने ते हक्क मागीत असता तिला हरप्रकारे मदत करणे हेच इतरांचे कर्तव्य होऊन बसते आणि हिंद सरकार तर तिच्यासारखाच अनेक वर्षे ब्रिटिशांशी झगडा करून अधिकारारूढ झाले आहे. तेव्हा त्यांनी जुनागडच्या प्रजेच्या इच्छेचा उपमर्द होत असलेला पाहणे, तिला चिरडलेली पाहणे म्हणजे अत्यंत नामुष्कीची गोष्ट होय. हिंदी सरकारने जुनागड ताबडतोब खालसा करावे आणि ती नामुष्की पदरी घेण्याचे टाळावे.

४०

नेहरू सरकार बलशाली करा !
समाजवादी पक्षाचे मार्गदर्शन !

२६–१०–४७

नुकत्याच दिल्ली येथे झालेल्या समाजवादी पक्षाच्या कार्यकारिणीच्या सभेत (National Executive) हिंद सरकारला बलशाली करण्यासाठी सर्व हिंदी जनतेने पूर्ण सहकार्य व पाठिंबा द्यावा असा प्रस्ताव पास करण्यात आला. समाजवादी पक्षाचे सध्याच्या हिंद सरकारशी अनेक बाबतींत पटत नसले व त्यामुळे समाजवादी पुढारी हिंद सरकारवर अनेक वार टीकाही करीत असले, तरी जातीयतेच्या भूताने सर्वत्र जो संचार सुरू केला आहे त्याला तोंड देण्यासाठी ही आवश्यक अशी भूमिका पक्षाने स्वीकारली आहे.

समाजवादी पक्षाने हिंदी राष्ट्राचे केलेले हे मार्गदर्शन सद्यःपरिस्थितीचे अवलोकन केले असता अत्यंत रास्त व वास्तवतापूर्ण आहे हे स्पष्ट दिसून येईल. हिंदुस्थानला स्वातंत्र्य-प्राप्ती होऊन आज दोन महिन्यांहून अधिक कालावधी लोटला आहे. ज्या १५ ऑगस्टची हिंदी जनतेने अत्यंत आतुरतेने वाट पाहिली तो दिवस स्वातंत्र्यप्राप्तीच्या स्वप्नपूर्ती-प्रमाणेच इतिहासजमा झाला आहे, आणि त्याबरोबरच त्या स्वप्नपूर्तीच्या आनंदात विरजण पाडणारे जीनाशहांचे खंडित हिंदुस्थानचे स्वप्नही खरे होऊन तीही एक ऐतिहासिक घटना झाली आहे. परंतु त्या ऐतिहासिक घटना मागोमाग गेल्या दोन महिन्यांत पंजाबात व हिंदुस्थानात इतस्ततः अमानुष दंग्यांचे सत्र सुरू झाले; त्यामुळे फारच गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्या दंग्यांमुळे जागतिक राजकारणक्षेत्रात हिंद सरकारचे नाव बदनाम तर झालेच पण खुद्द हिंद सरकारच्या अस्तित्वास धोका

निर्माण झाला आहे.

पाकिस्तानला मान्यता देण्यात अनेक वर्षे चालू असलेली देशाची गुलामी नाहीशी होऊन देशाचा राज्यकारभार आपल्या हाती येईल व आपणच आपल्या भवितव्याचे स्वामी होऊ हा काँग्रेस पुढाऱ्यांचा हेतू होता; आणि तो हेतू जरी सफल झाला असला तरी १५ ऑगस्टनंतर नवीनच अधिकारारूढ झालेल्या नेहरूंच्या हिंद सरकारला एका अत्यंत मोठ्या दिव्यातून जावे लागले. पंजाबच्या फाळणीतून उसळलेल्या जात्यंधतेच्या डोंबाने निर्वासितांचा जो मोठा प्रश्न निर्माण केला त्यामुळे नेहरू सरकारला जबरदस्त धक्के बसले; आणि पाकिस्तानमध्ये होणाऱ्या हिंदु-शिखांवरील अत्याचारांची हिंद संघराज्यात जी प्रतिक्रिया झाली तिला जातिनिरपेक्षपणे तोंड देणे हे अत्यंत कठीण काम नेहरू सरकारला करावे लागले व जवाहरलालजींच्या धडाडीपणामुळेच प्रतिगामी हिंदुत्व-निष्ठ व शीख शक्तींना तोंड देणे शक्य झाले. नाहीतर पाकिस्तानमध्ये प्रत्यही होत असलेल्या हिंदु-शीख अल्पसंख्याकांवरील अत्याचारांना हिंद संघराज्यात प्रत्युत्तर देणे बरोबर नाही हे हिंदी जनतेला समजाविणे कठीण झाले असते.

काही जातिनिष्ठ संघटना व वृत्तपत्रे अजूनही 'हिंदु राज्य' निर्माण करण्याच्या गप्पा करीत आहेत व हिंद सरकारने त्याला मान्यता द्यावी अशी खटपट करीत आहेत. परंतु पंडित जवाहरलाल नेहरूंच्या पुढारीपणाखाली हिंद सरकार केव्हाही जातीयपणाचा शिक्का स्वतःवर लादून घेणार नाही हे नक्की आहे आणि त्यामुळेच समाजवादी पक्षाचा त्या सरकारला पाठिंबा देण्याचा व बलशाली करण्याचा निर्धार आहे. अर्थात हिंद सरकारने जातिनिरपेक्षपणाबरोबरच कोणत्याही एका अल्पसंख्य जमातीला फाजील सवलती देऊ नयेत असेही समाजवाद्यांना वाटते.

मध्यवर्ती हिंद सरकार सर्व दृष्टींनी संरक्षणाची जबाबदारी स्वीकारण्याकरिता सिद्ध असण्यासाठी हिंदी जनतेचा पूर्ण पाठिंबा असणे ज्याप्रमाणे आवश्यक आहे त्याचप्रमाणे आणखीही काही गोष्टींची आवश्यकता आहे. पहिली म्हणजे हिंदसंघराज्यातील हरेक मुसलमानाने हिंद सरकारशी आपली इमानदारी व्यक्त केली पाहिजे. पाकिस्तानशी इमान राखू इच्छिणाऱ्यांना हिंदी संघराज्यात स्थान नाही हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. मोटमोठ्या पुढाऱ्यांनी हे बऱ्याच अंशी जाहीरही केले आहे. तरीही अजूनही मुसलमानांच्या येथे राहून कारवाया व कारस्थाने चालूच आहेत.

मुसलमानांप्रमाणेच ब्रिटिश नोकरांच्या अनेक कारस्थानांवरही गेल्या काही दिवसांत प्रकाश पडला आहे. पद्धतशीरपणे हिंद सरकारला कमजोर करण्याचा त्यांनी चंग बांधलेला दिसतो. तेव्हा मुसलमानधार्जिण्या या गोऱ्या अधिकाऱ्यांना तात्काळ आपल्या मायभूमीची वाट दाखविणे अत्यंत जरूर आहे. हिंदी संघराज्यात त्यांना नोकरी देऊन संघराज्य सरकार विरुद्ध मुसलमानांशी संगनमत करण्यास संधी देणे म्हणजे नागाला दूध पाजणेच

होय. हिंद सरकारने यापुढे कोणाही गोऱ्या अधिकाऱ्यांना नोकरीवर न ठेवणेच बरे!

आणि सरतेशेवटी संस्थानांचा प्रश्न जास्त लांबविणेही हितकर नाही हे ओळखणेही आवश्यक आहे. हैदराबादसारख्या संस्थानांना संघराज्यात सामील होण्यास जबरदस्ती करून सर्व संस्थानांत लोकशाही तत्त्वानुसार राज्यकारभार सुरू होणे आवश्यक आहे. संस्थानातील सरंजामी राजवट हिंदी लोकशाहीला मारक आहे. एवढेच नव्हे तर त्यांचे स्वतंत्र अस्तित्व राज्यकारभाराकरिताही फार त्रासदायक आहे. म्हणून सोयीनुसार त्यांचे काही पाच-सात गट पाडणेही जरूर आहे. असे केल्यास सध्या हिंद सरकारपुढे असलेले सामान्य जनतेचे प्रश्न लवकर हाती घेऊन सोडविणे त्यांना शक्य होईल. कारण जोपर्यंत एकंदर सरकारचा नीट जम बसत नाही तोपर्यंत जनतेच्या हिताचे प्रश्न सोडविणे कठीण आहे आणि त्याकरिता सुदृढ व बलशाली असे मध्यवर्ती सरकार निर्माण होणे आवश्यक आहे. स्थिर सरकार निर्माण करण्यातच जनतेचे हित आहे.

४१

काश्मिर आणि पाकिस्तान

९-११-४७

गेल्या ८-१० दिवसांत घडून आलेल्या घडामोडींत काश्मिरचे हिंदी संघराज्यात येणे हे सर्वांत महत्त्वाचे होय. अनेक दिवसांच्या हलकट पाकिस्तानी कारवायांना शह देण्याचा शेवटचा उरलेला मार्ग काश्मिरने स्वीकारला हे अत्यंत अभिनंदनीय होय. काश्मिरच्या राजेसाहेबांनी हिंदी संघराज्यात सामील होऊन पाकिस्तानी टोळीवाल्यांचे हल्ले परतविण्याकरिता हिंद सरकारची मदत घेतल्यामुळे पश्चिमेकडे पाकिस्तानाकडून धोका निर्माण होण्याचा जो संभव होता तो आता बराच कमी झाला आहे. कारण यापुढे हिंदी संघराज्याचा एक भाग या नात्याने परदेशाशी लागून असलेली काश्मिरची सीमा संभाळणे हे हिंद सरकारचे काम आहे, आणि ते काम हिंद सरकार नीट बजावील यात शंका नाही.

परंतु काश्मिरच्या हिंद संघराज्यात सामील होण्याने गव्हर्नर जनरल जीना व त्यांचे जी हुजूर करणारे लियाकत अली यांचा फार जळफळाट झाला आहे हे त्या दोघांनीही केलेल्या भाषणांनी स्पष्ट झाले आहे. श्री. जीनांनी तर काश्मिर हिंदी संघराज्यात सामील झाल्याचे वृत्त वाचल्यावर पाकिस्तानी फौजांना ताबडतोब काश्मिरकडे कूच करण्याचा हुकूम सोडला होता असे म्हणतात. परंतु फिल्ड मार्शल ऑकिन्लेक यांच्या इंग्रज अधिकाऱ्यांच्या राजीनाम्याच्या धमकीमुळे त्यांनी तो रद्द केला. यावरून जीनांची इंग्रजांवरील भिस्त स्पष्ट दिसून तर येतेच, परंतु त्याच बरोबर काश्मिरवर त्यांचा डोळा होता व वेळ पडल्यास जबरदस्तीने ते पाकिस्तानात सामील करून घेण्याचा त्यांचा विचार होता हे उघड आहे. संस्थानाच्या 'स्वातंत्र्या'विषयी पुळका आलेल्या या जीनांचा आतला डाव काय होता

हे आता सर्वांना कळले आहे. लियाकत अलींनी, 'नेहरूंनी भाषण केले म्हणून मीही करणार' या वृत्तीने लाहोर रेडिओवरून केलेल्या भाषणात तर उघड उघड टोळीवाल्यांच्या चढाईला पाठिंबा दिला आहे.

अशा पाकिस्तानी कारवायांची हिंद सरकारने वेळीच दखल घेतली हे छान झाले. फक्त आता पाकिस्तान सरकारला नीट शह बसेल असे लढाऊ धोरण ठरवून काश्मिर-मधून तर टोळयांची व पाकिस्तानी फौजांची हकालपट्टी करावीच पण काश्मीर आपल्या हातून जाऊ न देण्याची व्यवस्था करावी.

काश्मिरात लोकशाही

वाईटातून चांगले कित्येकदा निघते असे म्हणतात, त्याचाच प्रत्यय काश्मिरवरील पाकिस्तानी चढाईतून आला आहे. इतके दिवस दिवाणाच्या एकतंत्री जुलुमशाहीने गांजलेली काश्मिरी जनता आपल्या आवडत्या नेत्याच्या, शेख अब्दुल्लांच्या; पुढारीपणा-नुसार यापुढे आपला राज्यकारभार चालविणार आहे. काश्मिरच्या राजेसाहेबांनी हिंद संघराज्यात सामील झाल्याबरोबरच लोकशाही राजवट सुरू केली याबद्दल त्यांचे अभिनंदन करणे योग्य ठरेल; आणि शेख अब्दुल्लांच्या हाती अधिकारसूत्रे येताच काश्मिरी जनता त्यांच्या हाकेला ओ देऊन काश्मिरला वाचविण्यासाठी धावली आहे. हिंद फौजेच्या खांद्याला खांदा लावून शेख अब्दुल्लांची 'राष्ट्रीय शांततारक्षण फौज' ही पाकिस्तानी आक्रमकांना हाकलून लावण्यास मदत करीत आहे. लोकशाहीचा परिणाम किती तात्काल असतो त्याचेच हे एक उदाहरण आहे. शेख अब्दुल्लांच्या नेतृत्वाखाली काश्मिरची जनता केव्हाही पाकिस्तानात सामील होणार नाही अशी आशा करणे उचित होईल आणि जनमत त्याकरिता या लढाईनेच तयार होत आहे. शेख अब्दुल्ला व काश्मिरची राष्ट्रीय सभा (National Conference) तेथील जनतेला हिंद संघराज्यात राहणेच योग्य आहे हे पटवून देतील व लोकशाहीचा खराखुरा फायदा घेतील अशी आम्हाला खात्री वाटते.

४२

धर्मनिरपेक्ष शासनसंस्था निर्माण करावयाची असेल तर....

२३-११-४७

१५ ऑगस्टला आपण स्वतंत्र झालो. त्याच दिवशी मुस्लिम लीगची पाकिस्तानची मागणी मंजूर करण्यात येऊन 'पाकिस्तान' नावाचे नवे राष्ट्र ब्रिटिशांनी निर्माण केले. १८५७ पासून ते १५ ऑगस्ट १९४७ पर्यंतच्या आमच्या स्वातंत्र्य युद्धाचे सिंहावलोकन आपण करावयाला लागलो तर आम्ही आमचा लढा कधीही जातीयतेवर आधारला नव्हता असेच दिसून येईल. मुसलमानांबद्दल आमच्या मनात कधीही सापत्न भाव उत्पन्न झाला नाही. मुसलमान हिंदभूमीचे पुत्र नाहीत, त्यांना या देशात जगावयाचा अधिकार नाही असे आमच्या राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या तोंडून स्वप्नात सुद्धा निघाले नाही. पण असे असताना सुद्धा हिंदी मुसलमानांचे आपले तोंड मक्केकडेच. मुसलमानांमध्ये सुद्धा हिंदभूमीशी एकनिष्ठ असणारे लोक नव्हते असे आमचे म्हणणे नाही, पण अशा व्यक्ती अपवादात्मकच. अलिगड विद्यापीठाचे संस्थापक सर सैय्यद मुहम्मद यांच्यापासून तो जीनाशहांपर्यंत सर्वांच्या प्रवृत्ती सवता सुभा निर्माण करण्याकडेच. सर्वसामान्य मुसलमानेतर जनतेपेक्षा मुस्लिम जनता ही अधिक अशिक्षित. त्यामुळे शिक्षणाबरोबर त्यांची मूलवृत्ती नाहीशी होईल असाही आमच्या नेत्यांपैकी अनेकांनी तर्क केला. पण 'मूळ स्वभाव जाईना' या न्यायाने अर्धशिक्षित मुसलमान हा अधिकच दुष्ट प्रवृत्तीचा होऊ लागला. त्याच्या अंगात वारे संचरले. मध्ययुगीन बादशाहीची स्वप्ने त्याला पडू लागली आणि हिंदराष्ट्राचे स्वामी होण्याची भाषा त्यांच्या तोंडून निघू लागली. मुस्लिम लीगची

मागणी किंवा तिची परिपूर्तता ही हिंदुस्थानातील सर्वसामान्य मुसलमानांच्या मनोवृत्तीचाच परिपाक होय.

कोणासही खोटी आमिषे दाखवून एखादी विध्वंसक चळवळ उभारणे हे नेहमीच विधायक चळवळ उभारण्यापेक्षा सोपे असते. त्यात ही आमची स्वातंत्र्याची चळवळ आम्ही उभारत असता, आमच्या चळवळीस विघातक अशी मुस्लिम चळवळ फोफावण्यास मदत करणे हे ब्रिटिश राजनीतीशी सुसंगतच होते. आजच्या मजूर सरकार विरुद्ध जरी आम्हास काहीही बोलावयाचे नसले तरी गेल्या दोनशे वर्षांत ब्रिटिश राजनीतीने उत्पन्न केलेला भस्मासुर इंग्लंडातील मजूर सरकारला आपल्या हातात ठेवता आला नाही हे निश्चित. इतकेच नव्हे तर कणक नीतीचा अवलंब करणाऱ्या चर्चिलचे किंवा त्याच्या उपग्रहांचे हिंदुस्थानातील ब्रिटिश नोकरशहांचे - हिंदवी स्वराज्याला सुरुंग लावण्याचे प्रकार अद्याप सुरूच आहेत, हे दिल्ली, जबलपूर किंवा बरेली इत्यादी ठिकाणी जे कट उघडकीस आले त्यावरून स्पष्ट होते. याच ब्रिटिशांच्या राजनीतीने व मुसलमानांच्या 'मक्कार' वृत्तीमुळे १९४६ च्या सोळा ऑगस्टला कलकत्ता घडवला, त्यानंतर थोड्याच दिवसांत नौआखली करण्यात आली, हिंदुस्थानातील मोटमोठ्या शहरांतून दंग्यांचे सत्र सुरू झाले, आणि शेवटी पंजाब, बंगाल, आसाम यांची फाळणीही झाली.

आजपर्यंतचा जगाचा इतिहास असा आहे की, सुसंस्कृत आणि सुविद्य लोकांवर जेव्हा रानटी लोकांचे आक्रमण होते, तेव्हा रानटी लोक आपल्या पाशवी शक्तीच्या जोरावर सुसंस्कृत लोकांच्या एकूण कार्यावर पूर्णपणे पाणी फिरवतात. हिंदुस्थानातील मुसलमानांच्या कार्यपद्धतीचा एकंदर हिशेब केला तर मध्ययुगीन जंगली टोळयांच्या वागण्यात आणि लिगीवृत्तीच्या मुसलमानांच्या वागण्यात काहीच फरक दिसत नाही.

१५ ऑगस्टला आम्हास जेव्हा स्वराज्य मिळाले, तेव्हा आमच्या आणि आमच्या राष्ट्राच्या विकासाची किती तरी स्वप्ने आम्ही किंवा आमच्या पुढाऱ्यांनी रंगविली असतील. ही स्वप्ने खोटी ठरणार नाहीत आणि सर्व परिस्थिती काबूत आणून आम्ही समाजक्रांतीची वाट चालू लागू हेही खरे. परंतु मुस्लिम लीगने किंवा तिच्या पावलावर पाऊल टाकून जाणाऱ्या हैदराबादच्या चिमुरड्या इत्तेहादुल मुसलमीनने आमचे ध्येयाचे शिखर गाठण्यास अडथळा करून खोटे पण नवीन प्रश्न आमच्या समोर उत्पन्न करून ठेवले आहेत हेही इतकेच खरे आहे. आणि त्यामुळे व आमच्या राष्ट्राच्या विकासाच्या कोणत्याही योजना हाती येण्याच्या अगोदर लीग किंवा इत्तेहादुल मुसलमीन यांचे पाप निस्तरणे आवश्यक आहे.

कोणतेही राष्ट्र हे जातिधर्मनिरपेक्ष असावे असे आमचे प्रामाणिक मत आहे, त्यामुळेच मुसलमानांच्या बद्दल आमच्या मनात कधीच किंतु उत्पन्न झाला नाही. पण मुसलमानांनी आपली चळवळ 'मुसलमान' या शब्दाभोवती उत्पन्न केली. राष्ट्र जाति-

धर्मनिरपेक्ष पाहिजे असे अनेकदा सांगितल्यानंतर सुद्धा जेव्हा लीगने आपला हेका सोडला नाही तेव्हा 'भीक नको पण कुत्रा आवर' या न्यायाने त्यांना हवे असलेले पाकिस्तानही आम्ही त्यांना देऊन टाकले. 'शांततेने राहा, पाहिजे तर अलग राहा' हाच पाकिस्तान देण्यात आमचा उद्देश होता. पण सदासर्वदा भांडण उकरून काढण्याचा आणि मुजोरी करण्याचा ज्यांचा धर्म आहे त्यांना स्वस्थ कसे बसवेल? पाकिस्तानची सुव्यवस्था करावयाचे सोडून कोठे जुनागड उत्पन्न कर तर कोठे काश्मिरमध्ये अशांतता उत्पन्न कर, तर कोठे हैदराबादच्या निजामास उचक अशासारखी हीन कृत्ये करून पाकिस्तान आज युद्धाच्या वाटेने जात आहे. अब्दुल कयूम खान सारखे वाटगे लीडर तर हिंदुस्थानचा उघड उघड 'शत्रू' म्हणून उल्लेख करू लागले असून 'आझाद काश्मिरचा' म्हणजे पाकिस्तानपुरस्कृत सरकारचा काश्मिरमध्ये जय व्हावा असे उघड उघड चिंतित आहेत.

अशा स्थितीत आम्ही काय करावयास पाहिजे? मुसलमानांचे राष्ट्र हे जातीयतावादावर उत्पन्न झाले आहे. त्यांचा सगळा जोर हा मुसलमान शब्दाभोवती आहे, उलट आमची स्वातंत्र्याची चळवळ किंवा स्वातंत्र्य मिळाल्यानंतरसुद्धा पं. नेहरूंसारख्या आमच्या महनीय पुढाऱ्यांच्या घोषणा ह्या धर्मनिरपेक्षतेच्या द्योतक आहेत. आम्हाला आमचे राष्ट्र हे धर्मनिरपेक्ष ठेवावयाचे आहे हे खरे! पण जेथे आपल्याला हिंदुस्थानचे शत्रू म्हणविणारे राष्ट्र, हिंदुस्थानविरुद्ध आपल्याला अरब लीगचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न करणारे राष्ट्र, हिंदुस्थानातील मुसलमानांना धर्माच्या नावाखाली फोडण्याचा उपक्रम करीत आहे आणि आज हिंदुस्थानात एकनिष्ठेने वागण्याची प्रतिज्ञा करून, उद्या हिंदुस्थानशी बेईमानी करण्यास मागे पुढे न पाहणारे खलिक् उज्जमानसारखे लीगपुढारी हिंदुस्थान सोडून पाकिस्तानात जात आहेत आणि तेथून हिंदुस्थानातील अशिक्षित मुस्लिम जनतेचा बुद्धिभ्रंश करीत आहोत तेथे हिंदुस्थानातील मुसलमानांवर विश्वास कसा ठेवायचा? आमच्या राष्ट्रीयत्वाची कसोटी धर्मनिरपेक्षता ही आहे ना? मग हिंदुस्थानात मुसलमान म्हणून राहावयाचा मुसलमानांना हक्क नाही. माजी राष्ट्राध्यक्ष आचार्य कृपलानी यांनी आपल्या भाषणात सांगितल्याप्रमाणे लीगला या देशात जगावयाचा मुळीच हक्क नाही. तसेच 'राष्ट्रीय मुसलमान' हीही भ्रममूलक आणि भ्रमोत्पादक उपाधी आहे. धर्मावर आधारलेले मुसलमानांचे स्वतंत्र राष्ट्र निर्माण झाल्यानंतर उरलेल्या आमच्या हिंदुस्थानात मुसलमान हा एकतर मुसलमान तरी राहील नाहीतर राष्ट्रीय तरी राहील. दोनही विशेषणे असलेला प्राणी हा आमच्या देशाशी इमानदार असू शकत नाही. मुसलमान असणे हे यानंतर पाकिस्तानीत्वाची कसोटी आहे. मुसलमानांनी आपण मुसलमान आहोत हे तरी विसरले पाहिजे, नाहीतर आमचा देश तरी सोडून गेले पाहिजे. एकनिष्ठतेचा आव आणून आमच्याच हृदयावर सुरी चालविणाऱ्या कसायाला आम्ही खड्यासारखे वेचून बाहेर टाकलेच पाहिजे.

खंड दुसरा

१

इन्किलाबचे एक वर्ष

१–१२–४७

इन्किलाबचे एक वर्ष हे खरोखरच इन्किलाबचे वर्ष होते. हा सत्तांतराचा काळ होता, सत्तासंक्रमणाचा काल होता, पारतंत्र्याला लाथ मारून स्वातंत्र्याचा आस्वाद घेण्याचा हा काळ होता. या वर्षात जगात जितक्या घडामोडी झाल्या असतील तितक्या युद्ध-कालातसुद्धा झाल्या की नाही याची शंकाच आहे. शतकानुशतके गुलामगिरीत जखडलेल्या ४० कोटींच्या हिंदी राष्ट्राची बंधने वितळून गेली, 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले' या समर्थोक्तीला काल बदलवू शकतो हे सिद्ध झाले, आपसांतील दुही माणसांनेच काय पण राष्ट्रानेही तुकडे करू शकते याचा यादवकालीन यादवीनंतर पुनः एकदा प्रत्यय आला, आणि एशियातील काळ्या लोकांना सुद्धा गोऱ्या कातडीच्या लोकांइतकाच स्वतंत्रपणे आणि स्वाभिमानाने जगण्याचा हक्क आहे हे मान्य करण्यात आले.

गतवर्षी 'इन्किलाब' काढण्याचे धाडस जेव्हा आम्ही केले, त्या वेळी या संवत्सराच्या प्रसादकिरणांचा प्रभाव एवढा व्यापक राहील याची आम्हास कल्पना नव्हती, हे प्रांजलपणे कबूल करण्यास आम्हास मुळीच दिक्कत वाटत नाही. आपण एक महान् पर्वकालातून एका महान संक्रमणकालातून जात आहोत याची जाणीव आम्हास जरूर होती. सत्ता काबीज करण्याच्या नव्या तंत्राचा आविष्कार करून १९४२ च्या ऑगस्ट आंदोलनाने या पर्वास गती दिली होती. या पर्वाच्या घडवणुकीस नेताजींची आणि आझाद हिंद सेनेची पुण्याई खर्ची झाली होती. ज्याप्रमाणे निखाऱ्यावर राख चढल्यामुळे

निस्तेज दिसावयास लागलेला निखारा फुंकर मारताच सर्व राख झटकून परत देदीप्यमान दिसावयास लागतो आणि आपल्या स्वत्वाचा प्रभाव दाखवितो त्याप्रमाणे, ४२ चे बंड दडपून टाकण्याकरिता तत्कालीन सरकारने केलेल्या निर्घृण अत्याचारामुळे ईषत् कच खाल्लेल्या हिंदी जनतेवरील मायापटल, हिंदी जनतेच्या शरीरावर साचलेली राख, आमच्या देशाच्या लाडक्या 'आझाद शिपायांवर' खटले भरण्याची ब्रिटिश सरकारने मुत्सद्देगिरी दाखविताच झटकून पार झाली, आणि त्यांतून आणि तदनंतर झालेल्या नाविकांच्या बंडातून, पोस्ट आणि रेल्वे कामगारांच्या संपातून आणि ठिकठिकाणी होऊ घातलेल्या हिंदी जनतेच्या संघटनांतून, हिंदी जनतेच्या अंतरंगात धगधगत असलेल्या स्वातंत्र्याच्या जळत्या निखाऱ्याचा प्रत्यय ब्रिटिश सरकारला आला. सरकारला हे कळून चुकले की, आता केवळ हिंदी जनताच जागृत झाली नाही तर हिंदी सेनाही जागृत झाली आहे. आमचे १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध अयशस्वी ठरले, कारण या युद्धास जनतेने साथ दिली नाही. आमच्या १९४२ च्या स्वातंत्र्ययुद्धात आमच्या पदरी अपेश आले, कारण जनतेची साथ करणारी जनसेना आमच्याजवळ नव्हती. परंतु हिंदी जनमनात आणि सैन्यात घडून आलेल्या बदलामुळे सरकारला ही गोष्ट नक्की पटली की आपली घडी भरली. आपण येथून काढता पाय न घेतला तर हिंदी जनतेच्या हृदयातला धगधगता निखारा ब्रिटिश साम्राज्याची राखरांगोळी केल्यावाचून राहणार नाही. आणि हे कळल्याबरोबर ब्रिटिश राजनीतीने मिळते धोरण स्वीकारून निराळ्या दिशेने पवित्रे टाकण्यास सुरुवात केली. "सर्वकाले समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः" अशी संस्कृतात एक म्हण आहे. ब्रिटिश राजनीतीने ही म्हण प्रत्यक्षात आणली. जे आपल्या हातून जातेच आहे ते सोडून देण्याचा मोठेपणा दाखविला. अर्थात हा मोठेपणा दाखविल्याबद्दलसुद्धा ब्रिटिश सरकार अभिनंदनास पात्र आहे यात शंकाच नाही. कारण सर्वसामान्यपणे आपले दिवाळे निघण्याची वेळ आली तरी आपल्या हातातील सत्ता सोडण्याचे जिवावर येणे हा माणसाचा धर्मच आहे. पण माणसाचा असा धर्म असतानासुद्धा ब्रिटिशांनी हिंदुस्थानला स्वराज्य देण्याचा संकल्प जाहीर करून तो कृतीतही आणला यालाही तशीच कारणे आहेत. महायुद्धानंतर इंग्लंडमधील सामान्य जनतासुद्धा पूर्णतया जागृत झाली; आणि सरंजामशाहीचा उदो उदो करणाऱ्या, विकृत मनोवृत्तीच्या चर्चिलादी वाग्भाटांच्या मोहजालात न सापडता त्यांनी निवडणुकीत समाजवादी मजूर पक्षाला निवडून आणले. 'जागतिक परिस्थितीची' गंभीरता कोणत्याही थराला गेलेली असो, आजही चर्चिलसारखे हुकूमशहाच जर इंग्लंडचे शासन करीत असते आणि मजूरपक्ष जर निवडणुकीत विजयी झाला नसता तर सुखासमाधानाने ब्रिटिशांनी हिंदुस्थानातून काढता पाय घेतला असता यावर आमचा विश्वास नाही. इतकेच नव्हे तर आमच्यात फूट पाडण्याकरिता चर्चिलादी कापुरुषांनी जी विषवृक्षांची बीजे पेरून ठेवली त्यांनी अमृतप्राशनाच्या काळात

सुद्धा आमचा दावा साधला याविषयीही आमच्या मनात शंका नाही. हिंदी जनतेत होऊ घातलेली एकजूट छिन्नभिन्न करण्याकरिता जिनासारखे मूळनक्षत्र हाती धरून हिंदी जनतेच्या आणि हिंदी राष्ट्राच्या मुळावर येण्यासही त्यांनी कमी केले नाही, हे नोआखली, कलकत्ता आणि पंजाब या ठिकाणी झालेल्या अमानुष घटनांनंतर तरी सांगण्याची काही गरज आहे असे आम्हांस वाटत नाही.

परंतु नीलकंठाप्रमाणे चर्चिलादिकांच्या कुटिल नीतीला आम्ही पुरून उरलो. आमच्या देशाचे तुकडे झाले. आम्ही ते सहन करू शकलो. नाही तरी सडके मांस काढून फेकावेच लागते. आमचा कंठ हिरवा-निळा–पाकिस्तान–झाला तरी त्याचे आम्ही शमन करू शकतो एवढी तपश्चर्या आम्ही केलेली आहे. पाकिस्तानी हलाहलाला आम्ही खात्रीने पचवून टाकून तेजस्वी हिंदी राष्ट्र निर्माण करू शकू याविषयी आमच्या मनात मुळीसुद्धा संदेह नाही.

जागतिक परिस्थितीमुळे म्हणा, किंवा आमच्यात निर्णायक जागृती उत्पन्न झाली म्हणून म्हणा, किंवा इंग्लंडात मजूर सरकार अस्तित्वात आले म्हणून म्हणा, किंवा या तिन्ही गोष्टींचा समसमा संयोग झाल्यामुळे म्हणा, आम्हांस शांततेने स्वराज्य मिळाले ही गोष्ट खरी. परंतु कधी कधी चांगल्याबरोबर वाईटही घडते. शांततेने सत्तादान झाले नसते तर 'इंद्राय तक्षकाय स्वाहा' या न्यायाने ब्रिटिश साम्राज्यशहाबरोबरच त्यांनी निर्माण केलेल्या गणंगांचा–समाजकंटकांचा–जातीयतेचा, नोकरशाहीचा, हिंदी भांडवलशाहीचा फडशा आपणाला ताबडतोब पाडता आला असता. दुर्दैवाने ब्रिटिश गेले तरी त्यांची ही तीन 'बाळे' आमच्या देशात अद्याप बाळसे धरून आहेत, आणि पारतंत्र्यातून स्वातंत्र्यात आल्यामुळे या 'वाघ्यांचा पाग्या' झाला तरी यांचा मूळ स्वभाव बदललेला नाही हे निश्चित. स्वातंत्र्याच्या या कालात आम्हास जो झगडा करावा लागणार आहे तो या तीन प्रतिगामी शक्तींशी. या तीनही शक्ती कधी एक होऊन तर कधी आपसातच झगडण्याचा आभास उत्पन्न करून पुरोगामी शक्तीचे पाय कापण्याचा प्रयत्न करतील. या प्रतिगामी शक्तींना जर आपण तोंड देऊन त्यात विजयी झालो तरच स्वातंत्र्याची अस्सल फळे आपणास चाखता येतील.

ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या या तीन बाळांपैकी ब्रिटिशधार्जिण्या नोकरशाहीला खडे चारणे मोठेसे कठीण नाही. सरकारने मनात आणले तर लेखणीच्या एका फटकाऱ्यासरशी सरकारी यंत्रातला नोकरशाहीचा हा गंज त्यांना साफ करिता येईल. जुनी नोकरशाही कायम राहिली याचे कारण एवढेच की, शांततेने सत्तादान झाल्यामुळे या नोकरशाहीला काढून टाकणे अपरिहार्य नव्हते.

पण आमच्या प्रगतीला जो खरा धोका आहे तो जातीयता आणि भांडवलशाही यांच्याकडूनच. जातीयता ही दोन प्रकारची आहे : (१) हिंदू धर्मातील अटरा पगड

जातितत्त्वामुळे उत्पन्न झालेली आणि (२) भिन्न धर्मामुळे उत्पन्न झालेली.

हिंदू धर्मातील उच्च-नीच भेदामुळे काही विशिष्ट जातींना आजपर्यंत सामाजिक फायद्यांचा सगळ्यात मोठा हिस्सा उचलता आला हे खरे आहे आणि त्यामुळेच या समतेच्या युगात अन्य जातींत मिरासदार जातीविरुद्ध प्रक्षोभ उत्पन्न व्हावा हेही योग्यच आहे. वास्तविक हा प्रक्षोभ एका जातीचा दुसऱ्या जातीविरुद्ध नको होता. आर्थिक आणि सामाजिक गांजणुकीमुळे उत्पन्न झालेला हा प्रक्षोभ आर्थिक आणि सामाजिक व्यवस्थेविषयी असावयास पाहिजे होता, आणि महात्मा जोतिबा फुले यांच्यासारख्या या चळवळीच्या उत्पादकांच्या लिखाणावरून तर भांडवलशाही समाजपद्धतीविरुद्ध हा प्रक्षोभ होता असेच वाटते. परंतु या चळवळीच्या विकासाचे जर अवलोकन केले तर असे दिसून येते की, अर्थ आणि समाजव्यवस्थेविरुद्ध व्हावयाचा हा प्रक्षोभ समाज-व्यवस्थेची सूत्रे ज्या लोकांच्या हातात होती त्या व्यक्तींच्या विरुद्ध झाला आणि त्यामुळे ही चळवळ भलत्या मार्गाला लागली. इतकेच नव्हे तर भांडवलदार, जमीनदार लोक इतर जमातींतही होते. आपली पोतडी भरण्याकरिता ही उत्कृष्ट संधी साधून या चळ-वळीचा उपयोग आपला उत्कर्ष साधण्याकरिता त्यांनी करून घेतला आणि इतउत्तरसुद्धा ते घेतील. यातून निघावयाचा मार्ग एकच, म्हणजे आमच्यातल्या जाती आणि जातीयता यांचा समूळ नाश करावयाचा, आणि ज्या आर्थिक आणि सामाजिक विषमतेमुळे हे विषबीज उत्पन्न झाले ते मुळातच नाहीसे करावयाचे. काँग्रेससारख्या जातीयतानिरपेक्ष संघटनेतसुद्धा हे जातीयवादाचे पिल्लू शिरले आहे. अमुक एक माणसाची अमुक एक जाती असणे हा गुण किंवा अवगुण मानण्यात येतो, पण हे असेच चालू राहिले आणि जातीयतावादाचे हे कोलित भांडवलशहांच्या हातात राहिले, तर त्यांच्या माकडचेष्टांना ऊत आल्यावाचून राहणार नाही आणि ज्या समाजव्यवस्थेचे ध्येय गाठण्याकरिता आम्ही स्वातंत्र्यही मिळविले ते आमचे आदर्श समाजव्यवस्थेचे स्वप्न स्वप्नच ठरेल.

आमच्या भांडवलशहांच्या हातातील दुसरे मोठे अस्त्र म्हणजे हिंदू विरुद्ध मुसलमान अशी उत्पन्न झालेली जातीयता. मुस्लिम लीगच्या आणि मुस्लिम संस्थानिकांच्या अविचारी वागणुकीमुळे पुरोगामी शक्तींना त्यांच्या विरुद्ध झगडणे भाग आहे, इतकेच नव्हे तर 'मुसलमानांवर' आपण आज विश्वास टाकणेही शक्य नाही. त्यामुळे आमचे स्वातंत्र्यही संपुष्टात येण्याचा संभव आहे. पण हे सर्व मान्य केल्यानंतरसुद्धा या घटनेचा फायदा हिंदी भांडवलदारांनी घेतला तर आमच्या ध्येयाला फार मोठा धोका उत्पन्न होणार आहे. समाजवादाचा–समतेचा हा काल आहे. पण विषमतेचे बाळकडू प्यालेल्या भांडवलदारांना समाजवादाचे नाव ऐकून पोटदुखी उत्पन्न व्हावी हेही स्वभावधर्मास अनुसरून आहे. भांडवलशाहीविरुद्ध होऊ घातलेला लढा कमीत कमी पुढे ढकलण्याकरिता हिंदी जनतेची मनःस्थिती लक्षात घेऊन, आपल्या हस्तकांकरवी धर्मद्वेष फैलावून पुन्हा त्याला आळा

सुद्धा आमचा दावा साधला याविषयीही आमच्या मनात शंका नाही. हिंदी जनतेत होऊ घातलेली एकजूट छिन्नभिन्न करण्याकरिता जिनासारखे मूळनक्षत्र हाती धरून हिंदी जनतेच्या आणि हिंदी राष्ट्राच्या मुळावर येण्यासही त्यांनी कमी केले नाही, हे नोआखली, कलकत्ता आणि पंजाब या ठिकाणी झालेल्या अमानुष घटनांनंतर तरी सांगण्याची काही गरज आहे असे आम्हांस वाटत नाही.

परंतु नीलकंठाप्रमाणे चर्चिलादिकांच्या कुटिल नीतीला आम्ही पुरून उरलो. आमच्या देशाचे तुकडे झाले. आम्ही ते सहन करू शकलो. नाही तरी सडके मांस काढून फेकावेच लागते. आमचा कंठ हिरवा-निळा–पाकिस्तान–झाला तरी त्याचे आम्ही शमन करू शकतो एवढी तपश्चर्या आम्ही केलेली आहे. पाकिस्तानी हलाहलाला आम्ही खात्रीने पचवून टाकून तेजस्वी हिंदी राष्ट्र निर्माण करू शकू याविषयी आमच्या मनात मुळीसुद्धा संदेह नाही.

जागतिक परिस्थितीमुळे म्हणा, किंवा आमच्यात निर्णायक जागृती उत्पन्न झाली म्हणून म्हणा, किंवा इंग्लंडात मजूर सरकार अस्तित्वात आले म्हणून म्हणा, किंवा या तिन्ही गोष्टींचा समसमा संयोग झाल्यामुळे म्हणा, आम्हांस शांततेने स्वराज्य मिळाले ही गोष्ट खरी. परंतु कधी कधी चांगल्याबरोबर वाईटही घडते. शांततेने सत्तादान झाले नसते तर 'इंद्राय तक्षकाय स्वाहा' या न्यायाने ब्रिटिश साम्राज्यशहाबरोबरच त्यांनी निर्माण केलेल्या गणंगांचा–समाजकंटकांचा–जातीयतेचा, नोकरशाहीचा, हिंदी भांडवल-शाहीचा फडशा आपणाला तावडतोब पाडता आला असता. दुर्दैवाने ब्रिटिश गेले तरी त्यांची ही तीन 'बाळे' आमच्या देशात अद्याप बाळसे धरून आहेत, आणि पारतंत्र्या-तून स्वातंत्र्यात आल्यामुळे या 'वाघ्यांचा पाग्या' झाला तरी यांचा मूळ स्वभाव बदललेला नाही हे निश्चित. स्वातंत्र्याच्या या कालात आम्हास जो झगडा करावा लागणार आहे तो या तीन प्रतिगामी शक्तींशी. या तीनही शक्ती कधी एक होऊन तर कधी आपसातच झगडण्याचा आभास उत्पन्न करून पुरोगामी शक्तीचे पाय कापण्याचा प्रयत्न करतील. या प्रतिगामी शक्तींना जर आपण तोंड देऊन त्यात विजयी झालो तरच स्वातंत्र्याची अस्सल फळे आपणास चाखता येतील.

ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या या तीन बाळांपैकी ब्रिटिशधार्जिण्या नोकरशाहीला खडे चारणे मोठेसे कठीण नाही. सरकारने मनात आणले तर लेखणीच्या एका फटकाऱ्या-सरशी सरकारी यंत्रातला नोकरशाहीचा हा गंज त्यांना साफ करिता येईल. जुनी नोकर-शाही कायम राहिली याचे कारण एवढेच की, शांततेने सत्तादान झाल्यामुळे या नोकर-शाहीला काढून टाकणे अपरिहार्य नव्हते.

पण आमच्या प्रगतीला जो खरा धोका आहे तो जातीयता आणि भांडवलशाही यांच्याकडूनच. जातीयता ही दोन प्रकारची आहे : (१) हिंदू धर्मातील अटरा पगड

जातितत्त्वामुळे उत्पन्न झालेली आणि (२) भिन्न धर्मांमुळे उत्पन्न झालेली.

हिंदू धर्मातील उच्च-नीच भेदामुळे काही विशिष्ट जातींना आजपर्यंत सामाजिक फायद्यांचा सगळ्यात मोठा हिस्सा उचलता आला हे खरे आहे आणि त्यामुळेच या समतेच्या युगात अन्य जातींत मिरासदार जातीविरुद्ध प्रक्षोभ उत्पन्न व्हावा हेही योग्यच आहे. वास्तविक हा प्रक्षोभ एका जातीचा दुसऱ्या जातीविरुद्ध नको होता. आर्थिक आणि सामाजिक गांजणुकीमुळे उत्पन्न झालेला हा प्रक्षोभ आर्थिक आणि सामाजिक व्यवस्थेविषयी असावयास पाहिजे होता, आणि महात्मा जोतिबा फुले यांच्यासारख्या या चळवळीच्या उत्पादकांच्या लिखाणावरून तर भांडवलशाही समाजपद्धतीविरुद्ध हा प्रक्षोभ होता असेच वाटते. परंतु या चळवळीच्या विकासाचे जर अवलोकन केले तर असे दिसून येते की, अर्थ आणि समाजव्यवस्थेविरुद्ध व्हावयाचा हा प्रक्षोभ समाज-व्यवस्थेची सूत्रे ज्या लोकांच्या हातात होती त्या व्यक्तींच्या विरुद्ध झाला आणि त्यामुळे ही चळवळ भलत्या मार्गाला लागली. इतकेच नव्हे तर भांडवलदार, जमीनदार लोक इतर जमातींतही होते. आपली पोतडी भरण्याकरिता ही उत्कृष्ट संधी साधून या चळ-वळीचा उपयोग आपला उत्कर्ष साधण्याकरिता त्यांनी करून घेतला आणि इतउत्तरसुद्धा ते घेतील. यातून निघावयाचा मार्ग एकच, म्हणजे आमच्यातल्या जाती आणि जातीयता यांचा समूळ नाश करावयाचा, आणि ज्या आर्थिक आणि सामाजिक विषमतेमुळे हे विषबीज उत्पन्न झाले ते मुळातच नाहीसे करावयाचे. काँग्रेससारख्या जातीयतानिरपेक्ष संघटनेतसुद्धा हे जातीयवादाचे पिल्लू शिरले आहे. अमुक एक माणसाची अमुक एक जाती असणे हा गुण किंवा अवगुण मानण्यात येतो, पण हे असेच चालू राहिले आणि जातीयतावादाचे हे कोलित भांडवलशहांच्या हातात राहिले, तर त्यांच्या माकडचेष्टांना ऊत आल्यावाचून राहणार नाही आणि ज्या समाजव्यवस्थेचे ध्येय गाठण्याकरिता आम्ही स्वातंत्र्यही मिळविले ते आमचे आदर्श समाजव्यवस्थेचे स्वप्न स्वप्नच ठरेल.

आमच्या भांडवलशहांच्या हातातील दुसरे मोठे अस्त्र म्हणजे हिंदू विरुद्ध मुसलमान अशी उत्पन्न झालेली जातीयता. मुस्लिम लीगच्या आणि मुस्लिम संस्थानिकांच्या अविचारी वागणुकीमुळे पुरोगामी शक्तींना त्यांच्या विरुद्ध झगडणे भाग आहे, इतकेच नव्हे तर 'मुसलमानांवर' आपण आज विश्वास टाकणेही शक्य नाही. त्यामुळे आमचे स्वातंत्र्यही संपुष्टात येण्याचा संभव आहे. पण हे सर्व मान्य केल्यानंतरसुद्धा या घटनेचा फायदा हिंदी भांडवलदारांनी घेतला तर आमच्या ध्येयाला फार मोठा धोका उत्पन्न होणार आहे. समाजवादाचा–समतेचा हा काल आहे. पण विषमतेचे बाळकडू प्यालेल्या भांडवलदारांना समाजवादाचे नाव ऐकून पोटदुखी उत्पन्न व्हावी हेही स्वभावधर्मास अनुसरून आहे. भांडवलशाहीविरुद्ध होऊ घातलेला लढा कमीत कमी पुढे ढकलण्याकरिता हिंदी जनतेची मनःस्थिती लक्षात घेऊन, आपल्या हस्तकांकरवी धर्मद्वेष फैलावून पुन्हा त्याला आळा

घालण्याच्या मिषाने संरक्षणाच्या नावाखाली एखादे 'धर्मयुद्ध' सुरू करून आपले आसन स्थिर ठेवण्याचा प्रयत्न भांडवलदारांच्याकडून होणार नाही असे समजण्याचे कारण नाही. नव्हे असा प्रयत्न होईलच होईल, आणि असा प्रयत्न हाणून पाडणे आणि त्याचबरोबर हिंदी राष्ट्राला बलिष्ठ आणि संरक्षणक्षम करणे हेच नव्या वर्षाचे कार्य आहे. हे कार्य न झाले तर राजसत्ता हाती येऊन न येऊन सारखीच. केवळ राजसत्ता बदलविणे हे 'इन्किलाब'चे– क्रांतीचे कार्य नव्हे, नवीन सामाजिक घडी उत्पन्न करणे आणि त्याकरिता समाजद्रोह्यांचा–समाजकंटकांचा निःपात करणे हेच 'इन्किलाब'चे कार्य आहे. पुढील वर्षी हे कार्य करण्याचा 'इन्किलाब' यथाशक्ति प्रयत्न करील.

जयहिन्द.



२

सामन्तशाहीच्या विसर्जनाची नांदी

२२-१२-४७

१५ डिसेंबर १९४७ ला, आतापर्यंत ब्रिटिश साम्राज्यशाहीसारख्या अनेक प्रतिगामी शक्तींनी इजिप्तमधील 'ममी'प्रमाणे जतन करून ठेवलेल्या सामन्तशाहीच्या विसर्जनाची सुरुवात झाली. आमच्या हिंदुस्थान सरकारचे उपप्रधानमंत्री श्री. सरदार पटेल आपल्या लवाजम्यानिशी नागपूरच्या विमानतळावर १५ तारखेस दुपारी तीन वाजता उतरले, आणि दुसरे दिवशी सकाळी सूर्योदयाच्या पूर्वीच मध्यप्रांतातील चवदापैकी अकरा संस्थानिकांनी आपली संस्थाने हिंदुस्थान सरकारच्या म्हणजेच हिंदुस्थानी जनतेच्या स्वाधीन केल्याची बातमी वाऱ्यासारखी सर्व देशभर दरवळली. मध्यप्रांतातील उरलेल्या तीन संस्थानांनी या करारनाम्यावर सह्या केल्या नाहीत याचे कारण एवढेच की ते संस्थानिक सरदारांनी बोलविलेल्या सभेस प्रकृति-अस्वास्थ्यामुळे हजर राहू शकले नाहीत. पण त्यांच्या कपाळचे विधिलिखित आता चुकत नाही हे निश्चित; आणि त्यांच्याच कपाळचे काय पण हिंदुस्थानातील उरलेल्या ५०६ संस्थानिकांचे विधिलिखितसुद्धा हिंदी जनतेला पूर्वीच समजून चुकले आहे. सरदार पटेलांनी तर असे स्पष्टच सांगितले म्हणतात की, हिंदुस्थानातील केवळ चौदा संस्थानिकांची संस्थाने कायम राहतील. उरलेल्या संस्थानिकांना आपल्या संस्थानांचा राज्यकारभार हिंदुस्थान सरकारकडे तरी द्यावा लागेल किंवा 'आलिया भोगासी' सादर व्हावे लागेल. श्री. सरदार पटेल यांनी हे जे यश मिळविले ते हिंदी जनतेचे यश आहे. सरदारांनी संस्थानांच्या विसर्जनाची सुरुवात करून हिंदी जनतेच्या ताकदीची जी चुणूक जगाला दाखवून दिली त्याबद्दल सरदारजींचे आम्ही

घालण्याच्या मिषाने संरक्षणाच्या नावाखाली एखादे 'धर्मयुद्ध' सुरू करून आपले आसन स्थिर ठेवण्याचा प्रयत्न भांडवलदारांच्याकडून होणार नाही असे समजण्याचे कारण नाही. नव्हे असा प्रयत्न होईलच होईल, आणि असा प्रयत्न हाणून पाडणे आणि त्याचबरोबर हिंदी राष्ट्राला बलिष्ठ आणि संरक्षणक्षम करणे हेच नव्या वर्षाचे कार्य आहे. हे कार्य न झाले तर राजसत्ता हाती येऊन न येऊन सारखीच. केवळ राजसत्ता बदलविणे हे 'इन्किलाब'चे– क्रांतीचे कार्य नव्हे, नवीन सामाजिक घडी उत्पन्न करणे आणि त्याकरिता समाजद्रोह्यांचा–समाजकंटकांचा निःपात करणे हेच 'इन्किलाब'चे कार्य आहे. पुढील वर्षी हे कार्य करण्याचा 'इन्किलाब' यथाशक्ति प्रयत्न करील.

जयहिन्द.



२

सामन्तशाहीच्या विसर्जनाची नांदी

२२-१२-४७

१५ डिसेंबर १९४७ ला, आतापर्यंत ब्रिटिश साम्राज्यशाहीसारख्या अनेक प्रतिगामी शक्तींनी इजिप्तमधील 'ममी 'प्रमाणे जतन करून ठेवलेल्या सामन्तशाहीच्या विसर्जनाची सुरुवात झाली. आमच्या हिंदुस्थान सरकारचे उपप्रधानमंत्री श्री. सरदार पटेल आपल्या लवाजम्यानिशी नागपूरच्या विमानतळावर १५ तारखेस दुपारी तीन वाजता उतरले, आणि दुसरे दिवशी सकाळी सूर्योदयाच्या पूर्वीच मध्यप्रांतातील चवदापैकी अकरा संस्थानिकांनी आपली संस्थाने हिंदुस्थान सरकारच्या म्हणजेच हिंदुस्थानी जनतेच्या स्वाधीन केल्याची बातमी वाऱ्यासारखी सर्व देशभर दरवळली. मध्यप्रांतातील उरलेल्या तीन संस्थानांनी या करारनाम्यावर सह्या केल्या नाहीत याचे कारण एवढेच की ते संस्थानिक सरदारांनी बोलविलेल्या सभेस प्रकृति-अस्वास्थ्यामुळे हजर राहू शकले नाहीत. पण त्यांच्या कपाळचे विधिलिखित आता चुकत नाही हे निश्चित; आणि त्यांच्याच कपाळचे काय पण हिंदुस्थानातील उरलेल्या ५०६ संस्थानिकांचे विधिलिखितसुद्धा हिंदी जनतेला पूर्वीच समजून चुकले आहे. सरदार पटेलांनी तर असे स्पष्टच सांगितले म्हणतात की, हिंदुस्थानातील केवळ चौदा संस्थानिकांची संस्थाने कायम राहतील. उरलेल्या संस्थानिकांना आपल्या संस्थानांचा राज्यकारभार हिंदुस्थान सरकारकडे तरी द्यावा लागेल किंवा 'आलिया भोगासी' सादर व्हावे लागेल. श्री. सरदार पटेल यांनी हे जे यश मिळविले ते हिंदी जनतेचे यश आहे. सरदारांनी संस्थानांच्या विसर्जनाची सुरुवात करून हिंदी जनतेच्या ताकदीची जी चुणूक जगाला दाखवून दिली त्याबद्दल सरदारजींचे आम्ही

अभिनंदन करितो.

वास्तविक संस्थानांचे विसर्जन यापूर्वीच व्हावयास पाहिजे होते. परंतु ब्रिटिश साम्राज्यशाहीने पेरून ठेवलेल्या अनेक प्रतिगामी शक्तींच्या आशीर्वादामुळेच त्यांचे कळसूत्री आसन कायम राहिले. आपण केवळ नामधारी आहोत आणि राजदंड हा रेसिडेण्टच्या हातात आहे याची जाणीव खुद्द काही संस्थानिकांनाही होती असे दिसते. खुद्द एका संस्थानिकानेच अशा तऱ्हेचे उद्गार काढले आहेत. संस्थानिकांचे एकंदर आयुष्य अत्यंत गर्हणीय, लाजीरवाणे आणि हास्यास्पद असते असाच सार्वत्रिक अनुभव आहे. आपल्या संस्थानात न राहता मसुरी, उटकमंड वगैरेसारख्या थंड हवेच्या ठिकाणी किंवा मुंबई-कलकत्त्यासारख्या मोठ्या शहरी खुशालचेंडूपणा करीत राहावे आणि संस्थानचा कारभार कोण्यातरी 'विद्वान' कारभाऱ्यावर सोपवावा एवढीच आमच्या संस्थानिकांची कर्तव्यनिष्ठा. परंपरागत चालत आलेली संपत्ती पायाशी लोळत असल्यामुळे आपला शहाणपणा कोणतेही बंधन न घालता चालवायचा ही त्यांची न्यायबुद्धी आणि संस्थानच्या उत्पन्नापैकी शेकडा ९५ टक्के मिळकत स्वतःच्या चैनीकरिता, म्हणजे कुत्रीमांजरे पाळण्याकरिता, खर्च करावयाची आणि उरलेल्या पाच टक्के मिळकतीचा उपयोग जनतेकरिता म्हणजे जनतेला गांजण्याकरिता करावयाचा हे यांचे प्रजानुरंजन. यांच्या संस्थानचा कर वसूल करण्याकरिता जेवढे लोक आवश्यक आहेत तेवढ्याच लोकांच्या शिक्षणाची तरतूद करावयाची एवढीच यांची आपल्या प्रजेबद्दलची आस्था. फॅशनच्या बाबतीत पाश्चात्त्यांनाही लाजविणाऱ्या झिलईमुळे नव्या युगाचा मुलामा जरी या सामन्तशाहीने चढविला असला तरी ह्या प्रजास्वातंत्र्याच्या काळात तरी अँग्लो-इंडियन्सप्रमाणे आपला स्वतंत्र वर्ग निर्माण केलेल्या या मध्ययुगीन नृपालांचे उच्चाटन करणे अत्यंत आवश्यक होते आणि सर्व जगातून सामन्तशाहीचे उच्चाटन झाल्यानंतरही आमच्या देशातही सामन्तशाहीची सडकी प्रतीके जीव धरून राहिली हेच वास्तविक आम्हांस लांछन होते. हे लांछन निस्तरण्यास आम्ही आता सुरुवात केली हे आमचे खरोखर सद्भाग्य होय. पारतंत्र्यात आणि स्वातंत्र्यात काय फरक असतो याचे सामन्तशाहीचे विसर्जन हे दृश्यफल होय.

सामन्तशाहीचा जन्म हाच खरोखर अनैतिक आहे. स्वामीद्रोह आणि सत्तालालसा यांचे सामन्तशाही हे अपत्य होय. एकछत्रांकित केंद्रीय सत्ता डळमळू लागताच असल्या जागी आपले आसन पक्के करण्याच्या व्यभिचारी व्यापारातूनच हिंदी सामन्तशाहीचा जन्म झाला आहे. मग तो हैदराबादचा निझाम असो की ग्वालेरचा सिंदिया असो. सामन्तशाहीची गादी ही कधीच कोणत्याही पराक्रमाची द्योतक नव्हती. इतर काही संस्थानेही पुजाऱ्यांची आणि गोसाव्यांची, राजनांदगावचे संस्थान हे उदाहरणार्थ गोसावी संस्थान आहे. ज्याप्रमाणे इतर संस्थानिकांनी आपल्या स्वामीशी द्रोह केला त्याचप्रमाणे गोसावी संस्थानांनी 'ईश्वराशी' द्रोह केला आणि विरक्तीचे सोंग आणून आणि

सामान्य जनतेला नागवून सर्व संस्थान आपल्या घशात घातले. अशा कर्मशून्य आणि नतद्रष्ट उपटसुंभांच्या वंशात जन्मास आल्याबद्दल वास्तविक आजच्या नरेशांना लाज वाटावयास पाहिजे होती आणि आपखुषीने आपल्या अपराधाचे परिमार्जन करण्याकरिता राजसंन्यास घेऊन त्यांनी हिमालयात जावयास पाहिजे होते. पण ते गेले नाहीत म्हणजे संपले थोडेच. हिंदी जनतेच्या प्रभावी शक्तीपुढे त्यांना शेवटी मान वाकवावी लागली; आणि ज्यांनी अद्यापि वाकविली नाही त्यांनाही वाकवावीच लागेल. मध्यप्रांतातील एका मंत्र्याने म्हटल्याप्रमाणे सामन्तशाहीचा अंतकाळ हा विमानाने आला होता आणि त्याने आपला कार्यभाग साधला.

सामन्तशाहीविरुद्ध झगडा हा शोषक आणि शोषित यांच्याच झगड्याचे एक स्वरूप होय. कायद्याच्या पुस्तकात जरी प्रत्येक माणूस सारख्याच दर्जाचा असे मानण्यात येत असले तरी वस्तुस्थिती मात्र फार निराळी आहे, आणि सर्व माणसांचा दर्जा सारखा करून घेण्याकरिता तर जगातील सर्व क्रांत्या झाल्या आहेत. 'समता, बंधुभाव आणि स्वातंत्र्य' ह्या सर्वसामान्य माणसाच्या हक्कांकरिता तर फ्रेंच जनतेने क्रांतीचे निशाण रोवले होते. हीच समस्या समाजवादाशिवाय सुटणे शक्य नाही असे दिसून आल्यामुळे रशियन जनतेने लेनिनच्या नेतृत्वाखाली क्रांतीचा ध्वज फडकविला आणि कामगारक्रांती यशस्वी करून दाखविली. पण जनविरोधी शक्तीचे हे अवशेष जगातील निरनिराळ्या भागांतून नाहीसे होत असताना ब्रिटिशांच्या राजनीतीमुळे सामन्तांच्या कुळात जन्मास आलेला एक नादान माणूससुद्धा ऐश्वर्यात लोळत पडतो आणि केवळ जन्मामुळेच दुसऱ्या खऱ्या कर्तबगार माणसाच्या कर्तबगारीस वाव मिळत नाही, असे दृश्य दिसत होते. सामन्तशाहीच्या उच्चाटणास सुरुवात करून आमच्या नेत्यांनी केवळ आमच्या देशाचीच एक समस्या सोडविण्याचा निश्चय केला आहे असे नाही तर मनुष्यजातीवर-सुद्धा महदुपकार केला आहे. इतकेच नव्हे तर संस्थानिकांच्या खऱ्या स्वरूपाचे आकलन त्यांना करून देऊन संस्थानिकांवरसुद्धा उपकारच केला आहे. आपण सर्वसामान्य जनते-पेक्षा भिन्न आहोत अशा समजुतीत 'मूर्खांच्या नंदनवनात' विहार करणारे हे संस्थानिक आता तरी भूतलावर उतरतील तर ते आपले आणि त्याचबरोबर देशाचेही कल्याण साधतील.

संस्थानिकांचे उच्चाटण ही शांततामय क्रांती होय अशा तऱ्हेचे उद्गार महाकोशल प्रांतिक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सेठ गोविंददास यांनी काढले आहेत. ही घटना खरो-खरच समाजक्रांतीची नांदी ठरो आणि सामन्तशाहीबरोबरच, भांडवलशाहीसारख्या परागतिक शक्तींची आहुती त्यात पडून ही क्रांती पूर्ण होवो हीच आमची इच्छा आहे.

३

महात्माजींच्या उपवासाचे मर्म

१९-१-४८

महात्माजींचे प्राण आज पणास लागले आहेत. देशातील परिस्थिती, हिंदुमुसलमानांतील द्वेष या ८० वर्षांच्या म्हाताऱ्याला आजही स्वस्थ बसू देत नाही. आमच्या राष्ट्राच्या या जनकाला स्वतंत्र हिंदुस्थानात हिंदु-मुसलमान जमातीत खरा बंधुभाव पाहण्याची इच्छा आहे. परंतु दुर्दैवाने हा बंधुभाव आज देशातून नाहीसा होऊन त्याची जागा अविश्वासाने घेतली आहे. देशातील परिस्थिती केवळ धर्मवेड्या मुसलमानांनीच बिघडविली आहे असे नाही तर परिस्थितीची गंभीरता न ओळखणाऱ्या लहान-मोठ्या हिंदू अकाली शिखांनीसुद्धा बिघडविली आहे. महात्माजींच्या उपवासाने या भ्याडांची अंतःकरणे विदीर्ण न होता पंजाबातून पळून आलेल्या या लोकांचा उद्दामपणा आज महात्माजींनी मरून जावे हे म्हणण्याइतपत कायम आहे. हे विवेकभ्रष्ट लोक, मग ते हिंदू असोत की मुसलमान, आमच्या राष्ट्राचे शत्रू आहेत हे सांगावयास पाहिजे असे नाही.

महात्माजींनी उपवास का सुरू केला? महात्माजींचा उपवास हा हिंदुस्थान आणि पाकिस्तान या दोन्ही देशांत परस्पर जमातीत बंधुभाव नांदावा म्हणून आहे. कमीत कमी दिल्लीत तरी हा बंधुभाव नांदून 'दिल्ली'ने आपला आदर्श दोन्ही देशांपुढे ठेवावा अशी गांधीजींची इच्छा आहे. गांधीजींची ही इच्छा पुरी झाल्यावाचून राहणार नाही आणि ८० व्या वर्षी प्राण पणास लावणारा हा म्हातारा आम्हास अधिक मोलाचे धडे देण्यास दीर्घायू होईल याविषयीही आमच्या मनात शंका नाही.

महात्माजींच्या उपवासाने एका नवीन प्रश्नास आज पुनः चालना मिळाली आहे.

पाकिस्तानची निर्मिती ही आमच्या मुसलमानबंधूंच्या धर्मवेडेपणाचे निदर्शक आहे. वेडेपणाला तत्त्वज्ञान समजून वागल्यामुळे आणि धर्माला राजकारणाचे क्षेत्र पोखरू दिल्यामुळे आज पाकिस्तान उत्पन्न झाले आहे. इतर मुस्लिम राष्ट्रांच्या बाबतींत ही गोष्ट खरी आहे की नाही कोण जाणे, पण पाकिस्तानच्या बाबतीत ही गोष्ट निःसंशय खरी आहे की, या राष्ट्राचे तत्त्वज्ञान हे अपभ्रष्ट मुसलमान धर्मावर आधारलेले आहे.

आज मुसलमानांमध्ये शिक्षण कमी आहे. खालच्या पातळीवरून वर येणारा सद्गुणापेक्षा व्यसनाकडेच अधिक आकर्षित होतो. विचारापेक्षा विकाराकडेच त्याची अधिक प्रवृत्ती असते. हिंदुस्थानातील मुस्लिम जनता याला अपवाद नाही. परंतु आम्ही मुसलमानेतर लोक यांची अशी वृत्ती पाहिजे की त्यामुळे आमच्या मुस्लिम बांधवांचे अधःपतन आम्हाला थांबविता येईल. अर्थात अधःपतनाच्या मार्गावर असलेल्यांना शिक्षा करू नये असा आमच्या म्हणण्याचा विपर्यास करू नये. चोरी का होते आणि आजची समाजपद्धती याला कशी जबाबदार आहे असे सांगितल्यावरसुद्धा चोरी करणाऱ्याला शिक्षा करावीच लागते. त्याप्रमाणे मुस्लिम जनतेच्या मनोविकारांचे विश्लेषण केल्यावरसुद्धा त्यांच्या गुन्ह्याबद्दल त्यांना शिक्षा व्हावयासच पाहिजे. पण हा प्रश्न वेगळा. आज अपढ मुस्लिम जनतेची मनोभूमिका कशी आहे हाच आपल्यासमोर महत्त्वाचा प्रश्न आहे. याचा विचार करता आपणास मुस्लिम जनतेविषयी दोन गोष्टी दिसून येतात. (१) त्याची पाकिस्तानबद्दलची असीम श्रद्धा आणि हिंदुस्थानबद्दलच्या एकनिष्ठेचा अभाव आणि (२) त्याची धर्मासंबंधी असलेली भ्रामक समजूत.

हिंदुस्थानशी जे एकनिष्ठ नाहीत, त्यांना हिंदुस्थानातून ताबडतोब हकलून दिले पाहिजे असे आम्ही मागील अग्रलेखातून अनेकवार प्रतिपादन केले आहे. पण हिंदुस्थानबद्दलच्या एकनिष्ठेच्या अभावापेक्षाही मुसलमानांच्या अविवेकी वागणुकीला जर कोणती शिकवणूक कारणीभूत असेल तर त्यांची आपल्या धर्माच्या शिकवणुकीसंबंधी असलेली भ्रामक समजूत. हिंदूंच्या बायका पळविण्यात पुण्य आहे, परधर्मीय स्त्रियांवर व्यभिचार करण्यात आणि परधर्मीयांवर अत्याचार करण्यात आपण ईश्वरी कार्य करीत आहोत अशी त्यांची समजूत झालेली आहे. हे किळसवाणे प्रकार करण्यातच आपण आपल्या धर्माचे चीज करीत आहोत असा मुस्लिम जनतेचा समज झालेला आहे, आणि मुस्लिमेतर जनतेपैकीसुद्धा अनेक लोक त्यांचा हा गैरसमज दूर करण्याऐवजी ज्यायोगे त्यांचा हा 'समज' वाढत राहील असेच आचरण ठेवीत आहेत.

पाकिस्तानची गोष्ट सोडली तरी आपले चित्त भडकू न देता आपण हिंदुस्थानातील मुस्लिम जगताबद्दल अत्यंत शांतपणे विचार करावयास पाहिजे. लांछनास्पद आणि किळसवाणे कृत्य करण्यात ज्या मुसलमानांना आपण ईश्वराचे कार्य करीत आहोत असे वाटते, त्यांना तर शिस्तीने पण शांतपणे येथून ताबडतोब त्यांच्या पाकिस्तानात रवाना

केले पाहिजे. त्यांच्या या धर्मविषयक वागणुकीवरच ज्यांची भारताशी एकनिष्ठा आहे किंवा नाही हे अवलंबून आहे. नागरिक म्हणून जगावयाचे असेल तर नागरिकत्वासंबंधी असलेले नियम सर्वांनी पाळलेच पाहिजेत. त्याला हिंदू हा अपवाद असू शकत नाही आणि मुसलमानही अपवाद राहू शकत नाही. आमच्या देशातील वर उल्लेखिलेला मुसलमानांचा वर्ग सोडून दिला तर उरलेल्या लोकांना या देशात जगण्याचा हक्क नाही काय ? या प्रश्नासंबंधी सुद्धा थोडीशी चर्चा केली पाहिजे. 'हिंदू धर्म' म्हणून ज्याला संबोधण्यात येते तो वास्तविक 'धर्म' या अभिधानापेक्षा अधिक व्यापक आहे. ती एक संस्कृती, परंपरा आहे आणि आज ज्या जातिभेदामुळे वास्तविक आमची हानी झाली ते जातिभेद सुरुवातीस तरी आमच्या व्यापकत्वाचे, सहिष्णुतेचे आणि प्रगतीचे लक्षण होते याविषयीही शंका नाही. या जातिभेदामुळे आणि आमच्या संस्कृतीच्या व्यापकतेमुळे शक, गुर्जर, कुशाण आमच्यात सामील झाले; हूण, तार्तार आमच्यात मिसळून गेले. आमच्या जातिसंस्थेमुळे ईश्वरावर विश्वास असलेला, ईश्वरावर विश्वास नसलेला, एका देवाची पूजा करणारा, अनेक देवांना भजणारा, शीख, कबीर, शाक्त, शैव, वैष्णव इ. पंथांचे लोक आम्ही एका हारात गुंफू शकतो. अर्थात आजही जातिभेद कायम ठेवले पाहिजेत असा आमच्या म्हणण्याचा अर्थ नव्हे. प्रत्येक गोष्टीचे महत्त्व संपल्यानंतर, त्यांचे मूल्य नाहीसे झाल्यानंतर सुद्धा त्यांची प्रेते टिकविण्यात आम्हाला कधीही बरे वाटणार नाही. असो. ज्याप्रमाणे जुन्या काळी आम्ही अनेक पंथांच्या लोकांना आमच्यात सामावून घेतले त्याप्रमाणे विवेकभ्रष्ट मुसलमान सोडून इतर मुसलमानांना आम्ही आमच्यात सम्मीलितच करून घ्यावयास पाहिजे आणि सर्व मुसलमान विवेकभ्रष्ट आहेत असे म्हणण्याचा अविवेक करता कामा नये. ज्या दिवशी आम्ही आमच्या पूर्वपरंपरेस अनुसरून या सर्व मुसलमानांना आमच्यात सम्मीलित करून घेण्याचा प्रयत्न करू त्याच दिवशी महात्माजींच्या उपवासाचे कारण आम्ही नाहीसे केल्यासारखे होईल.

आम्हाला आता एक नवीन परंपरा सुरू करायला पाहिजे. ज्याप्रमाणे आमच्या संस्कृतीने शाक्त, वैष्णव, जैन इ. लोकांना आमच्या धर्मात म्हणा वा संस्कृतीत म्हणा सामील करून घेतले; ज्याप्रमाणे कबीर पंथ हा आमच्यातील एक पंथ झाला आहे, त्याचप्रमाणे हिंदुस्थानातील उरलेले मुसलमान हे पैगंबरपंथी हिंदूच झाले पाहिजेत.

आमची ही विचारसरणी अनेकांना मोठी विचित्र वाटेल, परंतु आमचे किंवा मुस्लिम समाजाचे परीक्षण केले असता या विचारसरणीला पोषक अशी उदाहरणे त्यात सापडत नाहीत असे नाही. आगाखानांचा 'पीराणा' पंथ घेतला तर त्यामध्ये अशी उदाहरणे अनेक आढळतात. मुसलमानांतील धर्मवेडेपणा अद्यापही या लोकांत फारसा शिरलेला नाही, धर्मवेड्या पुढाऱ्यांच्या शिकवणुकीमुळे जेवढा त्यांनी आत्मसात केला असेल तेवढाच. या पंथातील स्त्रिया मुसलमान झाल्या तरी अद्यापही तुळशीला प्रदक्षिणा घालताना

आढळतात. ते मूर्तिभंजक पैगंबराचे अनुयायी असले तरी अद्यापही त्यांच्यातील कृष्णपूजा तशीच कायम आहे आणि मागच्या पिढीपर्यंत पिंजाऱ्यांत सुद्धा महादेव, रामकृष्ण इ. नावे असलेले लोक वरचेवर दिसून येत. ज्या परिस्थितीमुळे लोकांना आपण हिंदभूमीचे पुत्र आहोत म्हणून वाटत होते ती परिस्थिती बदलविण्याचा गेल्या काही दिवसांपासून मुसलमान पुढाऱ्यांनी चंग बांधला. त्यांची जुनी नावे गेली, त्यांचा जुना इतिहास गेला, त्यांची जुनी संस्कृती गेली. ही सर्व गेल्यामुळेच आज आम्ही त्यांना आणि ती आम्हाला पारखी झाली आहेत. मुसलमान पुढारी धर्माच्या नावाखाली आणि प्रचाराच्या जोरावर त्यांना आमच्यातून ओढून नेत आहेत. आम्हीही तेच करू लागलो तर हे लोक आमच्यापासून अधिकच दूर जातील आणि अशा रीतीने अनेक पाकिस्ताने निर्माण होतील. आम्ही त्यांना आमच्यात परत ओढून आणलेच पाहिजे.

'धर्म' हा खरोखर व्यक्तीचा प्रश्न आहे. या व्यक्तिधर्माला जेव्हा आपण समूह-धर्माचे स्वरूप देतो तेव्हा धर्म हा आक्रमक होतो. मुसलमान धर्म हा असा आक्रमक झाला आहे. धर्म आक्रमक होऊ लागल्यामुळेच राजकारणातसुद्धा धर्माची लुडबूड सुरू झाली. धर्माची राजकारणातील ही लुडबूड नाहीशी करावयाची असेल तर धर्माचे क्षेत्र हे व्यक्तीपुरतेच मर्यादित केले गेले पाहिजे. तरच धर्मनिरपेक्ष राजकारण उत्पन्न होईल. आज भेडसावत असलेला हिंदु-मुसलमानांचा प्रश्न आपणास भेडसावणार नाही आणि महात्माजींना उपवास करण्याचे प्रयोजन राहणार नाही. महात्माजींच्या उपवासामागील ही भूमिका आपण लक्षात घेऊ तर महात्माजींचा उपवास तावडतोब सुटल्यावाचून राहणार नाही. महात्माजी चिरायू होवोत!!

४

श्रद्धांजली

९-२-४८

दि. ३० जानेवारी रोजी संध्याकाळी ५ वाजता गांधीजी व्यासपीठावर पोचले. ते सर्व जनतेचा प्रणाम घेत असता खाकी गणवेषातला एक नीच गर्दीतून पुढे सरसावला आणि त्याने गांधीजींवर तीन गोळ्या झाडल्या. गांधीजी तात्काळ मूर्छित झाले आणि थोड्याच वेळात गांधीजींचे प्राणोत्क्रमण झाले. एवढी मोठी दुर्घटना हिंदुस्थानच्या इतिहासात आजपर्यंत घडली नाही. सारा देश आज शोकसागरात मग्न आहे, नव्हे सारे जग दुःखसागरात बुडून गेले आहे. गांधीजी एवढी महान व्यक्ती हिंदुस्थानच्याच काय पण जगाच्याही पाठीवर आजपर्यंत झाली नाही. बुद्ध आणि खिस्त मोठे खरे, पण ते संसारापासून दूर राहिले. राष्ट्राला जिवंत करण्याची जादू त्यांच्यापाशी नव्हती. एवढ्या मोठ्या व्यक्तीला बिछान्यावर मरण आले असते तर ते अनुचित झाले असते. अवतारी पुरुषाला शरपंजरीच मरण येणे योग्य आहे. महात्माजींच्या मारेकऱ्याचे नाव नथूराम गोडसे. सारे जग आज या हलकटाच्या तोंडावर थुंकत आहे. न्यायालय त्याला जी काही शिक्षा करावयाची असेल ती करीलच. पण गांधीजींसारख्या महात्म्याचा खून करावयास धजणे हीच या नराधमाची सर्वांत मोठी शिक्षा होय. साधुश्रेष्ठ संत तुकाराम यांनी अशा माणसाकरिता तोंडावर थुंकण्याची शिक्षा सांगितली आहे. तुका म्हणे ऐशा लोका। त्यांच्या तोंडावरी थुंका। नथूरामच्या गोळीने गांधीजींचा खून केला. नव्हे त्यांना हुतात्म्यांचे अग्रणी बनविले. पण त्या गोळीने जर खरोखर कोणाचा खून केला असेल तर हिंदू राष्ट्राचा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा आणि साऱ्या जातीय संस्थांचा. साऱ्या

जातीयतेला गाडून टाकणे हीच गांधीजींच्या खुनाची किंमत, आणि ही किंमत गांधीजींचा खून करणाऱ्यांनो, तुम्हांस आता पटवावीच लागेल.

युगदात्यांचे कार्य पुरे होण्यापूर्वीच त्यांना आपल्या पार्थिव देहाचा त्याग करावा लागावा असा जणू ईश्वरी संकेतच दिसतो. कार्य करीत असता मरण येणे यासारखे उत्कृष्ट मरण नाही. महात्माजी, नथूराम विनायक गोडसे नावाच्या भ्याडाच्या गोळीला आपला जड देह बळी पडला. पण आपण आपल्या पवित्र सत्य अहिंसेच्या संदेशाने प्रत्येक मनुष्यमात्राच्या हृदयात चिरंतन जिवंत आहात. आपली १२५ वर्षे जगण्याची मनीषा होती. पण आम्ही कृतघ्न लोकांनी आपली इच्छा पुरी होऊ दिली नाही. इतक्या सहजासहजी जगतामध्ये शांतीचे साम्राज्य निर्माण होऊ देण्याचा ईश्वरी योग नसेल किंवा कदाचित आपल्या मृत्यूनेच जगाचे हृदयपरिवर्तन होऊन शांतियुग सुरू होणार असेल. गांधीजी, आपले कार्य करीत असता खिस्ताला क्रूसावर देण्यात आले या गोष्टीला आज १९४७ वर्षे झाली. या प्रदीर्घ काळात मनुष्यजात फार सुधारली, फार सुसंस्कृत झाली, फार शहाणी झाली असे अनेक विद्वान समजत असत. त्यांचे समजणे किती मूर्खपणाचे आहे हे जगाला पटवून देण्याकरिता तर आपण त्या भ्याड नथूरामाच्या गोळीला बळी पडला नाहीत ना! महात्माजी, खिस्त पुनः अवतीर्ण झाला तर काय होईल असा प्रश्न एकदा बेर्नार्ड शॉला विचारण्यात आला होता. "We will crucify him again", आम्ही त्याला पुनश्च फांसावर देऊ, असे सांगावयास शॉला मुळीच वेळ लागला नाही. शॉचे म्हणणे खरोखर किती सार्थ होते. महात्माजी, आपला जीव घेऊन आम्ही शॉचे म्हणणेच खरे करून दाखविलेना!

महात्माजी, त्या पाजी नथूरामने आपला खून केला नाही. त्या नादान माणसाने अहिंसेचा खून केला. आपण बंदिवासात घातलेल्या हिंसेला त्याने मुक्त केले. आपल्या मृत्यूनंतर ४८ तासांच्या आतच आपल्या जीवनाचे महत्त्व काय होते हे त्या 'हिंसेने' आम्हांस शिकविले आहे. त्यायोगाने आम्ही परत शांतीचे राज्य निर्माण करू.

महात्माजी, आपण क्रांतिकारकांचे पंचप्राण आहात, शस्त्रविहीन हिंदी जनतेच्या हातांत सामुदायिक सत्याग्रहाचे शस्त्र देऊन २७ वर्षांच्या अल्प काळात आपण आम्हांला स्वराज्य मिळवून दिले. "It is my duty to preach disaffection against the British Government." असे छातीठोकपणे सांगून आपण हिंदी जनतेला निर्भय होण्याचा मंत्र दिला. कोणताही क्रांतिकारक एक महान सत्य जनतेपुढे ठेवीत असतो. पण आपण क्रांतिकारकांचे मुकुटमणी आहात, आपल्यासारख्या क्रांतिकारकाला असेच मरण योग्य होते असे आमच्याने म्हटल्यावाचून राहवत नाही. वाईट गोष्ट एवढीच की, आपण मृत्यूनेही मोठे झालात. पण आपल्या खुनाने आम्हांला मात्र कलंक लागला. आता सारे जग आम्हाला –हिंदुस्थानाला हसेल की आपली योग्यता आम्ही ओळखली नाही.

महात्माजी, आपण गेलात. 'मरणं प्रकृतिः शरीरिणाम्' या गोष्टीला आपणही अपवाद ठरला नाहीत. आपण गेलात पण आमच्यावर– तरुण पिढीवर फार मोठ्या जबाबदाऱ्या टाकून गेलात. या जबाबदाऱ्या स्वीकारण्यास आम्ही योग्य आहोत अशीच आपली खात्री असली पाहिजे. म्हणूनच आपण आम्हांस सोडून गेलात. आपले अपुरे राहिलेले कार्य पुरे करण्याची आता आम्हास शक्ती द्या. यापेक्षा आम्ही आपणांस आणखी काय मागणार!

५

याचा शेवट कशात होणार ?

२३-२-४८

एखाद्या चांगल्या उद्देशाच्या पूर्तीकरिता घटकाभर वाईट इलाज वापरावा लागला तरी तो क्षम्य मानावा असे काहींचे म्हणणे आहे. पण एखाद्या इलाजाने खुद्द मूळ उद्देशच जर पालथा पडत असेल तर आम्ही जे काय करीत असू त्याचा फेरविचार करावयास नको काय !

म. गांधींच्या मृत्यूनंतर म. गांधींच्या नावावर एका राक्षसी वृत्तीने आटवडाभर मन-मुराद थैमान घातले. हे थैमान कोणी घातले, देशात ठिकठिकाणी काय घडले, या थैमानामागे म. गांधींबद्दलचे प्रामाणिक प्रेमच होते काय, हे थैमान असेच चालू राहिल्यास काय परिणाम होतील या सर्वांचा आता आम्ही शांत डोक्याने विचार करावयास हरकत नाही.

या थैमानात ज्यांना झळ पोचली ते व ज्यांना झळ पोचली नाही असे सामान्य नागरिक सध्या एकच प्रश्न विचारत आहेत. याचा शेवट काय ? हे थैमान केव्हा थांबणार ? हा प्रश्न खरोखरच उत्तर देण्यास फार कठीण आहे. हिंदुस्थानचा सर्वनाश व्हावा अशी जर ईश्वरयोजना असेल तर तसे होईल व सर्वनाश जर आमचे कुंडलीत नसला तर काही तरी ईश्वरी चमत्कार होऊन थैमान घालणाऱ्यांच्या डोक्यात फरक पडेल यापेक्षा अधिक काय सांगणार ?

आज वस्तुस्थिती अशी आहे की, शंभरांपैकी नव्वद लोक राक्षसी वृत्तीच्या आहारी गेले आहेत. उरलेले दहा या नव्वदांना थोपविण्यास असमर्थ आहेत. जो तो म्हणतो

सरकारने हे थांबवावे. सर्व जनता जर गोंधळ माजविण्याचा आग्रह धरू लागली तर सरकारही काय करणार ? गोंधळ थांबविण्याचे सरकारला दोन मार्ग उपलब्ध आहेत. एक नागरिकांतील पुढाऱ्यामार्फत. यांपैकी पुढाऱ्यांचे शहाणपण दंगा थांबविण्याचे कामी मुळीच उपयोगी पडत नाही हे यापूर्वीही अनेक वेळा सिद्ध झाले आहे व परवा तर ते ठळकपणे लोकांना दिसले. जाळपोळ करणारांना ज्यांनी थांबविण्याचा प्रयत्न केला त्यांना "अहो ! आपणांस स्वतःची अब्रू कायम ठेवायची असेल तर मध्ये तोंड घालू नका." असे बजावण्यात आले व पुढारी म्हणविणारांनी जेव्हा गोंधळ माजविणारांना दंगल थांबविण्याची विनंती केली तेव्हा त्यांचे एकानेही ऐकले नाही. याचा अर्थच असा की जमावाच्या लहरीला जो मान तुकवील त्यालाच जमाव पुढारी मानतो. जमावाच्या कलाविरुद्ध जो सांगेल त्यांचे पुढारीपण अगदी फोल ठरते. अशा रीतीने सरकार ज्या दोघांवरच शांतता प्रस्थापनेबाबत भरंवसा टाकू शकते, त्यांपैकी पुढारी म्हणविणारांची तर अशी वासलात लागली.

आता उरले सरकारी कर्मचारी. यांच्यातही सरकारी धोरणाशी तादात्म्य न पावणारे गणंग आहेतच. पण यांचा प्रश्न घटकाभर सोडला तरी जे प्रामाणिक आहेत त्यांच्या मार्गात आम्हीच अडचणी उत्पन्न करतो. त्यामुळे या प्रामाणिक सरकारी कर्मचाऱ्यांनाही कर्तव्यपूर्तीच्या बाबत आत्मविश्वासाने वागता येत नाही. इतरत्र काय झाले असेल ते असो, पण नागपुरात जो गोंधळ झाला तो थांबविण्याचा जेव्हा पोलिसने प्रयत्न केला अगर आगीच्या बंबाने जेव्हा आग विझविण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांच्या कामात जनतेपैकीच काहींनी अडथळा उत्पन्न केला. अशा परिस्थितीत सरकारने तरी काय करावे ?

सरकारची परिस्थिती कशी विचित्र आहे ते पाहा. म. गांधींच्या मृत्यूमुळे जनता क्षुब्ध झाली तरी जर ती जाळपोळ करीत असेल तर तिचे गांधीप्रेम म. गांधींच्या शिकवणुकीनुसार नाही हे स्पष्ट आहे. आता या जाळपोळ करणाऱ्या जमावाला सरकार प्रथम तोंडी उपदेश करणार. हा उपदेश त्यांनी ऐकला नाही म्हणजे त्यांची पांगापांग करण्याकरिता सरकारला कडक इलाज करावे लागणार. हे कडक इलाज सुरू केले की समाजच पुनः ओरड करणार की काँग्रेस सरकारने म. गांधींच्या "भक्तांवर" (?) लाठीहल्ला केला. शासनच गांधी तत्त्वज्ञानाला हरताळ फासावयास उठले. आता सरकारने काय करावे ? जाळपोळ थांबविते म्हटले तर गांधीभक्तांवरच लाटीहल्ला केल्याचा आरोप येतो. बरे स्वस्थ बसावे म्हटले तर उघड्या डोळ्यांनी जाळपोळ पाहावी लागते. जनतेनेच जर सरकारला असे धारेवर धरले तर सरकारने करायचे काय ? हा नाजूक श्लेष सरकारवर टीका करणारे लोक मोठ्या सोईने विसरतात.

मग हे थांबणार केव्हा– हा प्रश्न उरतोच, याचे अत्यंत स्पष्ट व कडू उत्तर असे आहे की, ज्या राक्षसी वृत्तीचे सध्या थैमान चालू आहे त्या राक्षसी वृत्तीचे स्वतः पोट भरेल

इतके नुकसान व नासाडी झाली म्हणजेच हे थांबेल. नव्वद टक्के लोकांना धूळधाण करावीशी वाटते. या धूळधाणीत त्यांचे स्वतःचे नुकसान आहे हे ते विसरतात. धान्याची कोटारे, उभी शेते, संत्र्याचे बगीचे, कापड इत्यादी जाळण्याने व्यक्तीचे काय नुकसान होत असेल ते होवो, पण आधीच धान्यटंचाई असलेल्या देशातील राष्ट्रीय संपत्ती आपण जाळत आहोत हे समजण्याइतपतसुद्धा आमचे मेंदू ठिकाणावर नाहीत. गजानन मिल्स जाळल्यामुळे मालकाचे काय नुकसान झाले असेल ते असो; पण हजारो मजुरांना आपण बेकार करीत आहोत ही गोष्ट स्वतः गजानन मिलला आग लावणारे मजूर विसरले यापेक्षा डोक्यातील आणखी जास्त काय बिघडणार? हे सर्व लक्षात घेतले म्हणजे एकदा या राक्षसी वृत्तीचे पोट भरेल इतके नुकसान झाले म्हणजेच एकदाची ही राक्षसी वृत्ती स्वतः थंडावेल व मग हे जाळपोळ करणारे लोक स्वतः शांतपणे विचार करतील ही एकच मोडकीतोडकी आशा करता येईल, तोपावेतो सर्व सत्प्रवृत्त लोकांना व खुद्द सरकारलासुद्धा परिणामकारक असा इलाज करणे कठीण आहे. संबंध जनता जर अदूरदर्शीपणाने वागण्याचा हट्ट धरील तर समाजाचे व देशाचे रक्षण कोण करणार?

आम्हाला सर्वांनाच देशात समता प्रस्थापित करायची आहे; पण समता निर्माण करण्याचा जो मार्ग आम्ही चोखाळू त्याने देशाची उंची व मजबुतीही वाढली पाहिजेत. मागासलेल्या लोकांना पुढे जाण्याच्या बाबतीत सर्वांनी मनःपूर्वक साहाय्य करावे यात मतभेद असूच शकत नाही. पण मागासलेल्या लोकांनी जर स्वतःच्या मागासलेल्या मुक्कामावरच कायम राहायचे ठरविले व फार पुढे असलेल्या लोकांच्या कंबरेला दोरखंड बांधून व मागे ओढून समता निर्माण करण्याचा प्रयत्न केला तर देशाचा निःसंशय सर्वनाश होईल. काहींचे पाय सबळ आहेत व काहींचे दुर्बल आहेत. ज्यांचे पाय दुर्बल आहेत त्यांनी मालिश व इतर औषधोपचार करून स्वतःच्या पायात मजबुती आणावी व समता निर्माण करावी हे समजण्यास सोपे आहे. अशानेच समाजातील धडधाकट लोकांची संख्या वाढेलही पण लंगडत चालणारांनी जर स्वतःच्या लंगडेपणावर इलाज करण्याऐवजी धड पाय असणाऱ्यांच्या पायांवर काठ्या हाणून त्यांनाच लंगडे करण्याचे ठरविले तर समता निर्माण होईल हे खरे, पण सर्व समाज लंगडा बनेल हे आम्ही विसरता कामा नये. सध्या समाजात जे वारे चालू आहे त्याने संबंध देश लंगडा बनण्याचा संभव आहे.

समाजाने सर्वांनाच लंगडे करण्याचे ठरविले तर समाजाचा कोण हात धरणार? स्वराज्य म्हणजे स्वातंत्र्य. या स्वातंत्र्यात स्वतःस लंगडे करून घेण्याच्या किंबहुना स्वतःची मान कापून घेण्याच्या हक्काचाही समावेश होतो. स्वतःच्या मानेवर सुरी फिरवून घेतली म्हणजे पुढे पश्चात्ताप होईल हेही निर्विवाद आहे. पण आम्ही एकदा स्वतःच्या मानेवर सुरी फिरवली व मग शेवटचा श्वास जाता जाता पश्चात्ताप होऊन मला असेही वाटले की,

सरकारने हे थांबवावे. सर्व जनता जर गोंधळ माजविण्याचा आग्रह धरू लागली तर सरकारही काय करणार ? गोंधळ थांबविण्याचे सरकारला दोन मार्ग उपलब्ध आहेत. एक नागरिकांतील पुढाऱ्यामार्फत. यांपैकी पुढाऱ्यांचे शहाणपण दंगा थांबविण्याचे कामी मुळीच उपयोगी पडत नाही हे यापूर्वीही अनेक वेळा सिद्ध झाले आहे व परवा तर ते ठळकपणे लोकांना दिसले. जाळपोळ करणारांना ज्यांनी थांबविण्याचा प्रयत्न केला त्यांना "अहो ! आपणांस स्वतःची अब्रू कायम ठेवायची असेल तर मध्ये तोंड घालू नका." असे बजावण्यात आले व पुढारी म्हणविणारांनी जेव्हा गोंधळ माजविणारांना दंगल थांबविण्याची विनंती केली तेव्हा त्यांचे एकानेही ऐकले नाही. याचा अर्थच असा की जमावाच्या लहरीला जो मान तुकवील त्यालाच जमाव पुढारी मानतो. जमावाच्या कलाविरुद्ध जो सांगेल त्यांचे पुढारीपण अगदी फोल ठरते. अशा रीतीने सरकार ज्या दोघांवरच शांतता प्रस्थापनेबाबत भरंवसा टाकू शकते, त्यांपैकी पुढारी म्हणविणारांची तर अशी वासलात लागली.

आता उरले सरकारी कर्मचारी. यांच्यातही सरकारी धोरणाशी तादात्म्य न पावणारे गणंग आहेतच. पण यांचा प्रश्न घटकाभर सोडला तरी जे प्रामाणिक आहेत त्यांच्या मार्गात आम्हीच अडचणी उत्पन्न करतो. त्यामुळे या प्रामाणिक सरकारी कर्मचाऱ्यांनाही कर्तव्यपूर्तीच्या बाबत आत्मविश्वासाने वागता येत नाही. इतरत्र काय झाले असेल ते असो, पण नागपुरात जो गोंधळ झाला तो थांबविण्याचा जेव्हा पोलिसने प्रयत्न केला अगर आगीच्या बंबाने जेव्हा आग विझविण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांच्या कामात जनतेपैकीच काहींनी अडथळा उत्पन्न केला. अशा परिस्थितीत सरकारने तरी काय करावे ?

सरकारची परिस्थिती कशी विचित्र आहे ते पाहा. म. गांधींच्या मृत्यूमुळे जनता क्षुब्ध झाली तरी जर ती जाळपोळ करीत असेल तर तिचे गांधीप्रेम म. गांधींच्या शिकवणुकीनुसार नाही हे स्पष्ट आहे. आता या जाळपोळ करणाऱ्या जमावाला सरकार प्रथम तोंडी उपदेश करणार. हा उपदेश त्यांनी ऐकला नाही म्हणजे त्यांची पांगापांग करण्याकरिता सरकारला कडक इलाज करावे लागणार. हे कडक इलाज सुरू केले की समाजच पुनः ओरड करणार की काँग्रेस सरकारने म. गांधींच्या "भक्तांवर" (?) लाठी हल्ला केला. शासनच गांधी तत्त्वज्ञानाला हरताळ फासावयास उठले. आता सरकारने काय करावे ? जाळपोळ थांबवितो म्हटले तर गांधीभक्तांवरच लाटीहल्ला केल्याचा आरोप येतो. बरे स्वस्थ बसावे म्हटले तर उघड्या डोळ्यांनी जाळपोळ पाहावी लागते. जनतेनेच जर सरकारला असे धारेवर धरले तर सरकारने करायचे काय ? हा नाजूक श्लेष सरकारवर टीका करणारे लोक मोठ्या सोईने विसरतात.

मग हे थांबणार केव्हा– हा प्रश्न उरतोच, याचे अत्यंत स्पष्ट व कडू उत्तर असे आहे की, ज्या राक्षसी वृत्तीचे सध्या थैमान चालू आहे त्या राक्षसी वृत्तीचे स्वतः पोट भरेल

इतके नुकसान व नासाडी झाली म्हणजेच हे थांबेल. नव्वद टक्के लोकांना धूळधाण करावीशी वाटते. या धूळधाणीत त्यांचे स्वतःचे नुकसान आहे हे ते विसरतात. धान्याची कोठारे, उभी शेते, संत्र्याचे बगीचे, कापड इत्यादी जाळण्याने व्यक्तीचे काय नुकसान होत असेल ते होवो, पण आधीच धान्यटंचाई असलेल्या देशातील राष्ट्रीय संपत्ती आपण जाळत आहोत हे समजण्याइतपतसुद्धा आमचे मेंदू ठिकाणावर नाहीत. गजानन मिल्स जाळल्यामुळे मालकाचे काय नुकसान झाले असेल ते असो; पण हजारो मजुरांना आपण बेकार करीत आहोत ही गोष्ट स्वतः गजानन मिलला आग लावणारे मजूर विसरले यापेक्षा डोक्यातील आणखी जास्त काय बिघडणार? हे सर्व लक्षात घेतले म्हणजे एकदा या राक्षसी वृत्तीचे पोट भरेल इतके नुकसान झाले म्हणजेच एकदाची ही राक्षसी वृत्ती स्वतः थंडावेल व मग हे जाळपोळ करणारे लोक स्वतः शांतपणे विचार करतील ही एकच मोडकीतोडकी आशा करता येईल, तोपावेतो सर्व सत्प्रवृत्त लोकांना व खुद्द सरकारलासुद्धा परिणामकारक असा इलाज करणे कठीण आहे. सबंध जनता जर अदूरदर्शीपणाने वागण्याचा हट्ट धरील तर समाजाचे व देशाचे रक्षण कोण करणार?

आम्हाला सर्वांनाच देशात समता प्रस्थापित करायची आहे; पण समता निर्माण करण्याचा जो मार्ग आम्ही चोखाळू त्याने देशाची उंची व मजबुतीही वाढली पाहिजेत. मागासलेल्या लोकांना पुढे जाण्याच्या बाबतीत सर्वांनी मनःपूर्वक साहाय्य करावे यात मतभेद असूच शकत नाही. पण मागासलेल्या लोकांनी जर स्वतःच्या मागासलेल्या मुक्कामावरच कायम राहायचे ठरविले व फार पुढे असलेल्या लोकांच्या कंबरेला दोरखंड बांधून व मागे ओढून समता निर्माण करण्याचा प्रयत्न केला तर देशाचा निःसंशय सर्वनाश होईल. काहींचे पाय सबळ आहेत व काहींचे दुर्बल आहेत. ज्यांचे पाय दुर्बल आहेत त्यांनी मालिश व इतर औषधोपचार करून स्वतःच्या पायात मजबुती आणावी व समता निर्माण करावी हे समजण्यास सोपे आहे. अशानेच समाजातील धडधाकट लोकांची संख्या वाढेलही पण लंगडत चालणारांनी जर स्वतःच्या लंगडेपणावर इलाज करण्याऐवजी धड पाय असणाऱ्यांच्या पायांवर काठ्या हाणून त्यांनाच लंगडे करण्याचे ठरविले तर समता निर्माण होईल हे खरे, पण सर्व समाज लंगडा बनेल हे आम्ही विसरता कामा नये. सध्या समाजात जे वारे चालू आहे त्याने सबंध देश लंगडा बनण्याचा संभव आहे.

समाजाने सर्वांनाच लंगडे करण्याचे ठरविले तर समाजाचा कोण हात धरणार? स्वराज्य म्हणजे स्वातंत्र्य. या स्वातंत्र्यात स्वतःस लंगडे करून घेण्याच्या किंवहुना स्वतःची मान कापून घेण्याच्या हक्काचाही समावेश होतो. स्वतःच्या मानेवर सुरी फिरवून घेतली म्हणजे पुढे पश्चात्ताप होईल हेही निर्विवाद आहे. पण आम्ही एकदा स्वतःच्या मानेवर सुरी फिरवली व मग शेवटचा श्वास जाता जाता पश्चात्ताप होऊन मला असेही वाटले की,

" अरेरे स्वतःची मान कापून घेतली नसती तर बरे झाले असते " तरी इतका उशिरा झालेला पश्चात्ताप निष्फळ ठरेल. त्यानंतर पश्चात्ताप झाला तरी प्राण हा जाणारच. आत्महत्या टाळायची असेल तर कंबरेला गोटा बांधून तलावात बुडी घेण्यापूर्वीच ती टाळता येईल. एकदा उडी घेतली, व मग तलावाच्या बुडाशी प्राण जाता जाता कितीही पश्चात्ताप केला तरी तो व्यर्थ आहे.

मित्रांनो ! सध्या आम्ही आत्मनाशाच्या वाटेवर आहोत, अजून तो टाळता येईल. इच्छा असेल तर अजून परता ! नाहीतर सर्वनाश पक्का आहेच.

६

ब्राह्मण्यवादाचे भूत गाडून टाका— ब्राह्मणेतरवादाचेही भूत गाडून टाका.

१५–३–४८

नागपुरातील वर्तमानपत्राची जातवार विभागणी होऊ शकेल याची आतापर्यंत आम्हास जाणीवही नव्हती. परंतु म. गांधींच्या हत्येनंतर आणि त्यानंतर झालेल्या प्रक्षोभानंतर निरनिराळ्या वर्तमानपत्रांत जे सूर निघाले त्यावरून वर्तमानपत्रांचीही जात असते याचा प्रत्यय आम्हाला आला. ता. २३ माहे फेब्रुवारीच्या 'आहुती'च्या अंकात 'भवितव्य, इन्किलाब, निःस्पृह आणि इंडिपेंडंट' या चार वृत्तपत्रांना एका दावणीत गोवण्यात आले आहे आणि त्यांच्यावर 'स्वतःचा व स्वतःच्या जातभाईंचा स्वार्थ साधण्याकरिता गांधीवादाचा आणि काँग्रेसवादाचा पुरस्कार आणि राष्ट्रपिता गांधींचा खून ही एक क्षुल्लक बाब आहे' असे समजण्याचा आरोप केलेला आहे. असेच आरोप बहुजनसमाजवादाचा हिरीरीने प्रसार करणाऱ्या, वऱ्हाडातील थोर पुढाऱ्यांच्या आश्रयाखाली चाललेल्या आणि बहुजनसमाजवादाचा प्रकाश दाखविणाऱ्या दुसऱ्या एका साप्ताहिकाने आणि प्रांतिक काँग्रेस कमिटीकडून प्रामाण्य मिळविलेल्या 'नवसंदेश'नेही केलेले आहेत. या सर्व आरोपांचा निष्कर्ष असा की, या चारही मतपत्रांनी जे लेख लिहिले ते त्या पत्राचे संपादक हे जन्माने ब्राह्मण होते म्हणून लिहिले. या सर्व आरोपांना आमच्या इतर व्यवसायबंधूंनी काय उत्तरे दिली याच्याशी आम्हास कर्तव्य नाही. या आरोपांना उत्तरे देण्याची आम्हाला तशी तात्त्विक गरजही वाटत नाही. पण तरीही आमच्याबद्दल जनतेत गैरसमज होऊ नये म्हणून आमची भूमिका स्पष्टपणे जनतेसमोर मांडणे आम्ही आमचे कर्तव्य समजतो.

गांधीहत्येनंतर नागपुरात झालेल्या प्रक्षोभासंबंधी आम्ही जे लिहिले त्या वेळी आमची जात ब्राह्मण आहे याची आम्हाला कल्पनाही नव्हती. कारण ज्या वातावरणात आणि परंपरेत आम्ही वाढलो, जी ध्येये आम्ही उराशी बाळगली आणि जी शिकवणूक आम्ही शिकलो, त्यामुळे जन्माने आलेले आमच्यातील ब्राह्मण्य आम्ही अजिबात विसरून गेलो होतो आणि त्यामुळे आमचे टीकाकार आमच्या लिखाणात ब्राह्मण्याचा वास हुंगतील अशी आम्हास यत्किंचित देखील कल्पना नव्हती. आम्ही ब्राह्मण आहोत अशी पुसटशी देखील शंका आमच्या मनाला चाटून गेली असती तरीसुद्धा ' इन्किलाब 'मध्ये जे आले ते येऊ देण्याचा ' असमंजसपणा ' (!) आम्ही दाखविला नसता. ' इन्किलाब 'मध्ये आम्ही जे लिहितो त्याचे इतरेजनांकडून न्याय्य बुद्धीनेच स्वागत किंवा अस्वागत होईल असा आमचा खोटा समज असल्यामुळे आम्ही जे लिहिले ते लिहावयास धजलो. परंतु न्यायशास्त्र आणि मानसशास्त्र हे हातात हात घालून जात नाहीत हेच खरे. आमच्या बहुजन समाजवादी व्यवसायबंधूंनी आमच्या डोळ्यात हे जे झणझणीत अंजन घातले याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभारी आहोत.

पण शेवटी आम्ही ' इन्किलाब 'च्या अंकांत लिहिले तरी काय ? ' आहुती ' चे संपादक दे. भ. दीनबंधू कुंभारे हे आमचे परममित्र आहेत. त्यांच्या कोणत्याही राजकारणात आम्ही त्यांचे प्रतिस्पर्धी नाही हेही त्यांना चांगले माहीत आहे. आमच्यामध्ये ब्राह्मण्यवाद नाही हे त्यांना सत्याची शपथ घेऊन सांगावयास सांगितले तर त्यांना सांगावे लागेल असा आमचा दृढ विश्वास आहे. असे असताना त्यांनी असे का लिहिले ? आमच्या लेखात (' नागपुरातील बहुजनसमाजवादी क्रांती ') ज्यावर आमचे टीकाकार तुटून पडले आहेत त्यामध्येच गांधीहत्येसारख्या घटनेनंतर प्रक्षुब्ध झालेल्या जनतेचा प्रक्षोभ व्हावा आणि आमच्या राष्ट्रपित्याच्या खुनाचा सूड घेण्याचा प्रयत्न त्यांनी करावा हे साहजिक आहे असेच आम्ही म्हटले आहे. आमच्या या विधानात आणि आमच्या टीकाकारांच्या म्हणण्यात आम्हाला तरी काही फरक दिसत नाही. सामान्यतः ब्राह्मणवर्ग पुराणपरंपराप्रिय आणि त्यामुळे प्रगतीस विरोध करणारा असतो असेच आमच्या टीकाकारांप्रमाणे आमचेही मत आहे. वास्तविक आमच्या टीकाकारांना हे समजावयास हवे होते की, या ब्राह्मण किंवा भटवर्गाच्या पुराणप्रियतेची आच जर पहिल्या प्रथम कोणाला लागत असेल तर ती त्याच ब्राह्मणवर्गाविरुद्ध बंड करून त्यांच्या कोत्या संस्कृतीच्या चक्रव्यूहापासून बाहेर पडलेल्या त्यांच्याच जमातीतील लोकांना.

महात्माजींचा मारेकरी हा महाराष्ट्रीय ब्राह्मण होता म्हणून साऱ्या महाराष्ट्रीय ब्राह्मणजातीलाच प्रायश्चित्त देणे योग्य नाही असे आम्ही म्हटले आहे आणि आजही म्हणतो. पण असे म्हणण्याची कारणे दोन.

१. जर समाजाने ब्राह्मण अप्रगतिकारक, परंपराभिमानी आणि स्थितिवादी म्हणून

साऱ्याच ब्राह्मणांवर शस्त्र धरले तर केवळ जन्माने ब्राह्मण असणाऱ्या परंतु ब्राह्मण समाजाच्या आकुंचित मनोवृत्तीला सदैव टोला हाणणाऱ्या, त्यांच्या आकुंचित मनोवृत्तीला दूर लाथाडून शुद्ध राष्ट्रीय विचारसरणीचा धडाडीने पुरस्कार करणाऱ्या, मूठभर का होईना पण शुद्ध राष्ट्रीयवादी, लोकांचीही त्यात आहुती पडण्याचा संभव नाही काय ? 'ब्राह्मण' हा शब्दच आपण 'गुन्हेगार' वाचक मानणार आहोत काय ? मग जन्माने ब्राह्मण असणाऱ्यांना पण वृत्तीने भटजी नसणारांना आपण दुसऱ्या जमातींना दत्तक देणार आहात का काय ?

२. स्थितिवादी ब्राह्मणवर्गाला ज्या तऱ्हेने शिक्षा देण्याचा प्रचार बहुजनसमाजवादी वृत्तपत्रांतून करण्यात आला आणि ज्या तऱ्हेचे प्रायश्चित्त त्यांना देण्यात आले त्यामुळे जातीयतेचा डोंब आणखी उसळेल. आज ब्राह्मणवर्गातील काही लोकांमध्ये तरी जाति-जाग्रती (caste consciousness) नाही. ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे की काही दिवसांपूर्वी आमच्यामध्ये धर्माचीही जाणीव नव्हती. पण मुस्लिम लीगच्या विषारी प्रसारामुळे आम्ही मुस्लिमेतर आहोत आणि मुस्लिम आमच्यापेक्षा भिन्न आहेत अशी एक कल्पना आमच्यात, म्हणजे आपल्या समाजात, रूढ होऊ लागली आणि त्यामुळेच नौखालीचा बदला बिहारात, पश्चिम पंजाबचा बदला पूर्व पंजाबात आणि दिल्लीत आम्ही घ्यावयास लागलो. महाराष्ट्रातील ब्राह्मणांना भरडून टाकण्याचे समाजाने ठरविले तर परंपराप्रिय आणि स्थितिवादी ब्राह्मणांप्रमाणेच प्रगतिवादी आणि क्रांतिकारक, पण जन्माने ब्राह्मण असलेल्या, समाजघटकांनासुद्धा समाजात स्थान राहणार नाही; आणि महाराष्ट्रीय समाजाचे, एका समाजाचे, आपण दोन समाज केल्यासारखे होईल. या आपल्या समाजातून प्रगतिशील विचारसरणीच्या क्रांतिवादी ब्राह्मणांना वगळण्याचा बहुजनसमाजवादी पुढाऱ्यांचाही हेतू असेल असे आम्हास वाटत नाही; परंतु ज्या विचारसरणीचा त्यांच्याकडून उदोउदो होत आहे त्या विचारसरणीचा न कळत होणारा परिणाम म्हणजे आपल्या समाजाचे दोन तुकडे होणे होय हे आम्ही आमच्या सर्व टीकाकारांच्या नम्रपणे नजरेस आणू इच्छितो, आणि हेच स्थितिवादी आणि जातीय मनोवृत्तीच्या लोकांना पाहिजे आहे.

दुसरे, स्थितिवादी आणि आकुंचित मनोवृत्ती ही केवळ ब्राह्मण समाजातच आहे असे नाही. जो उराशी काही बाळगून असतो तो स्थितिवादी असतो. ब्राह्मणवर्गाची उपजीविका ही आजच्या समाजपद्धतीच्या स्थितिशीलतेवर आहे म्हणून तो स्थितिवादी आहे. पण शिक्षणानेही तोच अग्रेसर असल्यामुळे या स्थितिशीलतेविरुद्ध बंड करणारेही ब्राह्मणवर्गातून बरेच उत्पन्न होत आहेत हेही नाकबूल करता येत नाही. ब्राह्मणजातीत जसे स्थितिवादी लोक आहेत, तसे इतर जातींतही आहेत. स्थितिवादिता ही एक वृत्ती आहे आणि त्यामुळे सरंजामशाहीचा आणि भांडवलशाहीचा पुरस्कार करणारे अनेक अब्राह्मण स्थितिवादी लोक, त्यांना केवळ प्रगती किंवा क्रांती पाहिजे आहे म्हणून नव्हे

तर आपल्या मार्गातील आणि राजकारणातील एक काटा नाहीसा करावा म्हणून, जनतेला प्रक्षोभाला तयार करणारच नाहीत असे म्हणून कसे चालेल ? विशेषतः अब्राह्मण स्थितिवादी लोकांचा कटाक्ष हा स्थितिवादी ब्राह्मणांविरुद्ध नाहीच. उद्या कदाचित असेही दृश्य पाहावयाला मिळण्याचा संभव आहे की, हिंदुस्थानातील सर्व ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर स्थितिवादी एकत्र होतील आणि त्यांच्या हातात राज्यसूत्रे आलीत तर ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर हीनदीन दलित शोषित जनतेला छळतील. वास्तविक आपणाला म्हणजे प्रत्येक क्रांतिवाद्याला, जी तयारी करावयाची आहे ती सर्वच स्थितिवाद्यांविरुद्ध, मग तो ब्राह्मण असो वा नसो; आणि हाच इशारा आम्ही आमच्या गेल्या वर्षीच्या १७ व्या अंकात 'आम्हास भटभिक्षुकांचे राज्य नको' या लेखात दिला आहे. या वर्षाच्या सुरुवातीसही 'इन्किलाबचे एक वर्ष' या लेखात आमच्या देशातील जातीयता नष्ट करावयाची असेल तर आमच्यातल्या जाती नष्ट केल्या पाहिजेत, कारण त्या आता जाती राहिलेल्या नसून त्यांची आता राष्ट्रे व्हावयास लागली आहेत असे आम्ही म्हटले आहे. ज्या गोष्टींची आवश्यकता नाहीशी होते त्यांचा ऱ्हास व्हावयालाच पाहिजे. जाती जन्मास आल्या त्या समाजरूपी शरीराला एकत्र ठेवण्याकरिता. परंतु या प्रत्येक अवयवाचे (जातीचे) जेव्हा अलग अलग शरीर (समाज किंवा राष्ट्र) व्हावयास लागले तेव्हा त्या जातींचा नाश करावयासच पाहिजे. पण आमची ही जी विचारसरणी आहे त्याला स्थितिवादी अब्राह्मणाप्रमाणेच स्थितिवादी ब्राह्मणांचाही विरोध झाल्यावाचून राहणार नाही हे आमचे टीकाकार नाकबूल करतील काय ? म्हणून कमीत कमी पुरोगामी लोकांनी तरी आमच्यावर अवास्तव टीका करू नये.

नागपुरातील घटनांना 'बहुजनसमाजवादी क्रांती' हे नाव दिल्यामुळे आमचे बरेच बहुजनसमाजवादी मित्र आमच्यावर चिडले आहेत, पण त्यांना आम्ही एवढेच सांगू इच्छितो की 'प्रकाश'मधील बहुजनसमाजवादावरील पुष्कळसे लेख वाचल्यावरसुद्धा बहुजनसमाजवादाचा प्रकाश अद्याप आम्हांस दिसला नाही. आम्ही अद्यापिही बहुजनसमाजवादासंबंधी (बहुजनसमाजाविषयी नव्हे) अंधारातच चाचपडत आहोत. आम्हाला बहुजनसमाजाचे राज्य असावे ही गोष्ट तंतोतंत मान्य आहे. आजच्या लोकशाहीच्या काळात कोणताही प्रामाणिक मनुष्य बहुजनसमाजाचेच राज्य पाहिजे असे म्हणेल, आणि बहुजनसमाजाच्या राज्यात जेथे शासितच शासक निवडतात, तेथे एखादा केवळ ब्राह्मण म्हणूनच निवडणुकीस अपात्र ठरेल. परंतु बहुजनसमाजाचे राज्य आणि बहुजनसमाजवाद ह्या भिन्न गोष्टी आहेत, असे आम्ही समजतो. बहुजनसमाजवादात एका समाजाचे दोन समाज करण्याची कल्पना अभिप्रेत आहे. समाजाच्या काही घटकांना वगळून टाकण्याची कल्पना अभिप्रेत आहे. आमचा हा ग्रह चुकीचा असल्यास आमची चूक आम्ही कबूल करण्यास तयार राहू, आमच्या टीकाकारांनी आम्हास तसे पटवून द्यावे.

बहुजनसमाजवाद आणि बहुजनसमाजाचे राज्य एक नाही असे मानल्यानंतर बहुजन-समाजाचे कार्य त्याला नको असलेले समाजघटक नाहीसे करावयाचेच राहणार आणि बहुजनसमाजवादाला नको असलेले घटक आज तरी जन्माने ब्राह्मण आहेत ते सांगावयास पाहिजे असे नाही. आमच्या लेखास वरील शीर्षक देणे आम्ही शहाणपणाचे केले किंवा नाही हा प्रश्न सोडून दिला तरीसुद्धा बहुजनसमाजवादी मतपत्रांनी बरेच दिवस जो प्रचार केला त्यामुळे जनतेने केलेल्या गोष्टी त्यांना हव्याच होत्या असे आमच्याने म्हटल्यावाचून राहवत नाही. आणि असे असल्यास आम्ही दिलेले शीर्षक योग्यच ठरते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, आणि हिंदुसभा यांच्या कार्यकर्त्यांवर थोडाफार अन्याय झाला (इति 'आहुति') याबद्दल आम्हाला वाईट वाटले असे 'आहुति'कारांचे म्हणणे दिसते. पण हे धादांत खोटे आहे एवढेच आम्ही सांगू इच्छितो. संघ आणि हिंदुसभा यांच्यावर सरकारकडून कडक कारवाई होण्यात काहीच अन्याय झाला नाही असेच आमचे प्रांजल मत आहे. केवळ रा. स्व. संघच नव्हे तर हिंदुमहासभेसारख्या जातीय संस्थेला सुद्धा आता देशात अस्तित्व राहू नये असेच आमचे मत होते आणि आजही आहे. देशाचे राजकारण हे जातीयतेवर आधारलेले नसावे. देशात पक्ष जरी असले तरी ते आर्थिक कार्यक्रमावर आधारलेले असावे असे आम्ही स्पष्टपणे अनेकदा आमच्या लेखातून मांडलेले आहे. आमच्या राष्ट्रापुढील प्रश्न ?... राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या आमच्या लेखातसुद्धा आम्ही हेच विचार प्रदर्शित केले आहेत.

सेनापती आवारी आणि संत तुकडोजी महाराज यांच्याबद्दलही आमच्या लेखात विपर्यस्त मजकूर आला आहे असे आमच्या अनेक व्यवसाय-मित्रांचे म्हणणे आहे. 'नवसंदेश'कारांनी तर सारा ताळतंत्र सोडून महात्माजी गेले, आता तुकडोजी राहिले असे आकर्षक शीर्षक देऊन संत तुकडोजींच्या वधाची आम्ही वाट पाहात आहोत असे ध्वनित केले आहे. या सर्व विधानांना आम्ही एवढेच उत्तर देऊ इच्छितो की, सेनापती आवारी आणि संत तुकडोजी महाराज या दोन्ही व्यक्तींबद्दल आम्हाला नितांत आदर आहे. परंतु सेनापतीबद्दल आदर असणे म्हणजे त्यांच्या प्रत्येक गोष्टीची आम्ही मुक्त-कंठाने स्तुती करावी असे नाही. शुक्रवार तलावावरील ज्या दृश्यांचे आम्ही वर्णन केले आहे त्या ठिकाणी आम्ही प्रत्यक्ष हजर होतो. त्या ठिकाणी जे घडले ते चांगले घडले असे तरी म्हटले पाहिजे किंवा वाईट घडले असे तरी म्हटले पाहिजे. त्या ठिकाणी घडत होते ते चांगले आहे असे म्हटले तर प्रश्नच मिटला, आमचा त्याच्याशी मतभेद आहे एवढेच. पण वाईट आहे असे म्हटले तर वाईट गोष्टीपासून परावृत्त करण्याचे पुढाऱ्यांचे कर्तव्य असते. सेनापती आवारी हे नागपूरचे अनभिषिक्त राजे आहेत. कितीही प्रक्षुब्ध झालेल्या जनतेचा प्रक्षोभ निमिषमात्रात थांबविण्याची जादू सेनापती आवारीशिवाय दुसऱ्या कोणाही माणसात नाही. आम्ही सेनापतींच्याकडे

पुढारी या नात्यानेच पाहतो, आणि पुढाऱ्याने प्रसंगी आपला जीव धोक्यात घालूनसुद्धा जनतेला आवरले पाहिजे असे आमचे मत आहे. मोटारी तलावांत शिरवीत असता, किंवा आग लावण्याच्या कामांत जनता गुंतली असता 'मोटारी तलावात शिरविण्याच्या अगोदर मला तुम्हाला तलावात ढकलावे लागेल. इमारतींना आगी लावणार असाल तर मी त्या आगीत जळून भस्म होईन' असे त्यांनी प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन म्हणावयास पाहिजे होते असे आमचे मत आहे; आणि ही गोष्ट सेनापतींनी केली नाही.

संत तुकडोजी महाराज यांच्याबद्दल आम्हांला एक अवाक्षरही काढावयाचे नाही. त्यांची भूमिका निःसंशय अत्यंत उच्च दर्जाची होती. परंतु अत्यंत उच्च दर्जाच्या भूमिकेचा सुद्धा काही लोक कसा फायदा घेऊ शकतात एवढेच आम्हाला दाखवावयाचे होते. आमच्या लिहिण्यामुळे संत तुकडोजी महाराज, त्यांचे शिष्यगण आणि जनता यांच्यापैकी कोणाचेच मन दुखविण्याचा आमचा विचार नव्हता. संत तुकडोजींनी जातीयतेचा प्रचार केला, असे आमच्या मनातही येणे शक्य नाही, एवढेच आम्ही सांगू इच्छितो.

शेवटी आमच्या बहुजनसमाजवादी मित्रांना आम्हास एक विनंती करावयाची आहे. जन्माने भिन्न जातीचे असलो तरी काँग्रेसवादी असल्यामुळे आपण खरोखर एक कुटुंबीय आहोत. आपला राष्ट्रपिता मारला गेला याचे आम्हास दुःख होत नाही असा आरोप आमच्या टीकाकारांनी करावयाचा म्हणजे मृत बापाच्या इस्टेटीसंबंधी झगडा करणे होय असे आम्ही समजतो. आणि यावर आमचे एकच उत्तर आहे. पाहिजे तर आमच्या राष्ट्रपित्याची सर्व इस्टेट तुम्हीच सांभाळा, पण आम्हास भलतीच दूषणे लावू नका. अशी दूषणे लावणे आपणास शोभत नाही. ते आपसांतील वैर मिटविण्याच्या वेळी वैर वाढविण्यासारखे होईल.

७

समाजवादी पक्षाचे अभिनंदन

१९-४-४८

अखिल भारतीय समाजवादी पक्षाने आपल्या नाशिकच्या अधिवेशनात जो क्रांतिकारी निर्णय घेतला त्यामुळे हिंदुस्थानच्या राजकारणास नवीनच कलाटणी मिळाली आहे. हिंदुस्थान स्वतंत्र झाले. सर्वत्र काँग्रेस सरकारे प्रस्थापित झाली व काँग्रेसची एकसूत्री राजवट अखिल हिंदुस्थानात सुरू झाली. लोकनियुक्त प्रतिनिधी सत्तारूढ झाल्यावर काँग्रेसच्या ध्येयानुसार किसान-मजुरांचे राज्य सर्वत्र प्रस्थापित होईल अशी लोकांची आशा होती. परंतु मोठ्या खेदाने असे म्हणावे लागत आहे की, अजून हिंदुस्थानात 'रामराज्य' कुठेही प्रस्थापित झालेले नाही. काँग्रेसला रामराज्य हवे आहे. ते काँग्रेसचे ध्येयही आहे. परंतु अजून ते साध्य झालेले नाही. एवढेच नव्हे तर काँग्रेसचा त्या दिशेने होत असलेला प्रयत्न आज जवळ जवळ 'शून्यच' आहे.

याचे कारण असे की, आज काँग्रेसला याचा जाब विचारण्यासाठी म्हणून कुठेही विरोधी पक्ष उरलेला नाही. सर्वत्र एकसूत्री व एकवचनी राज्य करण्याची अपूर्व संधी त्यांना लाभली आहे. कायदेमंडळात काँग्रेसशिवाय इतर पक्षच नाही. मुस्लिम लीग, कम्युनिस्ट किंवा इतर पक्ष यांचे जे काही चारदोन बोटांवर मोजण्याइतके सदस्य कायदे-मंडळात आहेत त्यांचा कायदेमंडळात आवाजच उठत नाही. त्यामुळे आज सरकार बरेच निश्चिंत झाले आहे, व याचा परिणाम किसान-मजूर-राज्य लांबणीवर पडण्यात होत आहे. या सरकारची किसान-मजूर-राज्य स्थापन करण्याची मुळातच इच्छा नाही, असे आमचे म्हणणे नाही. पण याकडे कानाडोळा होत आहे एवढेच आम्हाला म्हणावयाचे आहे.

या अशा परिस्थितीत देशाच्या व त्याचप्रमाणे काँग्रेसच्यासुद्धा उन्नतीसाठी एका जोरदार विरोधी पक्षाची नितांत आवश्यकता आहे. ही उणीव भरून काढण्याचे समाजवादी पक्षाने ठरविले आहे. या अशा विधायक विरोधी मनोवृत्तीचे आम्ही स्वागत करतो.

शुद्ध साधनाचा आग्रह

समाजवादी पक्ष आज राजकारणाच्या आखाड्यात उतरला आहे. इत:पर सरकार व कायदेमंडळे काबीज करण्याचा समाजवादी पक्षाचा इरादा आहे, आणि यासाठी ज्या प्रतिभेची गरज असते, तशा प्रकारचे प्रतिभावान कार्यकर्तेसुद्धा समाजवादी पक्षाजवळ आहेत. समाजवादाची प्रस्थापना करण्याचा विडा समाजवादी पक्षाने उचलला आहे, त्यासाठी संपूर्ण प्रयत्न करण्याचे त्यांनी ठरवले आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. आपले हे साध्य साधण्यासाठी म्हणून केवळ शुद्धसाधनांचाच उपयोग करण्याचीही प्रतिज्ञा समाजवादी पक्षाने घेतली आहे यासारखे आनंददायी काहीच नाही. आजवर आपण केवळ साध्याचाच विचार केला. साधनाचा विचार एका गांधीखेरीज करून इतर कुणाच्याच डोक्यात कधी आलाच नाही. त्यामुळे आपले 'साध्य तेवढे उज्ज्वल असले की झाले, मग साधन कसेही असो!' अशीच आपली धारणा होती. परंतु साध्यापेक्षाही साधनाचे महत्त्व अधिक आहे याची जाणीव आपणांस वर्ध्याच्या रचनात्मक कार्यकर्त्यांच्या संमेलनाने नुकतीच करून दिलेली आहे आणि अशा प्रकारच्याच शुद्ध साधनाचा आपला संकल्प समाजवादी पक्षानेसुद्धा जाहीर केलेला आहे. शुद्ध व पवित्र साधनांच्या द्वारेच उज्ज्वल व उन्नत साध्य साधणे हीच खरी क्रांती. यालाच अनुसरून किसान-मजूर-राज्याच्या प्रस्थापनेसाठी विधायक कार्यक्रमाचा व नैतिक अधिष्ठानाचा साधन म्हणून उपयोग करण्याचे समाजवादी पक्षाने जाहीर केलेले आहे. या त्यांच्या पवित्र संकल्पाबद्दल आम्ही समाजवादी पक्षाचे अभिनंदन करतो.

समाजवाद्यांस इशारा

समाजवाद सगळ्यांनाच हवा आहे. एकजात सर्वच क्रांतिकाऱ्यांनी समाजवादाचा पुरस्कार केला आहे. काँग्रेसचे सुद्धा तेच ध्येय आहे. परंतु त्यांच्या प्रस्थापनेसाठी काँग्रेस काहीच करीत नाही असा आज काँग्रेसवर आरोप करण्यात येतो. काँग्रेस जोवर सत्तारूढ झाली नव्हती तोवर तिला विरोधही कमी होता पण ती सत्तारूढ होताच तिचे ध्येय तेच असले तरी साधनांत फरक पडला आहे असा काहींचा काँग्रेसवर आरोप आहे. किसान-मजूर-राज्याच्या प्रस्थापनेसाठी करावयास हवे तसे प्रयत्न आज काँग्रेस सरकार करीत नाही हे उघड आहे. सत्तेचा असाच मद साऱ्यांनाच चढतो म्हणतात. ह्या धोक्यापासून समाजवादी पक्षाने सावध राहावे असा आमचा त्यांना नम्र इशारा आहे. ते सत्तारूढ झाले तरी त्यांचा समाजवादाचा व शुद्ध साधनाचा पवित्र संकल्प तसाच कायम राहील अशी दृढ आशा आहे.

८

आजच्या सुमुहूर्तावर

१५-८-१९४८

आमच्या गेल्या अंकात एक वर्षाच्या काळात आमच्या हातून घडलेल्या दोषांचे विवेचन करण्याचा थोडाफार प्रयत्न आम्ही केला होता. स्वातंत्र्य म्हटले की एका नव्या सृष्टीच्या स्वप्नात माणूस दंग होतो. पण ही कल्पनेतील 'नवी सृष्टी' प्रत्यक्षात येत असता जर कल्पनेपेक्षा निराळी ठरली तर माणसाच्या मनाला त्याचा हादरा बसतो आणि स्वप्नरंजनात असताना जशी त्याला प्रत्येक गोष्ट 'शिवं सुंदरम्' भासत असते, तशी त्याला प्रत्येकच गोष्ट बेसूर वाटावयास लागते. वास्तविक जीवनातील आनंद हा कधीच निर्भेळ असत नाही, तो नेहमीच दुःखमिश्रित असतो. स्वातंत्र्याच्या एक वर्षाच्या काळात आम्ही 'उदंड' खूप अपेक्षा केल्या. पण त्या सर्व फलद्रूप व्हावयाच्या नव्हत्याच. त्यांपैकी आपण थोड्याफार जरी प्रत्यक्षात आणल्या असल्या तरीही समाधान मानण्यास पुष्कळच जागा आहे, आणि गेल्या एक वर्षाचे सिंहावलोकन करता अखिल भारतीय क्षेत्रात कमीत कमी दोन गोष्टी तरी समाधान मानण्यास निश्चित जागा आहे असे दिसून येईल.

एक तर, गेली शतकानुतके आपल्या देशाला ज्या अनेक रोगांनी ग्रासले होते त्यामध्ये बुरसटलेल्या विचारसरणीच्या सरंजामशाही संस्थानांची कीड ही सर्वांत मोठी होती. आमच्या सरकारने, विशेषतः सरदार वल्लभभाईंनी या किडीवर 'डी. डी. टी.' सिंचन करून देशाचे या सरंजामशाहीपासून रक्षण करण्याचा प्रयत्न केला ही कमी महत्त्वाची गोष्ट खास झाली नाही. आज हा प्रश्न पूर्णपणे सुटला नाही हे खरे. कारण सर्वच संस्थाने पूर्णपणे बरखास्त व्हावयास पाहिजे होती. लोकमान्यांच्या हाताखाली शिक्षण

घेतले असतानासुद्धा, लोकशाहीचा आणि प्रगतीचा खोटाच पुळका आणणाऱ्या, आपणास हितकर असेल तेव्हाच भांडवलशाहीविरुद्ध आग पाखडणाऱ्या, एरवी भांडवलशाहीच्या ओंजळीने पाणी पिणाऱ्या अत्यंत आकुंचित मनोवृत्तीच्या, गुजराथमधील महाराष्ट्रीय संस्थानिकांचे संरक्षण करण्यास बद्धपरिकर झालेल्या काही सडक्या वृत्तपत्राप्रमाणे काही संस्थाने बरखास्त झाली पाहिजेत आणि काही तशीच राहिली पाहिजेत असे आमचे मत नाही. उलट छत्तिसगढ किंवा ओरिसा संस्थानाप्रमाणे सर्वच संस्थाने हिंदी संघराज्यात पूर्णपणे विलीन झाली पाहिजेत असेच आमचे मत आहे. म्हणूनच हा प्रश्न पूर्णपणे सुटला नाही असे आम्ही लिहिले आहे. पण असे जरी असले तरी जेवढे यश आमच्या पदरात पडले ते काही थोडेथोडके नाही.

दुसरे म्हणजे आमच्या सरकारने स्त्री आणि पुरुषांना दिलेला समान दर्जा. 'स्त्री-स्वातंत्र्याची सनद' ही आमच्या प्रगतिमय विचारसरणीची सर्वोत मोठी निदर्शक आहे. आणि एक वर्षाच्या अल्पावधीत स्त्रियांना सर्व क्षेत्रांत पुरुषाबरोबरीची समानता अर्पण करून आम्ही प्रगतीचा एक मोठा टप्पा गाठला हे आम्हास निस्संशय अभिमानास्पद आहे. अर्थात जोपर्यंत आमचा संपूर्ण देश हा खऱ्या अर्थाने सुशिक्षित होत नाही, आणि जोपर्यंत आमची जीवनासंबंधी विचार करण्याची पातळी वाढत नाही तोपर्यंत 'स्त्रीस्वातंत्र्याची सनद' सुद्धा स्त्रियांना पूर्णपणे उपयोगी ठरेलच असे म्हणता येणार नाही. पण यापुढे ज्या अडचणी उपस्थित होतील त्यांतून मार्ग काढणे हे स्त्रियांचे काम आहे. यापुढे त्यांनी आपले कार्यक्षेत्र केवळ 'चूल आणि मूल' यापुरतेच मर्यादित न ठेवता अगदी खऱ्या अर्थाने नागरिकांच्या पूर्ण हक्कांचा त्यांनी उपभोग घ्यावयास पाहिजे आणि नागरिकांच्या कर्तव्यांची जाणीव ठेवावयास पाहिजे.

सृष्टीत क्रांती सुरू झाली की तिची अडवणूक कोणासही करिता येत नाही. आपणास स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर आपली समाजसृष्टी नवे रूप धारण करील अशी अनेकांची अपेक्षा होती. दुर्दैवाने तसे झाले नाही. आमच्यातील शिथिलता तशीच कायम राहिली. नवे चैतन्य आमच्या जीवनात, आचारात, विचारात, कल्पनांत, वाङ्मयात उतरले नाही. पण याकरिता केवळ सरकारला दोष देऊनही उपयोग नाही. प्रजासत्ताक राज्यात प्रजेचेच सार्वभौमत्व असते. प्रजेमध्ये जे दोष असतात तेच राज्यकर्त्यांत उतरतात. जर राज्ययंत्रात शैथिल्य असेल, जर राज्यशासनात अनीती (Corruption) पसरली असेल, जर सरकारी नोकरवर्गात अहंमन्यता आणि दंभ पसरला असेल तर त्याचे कारण एवढेच की आमचे सरकार हे प्रातिनिधिक आहे. सरकार किंवा सरकारी यंत्रांतील कोणताही प्राणी हा 'थर्मामीटर'सारखा असतो. प्रजेचे दोष तो बरोबर दाखवितो. स्वतः आत्मसात करून दाखवितो.

आजच्या नोकरशाहीत आणि आमच्या गत गुलामगिरीतील नोकरशाहीत काहीसुद्धा

फरक नाही. आमच्या राष्ट्राची प्रतिष्ठा कशी राखावी, आमच्या राष्ट्रध्वजाचा मान कसा राखावा, याची त्यांना मुळीसुद्धा चाड नाही. फाटके राष्ट्रध्वज खुशाल आमच्या सरकारी इमारतीवर चढविले जातात असे दृश्य या एका वर्षात अनेकदा आम्हाला दिसले आहे. अनेक ऑफिसांतून अनीतीचा (Corruption) हैदोस सुरू आहे. पण याचे कारण आमची सरकारी नोकरशाही पोटभरू आहे, आणि ती पोटभरू आहे याचे कारण आम्ही सारे लोकच पोटभरू आहोत. स्वतःला सर्व विश्वाचा मध्यबिंदू कल्पूनच आमचे राजकारण सुरू होते. आमचे समाजकारण म्हणजे आमच्या 'स्व'ला आमच्या प्रकर्षासाठी दिलेले गोंडस स्वरूप! थोडेसे अंतर्मुख होऊन विचार केला तर एक वर्षात सर्व बाजूंनी आमच्यात चैतन्य उत्पन्न झाले नाही याचे कारण आमच्यातीलच दोष होत हे आपणास न सांगताही कळण्यासारखे आहे. आम्हास दुसऱ्याचे दोष केव्हा दिसू लागतात? जेव्हा दुसऱ्याचा प्रकर्ष आमच्या प्रगतीच्या आड येतो. थोडक्यात आम्हाला म्हणजे साऱ्या प्रजेला स्वातंत्र्याची खरी जाणीव उत्पन्न झाली नाही हेच खरे. म्हणून यानंतर तरी स्वतंत्र राष्ट्रातल्या नागरिकत्वाची खरी जाणीव राष्ट्रातील प्रत्येक घटकाच्या मनात उदय पावेल असा प्रयत्न बाकीच्या साऱ्या नागरिकांनी केला पाहिजे, म्हणजे शासनयंत्रसुद्धा आपोआप सुधारेल.

थोडासा प्रामाणिकपणे विचार केला तर आपणास हे कळून येईल की पंजाबातील अत्याचार, गांधीजींची हत्या किंवा त्यानंतर झालेल्या जातीय दंगली ह्या आमच्या दोषांचेच तांडवनृत्य होय. तात्पर्य, स्वतः काहीही विधायक कार्य न करिता केवळ सरकारवर टीका करण्याचा मक्ता घेणे हा सर्वनाशाचा निश्चित उपाय होय.

तेव्हा आजच्या सुमुहूर्तावर स्वतंत्र राष्ट्राचे खरे नागरिक बनण्याचा निश्चय आपण सारेच करू या म्हणजे या दोषलांछित स्वातंत्र्याचे उज्ज्वल स्वातंत्र्यात रूपांतर झालेले आपणास आढळेल.

जयहिंद

९

बलशाली भारताची निर्मिती

२६-९-१९४८

हिंदुस्थानच्या इतिहासात गेल्या आठवड्यातील घडामोडी सुवर्णाक्षरांनी लिहिल्या जातील. कारण १३ तारखेस पहाटे ४ वाजता हिंदी फौजांनी माणुसकीची होळी पेटविणाऱ्या हैदराबादमधील रझाकारी गुंडांचे आणि तेथील व पर्यायाने हिंदमधील जनतेच्या स्वातंत्र्याशी खेळू पाहणाऱ्या निझामाचे पारिपत्य करण्यासाठी हैदराबाद संस्थानात कूच केले. अत्यंत द्रुत गतीने चाल करून उणेपुरे पाच दिवस संपायच्या आधीच तेथील सरंजामी व गुंडगिरीवर आधारलेल्या राजवटीला वठणीवर आणले व अशा तऱ्हेने सुमारे दीड कोटी हिंदी प्रजेला जाळपोळ, लूटमार आदी त्रासातून वाचविले.

पण हा केवळ लष्करी विजयच होय असे मानणे चुकीचे ठरेल. निझामी फौजांना आणि रझाकरांना अत्यंत अल्पावधीत जेरीस आणणे हा लष्करी विजय तर खराच; परंतु त्याबरोबर तो एकंदर हिंदी प्रजेचा नैतिक विजय होय. हा लोकशाहीच्या पुरस्कर्त्या हैदराबादी जनतेचा विजय होय असे मानणे अधिक उचित ठरेल. ज्या संस्थानात संपूर्णपणे वेबंदशाही, अत्याचार आणि लुटालूट यांना ऊत आला होता तेथे पाच दिवसांच्या आत कबजा मिळविणे ही निव्वळ लष्करी सामर्थ्याची बाब नसून त्याकरिता जनतेच्या मदतीची, नैतिक बलाचीही आवश्यकता होती हे विसरून चालणार नाही.

विशेषतः ज्या ब्रिटिश मुत्सद्द्यांनी हिंदला स्वातंत्र्य-प्रदान करताना केवळ एकच नव्हे तर संस्थानांच्या रूपाने ५०० हून अधिक पाकिस्ताने निर्माण केली आणि अशा रीतीने हिंदी पुढाऱ्यांचा स्वातंत्र्य-संपादनोत्तर मार्ग अती दुष्कर करून ठेवला, त्यांच्या मुत्सद्दे-

गिरीला हैदराबादच्या शरणागतीने चांगलाच टोला हाणण्यात आला आहे हे निःसंशय ! हिंदी पुढाऱ्यांच्या धैर्यशाली धोरणाने व मुख्यतः सरदार पटेलांच्या खंबीरपणाने हिंदी संस्थानिकांचा प्रश्न एका वर्षाच्या आत सुटून सर्व संस्थाने हिंदचा अविभाज्य भाग बनण्यास तयार झाली. परंतु चर्चिल आदी साम्राज्यशहांच्या पाठिंब्याने आणि पाकिस्तानी जातीयवाद्यांच्या उघड उघड मदतीने निझामासारख्या संस्थानिकाने गेले वर्षभर रझाकरांचा व इत्तेहाद-इल्-मुस्लिमीनचा धुमाकूळ चालू ठेवला. पण काही झाले तरी अखेर जनतेची शक्ती प्रबल ठरून निझामाला हिंदी संघराज्यापुढे लोटांगण घालीत यावे लागले, आणि अशा रीतीने हिंदच्या हृदयातील काट्याचे उचाटण झाले.

म्हणून हैदराबादच्या लढ्यातील विजय हा हिंदी इतिहासात हिंदी जनतेच्या नैतिक बलाचा विजय अशा अर्थानेच लिहिला जाईल. तो सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल असे आम्ही म्हणतो याचे कारण हेच की १५ ऑगस्ट १९४७ रोजी जे स्वातंत्र्य केवळ हिंदच्या काही भागालाच प्राप्त झाले ते हैदराबादच्या यशस्वी लढ्याने संपूर्ण हिंदी जनतेला मिळणे शक्य झाले आहे. हिंद सरकारला न जुमानता आपले स्वातंत्र्य टिकविण्याचा हैदराबादचा प्रयत्न केवळ हैदराबादी जनतेच्या दृष्टीनेच नव्हे तर संपूर्ण हिंदी प्रजेच्या दृष्टीने घातकी असल्यामुळे जेव्हा १७ सप्टेंबर रोजी निजामाने शरणागती जाहीर केली तेव्हा तेथील प्रजेबरोबरच अखिल हिंदी प्रजेलाही मनस्वी आनंद झाला असल्यास नवल नाही. सर्व हिंदभर २६ तारखेस स्वातंत्र्यदिनासारखा आनंदीआनंद व ईशस्मरण करण्याचा श्री. राजगोपालाचार्य यांनी जो आदेश दिला त्याचेही हेच मर्म होय. हिंदी प्रजेच्या स्वातंत्र्याचे संपूर्ण फळ हैदराबादच्या यशस्वी लढ्याने प्राप्त झाले आहे. तेव्हा जर आम्ही स्वातंत्र्यदिनाइतकेच महत्त्व या यशाला दिले तर त्यात काहीच आश्चर्य नाही. गेल्या वर्षी मिळविलेल्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्याचे सामर्थ्य आमच्यात आता आले आहे असे आम्ही अभिमानाने म्हणू शकतो.

अशा रीतीने हिंदी स्वातंत्र्ययुद्धाचे एक पर्व पूर्ण झाले आहे. हिंदी प्रजेची खरी कसोटी गेल्या वर्षभरातच पाहण्यात आली. अनेक अडचणी मार्गात आल्या. पण त्या कसोटीला ती उतरली, त्या सर्व अडचणींना तिने यशस्वीपणे तोंड दिले. यामुळेच स्वतंत्र हिंद नव्या रूपाने जन्म घेत आहे; बलशाली हिंद आपल्या नैतिक बलाच्या जोरावर पुढे सरसावत आहे. लोकशाहीतील खरी सत्ता ज्या जनतेच्या हाती असते त्या जनतेच्या नैतिक सामर्थ्याच्या जोरावर हिंदने आजवर अनेक अडचणींना मुकाबला केला आणि आज ते एक सामर्थ्यवान राष्ट्र झाले आहे. त्या नैतिक सामर्थ्याच्या जोरावरच हिंदला यापुढे जगावयाचे आहे. तेव्हा हिंदच्या या सामर्थ्याची अत्यंत काळजीपूर्वक जोपासना करणे हे आमच्या सरकारचे कर्तव्य ठरले आहे. हिंदसमोरील अनेक प्रश्न सोडविण्यासाठीही त्या बलाची आवश्यकता असल्यामुळे ती जोपासना आमच्या भवितव्याच्या

दृष्टीनेही हितावह ठरणार आहे व हिंद सरकार हे हिंदी जनतेचेच सरकार असल्यामुळे ज्या बलाच्या जोरावर राष्ट्राचे भवितव्य अवलंबून आहे त्याची ते जोपासना करतील यात आम्हाला शंका नाही.

१०

ऑलिंपिकची दीपशिखा

२-८-१९४८

यंदाचे जागतिक ऑलिंपिक सामने लंडन येथे सुरू झाले आहेत. ऑलिंपिक सामन्याचे तत्त्वज्ञान अभ्यसनीय आहे. माणसाच्या प्रगतीकरिता स्पर्धा आवश्यक आहे, युद्ध नाही हे ते तत्त्वज्ञान होय. खेळाडूंना जे तत्त्वज्ञान खेळ खेळताना सहज अवगत होते ते राजकारणी लोकांना कधीच अवगत होत नाही, आणि राजकारणी लोकांच्या हातात राष्ट्राची धुरा असल्यामुळे इष्ट स्पर्धेऐवजी युद्धाचे तत्त्वज्ञान ते प्रसृत करितात आणि खेळाडूंनाही राजकारणी लोकांच्या हातातील बाहुले बनावे लागते. पण ही प्रक्रिया उलटी होण्यावरच राष्ट्राची प्रगती अवलंबून आहे हे आता तरी आपल्या ध्यानात यावयास पाहिजे.

लंडन येथे अठ्ठावन्न राष्ट्रांचे ६००० प्रतिनिधी या सामन्यांत भाग घ्यावयास जमले आहेत. त्यांनी मैत्रीची आणि राष्ट्राराष्ट्रातील ऐक्य टिकविण्याची शपथ घेतली आहे.

पण एकीकडे हा शांतिपाठ सुरू असता दुसरीकडे रणक्षेत्रावर चौघडे वाजू लागले आहेत. 'पाशवी शक्ती' 'सद्हेतूवर' विजय मिळविणार असे दिसू लागले आहे.

जागतिक मुत्सद्द्यांना आणि राष्ट्रा-राष्ट्रातील नेत्यांना मनातून युद्ध पाहिजे आहे. राष्ट्रा-राष्ट्रात वैषम्य पसरले आहे. एक राष्ट्र खच्ची झाले की दुसऱ्या राष्ट्रास आनंद होत आहे. ऑलिंपिक सामने आणि तदनुषंगिक शांतिपाठ हा बाहेरील देखावा आहे. भांडवलशाही आणि साम्राज्यशाही पाताळयंत्री लोकांच्या हातातील सामान्य जनतेला भुलविण्याचे ते एक प्रभावी साधन होऊन बसले आहे. शांततेच्या नावाखाली युद्धाची

तयारी करण्याची ही वारांगनेच नृपनीती आहे.

या विसंगतीचा सर्वांत मजेदार अनुभव या ऑलिंपिक सामन्याच्या वेळीच आला. एकीकडे जागतिक शांततेचे पाठ गाण्यात ऑलिंपिक खेळाडू आणि सहावे जॉर्ज मग्न असता दुसरीकडे इंग्लंडचे परराष्ट्रमंत्री श्री. बेव्हिन यांनी बर्लिनच्या कोंडीच्या प्रश्नावर जागतिक शांतता भंग होण्याचीही घोषणा केली, आणि त्यानंतर लागलीच इंग्लंडचे महामुत्सद्दी श्री. विन्स्टन चर्चिल यांनाही हैदराबादचा पुळका आला. पण हे इंग्लंडपुरतेच मर्यादित आहे असे नाही. या साम्राज्यशाहीच्या वैतागाचे थैमान जगभर सुरू आहे. रशियाचा गट आणि अमेरिकेचा गट असे गट पडले असून एका गटातून एखादे राष्ट्र फुटून निघण्याची, दुसरा गट गिधाडासारखी वाट पाहात आहे. अशा स्थितीत आज ना उद्या जागतिक शांतता भंग झाल्यावाचून राहणार नाही आणि सध्यातरी ऑलिंपिक सामन्याच्या वेळी घेण्यात येणारी शांततारक्षणाची शपथ ही मनात विकल्प ठेवून घेतलेली (with mental reservation) शपथ होय असेच म्हणावे लागते.

आज समाजात रूढ झालेल्या मूल्यामध्ये 'दंभ' हे सर्वांत महत्त्वाचे मूल्य होऊन बसले आहे. आपण नाही ते दाखविणे हे परंपरागत सुसंस्कृतीचे मापन झाले आहे. या संस्कृतीचा दंभ हा सर्वांत मोठा घटक आहे. पण ही संस्कृती मुत्सद्द्यांची संस्कृती आहे, खेळाडूंची नव्हे. आज खेळाडूंनी मुत्सद्द्यांविरुद्ध बंड करण्याची वेळ आहे. ऑलिंपिक सामन्याच्या वेळी जगातील खेळाडूंनी अशा प्रकारची शपथ घेतली आहे. पाहावे आता ऑलिंपिकची दीपशिखा जगाला सन्मार्ग दाखविते की महायुद्धाच्या ज्वालांत स्वतःच विलीन होते!

११

युक्तप्रांतातील निवडणुकी

१९-७-४८

युक्तप्रांतात नुकताच काँग्रेस आणि समाजवादी पक्षांत निवडणुकीबाबत झालेला लढा हा अनेक दृष्टींनी महत्त्वाचा आहे. लोकशाहीत राजकारण हे निवडणुकीचे वेळीच उतू जाते असा जो अनुभव पदोपदी येतो त्याचा पुन्हा एकदा प्रत्यय या निवडणुकीचे वेळी आला. ही निवडणूक काँग्रेसने पुरेपूर जिंकली आणि समाजवादी पक्षाचा या निवडणुकीत पुरा फज्जा उडाला, इतकेच नव्हे तर समाजवादी पक्षाचे पितामह श्री. आचार्य नरेंद्र देव यांना या निवडणुकीत हार खावी लागली आणि श्री. बाबा राघवदास हे जवळजवळ १३०० मते जास्त पडून निवडून आले.

या निवडणुकी जिंकल्याबद्दल काँग्रेसने आपली पाठ थोपटून घेणे साहजिकच आहे. समाजवादी पक्षाची जनता, जनवाणीसारखी साप्ताहिके यांनी या निवडणुकीत समाजवादी पक्ष का हरला याचे विवेचन आणि समर्थन करण्याचा प्रयत्न करणे हे ठीकच आहे.

प्रेम आणि युद्ध यांत सर्व काही योग्यच आहे असा जरी संकेत असला तरी नीति-तत्त्वाच्या कक्षेतून निवडणुकी ह्या उच्च पातळीवरून व्हावयाला पाहिजेत. जनतेचे पाठबळ आमच्या मागे आहे असे सांगणाऱ्या पक्षाला तर यासंबंधी जास्तीच काळजी घ्यावयास पाहिजे. या निवडणुकीत काँग्रेस पक्ष जिंकणार याबद्दल आम्हाला मुळीच संदेह नव्हता. पण बाबू जयप्रकाश नारायण यांनी निवेदिल्याप्रमाणे काँग्रेसने फॅसिस्ट तंत्राचा अवलंब केला असल्यास ते आजपर्यंतच्या काँग्रेसच्या कीर्तीस काळिमा आणणारेच झाले असेच म्हणावे लागते. लोकशाहीत विरोधी पक्षाकडे नेहमीच न्याय बुद्धीनेच

पाहावयास पाहिजे. इतकेच नव्हे तर विरोधी पक्ष असणे हे एक प्रगतीचेही लक्षण समजले पाहिजे. असे असताना ना. पंडित पंत यांनी हिंदुमहासभा आणि कम्युनिस्ट यांच्याप्रमाणे आम्ही आमच्या प्रत्येक विरोधकाला फोडून काढू या अर्थाचे केलेले वक्तव्य उदारमनाचे लक्षण मानले जाणार तर नाहीच. उलट त्याला फॅसिस्ट वृत्तीचा दर्प येतो हे नक्की.

पंधरा ऑगस्ट १९४७ च्या पूर्वी काँग्रेस आणि राष्ट्र हे दोनही समानार्थी शब्द होते. १५ ऑगस्ट १९४७ पूर्वीच्या केलेल्या पुण्याईच्या अधिष्ठानावरच आजची काँग्रेसची सत्ता उत्पन्न झाली, आणि ही सत्ता उत्पन्न झाल्यावरच काँग्रेस आणि राष्ट्र हे पूर्वीचे समानार्थी शब्द भिन्न अर्थाचे झाले. काँग्रेस हा पक्ष झाला. आज काँग्रेस हा देशातील सर्वांत बलिष्ठ पक्ष आहे हे खरे. परंतु काँग्रेसने प्रगतिमय धोरण न स्वीकारता स्थितिवादी किंवा परागतिक धोरणाचा स्वीकार केला तर काँग्रेसच्या लोकप्रियतेला ओहोटी लागण्यास विलंब लागणार नाही. सूक्ष्मपणे विचार केल्यास आजही काँग्रेसची लोकप्रियता ही संघटनात्मक (Organisational) लोकप्रियता नसून आजच्या भारतवर्षाचे राष्ट्रपुरुष हे तिचे अध्वर्यू आहेत म्हणूनच आहे हे विसरून चालणार नाही. या संघटनात्मक लोकप्रियतेचा अभाव समाजवादी पक्षातही दिसतो. समाजवादी पक्षाचे नाव जे राष्ट्रात झाले आहे ते काही समाजवादी पक्षाने केलेल्या संघटनेमुळे नव्हे तर १९४७ पूर्वीच्या राष्ट्राचे द्वितीय श्रेणीचे नेतृत्व समाजवादी पुढाऱ्यांच्या हाती होते म्हणूनच. संघटक शक्तीच्या जोरावर दिवसानुदिवस मजबूत होत चाललेला पक्ष कम्युनिस्ट पक्ष होय हेही नाकबूल करून चालणार नाही, आणि आम्ही खऱ्या संघटनेचा प्रयत्न न करता आमच्या राष्ट्रपुरुषांच्या लौकिकाला इरेला घालून आणि फॅसिस्ट तंत्राचा अवलंब करून निवडणुकी जिंकावयास लागलो तर एका रीतीने कम्युनिस्ट पक्षाला मदत केल्यासारखेच होईल आणि कम्युनिस्ट पक्ष दिवसानुदिवस जास्त बलवान बनेल. तेव्हा पुढाऱ्याच्या लोकप्रियतेच्या जोरावर निवडणुकी न जिंकता संघटनेच्या आणि जनतेसमोर ठेवलेल्या कार्यक्रमाचे भरंवशावरच निवडणुकीच्या आखाड्यात आपण उभे राहावयाला पाहिजे.

युक्तप्रांतातील निवडणुकी काँग्रेस जिंकणार याबद्दल आम्हांस मुळीच संदेह नव्हता हे आम्ही वर सांगितलेच आहे. समाजवादी पक्ष काँग्रेस अंतर्गत असताना समाजवादी पक्ष हा युक्तप्रांत काँग्रेस कमिटीत बहुमतात होता ही गोष्ट खरी आहे. पण त्याचे कारण युक्तप्रांत काँग्रेस कमिटीत असलेले लोक हे समाजवादी पक्षाचे होते म्हणून नव्हे तर ते काँग्रेसचे होते म्हणून. म्हणूनच काँग्रेसमधून फुटून निघाल्याबरोबर ज्या पक्षाला संघटना नाही, ज्या पक्षाचा कार्यक्रम फक्त ठरावात आणि ज्या पक्षाचा जोर हा त्या पक्षाच्या आचार्यजींसारख्या नेत्यांच्या वैयक्तिक तपावर अवलंबून त्या पक्षाला प्रांतीय राजकारणात दशम दर्जाचे स्थान प्राप्त झाल्यास आणि त्या पक्षाच्या नेत्यांच्या लोकप्रियतेस

ओहोटी लागल्यास त्यात आश्चर्य काहीच नाही. त्यातच मोहनलाल गौतमसारखे समाजवादी पक्षाचेच एके काळचे धुरीण समाजवाद्यांना विरोध करावयास उभे राहतात. अशा स्थितीत समाजवादी पक्षाला हार खावी लागणार हे उघडच होते. पण आचार्य नरेंद्र देवांच्या हारीबद्दल जो एवढा गवगवा करण्यात येतो त्याला मात्र तितकासा अर्थ नाही असे आमचे प्रांजल मत आहे. आचार्यजींच्या विरुद्ध निवडून आलेले बाबा राघवदास हे काही खरोखर राजकारणी नाहीत. त्यांची लोकप्रियता ही धार्मिक स्वरूपाची आहे. गोरखपूर विभागात एक महान विभूती म्हणून त्यांचा लौकिक आहे. त्यांची राजकीय तपस्या देखील कमी महत्त्वाची नाही.

१९४२ चे काळात भूमिगत राहून युक्तप्रांतात त्यांनी केलेली जपवृत्ती कोणीही विसरणे शक्य नाही. अशा स्थितीत बाबा राघवदासांचे विरुद्ध कोणीही उभा राहिला असता तर निवडणुकीत तो यशस्वी झाला नसता हेही उघड आहे. उलट आचार्य नरेंद्र देवांना केवळ १३०० मतेंच कमी पडली हे आचार्यजींच्या वैयक्तिक लोकप्रियतेचे द्योतक आहे. आचार्य नरेंद्र देवांच्या विरुद्ध सामना देण्यास काँग्रेसला बाबा राघवदास यांच्यासारखा मोहरा निवडणुकीचे हौद्यात उतरावा लागला यावरूनही हेच सिद्ध होते.

तात्पर्य, युक्तप्रांतात झालेल्या निवडणुकी ह्या पक्षशक्तीच्या द्योतक नसून वैयक्तिक बलाबलाच्या द्योतक आहेत, आणि त्यात काँग्रेस पक्ष विजयी झाला याचे कारण काँग्रेसची समाजविरोधी लढे करून झालेली पुण्याई. या निवडणुकीपासून काँग्रेसने घ्यावयाचा बोध हाच की जुन्या पुण्याईवर जगण्यापेक्षा नवीन पुण्याई उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. समाजवादी पक्षाने घ्यावयाचा बोध हा की वायफळ बडबड करण्यापेक्षा संघटनात्मक शक्ती वाढविली पाहिजे.

१२

माणुसकी नांदविण्याकरिता

१९-९-१९४८

शुक्रवार ता. १७ ला सायंकाळी ५ वाजता निझामाने शरण आल्याची घोषणा केली. रझाकार संघटन बेकायदेशीर ठरविण्यात आले. रामानंदतीर्थप्रभृतींची सुटका झाली. लायकअलीचे लायक मंत्रिमंडळ बरखास्त झाले. निझामाने सर्व सत्ता आपल्याकडे घेतली. निझामचे युवराज हिंद सेनेला सामोरे गेले आणि हिंदशी नवे नाते जोडण्याची निझामाकडून उत्सुकता दाखविली गेली.

हा विजयदिन देशात स्वखुशीने साजरा होत आहे. ठिकठिकाणी रोषणाई होत आहे. हिंदू आणि मुसलमान सारख्याच उत्साहाने हा विजयोत्सव करीत आहेत. एका रीतीने पाहिले तर आमच्या स्वातंत्र्योत्सवापेक्षा सुद्धा आमच्या या विजयोत्सवाचे महत्त्व अधिक आहे. एक तर हा विजयोत्सव आमच्या पराक्रमाचे प्रतीक आहे, दुसरे हा विजय केवळ आमचा विजय नसून प्रतिगामी शक्तींवर पुरोगामी शक्तींनी मिळविलेला विजय आहे आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे अनाथांच्या रक्षणाकरिता आम्ही आणि आमचे सरकार सदैव तत्पर आहोत याचे हे निदर्शक आहे. आम्ही हैदराबादेत घुसलो ते कोणत्याही साम्राज्यपिपासेने नव्हे याचे हे गमक आहे आणि जेथे जेथे अन्याय असेल तेथे तेथे न्यायरक्षणाकरिता आम्ही धावून जाऊ याचे ते द्योतक आहे.

स्वतंत्र असणे म्हणजे काय चीज आहे ही गोष्ट आम्हास पटली आहे. आमचे राष्ट्रपिता गांधीजी यांनी ती आम्हांस शिकविली आहे. त्यामुळे आम्ही दुसऱ्याचे शोषण करणार नाही. दुसऱ्याच्य शोषणाकरिता नव्हे तर शोषणापासून दलितांचे, अनाथांचे

रक्षण करण्याकरिता आम्ही हैदराबादेत शिरलो होतो. आज शस्त्र खाली ठेवून आणि शरणागती स्वीकारून निझामाने पर्यायाने आमच्या तत्त्वास मान्यता दिली आहे. निझामाने हे कबूल केले आहे की, देशावर सार्वभौम अधिकार हा जनतेचा असतो. 'बळी तो कान पिळी' या न्यायाने कोणी काही दिवस काही लोकांना गुलाम करून ठेवले, माणुसकीची चिता पेटविली तरी पेटलेली चिता शेवटी चिता पेटविणाऱ्यालाच भस्मसात करते. हेच हैदराबादच्या शरणागतीने सिद्ध झाले आहे. जनतेचा रोष, असंतोष हेच सर्वांत मोठे शस्त्र आहे हे हैदराबादच्या शरणागतीने पुनः एकदा सिद्ध झाले आहे. आमचा आणि निझामाचा लढा फक्त एकाच मुद्द्यावर होता. संस्थानावर सार्वभौम सत्ता कोणाची? प्रजेची की राजाची? राजा हा प्रजेचा सेवक हे अनादी तत्त्व निझामाकडून धाब्यावर बसविले गेले. बळी तो कान पिळी हा न्याय अंमलात आणून आणि कासिम रझवीसारख्या मानवताद्रोही नादान माणसास डोक्यावर बसवून निझामाने जनतेची उपेक्षा चालविली. निसर्गनिर्मित कायदा गुंडाळून ठेवून मनुष्याने स्वार्थाकरिता निर्माण केलेल्या मालकी हक्काच्या कायद्याचा निझाम आसरा घेऊ लागला. लोकांना लुबाडून बळकाविलेल्या भूप्रदेशावर निझाम आपली मालकी सांगू लागला आणि निझामला हा अधिकार नाही हे सांगणाऱ्यांना दंडुकेशाहीच्या भरवशावर शासन करण्यात आले.

पण आता हे प्रकरण संपले आहे. निझामाची बुद्धी ठिकाणावर आली. निझामाला आपली चूक कळून आली. निझामाचा डोलारा हा प्रजेच्या भरवंशावर आहे ही गोष्ट कळताच निझामाने शरणागती स्वीकारली. आमच्या फौजा शूर खऱ्या पण लोकमत आमच्या बाजूला नसते तर आमच्या फौजा चार दिवसांत हैदराबादवर धडक मारू शकल्या नसत्या. या दृष्टीने विचार केला म्हणजे हैदराबादचा विजय हा जसा हिंदी फौजेचा विजय आहे, तसा तो हैदराबादी जनतेचाही खराखुरा विजय आहे.

हिंदी शिपायांनो, तुम्ही आपली शर्थ केली. अन्यायाचे परिमार्जन करण्याकरिता तुम्ही काय करू शकता हे तुम्ही आज सिद्ध केले. आजच्या आनंदाचा दिवस हा सर्वस्वी तुमच्यामुळेच उगवला. या प्रसंगी आम्हाला तुमचे अभिनंदन करू द्या.

शेवटी, स्वतंत्र भारताला मिळालेले हे पहिले यश. आजचा हा आनंदाचा सोहळा आपण सारेच साजरा करू या! देशात सर्वत्र आनंदी आनंद होऊ द्या आणि हा आनंदोत्सव करीत असतानाच माणुसकी नांदविण्याच्या पवित्र कार्यासाठीच हा विजय आपणास मिळाला हे ध्यानात असू द्या. जयहिंद

१३

हैदराबाद प्रकरणाचे समालोचन

(ऑल इंडिया रेडिओ नागपूरच्या कृपेने)

२६-९-४८

शुक्रवार ता. १७ ला सायंकाळी ५ वाजता निझामाने शरण आल्याची घोषणा केली. रझाकार संघटन बेकायदेशीर ठरविण्यात आले. रामानंदतीर्थप्रभृतींची सुटका झाली. युनोकडे निझामाने केलेली तक्रार परत घेण्यात आली. लायकअलीचे मंत्रिमंडळ बरखास्त झाले. निझामाने सर्व सत्ता आपलेकडे घेतली. निझामचे युवराज हिंद सेनेला सामोरे गेले. हिंदशी नवे नाते जोडण्याची निझामाकडून उत्सुकता दाखविली गेली, आणि विजयी हिंद सेनेने सिकंदराबादेत प्रवेश केला. अशा प्रसंगी हैदराबाद प्रकरणात घडलेल्या अनेक घटनांचे समालोचन करणे इष्टच ठरेल. १३ तारखेस पोलिस कारवाई करण्याकरिता म्हणून जरी आमच्या फौजा हैदराबादेत शिरल्या तरी ज्या कारणास्तव आम्हास हैदराबाद-विरुद्ध पोलिस कारवाई करण्याचा निश्चय करावा लागला ते निझामाचे राजकारण आज अनेक दिवस शिजत होते, आणि याच राजकारणास दिलेले उत्तर म्हणजे हिंदुस्थान सरकारने हैदराबादविरुद्ध केलेली पोलिस कारवाई होय.

१५ ऑगस्ट १९४७ ला आमचा देश आमच्या ताब्यात देण्याचा संकल्प ब्रिटिशांनी केल्यापासून निझामाच्या महत्त्वाकांक्षेस अंकुर फुटू लागले होते. इतर कोणत्याही गोष्टीचा आधार नसता धर्मवेडाने लोकांना बहकवून राज्य निर्माण करता येते ही गोष्ट पाकिस्तान निर्माण होऊ घातल्यामुळे १५ ऑगस्टच्या पूर्वीच जाहीर झाली होती. १५ ऑगस्टला ब्रिटिश आमच्या देशातून गेले, पण ते आमच्या देशाची हजारो शकले करूनच. पाकिस्तानचा एक तुकडा, हिंद युनियनचा दुसरा आणि संस्थानांचे शेकडो. ब्रिटिश

हिंदुस्थानातून गेले आणि प्रत्येकांना स्वतंत्र करून गेले. स्वतंत्र करून गेले म्हणण्यापेक्षा अतंत्र करून गेले. हिंद युनियन स्वतंत्र झाले. लहानमोठे संस्थानिक स्वतंत्र झाले. हिंद युनियन स्वतंत्र झाले त्यात प्रजेच्या कर्तृत्वाचा हिस्सा फार मोठा होता. संस्थानिक स्वतंत्र झाले ते ब्रिटिशांच्या कृपेने झाले. पण हा फरक करण्याइतकी बुद्धी संस्थानिकांत नव्हती. त्यांच्यापैकी अनेकांना वाटू लागले की आपला आणि हिंद सरकारचा दर्जा एकच. या युगात देशावर आणि भूखंडावर प्रजेचीच सार्वभौम सत्ता असते ह्याची संस्थानिकांना कल्पनाही नव्हती. पुढे ओरिसा संस्थानात बंड झाले व नंतर सरदारांच्या भीतीमुळे एक एक संस्थान धडाधड कोलमडून पडू लागले, पण हैदराबाद संस्थानाने आपला ताठा तसाच ठेवण्याचा प्रयत्न केला. निझामाला खलिफा होण्याची स्वप्ने दिसू लागली. निझामाचे सल्लागार आपल्या संस्थानाच्या मर्यादा वाढविण्याचा सल्ला देऊ लागले. पोर्तुगीजांशी वाटाघाटी सुरू झाल्या. मच्छलीपट्टण, विजयापट्टण, उत्तर सरकार आणि वऱ्हाड हे प्रांत आपले म्हणून निझाम त्याच्यावर अधिकार दाखवू लागला. झाकली मूठ सव्वा-लाखाची असते. निझाम साऱ्या दुनियेत श्रीमंत. त्याचे संस्थान सर्वांत मोठे. निझामाच्या अधिकाऱ्यांनी जनतेवर केलेले जुलूम आजपर्यंत पचले. निझामच्या सल्लागारांना वाटले बेडूक फुगला की त्याचा बैल होतो. निझामाचे अस्तित्वच ब्रिटिशांच्या पाठबळावर होते ही गोष्ट निझामाचे अधिकारी साफ विसरले. निझामाच्या जुन्या शहाण्या सल्लागारांनी निझामाला हिंदशी मैत्री ठेवण्याचा सल्ला अनेकदा दिला. पण जवळच्या सल्लागारांनी त्याला निरनिराळी आमिषे दाखविली होती. मुजोरीच्या जोरावर काय करता येते हे निझामाचे अधिकारी हिटलरपासून शिकले होते. पण मुजोरीपायीच हिटलरचा अंत झाला ही गोष्ट मात्र ते विसरले. वऱ्हाड घशात घालण्याचे त्यांचे राजकारण तडीस गेले नाही, ते जाणार नव्हतेच. मच्छलीपट्टण आणि गोवा घेऊन हिंदुस्थानची दोन शकले करण्याचे स्वप्नही प्रत्यक्षात उतरायचे नव्हते. गोवा विकत घेण्याचा प्रयत्न फसला. समुद्रकिनारा मिळविण्याचाही प्रयत्न फसला. पण हिंदुस्थानशी मैत्री करणे आवश्यक आहे ही कल्पना निझामाच्या मनालाही शिवली नाही. कारण त्याचा बोलविता धनी रझाकारी गुंडांचा प्रमुख इत्तहादुल मुसलमीनचा अध्यक्ष कासीम रझवी हा होता. ब्रिटिशांच्या हिंदुस्थानात मुस्लिम लीगने जे केले आणि साधले ते कासिम रझवी इत्ते-हादच्या भरवंशावर हैदराबादेत करू चाहत होता. कासिम रझवीच्या मनात दक्षिणेत मुसलमानांचे स्थान निर्माण करण्याची महत्त्वाकांक्षा होती आणि निझामाच्या मनात आसफजहांची राजवट सुरू करण्याची आकांक्षा होती. हिंदुस्थान सरकारने हैदराबादशी इतके मिळते धोरण स्वीकारले की त्याबद्दल हिंदी जनतेने पुढाऱ्यांस नावे ठेवण्यास कमी केले नाही. पण तरीही हैदराबादची व कासिम रझवीची मग्रूरी तशीच कायम राहिली. सिकंदराबादहून सैन्य काढून घेण्याचे आम्ही कबूल केले. पण सैन्य काढताच रझाकारांच्या

उपेक्षा चालविली. नैतिक कायदा गुंडाळून ठेवून मनुष्याने स्वार्थाकरिता निर्माण केलेल्या मालकी हक्काच्या कायद्याचा निझाम आसरा घेऊ लागला. लोकांना लुबाडून बळकाविलेल्या भूप्रदेशावर निझाम आपली मालकी सांगू लागला, आणि निझामाला हा अधिकार नाही हे सांगणाऱ्यांना दंडुकेशाहीच्या भरवंशावर शासन करण्यात आले.

पण आता हे प्रकरण संपले आहे. निझामाची बुद्धी ठिकाणावर आली. निझामाला आपली चूक कळून आली. निझामाचा डोलारा हा प्रजेच्या भरवंशावर आहे ही गोष्ट कळताच निझामाने शरणागती स्वीकारली. आमच्या फौजा शूर खऱ्या पण लोकमत आमच्या बाजूला नसते तर आमच्या फौजा चार दिवसांत हैदराबादवर धडक मारू शकल्या नसत्या. या दृष्टीने विचार केला म्हणजे हैदराबादचा विजय हा जसा हिंदी फौजेचा विजय आहे, तसा तो हैदराबादी जनतेचाही खराखुरा विजय आहे.

हैदराबादवरील पोलिस कारवाई आणि तिची निझामच्या शरणागतीत झालेली परिणती यावरून आणखीही काही गोष्टी आपोआप सिद्ध होतात. हैदराबादसारखेच काश्मीरचेही प्रकरण गेल्या वर्षापासून उपस्थित झाले आहे. काश्मीर हिंदुस्थानात आले पाहिजे असा हट्ट आम्ही कधीच धरला नव्हता. ज्याप्रमाणे हैदराबादमध्ये प्रजेची सार्वभौम सत्ता असावी असे आम्ही म्हणत होतो त्याप्रमाणे काश्मीरचेही भवितव्य काश्मीरी जनतेनेच ठरवावे, असा आमचा आग्रह होता व आहे. पंडित नेहरू यांनी काश्मीरमध्ये सार्वमत घेण्यात येईल असे अनेकदा जाहीर केले. पुष्कळदा हैदराबादच्या विरोधात काश्मीरचा प्रश्न हा विकृत स्वरूपात मांडण्यात येतो. पुष्कळदा असे दाखवण्यात येते की, काश्मीरमध्ये बहुसंख्य प्रजा मुसलमान तर तेथील राजा हिंदू उलट हैदराबादमध्ये बहुसंख्य प्रजा हिंदू तर राजा मुसलमान. जर हैदराबाद हे हिंदुस्थानात आले पाहिजे तर काश्मीर पाकिस्तानात का जाऊ नये ? पण हे तर्कशास्त्र कसे चुकीचे आहे हे पाहा. हैदराबाद हा हिंदुस्थानचा भाग आहे खरा पण हैदराबादला हिंदुस्थानात जबरदस्तीने घेण्यात यावे असे आम्ही कधीच म्हटले नाही. हिंदुस्थानात सामील व्हावयाचे की नाही हे हैदराबादी प्रजेने ठरवावयाचे, काश्मीरनेही हिंदुस्थानात सामील व्हावे असा आमचा आग्रह नाही; काश्मीरी प्रजेने ते ठरवायचे आहे. अमुक भाग बहुसंख्य हिंदू म्हणून हिंदुस्थानात आणि तमुक भाग बहुसंख्य मुसलमान म्हणून पाकिस्तानात हे तर्कशास्त्र चुकीचे आहे. याच दुष्ट तर्कशास्त्राचा आश्रय घेऊन शांततापिय काश्मीरी लोकांवर टोळीवाल्यांना स्वारी करण्यास पाकिस्तानकडून फूस देण्यात आली आणि शेवटी टोळीवाल्यांकडून डाळ शिजत नाही असे दिसताच स्वतःचे सैन्यही काश्मीरात घुसविण्यात आले. हिंदुस्थानला हिंदू राज्य म्हणण्याचा पाकिस्तानचा आग्रह असतो. पण आमची शासनसंस्था ही जातिधर्मनिरपेक्ष आहे. आम्ही जातिधर्मनिरपेक्ष आहोत हे सिद्ध करण्याकरिता हैदराबाद विरुद्ध पोलिस कारवाई केल्यापासून ठिकठिकाणच्या हिंदु-मुसलमानानांनी आमच्या सरकारचे

आणि फौजेचे जे अभिनंदन केले तेही हेच दाखवीत नाही काय ? हैदराबादेत धर्माचे खूळ माजविणारे अधिकारी व आमचे जातिधर्मनिरपेक्षतेचे तत्त्व ह्यांच्यात झगडा होता. कन्हय्यालाल मुनशींच्या शब्दात सांगावयाचे म्हणजे त्यात शेवटी आमचे जातिधर्म-निरपेक्षतेचे तत्त्व यशस्वी झाले. याच तत्त्वाशी काश्मीरमध्ये पाकिस्तानी लोकांनी दावा मांडला आहे. त्यातही आम्हीच यशस्वी होऊ यातही आता शंका घेण्याचे कारण नाही.

हा विजयदिन देशात स्वखुशीने साजरा होत आहे. ठिकठिकाणी रोषणाई होत आहे. हिंदू आणि मुसलमान सारख्याच उत्साहाने हा विजयोत्सव करीत आहेत. एका रीतीने पाहिले तर आमच्या स्वातंत्र्योत्सवापेक्षा सुद्धा आमच्या या विजयोत्सवाचे महत्त्व अधिक आहे. एक तर हा विजयोत्सव आमच्या पराक्रमाचे प्रतीक आहे, दुसरे हा विजय केवळ आमचा विजय नसून प्रतिगामी शक्तीवर पुरोगामी शक्तींनी मिळविलेला विजय आहे. आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे अनाथांच्या रक्षणाकरिता आम्ही आणि आमचे सरकार सदैव तत्पर आहो याचे हे निदर्शक आहे. आम्ही हैदराबादेत घुसलो ते कोणत्याही साम्राज्यपिपासेने नव्हे याचे हे गमक आहे, आणि जेथे जेथे अन्याय असेल तेथे तेथे न्यायरक्षणाकरिता आम्ही धावून जाऊ याचे ते द्योतक आहे.

चला ! स्वतंत्र भारताला मिळालेला विजय आपण सारे साजरा करू या ! आमच्या फौजांनी गाजविलेल्या पराक्रमाबद्दल त्यांचे अभिनंदन करू या ! आमच्या सरकारने मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचेही अभिनंदन करू या ! चला ! आपण सारेच या आनंदोत्सवात सहभागी होऊ ! आणि हा विजय आपणास मानवतेच्या रक्षणाकरिता मिळाला आहे हे सदैव आपल्या मनःपटलावर कोरून ठेवू.

माकडचेष्टांना ऊत आला. दररोज हजारो रझाकारांच्या अत्याचारांच्या बातम्या कानावर येऊ लागल्या, हजारो लोक मारले जाऊ लागले. मारलेल्या लोकांची रक्ताने माखलेली शिरे निरपराधी जनतेला भिवविण्यासाठी उपयोगात येऊ लागली. बायकांची अब्रू जाऊ लागली. जबरदस्तीने लोक बाटविले जाऊ लागले. ह्या लोकशाहीच्या काळात एक कोटी ऐशी लक्ष लोकांवर शेकडा सतरा मुसलमान राज्य करू लागले. हैदराबादी प्रजेच्या मागण्या टाचेखाली तुडविल्या गेल्या. रामानंदतीर्थांसारखे प्रजेचे पुढारी तुरुंगात डांबले गेले. स्टेट काँग्रेसचे कित्येक लोक शहीद झाले व रेड्डीसारखे मानासाठी व पैशासाठी हपापलेले लोक कासिम रझवीच्या सुरात सूर मिसळू लागले. हिंदुस्थान सरकारला ह्याची जाणीव होती. हिंदुस्थानच्या हृदयभागी असणाऱ्या हैदराबादेत अव्यवस्था नांदावी हे हिताचे नव्हते. हैदराबाद संस्थानात पेटलेली माणुसकीची चिता कोणत्याही समंजस माणसास पाहवत नव्हती. पण हैदराबादेस रझाकारांचे राज्य सुरू होते व कासिम रझवीचे लोक गंजलेल्या बंदुका खांद्यावर घेऊन स्वतःला धन्य मानीत होते. कित्येक सामील-नाम्याचे नमुने झाले आणि गेले. मिर्झा इस्माईलसारख्यांचा सल्लासुद्धा धुडकाविला गेला. हिंदुस्थानने सर्व अपमान गिळला. पण त्यामुळे कासिम रझवीने आपल्या ताकतीची अवास्तव कल्पना करून घेतली व हिंदुस्थानच्या शक्तीला तुच्छ लेखले. आता रझा-कारांचे हल्ले हिंदी प्रदेशावर होऊ लागले व सर्वसाधारण हिंदी प्रजेच्या जीवितास धोका उत्पन्न झाला. हिंद सरकारने आर्थिक कोंडी करून पाहिली पण युद्धासाठी निझामाचे हात मुसमुसत होते. सिडने कॉटनसारख्यास वेठीला धरून परदेशातून चोरून शस्त्रसामग्री आणण्याचे कारस्थानही, हैदराबादी अधिकाऱ्यांनी करून पाहिले. लढाईच्या प्रसंगी पाकिस्तानचा व मुस्लिम जगाचा पाठिंबा मिळेल, एडनसारखे उलटया काळजाचे लोक आपल्या मदतीस धावून येतील अशा भ्रमात हैदराबादचे सत्ताधीश होते व हाच त्यांचा भ्रम दूर करण्यास हिंदुस्थानला पुलिस कारवाई करणे भाग पडले. १३ सप्टेंबरला आमच्या फौजा हैदराबाद संस्थानात शिरल्या आणि केवळ ४ दिवसांच्या आत हैदरा-बादचा बंगला कोसळून पडला. नऊ ठिकाणाहून आमचे सैन्य आत घुसले व ४ दिवसांच्या कालावधीत हैदराबादच्या वेशीवर त्यांनी धडक मारली. तुंगभद्रा, कर्नूल, उस्मानाबाद, तुळजापूर, जालना, औरंगाबाद, राजसूर, बिदर, कल्याणी, लातूर, जहिरा-बाद, हिंगोली, शिरपूर, सूर्यपेट, कामामेट, दौलताबाद व नारकेटपल्ली, इत्यादी शहरांना मागे टाकून, ज्या वेळी आमच्या फौजा विद्युत्वेगाने पुढे चालल्या त्या वेळी निझामाच्या तोंडचे पाणी पळाले. मांडचोळणा घालून व गंजलेल्या बंदुका खांद्यावर घेऊन रस्त्यातून जुलूस काढले व गरीब नागरिकांना छळले म्हणजे एखाद्या संस्थानाचे रक्षण करण्याची शक्ती अंगी येते ही कल्पना दूर झाली. पाकिस्तानला विनवून पाहिले पण तो युद्धात पडला नाही. त्यामुळे तोही दुवा निखळला. इंग्लंडमधील टोरीपक्ष हा शेवटचा आसरा,

पण एडनला परभारेच थप्पड मिळाली. युनोमध्येही जाण्याचा प्रयोग करून पाहिला आणि शेवटी निझामाची धुंदी उतरली.

हिंदशी मैत्री ठेवण्यातच जास्त शहाणपणा आहे हे निझाम सरकारला कळून चुकले व त्याने शरणागतीचा पदर पसरला. जुने मंत्रिमंडळ बरखास्त झाले. तुरुंगात डांबलेल्या पुढाऱ्यांची सुटका झाली. रझाकार संघटना बेकायदा करण्यात आली. हिंद सेनेचे स्वागत करण्यास निझामाचे युवराज सामोरे गेले. जनतेच्या मनाचे समाधान झाले. आमच्या मनगटाचा जोर दिसला. सत्याचा विजय झाला. पंडित नेहरूंनी सांगितल्याप्रमाणे साम्राज्यशाही हेतू धरून आमची सेना निझामीत कधीच शिरली नव्हती. वायुवेगाने प्रदेश काबीज करणे हाही आमचा हेतू नव्हता. पंडित नेहरूंनी सांगितले होते की स्वच्छ आणि शुद्ध अंतःकरणाने (with a clean conscience) आम्ही हैदराबादच्या प्रश्नाचा विचार करू. हा शुद्ध विचार म्हणजे हैदराबादच्या प्रजेचे हैदराबादवरील स्वामित्व कबूल करणे, हैदराबादमध्ये माणुसकी नांदविणे, माणुसकीची चिता विझविणे. ज्या रीतीने ह्या गोष्टीचा शेवट झाला त्यावरून आमच्या शुद्ध अंतःकरणाची प्रतीती अखेर निझामालाही आली हे सिद्ध होत नाही काय? हैदराबाद हा हिंदुस्थानचा निःसंशय भाग आहे. हैदराबादी प्रजेस गुलाम करण्यास आम्ही गेलो नव्हतो. हैदराबादसंबंधी पूर्ण विचार करण्याचा अधिकार हैदराबादी प्रजेला आहे. तिने हिंदमध्ये सामील होण्याचे ठरविले तर आम्ही तिचे स्वागत करू अगर न ठरविले तरी हैदराबादी प्रजेशी आमचे मैत्रीचे संबंध राहतील असे आश्वासन देऊ हेच पं. नेहरूंच्या विधानामधील मर्म आहे.

स्वतंत्र असणे म्हणजे काय चीज आहे ही गोष्ट आम्हास समजली आहे. आमचे राष्ट्रपिता गांधीजी यांनी ती आम्हास शिकविली आहे. त्यामुळे आम्ही दुसऱ्याचे शोषण करणार नाही. दुसऱ्याच्या शोषणाकरिता नव्हे तर शोषणापासून दलितांचे, अनाथांचे रक्षण करण्याकरिता आम्ही हैदराबादेत शिरलो होतो. आज शस्त्र खाली ठेवून आणि शरणागती स्वीकारून निझामाने पर्यायाने आमच्या तत्त्वास मान्यता दिली आहे. निझामाने हे कबूल केले आहे की देशावर सार्वभौम अधिकार हा जनतेचा असतो. 'बळी तो कान पिळी' या न्यायाने कोणी काही दिवस काही लोकांना गुलाम करून ठेवले, माणुसकीची चिता पेटविली तरी ही पेटलेली चिता शेवटी चिता पेटविणाऱ्यालाच भस्मसात करते. हेच हैदराबादच्या शरणागतीने सिद्ध झाले आहे. जनतेचा रोष, असंतोष हेच सर्वांत मोठे शस्त्र आहे हे हैदराबादच्या शरणागतीने पुनः एकदा सिद्ध झाले आहे. आमचा निझामाच्या विरुद्ध एकाच मुद्द्यावर आक्षेप होता. संस्थानावर सार्वभौम सत्ता कोणाची? प्रजेची की राजाची? राजा हा प्रजेचा सेवक असतो हे अनादी तत्त्व निझामाकडून धाब्यावर बसविले गेले. बळी तो कान पिळी हा न्याय अंमलात आणून आणि कासिम रझवीसारख्या मानवताद्रोही माणसास डोक्यावर बसवून निझामाने जनतेची

१४

९ ऑगस्ट

९-८-१९४८

आज आपण स्वतंत्र झालो आहो पण केवळ एक वर्षापूर्वी आपण परतंत्र होतो. पारतंत्र्याचे पाश तोडण्याकरिता आपणास अनेक आंदोलने करावी लागली आहेत. ही आंदोलने जरी हळूहळू इतिहासजमा होऊ लागली असली, आणि भावी पिढीच्या लोकांना ही आंदोलने करिताना मागील पिढीच्या लोकांना काय कष्ट सहन करावे लागले याची कल्पनाही येणे कठीण असले, तरी या आंदोलनाच्या क्रांतिकारी काळातून गेलेले लोक जेव्हा या गतकालाचे सिंहावलोकन करू लागतात तेव्हा आजही त्यांचे बाहू स्फुरण पावल्यावाचून राहात नाहीत. परंतु या सर्व गतकालातदेखील ४२ ते ४७ चा पाच-सहा वर्षांचा काळ हा अनेक अद्‌भुत घटनांनी खचून भरलेला आहे. या क्रांतिमय काळात जे राहिले, अनेक कठीण परिस्थितीशी जे झगडले, अनेक रोमांचकारी घटनांचा ज्यांनी अनुभव घेतला, आणि शेवटी आपल्या पराकाष्ठेच्या प्रयत्नांनी ज्यांनी स्वराज्य संपादन केले ते खरोखर धन्य होत! मग ते लहान असोत की थोर असोत. हा पाच वर्षांचा अल्प काळ इतका अद्‌भुत आहे की जे लोक या काळात राहिले त्यांचे जीवन सफल झाले. अनंत काळानंतरदेखील भावी पिढीतील लोक या काळात जीवन जगलेल्या लोकांकडे भक्तीने व आदराने पाहतील आणि या काळातील स्मृती आपले राष्ट्र बलशाली आणि संपन्न करण्याकरिता न्याय व शांतीच्या भक्कम पायावर त्याची उभारणी करण्याकरिता त्यांना हमेशाकरिता स्फूर्ती देईल.

आपण १५ ऑगस्ट १९४७ ला स्वतंत्र झालो. पण स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ ९ ऑगस्ट

१९४२ लाच रोवली गेली. आमच्या स्वातंत्र्याचा सिंहनाद आमच्या हृदयातून, सामान्य नागरिकांच्या हृदयातून उफाळून वर आला तो याच दिवशी. आमचे नेतृवर्य आमच्या जुन्या सरकारने बंदीवान केले. आम्हाला कोणी नेता राहिला नाही. पण आमच्या हृदयातला परमेश्वर जागा झाला, देशातील प्रत्येक माणसाच्या हृदयात जागा झाला आणि या जनताजनार्दनाने ब्रिटिशांचे आसन खिळखिळे करून टाकले. आज आपण ब्रिटिशांच्या कृपेने स्वतंत्र झालो असा देखावा जरी दिसत असला तरी दोन बलशाली इसमांमध्येच सलोखा होऊ शकतो हे विसरून चालणार नाही. आमच्यातील चैतन्य ब्रिटिशांना दिसले नसते तर आमच्याशी वाटाघाटी करावयाससुद्धा ब्रिटिश लोक तयार झाले नसते हेही न सांगता कळण्यासारखे आहे.

उलट हे वाटाघाटीचे स्वराज्य आम्हांस मिळाले नसते तरीदेखील आमच्या पराक्रमाने आम्ही आतापर्यंत निश्चित स्वराज्य मिळविले असते आणि आमच्या माजी राज्यकर्त्यांना अरबी समुद्राच्या पार केले असते यातही शंका नाही. नव्हे, आमच्या पराक्रमाने आम्ही स्वराज्य मिळविले असते तर आज ज्या अनेक अडचणी आमच्या मार्गात उभ्या आहेत त्या आम्ही केव्हाच निस्तरल्या असत्या. एक तर स्वराज्यसंपादनाच्या शेवटच्या क्षणी वाटाघाटी झाल्यामुळे आमच्या त्यागावर थोडेसे तरी पाणी फिरले, आणि इंग्रजांच्या कृपेने आम्हास स्वराज्य मिळाले, असा देखावा दिसू लागला. दुसरे पाकिस्तानचे भूत आमच्या मानगुटीवर बसले आणि आमच्या हृदयातला निझामाचा काटा आम्हांस अद्याप बाहेर काढता आला नाही. अर्थात हा निझामाचा काटा काढताना आम्हांस तो थोडासा सलेल हे जरी खरे असले तरी तो काढून फेकण्यास आम्हास वेळ लागणार नाही. परंतु मुजोर पाकिस्तानचे भूत मात्र आमच्या मानगुटीवर हमेशाकरिताच बसले आहे ते मात्र निघणार नाही आणि उलट पाकिस्तान आणि हिंदी संघराज्य यांमध्ये अनेक लढाया छेडल्याचेही दृश्य भविष्यकाळात दिसले तर त्याचेही आश्चर्य मानावयाचे कारण नाही. आपसात रक्ताचे पाट वाहू नयेत म्हणून आम्ही 'भीक नको पण कुत्रे आवर' या म्हणीप्रमाणे मुसलमानांना त्यांचे 'पाकिस्तान' देऊन टाकले, पण ज्या गोष्टी टाळण्याकरिता म्हणून आम्ही आमच्या एका देशाचे दोन देश केले, त्या गोष्टी अखेर घडल्याच. आमच्या अनेक निरपराधी बंधूंच्या रक्ताच्या नद्या तर वाहिल्याच, पण आज लक्षावधी निर्वासितांची व्यवस्था करण्याचं मात्र आमच्या नशिबी आले आहे.

तसेच वाटाघाटीने स्वराज्य मिळाल्यामुळे ज्यांनी हे स्वराज्य मिळविण्याकरिता ज्यांनी आपल्या हाडाची काडे केली ते त्यागी पुरुष आणि ज्यांनी १४ ऑगस्टपर्यंत केवळ देशद्रोह केला, खाजगी आयुष्यातदेखील ज्यांनी १४ ऑगस्टच्या मध्यरात्रीपर्यंत मनःपूर्वक युनियन जॅकची सेवा केली ते सर्व एका पातळीवर आले. स्वराज्य मिळाल्यानंतर मिळालेल्या लुटीत ही जुन्या राजवटीत पुष्ट झालेली गिधाडे सगळ्यात मोठा हिस्सा मागू लागली

आणि तो त्यांना मिळालाही. कारण राज्यशकट चालविण्याचे ज्ञान म्हणे त्यांच्या पाचवीला पुजले होते आणि चळवळ्या लोकांना (त्यांमधील वरचे १०-५ लोक सोडून दिले तर) राज्य चालवण्याची किमया साध्य झाली नव्हती. यामुळे जुन्याच आय्. सी. एस्. लोकांच्या ताब्यात राज्यकारभार आला, आणि क्रांतीनंतर ज्याप्रमाणे जुन्या खोडांची उचलबांगडी आपणास करता आली असती ती करता आली नाही. वास्तविक ज्याप्रमाणे चळवळ्या लोकांना केवळ 'असंतोषा'शिवाय कशाचेही ज्ञान नव्हते हे म्हणणे जसे थोडेफार खरे आहे त्याप्रमाणेच या नोकरशाहीतील जुन्या खोडांना नवयुगाची जाणीव उत्पन्न होणे शक्य नाही. जनतेशी समरस होणे त्यांना माहीत नाही आणि स्वतःच्या स्वार्थाशिवाय त्यांना काही दिसत नाही हेही खरे आहे. अशा लोकांच्या हाती राज्यकारभार आल्यामुळे शासनयंत्रणा ठरावीक साच्यातून जाऊ लागली व त्याचाच परिणाम म्हणून स्वातंत्र्यामुळे आमच्या एकंदर जीवनात काय फरक झाला असा प्रश्न सामान्य जनता विचारू लागली.

याचा आणखीही एक परिणाम घडला. स्वराज्याचे ताट वाढून येताच आमच्यापैकी बरेच लोक ह्या अमिषांना बळी पडू लागले. वाहत्या गंगेत हात धुऊन घेण्याची सर्वांनाच इच्छा झाली आणि आजपर्यंत घालविलेल्या त्यागाच्या आयुष्याचं भांडवल करून अनेक लोक त्यावर व्यापार करू लागले.

थोडक्यात या वाटाघाटींचा परिणाम म्हणजे खऱ्या नाण्याचे मोल जाऊन खोट्या नाण्यांना मोल आले. आज अधिकारावर असलेल्या लोकांची स्तुती हा युगधर्म झाला. आणि अनीतीला (Corruption)- मग ती आर्थिक असो की बौद्धिक असो– ऊत आला. शिंगे मोडून वासरात येऊन किंवा अमृताकरिता राहूप्रमाणे कपटाने देवसभेत प्रवेश मिळवून किंवा काँग्रेसश्रेष्ठींची खुशामत करून एखाद्या प्रांताचे गव्हर्नर होताच एखाद्याच्या मागील पापाकडे दुर्लक्ष होऊ लागले आणि ४२ साली किंवा तत्पूर्वी किंवा त्यानंतर केलेल्या वक्तव्याला डोळ्याआड करण्यात येऊन प्रत्येक स्वातंत्र्यसंग्रामात आघाडीवर लढलेला वीर म्हणून या पळपुट्या लोकांचा गौरव करण्यात येऊ लागला.

हे सर्व वाटाघाटीच्या स्वराज्याचे फळ होय. पण हे सर्व प्रकार घडले म्हणून आपणास मिळालेले स्वराज्य विलोभनीय नाही असे आम्हास मुळीच म्हणावयाचे नाही. उलट आमच्या स्वराज्याची इमारत भक्कम पायावर उभारली जावी म्हणूनच या दोषांचे निदर्शन केले. आम्हाला मिळालेले स्वराज्य हे विलोभनीय खासच आहे आणि या स्वराज्याची सिद्धी १५ ऑगस्ट २९४७ ला जरी झाली असली तरी या स्वराज्याचे तोरण आजच्या दिवशी म्हणजे ९ ऑगस्ट १९४२ रोजी बांधले गेले आहे हे विसरून चालणार नाही.

अशा या पुण्य दिवसाचे स्मरण करून आपण आपला पुढील पथ आखू या व आतापर्यंत घडलेले दोष टाळून आमचे स्वराज्य हे खरे किसान कामगार प्रजाराज्य होईल, असा प्रयत्न करू या.

१५

'WE MARCH'

१२-९-१९४८

निझामाची मृत्युघंटा वाजू लागली. बुडत्याचे पाय डोहाकडे अशी म्हण आहे. सुईच्या अग्राएवढी जमीन पांडवांना द्यावयास तयार नसलेल्या कौरवांचा शेवटी संपूर्ण निःपात झाला. निझामालाही स्वतःचा नाश करून घेण्याची दुर्बुद्धी आठवली. मराठ्यांनी करून ठेवलेली चूक निस्तरणे केव्हा तरी क्रमप्राप्तच होते. झाला एवढाच उशीर फार झाला.

हिंद सरकारने आपली फौज हैदराबादनजिकच्या सिकंदराबाद शहरी ठेवण्याचा निर्णय घेतला. हिंद सरकारने निझामाला त्याप्रमाणे कळविले. हिंदचे गव्हर्नर जनरल राजाजी यांनीही निझामाला असाच सल्ला दिला.

पण निझामचे अजून उत्तर नाही. निझामचा ताठा तसाच कायम आहे. निझाम काय उत्तर देणार हे न सांगताही कळण्यासारखे आहे. हैदराबादचे उपटसुंभ उपपंत-प्रधान श्री. रेड्डी यांनी याबाबत पूर्वीच आपले दात विचकले आहेत. हैदराबादी गुंड कासीम रझवी याची करतूत हैदराबाद कोणत्या वाटेवर आहे हे स्पष्टपणे सांगत आहे. पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री जाफरूल्लाखान यांनीही हिंदला धमकी देण्यास सुरुवात केली आहे.

पण आम्ही कोणाच्याही धमकीला भीक घालणार नाही. आमच्या मनगटात ताकत आहे आणि सत्य आमच्या बाजूला आहे. हैदराबादी प्रजेवर होणारे अन्याय आम्ही सहन करू शकत नाही. हैदराबादची प्रजा ही हिंदची प्रजा आहे. कुत्र्याने सिंहाचे कातडे पांघरल्याने तो सिंह होत नाही. एखाद्या जमीनदाराने राजसत्तेचा तोरा आणल्याने तो

राजा होत नाही.

पण हे साधेसुधे गणित निझामास उमगले नाही. स्वतःच्या जमीनदारीतील जनतेचे तर जाऊच द्या, पण आमच्या प्रदेशावरही हल्ले करण्याची त्याने तयारी दाखविली. हा अन्याय सहन करणे आम्हास शक्य नाही. आम्ही पुष्कळ सहनशीलता दाखविली. पण आमची सहनशीलता म्हणजे निझामाला आमचा कमकुवतपणा वाटला. निझामाचा त्रास वाढू लागला. शेवटी आम्हास आमचा फणा वर काढावा लागला. आमचे पंतप्रधान पं. नेहरू यांनी निझामाचे उत्तर येण्याची आम्ही वाट पाहणार नाही, 'We march' अशी निर्वाणीची घोषणा केली.

हैदराबादमधील अन्याय नाहीसा करण्याकरिता आमची फौज हैदराबादेत आगेकूच करणार आहे. आमचे शूर शिपाई आता निझामाला धडा शिकविणार आहेत. आता न्याय व नीती अन्यायाची गटडी वळणार आहेत.

थोडक्यात, अन्यायाचा नायनाट करण्याकरिता... We march. सरंजामशाहीची पाळेमुळे खणून काढण्याकरिता...We march. हैदराबादी आणि हिंदी प्रजेच्या रक्षणाकरिता... We march.

शूर हिंदी शिपायांनो, बेलाशक एक एक कदम, कूच करा. 'कदम कदम बढाये जाय' विजयश्री तुम्हालाच माळ घालील.

१६

गांधीजींच्या प्राणांचे मोल

२-१०-४८

आज गांधीजींचा जन्म-दिन. पण गांधीजी आमच्यात नाहीत. आज राष्ट्राचा उत्सव-दिन. पण ज्याचा उत्सव गेल्या आठवडाभर सारे राष्ट्र साजरा करीत आहे तोच आमच्यात नाही. गांधीजी गेले. त्यांना मरून उणे पुरे वर्षही झाले नाही. पण गांधीजींच्या बद्दल मनात विचार येताच गांधीजींना जाऊन युगे लोटल्याचा भास होतो. रामकृष्णादिकांच्या जीवनाच्या बाबतीत ज्या प्रकारची अद्‌भुतता मनास प्रतीत होते त्यापेक्षाही अधिक अद्‌भुतता गांधीजींच्या जीवनात आपणास दिसते. रामकृष्णादिकांना तर आपण ईश्वर कोटीत नेऊन बसविले आहे आणि चमत्कार हा ईश्वर कोटीचा नैसर्गिक धर्म आहे. पण गांधीजींना आपण मनुष्य कोटीतीलच समजतो. आणि त्यामुळेच त्यांच्या जीवनातील अद्‌भुतता मनात उदात्त संवेदना उत्पन्न केल्यावाचून राहात नाही. गांधीजींना देव बनवू नका असा जो इशारा हिंदचे गव्हर्नर जनरल चक्रवर्ती राजगोपालाचार्य यांनी दिला आहे यामागील रहस्यही हेच आहे.

गांधीजींच्या जीवनाचे जो जो आलोडन करावे तो तो त्यांच्या जीवनात एक नवीन अर्थ भरलेला दिसतो. त्यांच्या प्रत्येक वागण्यात त्यांनी ज्या तत्त्वांचा प्रसार केला त्या तत्त्वांचा नवनवीन आविष्कार होत असलेला दृग्गोचर होतो. मार्क्सवाद्यांकडून unity of theory and practice– विचाराचाराची एकता– या तत्त्वाचा फारच गाजावाजा करण्यात येतो. पण केवळ एकाच शब्दात सांगावयाचे म्हणजे विचार आचाराच्या एकतेचे चालतेबोलते स्वरूप म्हणजे गांधीजी होते. ते केवळ स्वतःच आपले विचार कृतीत

उतरविण्यासाठी झटले नाहीत. साऱ्या हिंदी समाजाने, नव्हे साऱ्या मानव समाजाने आपले विचार कृतीत उतरविण्याचा पुरेपूर प्रयत्न केला पाहिजे यासाठी ते सारे जीवनभर राबले आणि शेवटी एवढ्याच एका कार्याकरिता त्यांनी आपल्या प्राणाचेही मोल दिले.

गांधीजींचे विचार अत्यंत मूलगामी होते. त्यांच्या सत्य अहिंसेच्या तत्त्वाची गांधीजींच्या विरोधकांकडून जितकी हेटाळणी केली गेली तितकी क्वचितच एखाद्या तत्त्वद्रष्ट्याच्या तत्त्वांची झाली असेल, आणि गांधीजींच्या बकध्यानी भक्तांकडून या तत्त्वांना जितके विकृत स्वरूप देण्यात आले, तितके क्वचितच दुसऱ्या एखाद्या महापुरुषाच्या शिष्यांकडून झाले असेल. पण तरीही गांधीजींच्या सत्य–अहिंसा तत्त्वांची श्रेष्ठता अबाधित राहिली. नव्हे, अनंत वर्षांनी सुद्धा ती तशीच राहील. कारण सत्य आणि अहिंसा ही समाजजीवनाची मूलतत्त्वे होत. 'सत्य' या शब्दाचा अर्थच आपणांस बरोबर कळत नाही. 'सत्य' या शब्दाचा आपणांस एकच अर्थ माहीत आहे. सत्य म्हणजे खरे. 'खरे बोलणे'– Speaking the truth–या अर्थाने आपण या शब्दाचा प्रयोग करतो. पण सत्य या शब्दाचा एवढाच अर्थ नाही आणि हा मुख्य अर्थही नाही. "खरे बोलणे" हे साधन आहे. (खरे बोलू नये असे आम्हांस अभिप्रेत आहे असा गैरसमज निष्कारण करून घेऊ नये.) पण सत्य हे समाजजीवनाचे एक साध्य आहे असे आपण जेव्हा म्हणतो तेव्हा "सत्य" या शब्दाचा अर्थ "वास्तविकता" असा आहे. वास्तविकतेच्या विरुद्ध काल्पनिकता किंवा स्वप्नाळूपणा असा शब्दप्रयोग करता येईल. गांधीजींच्या जीवनाचे आणि त्यांच्या शिकवणीचे रहस्य हेच आहे की, आपल्या जीवनात वास्तविकता यावयास पाहिजे. 'वास्तविकते'च्या कसोटीवरूनच शेवटी 'खरे बोलणे' मूल्यवान (Valuable) ठरते. खोटे बोलणे समाजातील एखाद-दुसऱ्या घटकास जरी प्रसंगविशेषी फायदेशीर पडले तरी तो समाजाचा वास्तविक धर्म होऊ शकत नाही. जर समाजातील सर्वच घटक सदासर्वदा खोटे बोलण्याचे व्रत घ्यावयास लागतील तर समाजातील समाजत्वच ऱ्हास पावेल. समाजातील एखादा घटक जेव्हा खोटे बोलतो तेव्हा त्यालासुद्धा खरोखर खरे बोलण्याची चाड असते, सर्व समाजाने खोटे बोलणे त्याला पथ्यकर नसते. सर्व समाज खोटे बोलण्यास लागेल तर त्याचे खोटे बोलणे पचनी पडणार नाही.

अकबर-बिरबलाची एक गोष्ट सांगतात. राजाने एकदा शहरातील सर्व लोकांना एका हौदात एक एक गडवा दूध ओतण्यास सांगितले. दुसरे दिवशी राजा जेव्हा पाहावयास गेला तेव्हा हौदात केवळ पाणी होते. दुधाचा थेंबही नव्हता. कारण दूध टाकणाऱ्या प्रत्येक माणसाचे तर्कशास्त्र असे होते की, मी सोडून प्रत्येक जण दूध टाकेल. मग मी एक गडवाभर पाणी टाकल्याने काय होईल. तात्पर्य, असत्याच्या आश्रयाने असत्य टिकत नाही. असत्य टिकते व फोफावते तेही सत्याच्याच आश्रयाने. तेव्हा 'खरे बोलणे'

हाच समाजाचा वास्तविक धर्म होतो. वास्तविकता हा समाजाचा पायाभूत सिद्धान्त आहे, आणि खरे बोलणे हे या सिद्धान्ताचे साधन आहे. गांधीजींच्या जीवनाकडे दृष्टी टाकली तर ही वास्तविकता त्यांच्या जीवनात काठोकाठ भरलेली दिसून येते. साऱ्या समाजाच्या जीवनात ती यावी हीच गांधीजींची धडपड होती. गांधींच्या जीवनाचा आणि तत्त्वज्ञानाचा हाच एकमात्र संदेश होता.

जी गोष्ट 'सत्याबद्दल' तीच गोष्ट अहिंसेबद्दलही आहे. खरे बोलणे ज्याप्रमाणे केवळ साधनमात्र त्याप्रमाणेच शस्त्र वापरणे किंवा न वापरणे हेही साधनमात्रच. गांधीजींनी ते ओळखले होते. म्हणूनच इंग्रजांविरुद्ध निःशस्त्र प्रतिकार करावयास सांगणाऱ्या गांधीजींनी काश्मिरी जनतेस साहाय्य करण्याकरिता सैन्य पाठविण्याकरिता हरकत घेतली नाही. गांधीजींच्या वास्तविकतेची ही पुरेपूर कसोटी आहे. गांधीजींच्या 'सत्या'चा अर्थ हा ज्याप्रमाणे 'खरे बोलणे' यापेक्षा कितीतरी व्यापक आहे, त्याप्रमाणेच त्यांच्या अहिंसा या शब्दाचा अर्थही त्या शब्दाच्या सामान्य वाक्प्रचारापेक्षा अधिक व्यापक आहे. अहिंसेमध्ये समाजजीवनाचे सर्वस्व साठविले आहे. ज्या क्षणी समाजातील अहिंसा नाहीशी होते त्याच क्षणी एका समाजाचे दोन तुकडे झाल्यावाचून राहात नाहीत. आज जगाचे किंवा मानवी समाजाचे जे अनेक तुकडे झाले आहेत याचेही कारण हेच आहे की मानवी समाजातून अहिंसा पळून गेली आहे, आणि आजही लहानमोठे समाज 'समाज' या संज्ञेस पात्र आहेत याचेही कारण हेच आहे की, त्या त्या समाजाच्या कक्षेत अहिंसा कायम आहे. अहिंसा म्हणजे सहकार्य Co-operation. ज्या क्षणी कुटुंबातील सहकार्य नाहीसे होते, त्या क्षणी एका कुटुंबाची दोन कुटुंबे होतात. ज्या क्षणी समाजातील सहकार्य नाहीसे होते त्या क्षणी एका समाजाचे दोन समाज होतात. एका समाजाचे दोन समाज होऊ नयेत यासाठी गांधीजींची धडपड होती. नव्हे, सर्व समाजांचा एक समाज व्हावा हाच गांधीजींच्या जीवनाचा आणि तत्त्वज्ञानाचा संदेश होता आणि हेच त्यांच्या प्राणांचे मोल होते. The history of hitherto existing human society is the history of class struggle— आजपर्यंतचा मानवी समाजाचा इतिहास हा वर्गयुद्धाचा इतिहास आहे असे कार्ल मार्क्सने म्हटले आहे. गांधीजींना कार्ल मार्क्सचे म्हणणे खोटे आहे असे म्हणावयाचे नाही. पण त्यांचे म्हणणे एवढेच होते की, कार्ल मार्क्सने जे सांगितले ते पूर्ण सत्य नाही. समाजात अंतर्गत युद्ध जरूर असेल. पण ज्या अर्थी या अंतर्गत यादवीला तोंड देऊन समाज कायम राहिला आहे त्या अर्थी वर्गयुद्धाच्या तत्त्वापेक्षाही महत्त्वाचे असे सहकार्याचे तत्त्व समाजाचे नियंत्रण करीत असते. याच तत्त्वाच्या योगाने मानवी समाजाचे नियंत्रण व्हावे, जगातून युद्ध नाहीसे व्हावे, सर्वत्र मैत्री नांदावी, सर्वत्र आबादी आबाद व्हावी हाच गांधीजींच्या जीवनाचा आणि तत्त्वज्ञानाचा आदेश होता.

गांधीजी गेले. पण त्यांचा आदेश आजही कायम आहे. आज आपण स्वतंत्र आहोत. आपल्या राष्ट्राला जगाच्या शिरोभागी स्थान मिळवायचे आहे. आपल्याला आपली उन्नती करून घ्यावयाची आहे आणि जगाची उन्नती साधावयाची आहे. पण हे सर्व जर आपणांस करावयाचे असेल तर गांधीजींच्या जीवनाकडे आणि तत्त्वज्ञानाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. गांधीजींनी आपल्या प्राणांचे मोल देऊन ते तत्त्वज्ञान आपणांस शिकविले आहे, ही गांधीजींची शिकवण आता तरी आपण कृतीत आणावयास पाहिजे. तरच गांधीजींचे प्राण सार्थकी लागल्यासारखे होतील, आपला उत्कर्ष होईल, आणि आजचा उत्सव खऱ्या अर्थाने साजरा केल्यासारखे होईल.

जयहिंद!

गांधीजयंती १९४८

१७

समाजवाद्यांनो ! परत काँग्रेसमध्ये या

१-३-१९४९

आज समाजवादी पक्षाचे वार्षिक अधिवेशन पाटण्यास भरत आहे. गतवर्षी नाशिक येथे भरलेल्या समाजवादी पक्षाच्या अधिवेशनात समाजवाद्यांनी काँग्रेसमधून बाहेर पडण्याचा निश्चय केला आणि आपला स्वतंत्र पक्ष निर्माण करून काँग्रेसमधून राजीनामे देऊन समाजवादी बाहेर पडले.

राजकारण हे बुद्धिबळाच्या खेळासारखे आहे. त्यात नेहमीच उलटसुलट डाव टाकावे लागतात. प्याद्यांनाच नव्हे तर मोहऱ्यांनाही बळी द्यावे लागते. शत्रुपक्षीयांना कोंडीत पकडण्याच्या डावात अयशस्वी होऊन अंगावर डाव येत आहे असे दिसताच पवित्रे बदलावे लागतात आणि नवीन धोरण आखावे लागते. पुष्कळदा माणूस एक अंदाज बांधतो आणि त्याचा अंदाज चुकतो, त्या वेळी आपली चूक समजून ती सुधारण्यातच शहाणपणा असतो. उलट हट्टाने आपल्या चूक धोरणावरच अढळ राहण्यात सर्वस्वाचा नाश होण्याचा संभव असतो.

गतवर्षी नाशिकच्या अधिवेशनात समाजवाद्यांनी काँग्रेसमधून बाहेर पडण्याचा जेव्हा निर्णय घेतला तेव्हा त्यांनी देशाच्या परिस्थितीसंबंधी काही अंदाज केले. ब्रिटिश हिंदुस्थानातून निघून गेल्यामुळे आणि शांततेने स्वराज्य मिळाल्यामुळे देशात एक विशिष्ट परिस्थिती निर्माण झाली होती. कित्येक लोक हे स्वराज्यच नव्हे म्हणून म्हणत होते. यात दोन प्रकारचे लोक होते : (१) कट्टर हिंदुत्ववादी व (२) अस्सल कम्युनिस्ट. अर्थात या दोघांचीही असे म्हणण्याची कारणे भिन्न होती. काँग्रेसच्या हातात सत्ता

आल्यामुळे तेथेही पोटभेद उत्पन्न होऊ लागले होते. बरेच संधिसाधू सत्ताभिलाषेने शिंगे मोडून काँग्रेसमध्ये शिरू पाहात होते, व बहुजन समाजाच्या व लोकशाहीच्या नावाखाली त्यांची डाळ तेथे शिजू लागली होती.

सत्तेबरोबर अधोगती येतेच. याचा प्रत्यय काँग्रेसमध्ये पुरेपूर यावयास लागला होता. काँग्रेसची अनेक वर्षांची पुण्याई सहजासहजी आपल्या मालकीची करिता येते असे दिसताच काँग्रेसकडे लोकांची रीघ लागली. आणि अविचारवंत आणि ठोकळेबाज लोकांचा काँग्रेसमध्ये सुळसुळाट झाला.

स्वराज्य मिळाल्यानंतर जर सर्वप्रथम कोणती गोष्ट करावयास हवी असेल तर ती म्हणजे काँग्रेसचे विसर्जन आणि गांधीजींना हीच गोष्ट अभिप्रेत असावी. कारण ते सारखे म्हणत होते, काँग्रेसचे लोकसेवासंघात रूपांतर व्हावे. पण हातात आलेली पुण्याई क्षीण होईपर्यंत कोणी थोडीच सोडणार! अर्थात काँग्रेसमध्ये खऱ्या कळकळीच्या कार्यकर्त्यांपेक्षा सत्तालोलुप, भांडवलवादी, संधिसाधू लोकांचा सुळसुळाट होऊ लागला आणि कार्यकर्त्यांच्या मनात असंतोष निर्माण झाला. अशा कार्यकर्त्यांचे सुद्धा दोन भेद होते: (१) स्थितिवादी व (२) परिवर्तनवादी. स्थितिवादी बिचारे काँग्रेसमध्येच राहिले आणि परिवर्तनवादी काँग्रेसमधून बाहेर पडण्याची भाषा बोलू लागले. यात आणखी एका वर्गाची भर पडली. क्रांतीचा गांजा प्यालेले, विधायक वृत्तीशी सूत नसलेले, शारदीय मेघाप्रमाणे गर्जना करणारे, व थोडक्यात असंतोषावरच जीवन जगत असल्यामुळे आणि मिळालेल्या स्वराज्यात वर्णी न लागल्यामुळे असंतोषाचा कैफ चढलेलेही लोक होते. समाजवादी पक्षात जे लोक एकत्र झाले त्यांत मुख्यतः काँग्रेसमधील शुद्ध विचारसरणीचे परिवर्तनवादी कार्यकर्ते आणि क्रांतीचा कैफ चढलेले असे दोन्ही प्रकारचे लोक होते, आणि या लोकशाहीच्या काळात जेव्हा बहुमत मिळविण्यावरच सारी मदार असते तेव्हा या दोन्ही प्रकृतीची माणसे एकत्र यावीत यातही काहीच आश्चर्य नाही. समाजवादी पक्षाचे असेच झाले. सांगितल्याप्रमाणे प्रामाणिक परिवर्तनवादी व कोणत्या ना कोणत्या कारणामुळे चालू राजवटीबद्दल असंतुष्ट असलेले लोक एकत्र आले आणि त्याचा परिणाम समाजवादी पक्ष काँग्रेसमधून बाहेर पडण्यात झाला.

वास्तविक समाजवादी पक्ष म्हणजे काँग्रेसचे अपत्य. आजही काँग्रेसबद्दल जितकी आत्मीयता समाजवादी पक्षाच्या जुन्या नेत्यांना आहे तितकी क्वचितच दुसऱ्या कोणास असेल. कानपूरच्या अधिवेशनात सुद्धा काँग्रेसमधून बाहेर पडण्याच्या ठरावावर जेव्हा विचार करण्यात आला तेव्हा आचार्य नरेंद्र देवांसारख्या कसलेल्या समाजवादी नेत्यांनी त्याला कसून विरोध केला, आणि समाजवादी काँग्रेसमध्येच राहिले. पण नाशिकच्या अधिवेशनाच्या वेळी ही परिस्थिती बदलली होती. स्वराज्य मिळाले होते. स्वराज्य मिळण्यापूर्वी काँग्रेस आणि राष्ट्र यांचे अद्वैत होते. पण काँग्रेसच्या पुण्याईने स्वराज्य

मिळाल्यानंतर या पुण्याईचा उपयोग करून आणि काँग्रेसचे पक्षात रूपांतर करून तिच्या पुण्याईचा आपल्या सत्ताराजकारणाकरता उपयोग करण्याचा प्रयत्न काँग्रेसमधील एका गटाकडून होत होता, आणि त्यांना समाजवाद्यांचे काँग्रेसमधील अस्तित्व सलत होते. उलट समाजवादी गटातही काही लोकांना काँग्रेसचे स्थितिवादित्व सहन होत नव्हते, व हे नाहीसे करण्याकरिता स्वतंत्र पक्ष स्थापन करून त्याला देशातील कमीत कमी नंबर दोनचा बलशाली पक्ष बनविण्याची महत्त्वाकांक्षा समाजवाद्यांत उत्पन्न झाली. आणि त्याबरोबरच या पक्षाच्या भरवंशावर पुढील निवडणुकीत डोळ्यात भरण्यासारखे प्रतिनिधित्व संपादन करून आपला प्रभाव दाखविण्याचे प्रयत्न सुरू झाले.

पण स्वतंत्र पक्षाकरिता ज्या भूमिकेची गरज असते ती समाजवादी पक्षाजवळ नव्हतीच. एकतर त्यांचे संबंध काँग्रेसशी निगडित झालेले. त्यांची विचारसरणी काँग्रेससारखीच. कम्युनिस्टांसारखा असंतोषावर जोर द्यावा म्हणावे तर ज्या अतिरेकाला कम्युनिस्ट जाऊ शकतात त्या अतिरेकाला, प्रामाणिक असल्यामुळे, जाणे समाजवाद्यांना इष्ट वाटत नाही. समाजवादी पक्ष म्हणजे किसान मजुरांचा पक्ष. पण काही थोडीशी ठिकाणे सोडली तर समाजवादी पक्षाचा जनतेशी असा स्वतंत्र संबंध आलाच नव्हता. ज्या ज्या चळवळी समाजवाद्यांनी केल्या त्या त्या काँग्रेसकरिताच. जनतेला काँग्रेसचेच नाव माहीत. त्यामुळे स्वतंत्रपणे यांनी आपल्या पक्षगर्जना सुरू करिताच जनतेकडून त्यांना म्हणण्यासारखा पाठिंबा मिळाला नाही. असंतोषाची बीजे पेरून पाहिली. पण असंतोषाचे शस्त्र म्हणजे माकडाच्या हातचे कोलीत. एकदा जनतेत असंतोष पसरत चालला की कम्युनिस्टांना आयतेच फावते. कारण कम्युनिस्टांचे सारे अस्तित्वच असंतोषावर. आम्ही समाजवाद्यांपेक्षाही काकणभर सरसच आहोत, आणि आम्हास तुमच्या हिताची सर्वांत जास्त काळजी, असे कम्युनिस्टांना सहजच कामगारांना सांगता येते. त्यामुळे कामगारांना हळूहळू वश करण्यात त्यांना सहजच यश येते. शिवाय कम्युनिस्टांची चिकाटी फार. कोणताही एक कामगारसंघ काबीज केला की तेथे कम्युनिस्ट नेहमीकरिताच चिकटले. कम्युनिस्टांना एकदम बहुमताची घाई नाही. जेवढे मिळाले तेवढे आत्मसात केले, असे त्यांचे धोरण. शिवाय त्यांच्या पक्षाचे अस्तित्वही पुष्कळ वर्षांचे. शिवाय त्यांना रशियाचा पाठिंबा. त्यामुळे समाजवादी पक्षाची काँग्रेसच्या बरोबरीचा स्वतंत्र पक्ष होण्याची महत्त्वाकांक्षा फलद्रूप होऊ शकली नाही.

देशाच्या आखाड्यातील चौथा पक्ष म्हणजे हिंदुत्वनिष्ठ संघवाद्यांचा. देशाच्या फाळणीचा फायदा घेऊन आपल्या पक्षाला बलिष्ठ करण्याचा पद्धतशीर प्रयत्न या पक्षाने केला. जरी या पक्षाला सरकारने बेकायदेशीर ठरविले आहे तरी या पक्षाचे संघटन अत्यंत शिस्तबद्ध आहे. वास्तविक संघाची संघटना फासिस्ट प्रवृत्तीची आहे आणि फासिस्ट संघटनात विचारापेक्षा संघटनेवरच अधिक जोर द्यावा लागत असल्यामुळे संघटन

प्रभावशाली बनविण्याकरिता त्यांना 'धर्म संस्कृती' यांसारखे लोकांचे चित्त सहज हेरू शकतील असे मसालेदार पदार्थ वापरावे लागले व लागतात. या लोकांचे हिंदुत्व म्हणजे साधनमात्र. एकदा यांचा उद्देश साध्य झाला म्हणजे ते स्वतःच आपल्या हिंदुत्वाचे आणि संस्कृतीचे 'गणपती विसर्जन' करावयास कमी करणार नाहीत. आमच्या या म्हणण्याच्या पुष्टयर्थ फार लांब जावयास नको. हिंदुत्व हिंदुत्व करणाऱ्या या लोकांनी आजपर्यंत हिंदुत्वाकरिता 'कवायत आणि बौद्धिकाशिवाय' काही केले काय हे एकदा विचारून पाहण्यासारखे आहे. पण फासिस्ट संस्थांचे असेच असते. घोषवाक्य हे (Slogan) त्यांचे मुख्य साधन आणि त्या साधनाचा उपयोग पुरेपूर करून घ्यावयाचा हे यांचे ब्रीद. आणि आपल्या या कार्यात संघ चुकला नाही याबद्दल वास्तविक संघाची पाठच थोपटावयास पाहिजे. फासिस्ट वृत्ती, जुनी बुरसटलेली विचारसरणी, धार्मिक प्रवृत्ती, असुधारणावादी व संकुचित मनोवृत्ती, तीव्र राष्ट्रवाद (Gingoism), भांडवलवाद इत्यादी गोष्टी बहुधा एकत्रित राहतात. याच कारणामुळे काँग्रेससारख्या अनेक विचारांच्या माणसांची मोट बांधलेल्या संस्थेत सुद्धा संघाच्या विचारसरणीला पोषक अशी पुष्कळच माणसे सापडू शकतात. 'सत्तालोलुप गट' तर नेहमीच 'पानी तेरा रंग कैसा जिसमें मिलाया वैसा' अशा वृत्तीचा असल्यामुळे कोणत्याही विचारसरणीला सहज आत्मसात करू शकतो. याच कारणामुळे काँग्रेसमधील फार मोठा गट आज संघाला अनुकूल आहे हे नाकबूल करून चालणार नाही.

आज या चार पक्षांशिवाय आणखीही बहुजन समाजवादी पक्षासारखे पुष्कळच पक्ष आहेत. पण त्यांचे अस्तित्वच पुढील निवडणुकीसाठी असल्यामुळे त्यासंबंधी विचार करावयाचे कारण नाही.

तात्पर्य, आज देशात एकंदर चार पक्ष आहेत :(१) काँग्रेस (२) कम्युनिस्ट (३) रा. स्व. संघ व (४) समाजवादी पक्ष. पण देशात पक्ष जरी चार असले तरी मनोवृत्ती मात्र तीनच आहेत : (१) लोकशाहीप्रधान समाजवाद (२) फासिस्ट–भांडवलशाही आणि (३) कम्युनिस्ट. काँग्रेस या संस्थेत समाजवादी आणि फासिस्ट अशा दोन्ही मनोवृत्ती आढळतात. आणि जर समाजवादी काँग्रेसपासून फटकून वागू लागले तर त्यांच्या मनोवृत्तीशी एकरूप असलेला काँग्रेसमधील लोकशाहीवादी गट लंगडा पडेल आणि काँग्रेस भांडवलवाले आणि फासिस्ट यांच्या हातात जाईल. समाजवादी व कम्युनिस्ट यांचे मूळ तत्त्वज्ञान जरी एक असले तरी कम्युनिस्टांच्या तत्त्वज्ञानाची इमारत आणि समाजवाद्यांच्या विचारसरणीची इमारत निरनिराळ्या प्रकारची आहे. लोकशाहीचे आणि कम्युनिस्टांचे तर जन्मजात वाकडे आहे. आपल्या तत्त्वज्ञानाला 'शास्त्रीय' करिताना त्यांनी आपल्या पायाखालील शिडीच कापून टाकली आहे. पण तरीही समाजवादी कधी कधी कम्युनिस्टांच्या मार्गाने जातात आणि समाजवादी जेव्हा कम्युनिस्टांच्या मार्गाचा उपयोग

करतात तेव्हा एकतर त्यांना त्या मार्गावरून मध्येच परत फिरावे लागते किंवा त्यात ते तोंडघशी पडतात. काहीही झाले तरी फायदा कम्युनिस्टांचाच होतो, कारण अशा घटनात कम्युनिस्टांच्या बटव्यात काही लोक सापडतातच. हिंदुस्थानातील कम्युनिस्ट पार्टीचा इतिहास पाहिला तर त्यांची सारी शक्ती समाजवादी पक्षातूनच उत्पन्न झाली आहे असे दिसून येईल. जेथे पढलेल्या समाजवाद्यांची ही कथा, तेथे इतरांबद्दल बोलावयासच नको. नुकत्याच होऊ घातलेल्या रेल्वे संपाबद्दलही हेच म्हणता येईल. या वेळी संप करणे अयोग्य आहे हे समाजवाद्यांना माहीत होते आणि त्याप्रमाणे त्यांनी संप परतही घेतला. परंतु गेल्या कित्येक दिवसांतील घटनांचा फायदा कोणाला मिळाला ? कम्युनिस्टांनाच. तात्पर्य, समाजवादी जर कम्युनिस्टांच्या पावलावर पाऊल टाकून चालले तर त्याचा परिणाम समाजवादी कार्यकर्ते कम्युनिस्ट होण्यात होईल, आणि समाजवादी पुढारी केवळ नाममात्र पुढारी राहतील, आणि काँग्रेसमध्ये नवे विचार प्रेरण्याचे त्यांचे कार्यही नामशेष होईल.

आजचा काळ हा अत्यंत धामधुमीचा आहे. कम्युनिस्टांनी सर्वत्र बंडाळी करण्याचा चंग बांधला आहे. पटेल-नेहरूविरुद्ध बंड करू असाही इषारा प्रसिद्ध कम्युनिस्ट पुढारी रजनी पाम दत्त यांनी नुकताच दिला आहे. बंगालमध्ये तर कम्युनिस्टांचा हैदोस सुरू आहे. अशा वेळी काँग्रेसला पुरोगामी संस्था ठेवावयाची असेल तर समाजवाद्यांनी काँग्रेसशी सहकार्य केलेच पाहिजे. नव्हे त्यांनी परत काँग्रेसमध्ये यावयास पाहिजे. जर समाजवाद्यांनी असे केले नाही तर कम्युनिस्टांना शह देण्याच्या मिषाने काँग्रेस प्रतिगामी लोकांच्या हातात गेल्यावाचून राहणार नाही आणि मग समाजवाद्यांना नव्हे सर्वच पुरोगामी वृत्तीच्या लोकांना पस्तावे लागेल. हा सर्व प्रसंग टाळण्याकरिता, आणि कम्युनिस्टांच्या कारवायांना तोंड देण्याकरिता समाजवाद्यांनो ! परत काँग्रेसमध्ये या.

REFBK-0024933

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर

शुद्धिपत्र

	अशुद्ध	शुद्ध
पृष्ठ ४४ ओळ खालून ८	'मराठा समाजवाद'	'मराठा पुंजीवाद किंवा भांडवलवाद'
पृष्ठ ४५ ओळ वरून १०	राज्य पण आहे.	राज्य पण नको आहे.


उत्कर्ष
श्रीविद्या प्रकाशन